# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिांक ०६-१२-९१ ते ०४-०३-९२**

**रजि. क्र. ११**

**विषय:२२५/१४**

वार्ड क्र. ४४ मो. समता नगर येथे आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५५४२०/- चे सन १९८९-९० सालाच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून सदर अदाजपत्रकास मा. अयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२/९४०/९० दि. १४-९-९० व्दारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त द झाल्या होत्या त्यात तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९२% कमी दराची श्री. अन्सारी जी. एम. मुस्तबा यांची निविदा होती. सदर निविदेस स्थायी समिती ठराव क्र. ५३३ दि. ३०-३-९१ व्दारे मंजुरी मिळालेली असून संबंधीतास २% पत्रक देण्यात आले होते. तसेच सदर कामाचे दुसरे व तिसरे गुत्तेदाराशी चर्चा करण्यात आली असता दरसुची दर सन ८९-९० सालाचे असल्याने काम करण्यास नकार दिला असून अंदाजपत्रकीय दरात काम करण्यास तयारी दाखवलेली आहे. परंतु मा. आयुक्तांनी फेर निविदा मागविणेस्तव आदेश दिल्याने सदीर कामासाठी फेरनिविदा मागविल्या असता (दुसरी वेळ) दै. अजिंठा व आलमगीर टाईम्स या वर्तमानपत्रात जाहीरात देवून २०-७-९१ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता श्री. कैसरखान, गुत्तेदार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४०% फक्त एकच निविदा प्राप्त झाली मा. आयुक्त साहेबांच्या आदेशावरुन संबंधीत गुत्तेदारास दर कमी करण्याच्या अनुषंगाने वाटाघाटी करणेसाठी बोलवण्यात आले असता संबंधीताने ४०% जास्त ऐवजी ३०% जास्त दरानपे काम करण्यास संमती दर्शविलेली आहे. सन- ९०-९१ च्या दरसुचीनुसार हे काम ०.०९% जास्त दराचे होते. (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) या दरास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४४ मो. समतानगर येथे आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबतच्या कामासाठी प्राप्त झालेले एकमेव निविदा पत्रक गुत्तेदार श्री. कैसर खान यांचे ४०% जास्त दराचे होते परंतु गुत्तेदाराशी समक्ष वाटाघाटी नुसार सदरील काम ४०% जास्त ऐवजी ३०% जास्त दराने करुन देण्यास तयार झाले नुसार श्री. कैसरखान यांचे ३०% जास्त दराचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय: २२६/१५**

उप अभियंता, स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, फुलेनगर (हरसुल) स्लम भागात खडी रस्त्याचे काम करणेसा सां. बां. खात्याचे सन- ८९-९० चे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु ४१४१०/- चे तयार केले असून त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ७ (९१-९२) व्दारे स्थानिक वृत्तपत्र दै. देवगिरी तरुण भारत व दै. लोकधर्म मध्ये प्रसिध्दी देऊन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण दहा निविदा विकण्यात आल्या व निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

१) श्री. मोहमद सलीम - ०.२% कमी
२) श्री. बी. आर. आनंद - ४/- जास्त
३) श्री. रफिकुद्दीन - १२.७/. जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०२% कमी दराची श्री. मोहमंद सलिम यांची निविदा आहे प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

सदर प्रकरणी पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय:२२७/१६**

मा. उप आयुक्तांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही महानगरपालिका स्थापनेचा वर्धापन दिन साजरा करण्याचे योजिले आहे. त्या निमित्ताने आयोजित विविध उपक्रमासाठी अंदाजपत्रकात रु५०,०००/-ची तरतुद करण्यात आली आहे. तरी अर्थ संकल्पीय तरतुदीच्या अधिन राहुन प्रस्तावित कार्यक्रमास मान्यता देण्यात यावी.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे याही वर्षी महानगरपालिका स्थापनेचा वर्धापन दिन साजरा करणेसाठी व त्यानिमित्ताने आयोजित विविध उपक्रमांसाठी अंदाजपत्रकात करण्यात आलेली रक्कम रुपये-५०,०००/- या अर्थसंकल्पीय तरतुदीचे अधिन राहुन खर्च करण्यास व प्रस्तावित कार्यक्रमास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**विषय : २२८/१७**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, खुल्या बाजारातुन सिमेंट खरेदीस्तव सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कंपनीस कार्यालयाचे पत्रक क्र. ३५५/९१ दिनांक-१४-११-९१ व्दारे दरपत्रक मागविले असता त्यांनी दिनांक २२-११-९१ रोजी दरपत्रक देवून प्रति टन र. रु. १६४०/- प्रमाणे दर दिला होता परंतु त्यानंतर सी. सी. आय. कंपनीचे वरिष्ठ विक्री अधिकारी यांच्याशी दि २७-११-९१ रोजी दराबाबत मा. सभापती स्थायी सममिती, तसेच शहर अभियंता यांनी चर्चा केली असता त्यांनी पत्रक देणुन कळविले की, सिमेंटच्या दर हा र. रु. १६००/-प्रति मे. टन सिमेंटची ऑडर दिल्यास आणखी प्रतिटन रु. ४०/- ची सुट देण्यात येईल व ७५% अग्रीम धन तसेच २५% सिमेंटचा पुरवठा केल्यांनंतर बिलाची अदाई करावी असे कळविले आहे. १००० मे. टन खरेदीस प्रति टन रक्कम रु १५६०/- प्रमाणे एकूण-१५,६०,०००/- इतका खर्च येईल.

तसेच कंपनीच्या अटी खालील प्रमाणे आहेत.

१) सदरील सिमेंट हे महानगरपालिकेस रेल्वेस्टेशन गोडावून किंवा सि. सी. आय. गोडावून पासून महानगरपालिकच्या गोडाऊन पर्यत वाहतुक करावी लागेल.

२) सिंमेंटची रक्कम ७५% अग्रीम धन व २५% रक्कम पुर्ण पुरवठा झाल्यानंतर देण्यात याले या बाबत लेखी कळविले आहे.

३) संबंधीत कंपनीने सिमेंटच्या दराबाबतचही मुदत दि. ३०-११-९१ पर्यत बंधनकारक राहील असे नमुद केले आहे.

४) सिमेंटचा पुरवठा त्वरीत करण्यात येईल तरी सी. सी. आय सिमेंटच्या दरास व १००० मे. टन सिमेट खरेदीस तसेच रेल्वे स्टेशन ते मनपा गोडावून पर्यंत उपलब्ध वाहतुक ठेकेदारांमार्फत सिमेंट वाहतुक करणेचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खुल्या बाजारातुन सिमेंट खरेदी बाबत मे. सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीचे वरिष्ठ विक्री अधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार आणि संबंधीत कंपनीचे पत्रकातील-१ते ४ या अटीनुसार प्रति टन रु. १५६०/- या दराने १००० मे. टन सिमेंट खरेदी करण्यास र. रु १५,६०,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी

देण्यात येते तसेच खरेदी करण्यात येणा-या १००० मे. टन सिमेंटची रेल्वेस्टेशन ते मनपा गोडावून पर्यत उपलब्ध वाहतुक ठेकेदारामार्फत वाहतुक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय २९/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा येथील तिरुपती नगर अंतर्गत रोडचे खडी रस्त्याचे काम करणेसाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस. आर. दराने रक्कम रु. ४८७६७/- चे अंदाजपत्रकास दि ७-९-९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र (०८) १९९१-९२ व्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दिनांक- २३-९-९१ पर्यत एकूण (१४) चौदा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि. २६-९-९१ ला एकूण (४)चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १)श्री. कुलवंतसिंग | ०.१०%कमी दराने |
| २)श्री. नरेंद्रसिंग | ४% जास्त दराने |
| ३)श्री. मे. एस. एस. एच. असोशिएट | ५% जास्तदराने |
| ४)श्री. एस. ए. वहाऊद्यीन | ९% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१०% कमी दराचे श्री. कुलवंतसिंग यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील तिरुपतीनगर अंतर्गात रोडचे खडी रस्त्याचे काम करणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे श्री. कुलवंतसिंग यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय:२३०/१९**

ब्लॅक बोर्ड योजनेनुसार खालील स. सभासदांनी त्यांचे सन १९९०-९१ व १९९१-९२ या वर्षातील नगरसेवक स्वेच्छा निधीतुन त्यांचे प्रभागातील म. न. पा. शाळेच्या विद्यार्थ्याना अध्यापन (मुळाक्षरे) फिफसो फिकचर फन अँड लनर्प प्राणी संग्रह योजने अंतर्गतचे साहित्य वाटप करणे बाबत लेखी पत्रक दिले आहे.

| अ. क्र. | प्रभाग क्र. | सं. सभासदांचे नांव | स्वेच्छा निधीतुन खर्च करावयाची रक्कम- |
|---|---|---|---|
| १. | २८ | श्री. रमेश छापरवाल | रुपये- ५०,०००/- |
| २. | ३० | श्री. श्यिावाजी कवडे | रुपये- २५,०००/- |
| ३. | ४८ | डॉ. शांताराम काळे | रुपये- २५,०००/- |
| ४. | ५२ | श्री. आनंद गोडसे | रुपये- २५,०००/- |
| ५. | ५४ | श्री. राधाकृष्णा मोटे | रुपये- २५०००/- |

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, ब्लॅक बोर्ड योजनेनुसार मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांना अध्ययन व अध्यापन (मुळाक्षरे / फिकसो. फिकचर/ फन ॲन्ड लर्न प्राणी संग्रह) योजने अंतर्गत निम्न निर्दिष्ट स. सभसदांच्या प्रभागातील शाळांना संबंधीत सं. सभासदांचे सन १९९०-९१ व १९९१-९२ या वर्षातील नगरसेवक स्वेच्छा निधीतुन प्रभागासमोर दर्शविलेल्या रकमेचे साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | प्रभाग क्र. | सं सभासदांचे नांव | स्वेच्छा निधीतुन खर्च करावयाची रक्कम- |
|---|---|---|---|
| १. | २८ | श्री. रमेश छापरवाल | रुपये- ५०,०००/- |
| २. | ३० | श्री. शिवाजी कवडे | रुपये- २५,०००/- |
| ३. | ४८ | डॉ. शांताराम काळे | रुपये- २५,०००/- |
| ४. | ५२ | श्री. आनंद गोडसे | रुपये- २५,०००/- |
| ५. | ५४ | श्री. राधाकृष्ण मोटे | रुपये- २५०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती.
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक-६ डिसेंबर १९९१ रोजी भरलेल्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त शुक्रवार दिनांक - ६-१२-९१ रोजी दुपारी ३ = ४५ वाजता समिती सभागृहात विशेष स्थायी समितीस मा. सभापती श्री. मोहंमद इस्माईल अब्दूल करिम यांच्या अध्यक्षतेखाली सुरवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिका-यांसह खालील सं. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग
२) श्री. फैय्याजखान अहमदखान
३) श्री. अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. जावेद हसन खान कसीम हसन खान
५) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
६) श्री. बारवाल गजानन रामकिसन
७) श्री. सोनवणे केशव काशीनाथ
८) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र. २३१/७ :**

शहरातील स्वच्छतेबाबत चर्चा करणे.

**संवाद:**

**श्री गजानन बरवाल :** दै. लोकमत, दैनिक मराठवाडयासारख्या प्रसिध्द होणा-या वृत्तपत्रामध्ये महापालिकेच्या कारभारा विरुध्दच्या बातम्या नेहमीच प्रसिध्द होतात. नुकतीच भावसिंगपुरा, भिमपुरा भागातील स्वच्छता विषयक बातमी प्रसिध्द झाली आहे. अशा प्रकारे शहारातुन प्रसिध्द होणारे दैनिके महापालिका प्रशासन आणि नगरसेवकांना डिवचण्यासाठी अशाप्रकारच्या बातम्या देत असतात बसस्टँड, रेल्वेस्टेशन, अथवा शहरातील स्वच्छतेबाबत व साफसफाईबाबत वृत्त प्रसिध्द होत असते, रेल्वेस्टेशन ते प्रिन्ट्राव्हल येथील काम सुरु झाले आहे. याठिकाणी ड्रेनेज आणि पाणी पुरवठा लाईन एकाच ठिकाणी आहे. वार्ड क्र. ५१ मधील कच-याचे ढिग उचलल्यानंतर त्याठिकाणी गॅमैग्झीन पावडर टाकले जात नाही, नाल्याची साफसफाई योग्यप्रकारे होत नाही तसेच फिनेलचाही वापर केला जात नाही.

**विभागीय अधिकारी झोन क्र.६** झोन क्र ६. मध्ये सात स्विपर काम करतात या स्विपर कडुन ड्रेनेज चोकअप काढण्याचे काम केले जाते. झोन अंतर्गत असलेल्या गटारीवर फवारणी करण्यासाठी ६ ड्रम फिनेल आणि २० गोणी गॅमेग्झीन पावडर उपयोगात आणली आहे.वापरण्यात येणारी औषधी योग्यप्रकारे वापरली जाते किंवा नाही याबाबात पाहणी स्वच्छता निरिक्षक मार्फत केली जाते. तसेच संबंधीत स्विपरच्या सहयाही घेतल्या जातात झोन क्र. ६ मध्ये असलेल्या मुता-यांसाठी पाण्याची सोय नाही ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध होते. अशा ठिकाणी मुता-या साफ केल्या जातात व औषधी फवारली जाते.

**श्री. गजानन बारावाल:** विभागीय अधिका-याने सभागृहात केलेला खुलासा योग्य नाही. झोन क्र.६ मध्ये मुता-याची परिस्थिती योग्य नाही कोठेही औषधीचा वापर केला जात नाही.

**श्री. केशव सोनवणे, श्री गजानन बारवाल, श्री जावेद हसन खान :** झोन क्र. ६ मधील मुताऱ्यांची मिटींगनंतर प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी

**श्री. नारायण फत्तेलपकर:** मोंढा आणि शहागंज मंडी या भागाची साफसफाई महापालिकेकडे आहे काय? याबाबतच्या खुलासा व्हावा तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीकडे बाकी असलेला सहा लाख रुपये कर संबधीत संस्थेने भरणा केला काय? याचाही खुलासा व्हावा.

**विभागीय अधिकारी झोन क्र.३. मा. उप आयुक्त:** मोंढा हा भाग कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अंतर्गत आहे. परंतु कृषी उत्पन्न बाजार समिती या भागाची साफसफाई करत नसल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तेथील साफसफाई महापालिकेतर्फे केली जाते. सर्वसाधासरण सभेच्या मंजुरीनुसार कृषी उत्पन्न बाजार समितीवर विशेष साफसफाई कर लावण्यात आला आहे या प्रकरणी प्रथम प्रथम शासनाकडे आणि त्यानंतर न्यायालयाकडे प्रकरण दाखल करुन कमिटीने या कराबाबत मनाई हुकुम मिळविला आहे.

**श्री. अलीम बेग, श्री. नारायण फत्तेलष्कर :** मोंढा आणि शहागंज मार्केट हा भाग कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अंतर्गत असल्यामुळे नियमाप्रमाणे या भागाची साफसफाई करण्याचे काम बंद करण्यात यावे. झोन क्र.३ मध्ये १८ प्रभाग येतात यासाठी झोनकडे असलेला साफसफासई कर्मचारीवर्ग अपुरा पडतो. बरेच कर्मचारी घरी राहतात. काही डेलीवेजेस मजुर जवान म्हणुन काम करतात तर काही कर्मचारी अधिकाऱ्यांची कामे करतात मी सभागृहापुढे केलेले वरील विधाने जर खोटी आहे, हे सिध्द झाले तर मी राजीनामा देण्यास तयार आहे आणि वरील विधान सत्य निघाल्यास अधिका-यांनी या प्रकरणी राजीनाम द्यावा वस्तुतः सफाई कामगारांनी आठ तास काम केले पाहिजे. यासाठी प्रत्येक झोनला काम सुरु होण्याच्या वेळेस म्हणजेच सकाळी ५ वाजता भेट देणे आवश्यक आहे म्हणजे याबाबत सभागृहाची सत्यता पटेल.

**विभागीय अधिकारी झोन. क्र. ३:** विभाग क्र.३ मध्ये एकुण १५२ (सफाई कामगार जवान स्विपर इ.) कर्मचारी आहेत. यापैकी मोंढा भागासाठी ३३ कामगार आहेत. झोन क्र. ३ करिता आणखी ८४ कामगारांची आवश्यकता आहे.

**श्री गिरजाराम हाळनोर:** सफाई कामगारांची हजेरी निपयमाप्रमाणे कोणी घ्यावी वस्तुतः सफाई कामगारांच्या कामाची वेळ सकाळी ५ वाजता असतांना सुध्दा बरेचसे कामगार ७ वाजता कामावर येतात आणि काही ठिकाणी तर स्वच्छता निरिक्षक ऐवजी कामगारांची हजेरी कामगारातर्फेच घेतली जाते. त्या बाबत खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त:** स.सभासदांच्या सुचनेबाबत विभागीय आधिकाऱ्याकडुन प्रतिक्रीया विचारली असता खालील प्रमाणे माहिति प्राप्त झाली. अ) विभागीय कार्यालयाच्या अस्थेपनेवर नोंद असूनही कामावर न येणा-या कर्मचा-यांची संख्या खालील प्रमाणे.

झोन. क्र. १. १
झोन. क्र. २. २
झोन. क्र. ३. १

झोन. क्र. ४. २
झोन. क्र. ५. निरंक
झोन. क्र. ६. निरंक
ब) विभागीय कार्यालयाच्या अस्थानपनेवर असूनही कार्यालयात काम करणा-या कर्मचा-यांची संख्या
झोन. क्र. १. २
झोन. क्र. २. ३
झोन. क्र. ३. ३
झोन. क्र. ४. ३
झोन. क्र. ५. ३
झोन. क्र. ६. २

**मा उप आयुक्त :** अ. प्रमाणे जे कामगार काम करीत नसतील त्यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी तसेच जे कामगार मजुर आहेत पण ऑफीसमध्ये काम करतात किंवा अधिका-यांच्या घरी काम करतात अशा विभागीय कार्यालयाच्या अस्थापनेवरील कामगारांबाबत विभागीय अधिका-यांनी गोपनिय पध्दतीने माहिती तयार करुन दाखल करावी त्यांनंतर ट्रेडीशनल माहिती वगळुन बाकी बाकी कामगारांबाबतची माहिती. सं. सभासदांना दिली जाईल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर:** महापालिकेचे जवळ जवळ १०० च्या वर कामगार कामावर न येता घरी बसून असतात. घरी बसून असलेले हे कामगार कामावर आले तर शहराची सफाई बरोबर होईल. या बाबत मा. सभापती आणि मा. उप आयुक्त यांनी विभागीय कार्यालयास भेट दयावी.

**मा. उप आयुक्त:** सं. सभासदांच्या सुचनेप्रामाणे झोनध्ये काम करणाऱ्या कर्मचा-याबाबत विभागावर माहिती खालीप्रमाणे.

| झोन. क्र. | गैरहजर निलंबीत अन्य कारणामुळे कामावर नसलेले कर्मचारी. | कार्यालयाच्या अस्थापनेवरील एकूण संख्या | अस्थापना-२ नुसार एकूण संख्या |
|---|---|---|---|
| १. | १ | १५८ | १९१ |
| २. | २ | १५८ | १९८ |
| ३. | २ | १५२ | २०० |
| ४. | २ | १३३ | १६५ |
| ५. | ३ | ३२ | ४२ |
| ६. | (४ नि.+ १ गै . ह ) | ९० | १०२ |

विभागीय अधिका-यांनी झोनच्या अस्थापनेवरील कामगार आणि इतर विभागात वर्ग करण्यात आलेले कामगार त्याबाबतची माहिती तयार करुन घ्यावी.

**सहाय्यक- आयुक्त- १ :** प्रशासनातार्फे एका परिपत्रकाव्दारे सर्व शाखा प्रमुखांकडुन त्यांचे विभागात काम करणा-या कर्मचा-यांची आणि कामाचे आवश्यकतेनुसार आवश्यक असलेल्या कर्मचा-यांची माहिती मागविण्यात आली आहे.

**मा. उप आयुक्त:** सहाय्यक आयुक्त यांनी नियुक्त सफाई कामगारांपैकी किती कामगार शिक्षण/उद्यान/ आरोग्य या सारख्या विभागात वर्ग करण्यात आले आहेत या बाबतची माहिती तयार करावी.

**श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. अलीम बेग:** झोन मध्ये काम करणा-या कामगारांपैकी काही कामगार घरी राहतात आणि त्यांचे ऐवजी रुनपये- ४००/- वर पर्यायी मजुर कामास लावतात. यापैकी शारीरिक व्यंग अथवा इतर कारणासाठी पर्यायी कामगार लावला असेल तर असे कर्मचारी वगळून बाकीच्या कामगारांवर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर:** झोनमध्ये काम करणा-या कामगारांना प्रशासनातर्फे ओळखपत्र देण्यात आली आहेत काय? असतील तर या कर्मचा-यांनी कामाचे वेळी स्वत:चे ओळखपत्र जवळ बाळगावयास हेवे म्हणजे तपासणीच्या वेळी तोच कामगार कामावर आहे काय पाहता येईल.

**मा. उप आयुक्त :** सहाय्यक आयुक्त यांनी वरील दोन्ही प्रकरणाबाबत आवश्यक ते परीपत्रक काढावे.

**श्री. जावेदहसन खाँ, श्री. गजानन बारवाल :** औरंगाबाद शहरात मोठया प्रमाणावर नाले आहेत. या नाल्यामध्ये वाहात येणारी घाण साचून असते, तेंव्हा अशाप्रकारे साचलेली घाण ४/८ दिवसांनी साफ व्हावयास पाहिजे. पण ती साफ केली जात नाही. त्यामुळे नजिकच्या नागरीकांना त्याचा त्रास होतो काही नाल्यावर महापालिकेतर्फे इमारती बांधण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे ही नाल्याची साफसफाई न होता अधिक घाण साचते. नाल्यावर इमारत उभारण्याबाबत संबंधीताशी झालेल्या करारानुसार संबंधीत इमारत धारकांनी नाल्याची साफसफाई करावी अशी अट आहे. या बाबतचे पत्रक मा. सभागृहानेता यांनी दिलेले आहे.

**विभागीय अधिकारी. क्र. २ :** नाल्याचे साफसफाई प्रकरणी स्थळ पाहणी करत असतांना वरील प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावेळी माजी आयुक्त यांनी याकडे लक्ष देऊ नका अशा सुचना दिल्या आहेत.

**मा. उप. आयुक्त:** उप अभियंता जलनि: साधारण यांनी नाल्यावरील जमिनी लिजने देतांना झालेल्या कराराबाबत मालमत्ता अधिकारी यांचेकडून सविस्तर माहिती घेऊन विधी सल्लागार यांचे मार्गदर्शनाखाली कार्यवाही करावी.

**श्री. गजानन बारवाल:** मलेरिया विभागाचे कामासाठी नियुक्त झालेले काही कर्मचारी कार्यालयामध्ये काम करतात अशी माहिती मिळाली आहे. हे खरे आहे काय?

**आरोग्य वैद्यकिय अधिकारी :** सं. सभासदांनी विचालेली माहिती खरी आहे. पण या कर्मचा-याचे बदल्यात दुसरे अन्य कर्मचारी प्रशासनातर्फे मिळाले आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. हावेद हसन खान, श्री. केशव सोनवणे :**शहरातील नाल्याच्या बाजुस बेशरम कॉंग्रेस गवत अशा प्रकारचे अनावश्यक वनस्पतीची वाढ होते. त्यातच आजुबाजुचे नागरीक केरकचरा आणि अन्यप्रकारचे निकामी वस्तू या ठिकाणी आणुन टाकतात. त्यामुळे अशा नाल्यातुन घाण पाणी वाहून जाण्यास मज्जाव होता. पर्यायाने दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव वाढतो. तेव्हा नाल्यातील घाणपाणी नियमीत वाहुन जाण्याच्या दृष्टीने नाल्याभोवती वाढलेले बेसरम/कॉंग्रेस गवत वाढणे आणि नाला साफ करणेसाठी विशेष कार्यक्रम मोहीम हाती घेण्यात येत होती. अशी माहिती मिळाली आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** सं. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे पावसाळया पुर्वी शहरातील नाल्याभोवती असलेले बेसरम/कॉंग्रेस गवत काढणे आणि नाल्याची साफसफाई करुन नाल्यातील पाणी सुलभतेने वाहून जाण्याचे दृष्टीने विशेष

कार्यक्रम मोहीम हाती घेण्यात येत होती. परंतु त्यासाठी लागणारा खर्च लक्षात घेता कायम उपाय म्हणून नाल्याची पिचींग करावी लागेल.

**श्री. अलीम बेग:** आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे शहरातील नाल्याचे पिचींग करण्यासाठी दरवर्षीच्या अंदाजपत्रकात या कामासाठी एक कोटी रु. खर्चाची तरतुद केल्यास येत्या ४/५ वर्षात सर्व नाल्याची पिचींग होईल. असे वाटते आणि पर्यायाने दरवर्षी लागणारा खर्च व्यर्थ जाणार नाही.

**मा. सभापती:** शहरातील नाल्यावर ज्या ज्या ठिकाणी इमारती उभारल्या आहेत अशा नाल्यांच्या साफसफाईसाठी मोंढा, मुंबई, बसस्टॅड, रेल्वेस्टेशन यावर ज्याप्रमाणे विशेष साफसफाई कर आकारला जातो त्याप्रमाणे नाल्यावर इमारती उभारलेल्या संबंधीताकडून अशाप्रकारचा विशेष साफसफाई कर आकारण्यात यावा तसेच शहरातील बहुतांश नाल्यामध्ये ड्रेनेजचे पाणी वाहत असते याबाबत कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

**मा. कार्यकारी अभियंता:** शहा कन्सल्टेन्ट यांचे अहवालप्रमाणे गणेश कॉलनी कडुन बस स्टँड पर्यत नाल्यावर ६०० मी मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. यासाठी पूर्वीचे ३०० मी मी व्यासाची ड्रेनेज लाईन आहे. तसेच जाफर गेट येथुन श्रीमान श्रीमती मार्गे बसस्टँडकडे येणा-या नाल्यात ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी दरपत्रके मागविण्यात आली आहेत.

**मा. सभापती :** शहराची जलनिः सारणाची एकूण मागणी लोकसंख्या आणि यापुढे लोकसंख्येत होणारी संभाव्य वाढ लक्षात घेऊन अस्तित्वात असलेल्या जलनिःसारण वाहिनी टाकण्याऐवजी आवश्यकतेनुसार एकच मोठया व्यासाची लाईन टाकण्याबाबंबत कार्यकारी अभियंता यानी कार्यवाही करीवी.

**श्री. गिरजाराम हाळनोर:** वार्ड क्र. ५७ मध्ये आवश्यकतेपेक्षा कचरा कुंडयाची संख्या फारच कमी आहे. यासाठी मागील तीन वर्षापासून सतत मागणी करण्यात येत आहे. यासाठी मागील तीन वर्षापासून सतत मागणी करण्यात येत आहे. तेंव्हा या बाबत कुंडयाची खरेदी झाली नाही काय? ज्योतीनगर भागात कचरा कुडयांची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच तसेच आवश्यकता असलेल्या इतर भागाची माहितीही झोन क्र. ६ मध्ये कळविण्यात आले आहे.

**श्री. अलीम बेग:** प्रत्येक वार्डात ८/८ दिवस कचरा पडून असतो. काही भागात तर कच-याचे मोठमोठे ढिग पडून आहे. ही बाब लक्षात घेता कचरा उचलण्यासाठी अपुरा असलेला कामगार वर्ग लक्षात घेता टेंडर मागविण्यात यावे विशेषतः नव्याने अस्तित्वात येणा-या वसाहतीत हा प्रश्न मोठया प्रमाणात भेडसावतो या भागातील साफसफाई वेळेवर होत नाही तेंव्हा टेंडर पध्दतीने कचरा उचलण्यात यावा.

यापध्दतीने ज्या भागातील कचरा टेंडर पध्दतीने उचलण्यात येत आहे. कचरा टेंडर पध्दतीने उचलण्यात येत आहे. त्या भागातील कामगार दुस-या भागात नेमून त्या भागाचीही सफाई करुन घेण्यात येईल. अशा रितीने शहरातील कचरा उचलण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी इंदिरानगर,संजय नगर या सारख्या भागात बरेच दिवस कचरा उचलल्या जात नाही.

**श्री. गजानन बारवाल:** झोन. क्र. ६ मध्ये कचरा उचलण्यासाठी देण्यात आलेले वाहन लहान आहे. या भागात असलेल्या कचरा कुंडयाच्या मानाने झोन.क्र. ६ कडे

असलेले वाहन कचरा उचलण्याचे काम करु शकत नाही. आजही वार्ड क्र ५१ चे काही भागात २५/२५ ट्रक कचरा पडून आहे ही बाब लक्षात घेता सं. सभासदाचे सुचनेप्रमाणे टेन्डर पध्दतीने शहरातील कचरा उचलण्यात यावा.

**मा. उप आयुक्त:** सं. सभासदांच्या सुचनेप्रमाणे टेंडर पध्दतीने कचरा उचलण्यात ब-याच अडचणी आहेत. अशाप्रकारे कचरा उचलण्यासाठी टेंडर मागविल्यास संबंधीत अर्धी गाडी भरुन कचरा उचलतील आणि पूर्ण गाडीचे पैशाची मागणी करतील तसेच इतर अडचणी आहेत.

**विभागीय अधिकारी-३:** कचरा उचलणा-या ट्रकसाठी आवश्यकतेनुसार मजूर वाढवून दिल्यास कचरा उचलण्याचा अभियान हाती घेऊन कचरा उचल्याचे काम करण्यात येईल.

**मा. सभापती:** यापूर्वी महापालिकेची एखादी ट्रक बंद असेल तर अशावेळी सकाळ पाळीचे वाहन चालकाने दुपार पाळीत दुस-या झोनची गाडी घेऊन कचरा उचलण्याचे काम करावे अशी पध्दत सुरु करण्यात आली आहे. तेंव्हाही पध्दत आमलात आणता येत नाही काय ?

**श्री. अलीम बेग :** संजयनगर भागातील नालीमध्ये ड्रेनेज लाईन सोडण्यात आली आहे. याशिवाय तेथील नागरीक नालीमध्ये कचरा टाकतात त्यामुळे नालीतुन वाहणा-या पाण्यास अडथळा निर्माण होत आहे. या बाबत संबधीत विभागास लेखी पत्रही देण्यात आले आहे.

**मा. उप आयुक्त:** विभागीय कार्यालयातुन गैरहजर राहणा-या कामगारांचे प्रमाण लक्षात घेता आणि कामाचे निकडीनुसार विभागीय कार्यालयाकडून कामागारांची मागणी करण्यात आली. तर उपलब्धतेनुसार कमी अधिक प्रमाणात संबंधीत विभागीय कार्यालयास कागार पुरविण्याची व्यवस्था करण्यात येते. तसेच दैनिक वेतनावर काम करणा-या कामगारांची यादी सर्व विभागीय अधिका-याकडे देण्यात आली असून एखादा कामगार गैरहजर असल्यास त्या कामगाराचे जागी यादीतील कामगार दैनिक वेतनावर घेण्याचे अधिकार विभागीय अधिका-यांना देण्यात आले आहेत. या पुढे ही ही पध्दत कार्यरत राहील. तेव्हा विभागीय अधिका-यांनी वरील प्रमाणे कार्यवाही करुन झोनमधील स्वच्छतेचे काम करुन घ्यावे व त्याबाबतचा अहवाल दाखल करावा .

**श्री. नारायण फत्तेलष्कर:** दैनिक वेतनावर कामगार लावण्याचा प्रश्न प्रशासनाने तुर्त बाजुला ठेवावा. प्रथम जे कायम १०० कामगार गैरहजर आहेत त्याबाबत काय निर्णय घेण्यात आला याचा खुलासा करावा किंवा त्यावर चर्चा करावी नसता या कामगारा बाबतची यादी मी देतो. त्याबाबत अधिका-यांची राजीनामा द्यावा काही कामगार त्यांच्या मूळ पदावर काम करत असतांनाचा सेवा निवृत्त होण्याची वेळ आली आहे पण त्यांना अद्याप पदोन्नती मिळाली नाही आणि जे कामगार कामावर येवून काही काळ झाला नाही तर त्यांना जवान म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे विभागीय कार्यालयात काम करणा-या कामगारांना ओळखपत्र आणि फोटोसह बिल्ला देण्यात यावा. म्हणजे मुळ कामगारच कामावर आहे. याची खात्री पटेल.

**श्री. अलीम बेग :** स्वच्छता निरिक्षक श्री. टाक यांचेकडे एकूण २३/२४ मोहल्ल्याच्या साफसफाईचे काम आहे. या मोहल्ल्यातील साफसफाईसाठी दोन ट्रक देण्यात आले आहेत. या ट्रकवर काम करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या

कामगरांपैकी ८/९ कामगार लागतात मुळातच अस्तित्वात असले त्या कामगारांची संख्या कमी असल्याने या २३/२४ मोहल्ल्याची साफसफाई कमी करता येईल याबाबीचा विचार करता संबंधीताकडे दैनिक वेतनाचे कामगार देण्यात यावेत.

**श्री. केशव सोनवणे:** संजयनगर भागात रुपये २ लाख ८५ हजार खर्चाचे गटार बांधण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या गटारीचे बांधकाम करतांना दोन्ही टोकास बांधकाम करुन मधला भाग अर्धवट सोडून देण्यात आला आहे. या परिस्थितीचा फायदा घेऊन नागरीकांनी गटारीवर घरे बांधले आहेत. तेव्हा अशा परिस्थितीत हे काम कसे पुर्ण केले जाणार याचा खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** सं. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे संजयनगर भागात गटारीवर करण्यात आलेले बांधकाम एकवेळेस पाडण्यात आलेले आहे. संबंधीत विभागाचे उप अभियंता यांनी यानंतर काम पुर्ण न केल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. तेव्हा अतिरिक्त शहर अभियंता यांनी पुन्हा पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. गजानन बारवाल:** झोन. क्र. ६ ला भेट दिली असता त्याठिकाणी काही कामगार बसून असल्याचे निदर्शनास आले. याबाबत चौकशी केली असता सदर कामगार ट्रकवर कचरा भरण्याचे काम करणारे असून, या झोन करीता देण्यात आलेल्या ट्रकचा फॅन तुटल्यामुळे ट्रक आली नाही. अशी माहिती मिळाली फॅन बेल्ट ही शुल्लकबाब असून सर्व वाहनामध्ये अतिरिक्त फॅनबेल्ट असतात, तेंव्हा महापालिकेच्या सर्व वाहनांमध्ये अतिरिक्त फॅनबेल्ट देण्यात यावे. म्हणजे किरकोळ कारणासाठी गाडी बंद राहणार नाही. आणि पर्यायाने साफसफाईचे कामगार व्यत्यय येणार नाही.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहराचे काही भागात अरुंद गटारी आहेत. या गटरचि साफसफाई साठी आवश्यक त्या मापाचे पावडे विभागीय कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे या अरुंद गटारीची सफाई होत नाही. तेव्हा अशा अरुंद गटारिच्या सफाईसाठी आवश्यकते नुसार पावडे पुरविण्यात यावे. (उदा. फुलेनगर, चौसरनगर)

**श्री. गजानन बारवाल :** रेल्वेस्टेशन ते प्रिन्ट्राव्हल या मेनरोडवरील ड्रेनेज लाईनवर पदमपुरा येथे कॅचबिट तयार करण्यात आले असून त्याठिकाणी जाळी बसविण्यात आली आहे. या जाळीवर घाण साचते अशावेळी जाळी काढून साचलेली घाण ड्रेनेजलाईनमध्ये सोडण्यात येते. आणि पर्यायाने ड्रेनेज लाईन चोकअप होते.

**श्री.गिरजाराम हाळनोर:** सं. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे भिमपुरा भागातही अशाच प्रकारच्या कारणांमुळे ड्रेनेज लाईन चोकअप होते.

**उप अभियंता, जलनिः सारण, श्री. एकबालसिंग गिल:** सं. सभासदांनी सुचविलेल्या भागाची पाहणी करुन कार्यवाही करण्यात येईल. भडकलगेट येथील ड्रेनेज लाईन फुटून घाण पाणी गेल्या एक दिड महिन्यापासून रस्त्यावर वाहत आहे. त्यामुळे त्या भागातील रहदारीस अडचण निर्माण झाली आहे.

**उप अभियंता जलनिः सारण:** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिः सारण मंडळाचे कामाचे वेळी सदर ड्रेनेज लाईन नादुरुस्त झाली असून, नादुरुस्त झालेली ड्रेनेज लाईन दुरुस्त करण्याचे काम येत्या सोमवारपासुन चालू करण्यात येईल. असे पत्र

संबंधीत विभागाने दिले आहे. या पत्रानुसारही येत्या सोमवारपासुन दुरुस्तीचे काम सुरु न झाल्यास महापालिके तर्फे चालु करण्यात येईल.

**मा. सभापती** : झोन. क्र.२ मधील वसंत भुवन या इमारतीचे सांडपाणी ड्रेनेज लाईन मधुन वाहुन जात नाही. तसेच या इमारतीमध्ये असलेल्या संडास, मुतारी मध्ये फिनेलचा वापर केला जात नाही. महापालिकेच्या इमारतीत ही परिस्थिती तर शहराची काय परिस्थिती असेल याचा विचार करणेच बरे तेंव्हा संबंधीत विभागीय अधिका-यांनी या पुढे अशी परिस्थिती दिसु नये यांची दक्षता घ्यावी.

**विभागीय अधिकारी झोन. क्र. ७ :** अस्तित्वात असलेल्या मुता-या आणि संडास (सार्वजनिक) हे सकाळी ६ ते ७ या दरम्यान साफ केले जातात. परंतु या वेळेनंतर या सार्वजनिक संडास व मुता-याचा वापर केला जातो. म्हणुन अशा ठिकाणी घाण वास येतो.

**विभागीय अधिकारी झोन. २ :** वसंत भुवन या इमारतीमध्ये असलेल्या शाळेच्या भागात फिनेलचा वापर केला जात नाही. इतर ठिकाणच्या संडास व मुता-या करीता फिनेल वापरले जाते. या इमारतीचे संडास व मुतारी ड्रेनेजला जोडलेली नाही. त्यामुळे दुर्गंधी येते.

**मा. सभापती** : १) उप अभियंता जलनि: सारण यांनी येत्या दोन दिवसात याबाबतची माहिती घेऊन शक्यता लवकर ड्रेनेज लाईन चालु करण्याची कार्यवाही करावी.

२) शहरातील नाल्यावर ज्या इमारती बांध्ण्यात आल्या आहेत. त्याबाबत संबंधीतांशी झालेल्या कराराची पाहणी करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी व संबधीतावर विशेष साफसफाई कर लावण्यात यावा.

३) साफसफाईचे कामासाठी सध्या अस्तित्वात असलेला वाहने कमी पडत आहे तेंव्हा नविन वाहन खरेदी बाबत संबंधीत विभागाने त्वरीत कार्यवाही करुन वाहने खरेदी करावी.

४) शहराच्या नाल्यातुन टाकण्यात येणा-या ड्रेनेज लाईनवर अस्तीत्वात असलेली लोकसंख्या, अगामी काळात लोकसंख्येत होणारी वाढ, ड्रेनेज लाईनमधुन वाहणारा फलो याबाबत पाहणी करुन नविन ड्रेनेज लाईन टाकण्याबाबत कार्यकारी अभिंयंता यांनी वैयक्तिक मत द्यावे.

५) विभागीय अधिका-यांनी ज्या ठरावीक कामासाठी दैनिकवेतनावर कामगार लावण्यात आले आहे अशा कामगाराकडुन ज्या ज्या कामासाठी दैनिक वेतनावर कामगार लावण्याची मागणी केली आहे. तेच काम करुन घ्यावे. तसेच एखाद्या मुख्य कामासाठी त्याबाबतचे कारण नमुद करावे

६) शहरातील ज्या नालीचे सांडपाणी ड्रेनेजला जोडले आहे. अशा भागाची पाहणी करुन ज्या ठिकाणी नालीचे सांडपाणी ड्रेनेजला जोडले आहे ते बंद करावे. बंद करण्याची व्यवस्था उप अभियंता जलनि:सारण यांनी करावी.

७) सर्व कामगारांनी ओळखपत्र सोबत बाळगावे.

**मा. उप आयुक्त** : शहरातील साफसफाईचे कामात सुसुत्रता यावी या दृष्टीने विभागीय कार्यालयाच्या स्वच्छता विषयक पाहणीसाठी प्रशासनातार्फे लायझन ऑफिसरची नेमणुक करण्यात आली आहे. अशा लायझन ऑफिसरने स्वच्छतेबाबत संबंधीत विभागीय अधिका-यास काही सुचना दिल्यास विभागीय अधिकारी त्या सुचनाची अंमलबजावणी करत नाही अशी माहिती

मिळाली आहे. नियुक्त करण्यात आलेल्या लायझन ऑफिसर यांना प्रशासनातर्फे नियुक्ती देण्यात आली असल्यामुळे मा. आयुक्त यांना जे अधिकार प्राप्त आहेत ते अधिकार लायझन ऑफिसरला प्राप्त आहेत. तेव्हा लायझन ऑफिसर यांनी दिलेल्या सुचनांची अमलबजावणी करण्यात यावी. अन्यतः संबधीतावर लायझन ऑफिसर यांचकडुन अहवाल प्राप्त झाल्यास त्या विभागाचे विभागीय अधिकारी यांचेवर कार्यवाही केली जाईल

२) शहरात साचलेला कचरा लवकर उचलण्याच्या दृष्टीने सध्या कार्यरत असलेली वाहने सकाळ व दुपार अशा दोन पाळीत चालविली जातील त्यासाठी वाहन चालकांना जादाकाम भत्ता देण्यात येईल.

३) भावसिंगपुरा, भिमपुरा भागासारखा प्रसंग उद्‌भवल्यास त्याबाबत संबंधीत विभागीय अधिका-यांनी सहाय्यक आयुक्त -२ यांचेकडे त्याबाबतचा सविस्तर अहवाल द्यावा व नियमाप्रमाणे काम करुन घ्यावे.

४) गैरहजर कामगारांचे जागी दैनिक वेतनावर दुस-या कामगाराची नियुक्ती करता यावी. यासाठी कार्यालयाकडे असलेली यादी विभागीय अधिकारी यांनी देण्यात आली आहे. विभागीय अधिका-यांनी या यादीनुसार गैरहजर कामगाराचे जागी दैनिक वेतनावर मजुर लावता येईल. दैनिक वेतनावर लावलेला मजुरही कामावर न आल्यास त्या जागी यादी नुसार दुसरा मजूर दैनिक वेतनावर लावण्यात यावा. तसेच विभागीय कार्यालयासाठी आवश्यक असलेल्या साहित्याबाबत भांडार विभागाकडे मागणी करावी.

५) विभागीय अधिकारी यांनी त्यांच्या झोनचे कक्षेत येणा-या सर्व संबंधीत नगरसेवकांचे तक्रारी बाबत रजिस्टर तयार ठेवावे. आणि त्या तक्रारी नुसार संबंधीत विभागास भेट देवून त्यापैकी किती कामे झाली आणि किती कामे बाकी आहेत याबाबतची माहिती आद्ययावत ठेवावी

६) विभागीय अधिका-यांनी त्यांच्या कक्षेतील झोनचा सर्व्हे करुन कोणत्या कामासाठी किती कामगार लागतील याची माहिती द्यावी. या माहितीनुसार प्रत्येक झोनकरीता किती कामगारांची आवश्यकता आहे. याची माहिती घेतली जाईल. या कामासाठी दोन विभागीय अधिकारी यांचा समावेश असलेली एक उपसमिती कायम करण्यात येईल.

**श्री. गजानन बारवाल :** मा. आयुक्त यांनी सुचविल्याप्रमाणे कचरा उचलण्यासाठी सकाळ व दुपार अशा दोन वेळात वाहने चालविण्यात येऊन वाहन चालकांना अतिरिक्त भत्ता देण्यात येईल. असे सुचविले आहे. मिळालेल्या माहितीनुसार वाहन चालकाना प्रति तास दोन रुपयें अतिरिक्त भत्ता दिला जातो. तेव्हा दोन पाळीत काम करावयाचे झाल्यास वरील दराने वाहन चालक काम करतील काय याचा विचार घेणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : सं सभासदांनी सुचविल्याप्रमाणे जर प्रति तास रुपये दोन याप्रमाणे अतिरिक्त कामाचे भत्ता दरेण्यात येत असेल तर तो फारच कमी आहे. तेंव्हा अतिरिक्त कामाचा दर वाढवून देण्यात यावा.

**मा. उप आयुक्त :** माझे माहिती प्रमाणे अतिरिक्त कामासांठी प्रति तास रुपये चार असा दर असावा तरीपण शासकीय नियमाप्रमाणे अतिरिक्त भत्ता देण्यात येईल.

**मा. सभापती** : झोन क्र. ६ येथील कोंडवाडयाच्या वाचमन रुममध्ये एक स्त्री कामगार राहते आणि या कोंडवाडयाचे कामावर असलेला वॉचमन बाहेर झोपतो अशी माहीती मिळाली आहे. हे योग्य नाही कोंडवाडयाच्या ठिकाणी असलेली रुम

ही या ठिकाणी काम करणा-या वॉचमनसाठी असते तेंव्हा या कोंडवाडयाच्या रुममध्ये राहत असलेल्या स्त्री कामगार यांचेकडुन ती रुम रिकामी करुन घेऊन वॉचमनला देण्यात यावी.

**विभागीय अधिकारी झोन. क्र.६ :** झोन. क्र.६ येथील कोंडवाडा येथे वॉचमन म्हणून यापुर्वी काम करणारा कामगार वारला असून त्यांची पत्नी सध्या त्या ठिकाणी राहत आहे. याशिवाय मयत वाचमनचे जागेवर त्यांचे पत्नीस महापालिकेत नोकरी देण्यात आली आहे सध्या काम करित असलेल्या वॉचमनला रुम उपलब्ध करुन देण्याबाबत मालमत्ता अधिकारी यांना पत्र देण्यात आले आहे. शहराचे साफसफाई बाबत सभागृहात झालेली चर्चा आणि त्याबाबत देण्यात आलेल्या सुचना याची संबधीत अधिका-यांनी अमलबजावणी करुन यापुढे स्वच्छेतेबाबात कुठल्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची काळजी घ्यावी व शहर स्वच्छ ठेवण्यास मदत करावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | सभापती स्थायी समिती. |
| औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद | औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक-१७ डिसेंबर १९९१ रोजी मा. सभापती श्री. मोहंमद इस्माईल अ. करीम यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ३. ०० वाजता समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरवात झाली या सभेस कार्यालयीन अधिका-यांसह निम्ननिर्दिष्ट सन्माननिय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग
२) श्री. फैय्याजखान अहेमदखान
३) श्री. अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. विजय गोविंदलाल पालीबाल
५) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
६) श्री. भगुरे तुळशीराम छगन
७) श्री. बारवाल गजानन रामकिसन
८) श्री. सोनवणे केशव काशीनाथ
९) श्री. गिरजाराम नानाराण घळनोर

**विषय : २३२/१ :**

विशेष स्थायी समिती सभा दि. १९-११-९१ तहकुब सभा दि. २७/११/९१ व दि. २८/११/९१ तसेच विशेष स्थायी समिती सभा दिनांक ६-१२-९१ चे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. अलीम बेग :** दिनांक ६-१२-९१ रोजी पारित झालेल्या स्वच्छता विषयक स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे शहरातील साफसफाईबाबत काय प्रगती झाली याबाबतचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : दिनांक ६-१२-९१ च्या सभेतील निर्णयानुसार झोन क्र. १/५/६ या विभागाकडुन कामगारांचे हजेरी बाबतची माहिती मिळाली आहे. झोन क्र. २/३/४ यांचेकडून कामगारांचे हजेरी बाबत माहिती मिळाली नाही.

**श्री. केशव सोनवणे, श्री. अलीम बेग :** दिनांक ६-१२-९१ च्या विशेष स्थायी समिती निर्णयाप्रमाणे ज्या विभागीय अधिका-याकडून कामगारांचे हजेरी ठिकाणाबाबत माहिती आली नाही त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात यावा.

**मा. सभापती** : विभागीय अधिकारी झोन क्र.२/३/४ यांचेकडुन सभागृहाचे नियामाप्रमाणे कामगारांचे हजेरी सेंटरबाबत माहित का पाठविली नाही याबाबतचा खुलासा मागविण्यात यावा.

**श्री. अलीम बेग :** शहरातील साचून असलेले कच-याचे ढिग उचलण्यासाठी विभागीय अधिका-यांनी समितीचे निर्णयानुसार ज्यादा कामगारांची मागणी करावी असा निर्णय झालेला असतांना मोंढा भागातील कचरा अद्याप उचलला गेला नाही याबाबत वेळोवेळी मागणी करण्यास आली आहे. याशिवाय प्रभागातील चोकअप झालेले ड्रेनेज कचरा व इतर कामाबाबत लेखी अथवा तोंडी मागणी केली असता मागणी केलेल्या कामाच्या पुर्ततेसाठी कामगार पाठविण्यात आले आहेत असे सांगितले जाते. पण प्रत्यक्षात मात्र काय झालेले नसते.

**सहाय्यक आयुक्त** : दिनांक ६-१२-९१ च्या समेतील निर्णयानुसार झोन. क्र. १ कडुन मकबरा भागातील कामासाठी कामगारांची मागणी प्राप्त झाली होती. संबंधीत विभागाच्या मागणी नुसार जादा कामगार पुरवठया बाबतचे प्रकरण वरिष्ठांकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे.

**मा. उप आयुक्त** : दिनांक ६-१२-९१ च्या सभतील निर्णयानुसार ज्या झोनकडून जादा कामगारांची मागणी झाली आहे, त्यांना कामगार पुरविण्याबाबत व्यवस्था केली जाईल. तसेच ज्या झोनकडून जा कामगारांची मागणी झालेली नाही त्या झोनमध्ये नियमित कामगारांकडून काम करुन घेण्यात येत असे

**श्री. नारायण फत्तेषष्कर, श्री. गिरजाराम हाळनोर** : स्वच्छता निरिक्षकांच्या कामावर देखरेख करण्यासाठी जेष्ठ स्वच्छता निरिक्षकाची नेमणूक करण्यात आली आहे काय ? अशा प्रकारे जेष्ठ स्वच्छता निरिक्षकाची नेमणूक करण्यात आली असेल तर नियुक्त करण्यात आलेले जष्ठ स्वच्छता निरिक्षक काय काम करतात या जेष्ठ निरिक्षकांनी आतापर्यत किती रिपोर्ट दाखल केले आहेत आमचे माहितीप्रमाणे आतापर्यत फक्त स्वच्छता निरिक्षकच झोनच्या कामा विषयी रिपोर्ट दाखल करतात.

**मा. उप आयुक्त** : सहाय्यक आयुक्त यांनी जेष्ठ स्वच्छता निरिक्षक यांना योग्य ते डायरेक्शन द्यावे आणि जेष्ठ स्वच्छता निरिक्षकांचा दैनिक कामाचा अहवाल नियमित मागवून घ्यावा

**श्री. नारायण फत्तेलष्कर** : कामगारांचे हजेरी सेंटरच्या ठिकाणी टेबल/खुर्चीची व्यवस्था असणे आवश्यक आहे. मुंबई महापालिकामध्ये अशी व्यवस्था आहे.

**मा. सभापती** : ज्या झोनमध्ये कामगारांचे हजेरी सेंटरसाठी जागा उपलब्ध होईल अशा ठिकाणी हजेरी सेंटरसाठी शेड उभारण्यात यावे व व्यवस्था करण्यात यावी.

**श्री. केशव सोनवणे** : दिनांक ६-१२-९१ च्या सभेतील निर्णयानुसार साफसफाई कामासाठी कमी असलेले २०० नियमित कामगार महापालिकेच्या कोणत्या विभागात काम करतात याबाबता अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यावर खुलासा व्हावा.

**साहय्यक आयुक्त** : दिनांक ६-१२-९१ च्या सभेतील निर्णयानुसार महापालिकेच्या विविध विभागात काम करणा-या सफाई कामगाराबाबतची माहिती घेण्याचे कार्यवाही कार्यरत असून या बाबतची माहिती पुढील सभेत देण्यात येईल.

**श्री.गजानन बारवाल, श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. गिरजाराम हाळनोर** : दिनांक ६-१२-९१ च्या सभेतील निर्णयानुसार शहरातील मुता-या साफसफाई बाबत कुठल्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही आजही शहरातील सर्व मुताऱ्यामध्ये अत्यंत दुर्गंधी असून त्याचा नागरीकांना उपयोग घेता येत नाही. उदा. रेल्वेस्टेशन गुलमंडी, क्रांतीचौक, झोन क्र. ६ (कार्यालय) इत्यादी मुता-या चेलीपुरा चौकी जवळील मुतारी याच करणासाठी तोडण्याचा प्रयत्ना संबंधीत चौकीच्या निरिक्षकां कडून झाला असता याबाबत त्यांचेशी चर्चा करुन मुतारीचे व्यवस्थेबाबबत विभागीय अधिकारी मा. उप आयुक्त व मा. आयुक्त यांचेशी पत्र व्यवहार करण्याचे संबंधीतातर्फे ठरले होते. या मुतारीचा बराच भाग पडलेला असून त्या ठिकाणी टाईल्स बसविणे आवश्यक आहे. शहरातील मुता-याप्रमाणे महापालिका कार्यालयातील मुतारीचीही नियमित साफसफाई होत नाही जिना चढतांना घाण वास येतो.

**मा. सभापती** : मिळालेल्या माहितीनुसार कार्यालयातील मुतारी नियमितपणे साफ होते व त्या ठिकाणी फिनेलही टाकण्यात येते. मुतारिचा एक भाग बंद आहे. तेव्हा याबाबतची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल.

सभागृहातील सभासदांतर्फे ३=४० वाजता कार्यालयातील मुतारीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

**मा. उप आयुक्त** : महापालिका कार्यालयातील स्वच्छता गृहाची साफसफाई सुरक्षा अधिका-याकडे सोपविण्यात आली आहे. सुरक्षा अधिकारी यांनी स्वच्छता गृहाचे स्वच्छेतेबाबत विशेष लक्ष देऊन फिनेल व इतर औषधींचा योग्य प्रकारे वापर करावा. तसेच या ठिकाणी एक्झास्ट फॅन बसविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

**श्री नारायण फत्तेलष्कर** : शहरात विविध ठिकाणी असलेल्या जनावरांच्या गोठयातील शेण रस्त्याच्या कडेला पडलेले आहे, या शेणामुळे ड्रेनेज लाईल चोकअप होणे, नालीतुंबणे, डास वाढवणे अशा प्रकारच्या अनेक अडचणी निर्माण होतात. तेव्हा नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने उघडयावर पडलेल्या शेणाचे ढिग उचलण्याबाबत कार्यवाही व्हावी उदा: नंदलाल बिल्डींग जवळील भाग.

**पशुधन विकास अधिकारी** : शहराच्या विविध भागात रत्याच्या कडेला पडलेले उघडयावरील शेणाचे ढिग उचलण्यासाठी प्रशासनातर्फे यापुर्वी अभियान हाती घेण्यात आली. याकामी पोलीस मदत ही घेण्यात आली.परंतु अभियान यशस्वी करण्यासाठी अनेक ठिकाणी विरोध झाला तेंव्हा नव्याने अभियान हाती घ्यावयाचे झाल्यास पुर्ण पोलीस संरक्षण घेवून अभियान हाती घ्यावे लागेल.

**मा. सभापती** : संबंधीत अधिका-याने सुचविल्याप्रमाणे उघडयावर पडलेले शेण उचलण्यास विरोध होतो ही बाब लक्षात घेऊन कार्यवाही केली नाही तर याबाबतचे नागरीकांचे धैर्य वाढेल. व ड्रेनेज चॉकअप होणे. नाली तुंबणे या प्रकारामुळे रोगराई वाढेल ही बाब लक्षात घेऊन संबंधीता अधिकाऱ्याने उघडयावर पडलेले शेण उचलण्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.यापूर्वीच्या अभियानाप्रमाणे उघडयावर पडलेले शेण उचलण्यासाठी टेंडर मागवुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी व उचलण्यात आलेले शेण सिध्दार्थ उद्यान येथें जमा करावे.

**श्री. गजानन बारवाल** : सहाय्यक आयुक्त यांचे समवित गुलमंडी, औरंगपुरा नाथमंदिर, बसस्टँड, अप्सरा सिनेमागृह, या भागातील मुता-यांची पाहणी केली या सर्व ठिकाणी अत्यंत घाण असून या मुता-यांचा नागरिकांना काही उपयोग घेता येत नाही त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची साफसफाई होत नाही अशीच परिस्थीती बन्सीलाल नगर हायकोर्ट पदमपुरा या भागातील मुता-यांची आहे.

**मा. उप आयुक्त** : शहरातील मुतारी व सार्वजनिक संडासाचे साफसफाई करीता प्रत्येक झोनकरीता आवश्यक ते सफाई कामगार देण्यात आले आहेत. तेंव्हा शहरातील मुता-यांचे साफसफाई बाबत जे संबंधीत अधिकरी जबाबदार असतील अशा अधिका-यांना सहाय्यक आयुक्त यांनी कारणे दाखवा नोटीस द्यावी आणि उपअभियंता इमारत यांनी शहरातील सर्व सार्वजनिक मुता-यांची पाहणी करुन त्याबाबतचा आपला अहवाल सादर करावा.

**श्री. अलीमबेग** : सार्वजनिक मुता-याबाबत सभासदांची मागणी आणि नागरीकांची सोय लक्षात घेता मुता-यांचा सर्वे आणि दुरुस्ती करण्याचे काम उप अभियंता बांधकाम-२ यांचे कडे सोपविण्यात यावे.

**मा. सभापती :** शहरातील सर्व सार्वजनिक मुता-यांची पाहणी करुन त्याठिकाणी पाणी, ड्रेनेज, डागडुजी, टाईल्स, इत्यादी बाबत १५ दिवसाचे आत उप अभियंता बाधकाम-२ यांनी अहवाल सादर करावा.

**श्री. गजानन बारवाल, श्री. तुळशीराम भगुरे श्री. केशव सोनवणे :** शहराच्या विविध भागात मोठया प्रमाणावर जाहीरात बोर्ड लावण्यात आल्याचे दिसून येत आहे. उदा. सिल्लीखाना चौक, बाबा पेट्रोलपंपं ते बसस्टँड कलेक्टर ऑफीस ते हर्सूल क्रांती चौक ते गुलमंडी रोड आणि इतर अशा प्रकारे लावण्यात आलेले हे सर्व बोर्ड विना परवाना आहेत या कडून महापालिकेला जाहीरात कराचे उत्पन्न होत नाही. त्यामुळे महापालिकेचे अर्थिक नुकसान होत आहे. तेंव्हा जो जाहिरात फलक महापालिकेच्या परवानगीने लावलेला आहे अशा फलकावर परवानगीचा नंबर त्यासाठी देण्यात आलेली मुदत इत्यादी माहिती देण्यात यावी आणि याव्यतिरिक्त जे जाहिरात फलक विना परवाना लावण्यात आले आहेत अशा पाहिरात फलक धारकाकडुन नियमाप्रमाणे जहिरात कर वसूल करण्यात यावी आणि जाहिरात कराचे उत्पन्न देण्यात आलेली परवानगी इत्यादी बाबतची माहिती सभागृहाला देण्यात यावी शहरात प्रवेश करणा-या मुख्य रस्त्यावरील महापालिकेच्या हद्दीच्या ठिकाणी लावण्यात आलेले स्वागत फलक खराब झालेले आहे ते दुरुस्त करण्यात यावेत.

**मा. उप आयुक्त :** सं. सभासदांच्या सुचनेप्रमाणे आवश्यक ती व्यवस्था करण्याची कार्यवाही सबंधीत विभागप्रमुखांनी करावी.

**श्री. गजानन बारवाल :** जवाहर कॉलनी भागात प्राथमिक आरोग्य केंद्र उघडण्याच्या दृष्टीने आवश्यक ती तो कर्मचारी वृंद नियुक्त करण्यास सर्व साधारण सभेने मंजुरी दिली आहे. या केंद्रासाठी इमारतही बांधण्यात आली असून ही इमारत पोलीस खात्यास भाडयाने देण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. तेंव्हा सर्वसाधारण सभेने मंजुरी देवूनही आणि आवश्यक इमारत उपलब्ध असतांना आरोग्य केंद्र सुरु करण्यात आले नाही.

**आरोग्य वैद्यकिय अधिकारी :** सर्वसाधारण सभेच्या ठरावाप्रमाणे जवाहर कॉलनी भागात आरोग्य केंद्र सुरु करण्यासाठी शासनाकडून १००/- अनुदान मिळावे म्हणून मागणीही करण्यात आली आहे. या आरोग्य केंद्रासाठी कर्मचारी वृंदही मंजुर आहे. मंजुरी मिळताच पुढील कार्यवाही करण्यात येईल आरोग्य केंद्राची जागा १ वर्षासाठी पोलीस स्टेशनला भाडयाने देण्यात आली आहे.

**श्री. केशव सोनवणे :** आरोग्य केंद्र इमारती प्रमाणेच महापालिका मालकीच्या अन्य इमारतीही भाडे तत्वावर देण्यात आलेले आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.उदा.एन-११,एन-७, मुकुंदवाडी येथील इमारती.

**शिक्षण अधिकारी :** एन-११ येथील इमारतीचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असले तरी त्यात मनाई हुकूम मिळालेला नाही. तेव्हा सदर प्रकरणी नियमाप्रमाणे काय कार्यवाही करता येईल याची शिक्षण अधिकारी यांनी तपासणी करावी.

**श्री. गजानन बारवाल :** सिल्लेखाना ते मोंढा या रस्त्यावरील शिवाजी हायस्कूल जवळील झोपडपट्टी उठवून चिकलठाणा भागात बसविण्यात आली आहे. नव्याने बसविण्यात आलेल्या वसाहतीस नेहरु रोजगार योजने अंतर्गत सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात आली असता त्यावर मनाई हुकूम आणण्यात आला आहे. नव्याने वसाहत झालेल्या या भागात सुविधा

उपलब्ध करुन देण्यात आल्या नाही. तर वार्ड क्र. ६० चे सं. नगरसेवक या वसाहतीत वास्तव्य करणा-या नागरिकांना पुन्हा शिवाजी हायस्कुल आणून बसवतील.

**श्री.नारायण फत्तेलष्कर,श्री.तुळशीराम भगुरे :** न्यायालयात असलेल्या एका डी.पी. रोड प्रकरणात संबंधीत प्रकरणाचे वकील न्यायालयात उपस्थित असतांना ही या प्रकरणातील वादीस सदर प्रकरणी मनाई हुकूम मिळाला आहे. महापालिकेने नियुक्त केलेले वकील योग्य काम करीत नाही हे यावरुन सिध्द होते. तेंव्हा महापालिकेची प्रकरणे चालविण्यास आवश्यक त्या वकीलाची नियुक्ती करण्याबाबत सभागृहाने परवानगी दिल्यास महापालिकेची प्रकरणे योग्य प्रकरे हाताळली जातील.

**मा. उप आयुक्त :** महापालिकेचे विधी सल्लागार कामावर रुजु झाल्यानंतर (रजेवरुन) सहाय्यक आयुक्त यांनी त्यांच्याशी चर्चा करुन महापालिकेच्या किती प्रकरणात मनाई हुकूम मिळाला आहे,किती प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. हया प्रकरणाचे काम कोणते विधिज्ञ पाहता एकूण प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. हया प्रकरणाचे काम कोणते विधिज्ञ पाहतात एकूण प्रकरणांपैकी किती प्रकरणे लिजडीड किंवा भाडेपटटयाबाबतचे आहेत. त्याबाबत काय कार्यवाही झाली याची सविस्तर माहिती तयार करावी

**श्री. गिरजाराम हाळनोर :** ज्योती नगर भागातील जागेस तार फेंन्सींग करण्याच्या कामास मंजुरी मिळाली आहे. परंतु अद्याप काम सुरु झाले नाही. तसेच नागसेन कॉलनी येथील ड्रेनेज लाईनचे कामही सुरु झालेले नाही.

**उप अभियंता (स्लम) :** नागसेन नगर ड्रेनेज लाईनच्या कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्याबाबतच्या आहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यास मंजुरी मिळाल्यानंतर काम करुन घेण्यात येईल.

**उद्यान अधिक्षक :** ज्योतीनगर येथील जागेस तार फेन्सींग करण्याच्या कामासाठी संबंधीत कामाचे गुत्तेदार यांना कामाचा आदेश दिला आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** शहागंज येथील दवाखान्या जवळील रस्त्यावर ब-याच विनापरवाना टप-या आहेत तसेच याच ठिकाणी फळ विक्रीच्या गाडया उभ्या केल्या जातात.त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो. तेंव्हा या ठिकाणच्या टप-या व हातगाडया हाटविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच शहागंज चमन भागातील मार्केट काढुन टाकण्यात यावे. या ठिकाणी बरेच अवैध धंदे चालतात.

**मा. सभापती :** शहागंज दवाखाना येथील टप-या व हातगाडया हाटविण्याची कार्यवाही करुन सदर रस्ता रहदारीस खुला राहील अशी व्यवस्था मालमत्ता अधिकारी यांनी करावी तसेच शहागंज चमन ही जागा विकास आराखडयात कोणत्या कारणासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. आणि त्याबाबत काय कार्यवाही करता येईल याबाबतची माहिती संबंधीत विभागाने द्यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहागंज प्रमाणेच पिरबाजार भागातील रोडवर टप-या उभारण्यात आल्यामुळे या भागात सकाळचे वेळी पायी चालणेही त्रासदायक होते. तेंव्हा पिरबाजार भागातील टप-यासाठी पर्यायी जागा देवून रस्ता वाहतुकीसाठी खुला करुन दयावा.

**मा. सभापती :** संबंधीत अधिका-यांनी वरील प्रकरणी पाहणीकरुन अहवाल द्यावा.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** विद्युत विभागाच्या भांडारात असलेल्या निकामी साहित्याबाबतच्या माहितीसाठी संबंधीत विभागाकडे ३ लेखी पत्र देण्यात आले आहे परंतु त्याबाबत कोणताही खुलासा झाले ला नाही

**उप अभियंता (विद्युत) :** भांडार विभागात असलेल्या निकामी टयुबचा दुरुपयोग घेऊ शकतो ही बाब लक्षात घेऊन निकामी टयुब नष्ट करण्यात आल्या. टयुब व्यतिरिक्त भांडारात असलेल्या निकामी साहित्याची माहिती देण्यात येईल.

**श्री. गजाजनन बारवाल :** गारखेडा भागातील सि. टी. एस क्र. १५३०१/५४ वर बांधकाम करण्यासाठी संचिका दाखल करुन विकास खर्चही करण्यात आलेला आहे. परंतु सदर प्रकरणी अद्याप बांधकाम परवानगी मिळालेली नाही.

**मा. सभापती :** मा. सहाय्यक संचालक यांनी पुढील सभेत याबाबतची माहिती द्यावी.

**श्री. केशव सोनवणे :** दिनांक २७-११-९१ च्या सभेतील निर्णयानुसार ज्या नागरिकांच्या मालमत्तेवर पुर्वी करआकरणी करण्यात आलेली होती अशा नागरीकांकडुन पुन्हा कर घेण्यात येणार आहे काय ? याचा खुलासा व्हावा. मिळालेल्या माहितीनुसार अशा नागरीकांकडून कर वसुल केला जात नाही उदा. सिध्दार्थ नगर, आंबेडकरनगर, जाधववाडी इत्यादी.

**श्री. तुळशीराम भगुरे :** वैद्यकिय देयकाबाबतच्या नियमाची प्रत सर्व सभासदांना देण्यास दिनांक २८-११-९१ च्या सभेत निर्णय घेण्यात आला आहे. त्याबाबत काय कार्यवाही झाली तसेच हारणाबाई रतन याचें वैद्यकिय देयक कोणत्या करणाने नामंजुर केले. आतापर्यत किती कर्मचा-यांनी उत्तरापुर्वी कार्यालयाची परवानगी घेतली होती याचा खुलासा व्हावा. तसेच माजी शहर अभियंता आणि माजी क्रिडा अधिकारी यांना कोणत्या आधारे देयक मंजुर करण्यात आले. त्यास कोण जबाबदार आहे यांचा खुलासा व्हावा.

**श्री. अलीम बेग, श्री. केशव सोनवणे. :** कर्मचा-यांना देयक असलेल्या वैद्यकिय भत्या बाबत आतापर्यंत सभागृहात झालेली चर्चा विचारात घेता कर्मचाऱ्यांना दर महाप्रमाणे वैद्यकिय भत्ता देण्यात यासवा किंवा इ. एस. आय. नियम लागु करावा.

**मा. सभापती :** वैद्यकिय देय भत्त्याबाबत असलेल्या नियमांची प्रत आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी सर्व सभासदांना देण्याची व्यवस्था करावी. तसेच वैद्यकिय देय्य भत्त्याबाबत प्रचलीत असलेल्या नियमातील त्रुटी लक्षात घेवुन अद्यावत असे नियम तयार करावे आणि इ. एस. आय. नियम लागु करण्याबाबत माहिती दयावी.

**श्री. गजानन बारवाल :** दिनांक २८-११-९१ च्या सभेतील निर्णया नुसार निवडणूक काळात काम केलेल्या कर्मचा-यांना दोन आगावू वेतनवाढ देण्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा नुकत्याच पार पडलेल्या जनगणना कार्यात काम केलेल्या कर्मचा-यांना अशा प्रकारच्या दोन आगावू वेतन वाढ देण्यात आलेल्या आहेत.

**मा. उप आयुक्त :** निवडणुक काळात काम केलेल्या कर्मचा-यांना आगावू वेतनवाढ देण्याबाबतचा प्रश्न ब-याच वेळा सभ्ंगृहात चर्चेला गेला आहे. त्यावेळी प्रशासनातर्फे त्यावर आवाश्यक खुलासा करण्यात आला. जनगणना आणि निवडणुक हे दोन वेगळे कार्य आहेत.आगावू वेतन वाढ देण्यासाठी कर्मचा-यांचे गोपनिय अहवाल पाहावे लागतात तरीपण पुढील वेळी

निवडणूक काळात काम केलल्या कर्मचा-यांना आगावू वेतनवाढ देण्याबाबतचा विचार प्रधान्याने केला जाईल.

**श्री. केशव सोनवणे** : कलम ६७ (१) (सी) अन्वयेची माहिती अद्याप शासनाकडे पाठविली गेली नाही. ही माहिती कोणत्या विभागाने पाठवावी हे अद्याप निश्चित झालेले नाही. त्यामुळे सदर माहिती शासनाकडे पाठविली नाही.

**सचिव** : ६७ (१) (सी ) अन्वये विविध विभागाकडून प्रस्ताव येतात. तेंव्हा ज्या विभागाकडून असे प्रस्ताव आले आहेत त्याच विभागाने माहिती पाठवावी असे माझे मत आहे. तरी मा. उप आयुक्तयांचे सुचनेप्रमाणे कलम ६७ (१) (सी ) बाबत का. आयुक्त यांचेकडे प्रस्ताव दाखल करुन कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर** : शहागंज मच्छी बाजार विस्ताराचे अंदानजपत्रक पुढील सभेपर्यंत लेखा विभागाकडे पाठविण्यात येईल असा निर्णय दिनांक- २८-११-९१ च्या सभेत झाला आहे. त्याबाबत खुलासा व्हावा..

**उप अभियंता (इमारती)** : शहागंज मच्छीबाजार विस्ताराचे संचिका उद्या पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

**श्री. केशव सोनवणे, श्री. तुळशीराम भगुरे** : महापालिकेतर्फे मनपा कर्मचा-यांना म्हाडाने बांधलेली हर्सुल येथील घरे खरेदी करुन देण्याचे ठरले आहे. या ठिकाणी सार्वजनिक दिव्यांची व्यवस्था नाही. या परिस्थिति मुळे संबंधीत कर्मचा-यांना ही घरे आणखी दहा वर्षे मिळणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**उप अभियंता (विद्युत)** : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने पुर्वीप्रमाणे ओव्हर हेंड विद्युत कनेकशन देण्याची पध्दत बंद करुन अंडर ग्राऊंड पध्दतीने विद्यूत कनेकशन देण्याची नवीन पध्दत सुरु केली आहे. या प्रकरणी म्हाडाचे संबंधी मत अधिकारी आणि मा. आयुक्त यांचे संयुक्त चर्चा झाली आहे.

**श्री. तुळशीराम भगुरे** : शहरातील सार्वजनिक दिव्यांच्या व्यवस्थेकरीता लागणारे पोल उभारणेसाठी महापालिका पैसा खर्च करते आणि याच पोलवरुन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ खाजगी घरांना देण्यात आलेल्या विद्युत कनेक्शन बाबत पैसे वसुल करते यावर विचार होणे आवश्यक आहे.

**मा. उप आयुक्त** : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचेंशी चर्चा केली जाईल.

**ठराव** :

दिनांक २८-११-९१ च्या सभेत स्थळ पाहणीचा निर्णय घेण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत खालली प्रमाणे निर्णय घेण्यात येतो.

१) ठराव क्र. २२६/१५ बाबत पाहणी करण्यात आली असून प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फुलेनगर हर्सुल स्लम भागात खडी रस्ता तयार करण्याचे काम तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.२% कमी दराने श्री. मोहमंद सलीम यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

२) ठराव क्र. २३०/१९ अन्वये ठरावात दर्शविलेल्या सं. नगरसेवकांचे वार्डातील मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांना ब्लॅक बोर्ड योजने नुसार अध्ययन व अध्यापन अंतर्गत वाटप करण्यात येणारे साहित्य मागील मंजुरा दराने खरेदी करण्यात यावे. तसेच स. सभासद श्री. रमेश छापरवाल यांचे सन १९९०-९१ वर्षातील स्वेच्छा निधीतुन वरीलप्रमाणे रक्कम रुपये रु. ३९,०००/- साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.अशी वाढ करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वरील दुरुस्त्यांसह दिनांक १९-११-९१ ची विशेष स्थायी समिती सभा, दिनांक १७-११-९१ ची तहकुब सभा. दिनांक २८-११-९१ ची स्थायी समिती सभा आणि दिनांक ६-१२-९१ च्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३३/२ :**

कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व जलनि :सारण यांनी प्रस्ताव सादर केला की कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग क्र-२ औरंगाबाद यांचे पत्रक क्र. परिसर अभियांत्रिकी / डि-२/ अे. वि. डबल्यू-ई /३५५०/९१ दिनांक१४-५-९१ अन्वये पाण्याच्या दरात वाढ करण्यात आली असून दि. १-६-९१ पासून पाण्याचे वाढीव दर लागू करण्यात आले आहेत. यापुर्वी दि. १-६-९० ते ३०-५-९१ पर्यत स. १=४० पैसे प्रति १००० लिटर या प्रमाणे दर होते आता नविन दर प्रति १००० लिटर्सला रु. १=६५ प्रमाणे दर आहेत.

पाणी पुरवठा व जलनि: सारण मंडळा सोबत झालेल्या करारनाम्यानुसार मंडळा ज्या वेळेस दर वाढवील ते महानगरपालिकेस मान्य राहील.

करीता महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाने वाढविलेले पाण्याच्या दरास मंजुरी मिळण्याच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री केशव सोनवणे :** परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग-२ औरंगाबाद यांचे कडील दिनांक १४-५-९१ चे पत्राप्रमाणे वाढीव दरानुसार पाणी खरेदीसाठी महापालिकेला किती रककम जादा द्यावी लागाणार आहे यांचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता (पाणी-पु-)१ :** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि: सारण मंडळाचे वाढीव दराने पाणी पुरवठया करीता महापालिकेला दरमहा ३०ते ३५ हजार रुपये जादा रक्कम द्यावी लागेल.

**श्री. एकबालसिंग गिल :** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळातर्फे वैद्यकिय महाविद्यालयाचे आवरात बांधण्यात येणा-या जलकुंभाचे काम ब-याच दिवसापासून अर्धवट स्थितीत असून त्या मुळे या रुग्णालयात पाण्याची टंचाई भासते ही बाब लक्षात घेता संबंधीत विभागास पत्र देऊन जल कुंभाचे काम त्वरीत पुर्ण करण्याबाबत सुचना देण्यात याव्यात.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** राज्यात सध्या दुष्काळी परिस्थिती आहे. ही बाब शहरात तीव्र पाणी टंचाई भासेल तेंव्हा येत्या २६ जानेवारी रोजी टाकण्यात आलेल्या ४ फुटी नविन जलवाहिनिद्वारे शहरास जादा पाणी पुरवठा होईल अशी व्यवस्था करण्याबाबत महाराष्ट्र पाणी पुरवठा व जल नि:सारण मंडळास कळविण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग क्र. २ औरंगाबाद यांचे करडील पत्र क्र. परिसर अभियांत्रिकी /डी-२/ अेबी डबल्यु ई /३५५०/९१ दिनांक १४-५-९१ अन्वये दिनांक १-६-९१ पासून वाढलेल्या रुपये १=४० पैसे प्रति हजार लिटर या

वाढीस दराने देयकाची रक्कम अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २३४/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे. की, हत्तेसिंगपुरा येथे २५० मीमी व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाकरीता र. रु. ७५,९००/- च्या सन ९०-९१ च्या डी. एस.आर. प्रमाणे तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास दि. १८-१०-९१ ला मा. आयुक्तांनही मान्यता दिली आहे सदर काम हाती घेण्याकरीता निविदा सुचना क्र. ८ दि. ११-११-९१ रोजी दैनिक स्वरगंगा मध्ये प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

१) श्री. एस. एस. भंडोरे- १०% जास्त
२) श्री. आर. बी. मिर्झा- ०.१२५%कमी
३) श्री. शे. करीम- ३% जास्त

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१२५% कमी दराची श्री. आर. बी. मिर्झा यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हत्तेसिंगपुरा येथे २५०मीमी व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.१२५%कमी दराच्या श्री. आर. बी. मिर्झा यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय २३५/४:**

वार्ड क्र. मो. शिवाजी कॉलनी/ क्रांतीचौक पोलीस स्टेशन जवळ ३०० मीमी व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणेच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९०-९१चे दरसुचीनुसार र. रु १,९५,११०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर काम शासकीय अनुदान सन- ९०-९१ अंतर्गत करावयाचे आहे.

सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ७/१०७/९१ दि. २४-१०-२१ अन्वये दैनिक मुकदस व स्वरगंगामध्ये जाहिरामत देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) श्री. मोहंमद सलीम- ०.२०% कमी
२) श्री. मिर्झा आर. बी- ३% जास्त.
३) श्री. आर.बी चव्हाण- ४% जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२०% कमी दराचे श्री. मोहंमद सलीम यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांती चौक पोलीस स्टेशन जवळील शिवाजी कॉलनी येथे ३०० मीमी व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेद्क्ष्या ०.२०% कमी दराच्या श्री. मोहंमद सलीम यांचे दरपत्रकास सर्वोनुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय २३६/५ :**

वार्ड क्र. ४६ समर्थनगर येथे मुक्ती सोपान पासून ते कार्तीकी हॉटेल पर्यंत नाला पिचींग करणेच्या कामाकरीता र. रु. १,५२०००/- ला स्थायी समीती ठराव क्र. ८१ दि. २२-७-९१ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामाकरीता निविदा सुचना क्र. ५ दिनांक २१-८-९१ नुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) श्री. स. रफिक उद्दीन - १.१५% कमी
२) श्री. कैसर खॉन - ५% जास्त
३) श्री. स. सिराज उद्दीन - २.५% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५% कमी दराचे श्री. सय्यद सिराजउद्दीन यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. इकबालसिंग गील :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल जवळील नाल्यासही पिचींग करणे आवश्यक आहे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४६ समर्थ नगर येथील मुक्तीसोपान पासून कार्तीकी हॉटेल पर्यत नाला पिचींग करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी वच अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २.५% कमी दराच्या श्री.सय्यद सिराजोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २३७/ ६ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, गांधी नगर स्लम भागात खांडकी पेव्हींगचे काम करणेसाठी र. रु. ३१,५४५/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. १५-३-९१ ला मंजुरी दिल्यानुसार दुस-या वेळेस कार्यलयीन निविदा सुचना क्र. ७ अन्वये दैनिक देवगीरी तरुण भारत व दैनिक लोकमध्ये प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तिन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

१) श्री. स. सिराजुद्दीन ५% जास्त
२) श्री. अब्दुल खालेक ३% जास्त
३) श्री. अे. एम. फारुकी १% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दारापेक्षा १% कमी दराचे श्री. ए. एम. फारुकी यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर"

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गांधीनगर स्लम भागात खांडकी पेव्हींगचे काम करण्यासाठी तुलात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकांच्या दरापेक्षा १% कमी दराचे श्री. ए.एम. फारुकी यार्चे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येणे.
वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय २३८/७ :**

दिलरस गृहनिर्माण संस्था घाटी येथ्रील मनपा मोकळया जागेस तार कुंपण करण्यासाठी सन ९०-९१ चे मा. बां. खात्याचे डि. एस. आर. दराने तयार करण्यात आलेल्या रकम रु. ३४७००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे

सदर काम हाती घेण्याकरीता निविदा सुचना क्र. १० दि. १९-१०-९१ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) श्री. आर. अे. शेख ८% कमी दराने
२) श्री. एस. ए. बहाउद्यीन २% जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% कमी दराची श्री. आर. अे. शेख यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गजानन बारवाल,श्री. गिरजाराम हाळनोर, श्री.नारायण फत्तेलष्कर :** शहर विकास आराखडयानुसार संपदित केलेल्या जागा आणि लेआऊट मधील संपादीत केलेल्या मोकळया जागा अशा सर्व जागांना तार कुंपण करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्व जागांना कुंपण करण्याकरीता दरपत्रके मागविण्यात यावी आणि त्यांचा विकास करण्यात यावा. ज्या ले आऊट मधील मोकळी जागा संबंधीत सोसायटी विकसीत करण्यास तयार असेल. त्या प्रमाणे करार करुन सोसायटीतील मोकळी जागा संबंधीत सोसायटीस विकास करण्या करीता देण्यास हरकत नसावी.

विष्णुनगर भागातील रहिवाशी या भागातील मोकळया जागेचा विकास करण्यास तयार आहेत. तसेच त्याठिकाणी वॉचमनही ठेवण्यास तयार आहे. त्या दृष्टीने विचार व्हावा..

**सहाय्यक संचालक (नगररचना) :** रेखांकनातील मोकळी जागा संबंधीत सोसायटी ही सार्वजनिक कामासाठी विकसीत करण्यास तयार असेल तर त्याबाबतचा करार करुन मोकळया जागेचा विकास करता येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घाटी येथील दिलरस गृहनिर्माण संस्थेच्या मोकळया जागेस तार कुंपण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ८% कमी दराच्या श्री. आर. ए. शेख यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २३९/८ :**

अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पिरबाजार, उस्मानपुरा येथील प्राथमिक शाळेची दुरुस्ती करायाचे कामासाठी सा. बां. खात्याचे सन ९०-९१ चे डि. एस. आर. दराने र. रु. ३१,७७०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानंतर सदर काम हाती घेण्यासाठी निविदा सुचना क्र.१० दि.१९-१०-९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) श्री. एल. आर. गोरे ०. ०५%कमी

२) श्री. एस. ए बहउद्यीन १४% जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. एल. आर. गोरे यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गजानन बारवाल, श्री गिरजाराम हाळनोर :** बन्सीलाल नगर प्राथमिक शाळेतील आर.सी.सी बोर्ड आणि या शाळेचे वायर फॅन्सिंग खराब झालेले आहे. या दृष्टीने संबंधीत अधिका-यांबरोबर पाहणीही करण्यात आली आहे. तार फॅन्सिंग नादुरुस्त असल्यामुळे शाळेच्या आवरात पवाहने उभी केली जातात. तसेच या शाळेतील एका रुममध्ये मोठया आकाराचा एक आर. सी. सी. कायम स्वरुपी टेबल तयार करण्यात आलेला आहे त्यामुळे या खोलीत बसून शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना बसण्यास जागा अपुरी पडते तेंव्हा सदर टेबल मोडूनटाकण्यात यावा एकनाथनगर भागातील शाळेतही अशाच प्रकारची स्थिती आहे. या शाळेतील एका वर्गात मधोमध असलेल्या पार्टीशनमुळे एकाच वर्गात शिक्षण घेणारे अर्धे विद्यार्थी पार्टीशानच्या एका बाजुला अर्धे विद्यार्थी दुस-या बाजुला आणि मध्ये शिक्षक बसतात अशी परिस्थिती आहे.

**मा. सभापती :** उप अभियंता (इमारती) यांनी सर्व शाळांची पाहणी करुन दुरुस्ती बाबत योग्य कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पिरबाजार, उस्मानपुरा येथील प्राथमिक शाळेचे दुरुस्ती कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री. एल. आर. गोरे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय २४०/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मौजे हर्सुल येथील स.न. २१७ या ठिकाणी मागासवर्गीय विद्यर्थ्यासाठी वसतीगृह बांधण्याचे कामासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६ दिनांक ११-७-९१ अन्वये र. रुपये ८,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी मिळाली आहे.

सदर काम हाती घेण्यासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. ७ दि. २०-८-९१ नुसार निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

१) श्री. एस. ए. नवाब ४.९९% जास्त दराने

२) श्री. एस. एच. असोशिएटस ४.९९% जास्त दरान

दोन्ही निविदाचे दर सारखेच असल्यामुळे पत्रक. मनपा ३ अ (ई) /२८९/९१ दि.३०-९-९१ नुसार गुत्तेदारास वाटाघाटीसाठी कळविले असता त्यांनी लेखी दर कळविले ते खालीलप्रमाणे.

१) श्री. एस . ए. नवाब ४.९५% जास्त ५-१०-९१

२) श्री. एस. एच. असोशिटस ४.९९% जास्त ५-१०-९१

तुलनात्मक दृष्टया श्री. एस. ए. नवाब यांचे दर कमी म्हणजे ४.९५% जास्त दराची निविदा आहे. सदरच्या कामाचे दर हे सन ९०-९१ च्या वर्षाचे आहेत. ९१-९२ च्या दराशी तुलना केल्यास गुत्तेदाराने दिलेले दर अंदाज पत्रकीय दरापेक्षा १.५% कमी येतात प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे हर्सुल येथील स.न. २१६ या ठिकाणी मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी बांधण्यात येणा-या वसतीगृहाचे कामासाठी दिनांक ३०-९-९१ च्या वाटा घाटी नुसार सदर काम तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी, अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.९५% जास्त दराचे (९०-९१) च्या डी. एस. आर. दराने श्री. एस. ए. नवाब यांचे दरपत्रकास सर्वोनुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २४१/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की किराडपुरा येथील मलिकंबर कॉलनी येथील खुल्या जागेवर बालोद्यान तयार करणेच्या कामसाठी रक्कम रु. ३९,८३५/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानुसार सदर कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा दैनिक देवगिरी तरुण भारत व दैनिक लोकधर्म मध्ये प्रसिध्दी देवून निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

१) श्री. आर. ए. शेख १% कमी

२) श्री एस. बहाऊद्यीन २% जास्त

२) श्री. विशाल कन्स्ट्रकशन ४.५०% जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री. आर.ए. शेख यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराडपुरा येथील मलिकंबर कॉलनीच्या खुल्या जागेवर बालोद्यान तयार करण्याच्या कामासाठी तुलानात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १% कमी दराचे श्री. आर. अे. शेख यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही. व्हावी.

**विषय २४२/११ :.**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हत्तेसिंगपुरा, कटकटगेट साईट न. २०५ येथे शाळेची इमारत बांधणेच्या कामासाठी सा. बां. खात्याचे डी. एस. आ. दराने (सन-९०-९१ च्या) रककम रु. ४,९८,४३२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. करिाडपुरा न. २ उर्दू व मराठी शाळेची इमारत भाडयाने असल्यामुळे तेथे अंतर्गत गैरसोय असल्यामुळे उपरोक्त मनपाची इमारत बांधणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरुन तेथे मराठी व उर्दु या दोन्ही शाळा पाळी पध्दतीने चालविणे सोयस्कर होईल.

अंदाजत्रपक र. रु. ४,९८,४३२/- मंजुरीस्तव प्रस्ताव सादर. सदर खर्च ९१-९२ सी. ए. बिल्डींग या शिर्षकाखाली करण्यात येईल.

**संवाद :**

**श्री. गजानन बारवाल :** पदमपुरा प्राथमिक शाळेच्या इमारतीत संडास व मुतारिची सोय नाही. या बाबत संबंधीत विभागाला लेखी पत्रही देण्यात आलेले आहे तेंव्हा सदरील ठिकाणी वरीलप्रमाणे व्यवस्था करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हत्तेसिंगपुरा कटकटगेट, साईट क्र. २०५ येथे शालेय इमारत बांधण्याच्या कामासाठी रककम रु. ४,९८,४३२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च सन १९९१-९२ च्या भांडवली इमारती या शिर्षकातून करण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २४३/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मी. शहाबाजार येथील अस्तित्वात असलेली झोपडपट्टी रस्ता-रुंदीकरणामध्ये बाधीत होत असल्यामुळे मजनुहील येथे स्थलांतरीत करण्यात आली आहे. या नविन स्थालांतरीत झोपडपटटीमध्ये विद्यूत व्यवस्था घेण्याकरीता विद्यूत खांब म. रा. वि. मंडळाने र. रु १७,९७००/- चे कोटेशन दिले आहे. सदरील कोटेशनची रक्कम म. रा. वि. मंडळ औरगाबाद यांचे कार्यालयात भरण्याबाबत विचारार्थ सादर तसेच सदरचा खर्च १९८९- ९० च्या शासकीय अनुदानामध्ये पोल शिप्टिंग या सदराखाली असलेल्या तरतुदीतुन केला जाईल.

**संवाद :**

**श्री. गजानन बारवाल :** वार्ड क्र. ५१ साठी आवश्यक असलेल्या सार्वजनिक विद्यूतपोलासाठी लेखी मागणी करण्यात आली आहे. लेखी मागणी करुनही आतापर्यत पोल मिळालेले नाहीत. तेव्हा यांबाबत विशेष सभा बोलवण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. शहाबाजार येथील रस्ता रुंदीकरणामुळे नविन स्थलांतरीत जागेवर वसलेल्या झोपडपटटी मध्ये विद्युत व्यवस्था करण्याकरीता विद्यूत खांब, डी.पी. व नविन कनेक्शन करण्याच्या कामाकरीता रक्कम रु. १,७९७००/- चे कोटेशन महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळ औरंगाबाद यांच्या कार्यालयात जमा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च सन १९८९-९० च्या शासकीय अनुदानातील पोल शिफटींग या सदरातुन करण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २४४/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, एम. पी. लॉ कॉलेज ते नागेश्वर वाडी (खडकेश्वर) येथील खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु २,६५०००/- चे सरकारी अनुदानातुन मिळणा-या सात कोटी रुपयातुन सन ९१-९२ वर्षामध्ये करावयाचे आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.३ दि. १६-७-९१ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहे

१) श्री. डी. अजितसिंग ५.१५%जास्त
२) श्री. कैसरखान ०.०५% कमी
३) श्री. कुलवंतसिंग ७.१०% जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. कैसरखान यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर

**ठराव :**

सदर प्रस्तावाची स्थळ पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय २४५/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कदी, महेश नगर अंतर्गत रस्त्यास २० मीमी जाडीचे डांबरीकरणे करणेच्या कामासाठी सन ९०-९१ च्या सा. बां. खात्याच्या डि. एस. आर. दराने र. रु. ६१,०९०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल. सदर कामासाठी कार्यालयीने निविदा क्र. ३ दि. १६-७-९१ अन्वये निविदा मागविल्या असता फक्त मे. रे. कन्स्ट्रकशन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०%जास्त दराची एकच निविदा प्राप्त झाली. दि. १९-८-९१ रोजी पत्राद्वारे मे.रे. कन्ट्रकशन यांना दर कमी करण्याबाबत कळविले असता त्यांनी २०% जास्त दरा ऐवजी १४% जास्त दराने काम करण्यास तयार असल्याबाबत पत्रद्वारे कळविले आहे.

सन ९१-९२ च्या दरपत्रकानुसार तुलना केली असता सदरील दर ०.०२% जास्त दराचे येते. करीता मे. रे. कन्स्ट्रक्शन यांची १४%जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.नारायण फत्तेलष्कर,श्री गिरजाराम हाळनोर :** महेशनगर अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक केंव्हा तयार झाले आहे. यांचा खुलासा व्हावा. अशाच प्रकारचे काही रस्त्याचे डांबरीकरणाबाबत मी दिलेल्या पत्राचे झाले, त्या रस्त्याचे डांबरीकरणाच्या प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा. स्टेट बँक कॉलनीतील रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत गेल्या तीन वर्षापासून मागणी करण्यात येत आहे. परंतु अद्याप पर्यंत काम झालेले नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महेशनगर अंतर्गत रस्याचे २० मीमी जाडीचे डांबरीकरण करण्याचे दि. १९-८-९१ च्या पत्रानुसार अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १४% जास्त दराचे मे. रे. कन्स्ट्रक्शन यांचेकडून काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २४६/१५ :**

आयुक्त मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, यापूर्वी स्थायी समितील ठराव क्र. ५४५ दि. ३०-३-९१ नुसार सन-९१-९२ साला करीता प्राणी संग्रहालयास दररोज लागणारे दुध शासकीय दर रु ५-०० प्रमाणे खरेदी करण्यात यावे असा ठराव पास करण्यात आला होता. या कार्यालयाचे प. के. ७७७ दिनांक १६-६-९१ नुसार शासकीय दुध योजना

सध्याच्या दुधाचे शासकीय दर किती आहे याबाबत विचारणा केली असता त्यानुसार त्यांचे प. क्र. ३२९७ दि. १२-७-९१ अन्वये त्यांनी शासकीय दुधाचे दर पाठविले आहेत. (गायीचे) (पॉलीपॅक बंद पिशवी) दुधाचे दर रु. ६=५० प्रति लिटर दि. २३-३-९१ पासून लावण्यात आले असल्याचे कळविले आहे.करीता वाढीव दराप्रमाणे दि. २३-३-९३ पासून दुध खरेदी करण्याबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्राणी संग्रहालयास लागणारे दुध दि. २३-३-९१ पासून प्रति लिटर रु. ६.५० पैसे या दराने (गायीचे पॉलीपॅक बंद पिशवितील) खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २४७/१६ :**

अतिरिक्त सदर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, अजबनगर वार्डासाठी २५० वॅट एच. बी. एस. व्ही. फिटींगचा पुरवठा करणे आणि बसवणेसाठी (६नग) र. रु. २०,७००/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मान्याता मिळावी सदर कामासाठी स्थानीक वर्तमानपत्रात जाहीरात देवून निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

१) मे. लुना इलेकट्रीकल्स औ. बाद ५.१% कमी

२) मे. प्रगत इलेक्ट्रीकल्स औ. बाद १०.७६%कमी

३) मे. मुजाहेद इलेर्क्टीकल वर्क्स औ. बाद १७.७% कमी

तुलनात्मकदृष्टया मे. मुजाहेद इलेकट्रीक वर्क्स औरंगाबाद यांचे दर असून १७.७% कमी दराचे आहे त्यास ठराव क्र. ५३६ दि. ३०-३-९१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

परंतु सदर प्रस्तावामध्ये प्राप्त सर्वात कमी दर म्हणजे- १७-७% कमी ऐवजी ७.७%असे नजरचुकीने नमुद करण्यात आले होते. तेंव्हा वरील र. रु २०,७००/- ऐवजी र. रु ३७,९५०/- हया अंदाजपत्रकास आणि प्राप्त दरा १७-७% कमी दराची अशी दुरुस्ती करुन प्रस्ताव मंजुर करण्यात यावा प्रस्ताव (दुरुस्ती) मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अजबनगर वार्डासाठी २५० वॅट एच. बी. एस. व्ही. फिटींगचा पुरवठा करणे आणि बसविणेच्या कामासाठी (६-नग) ठराव क्र-५३६ दि. ३०-३-९१ अन्वये मे. मुजाहेद इलेक्ट्रील वर्क्स औरंगाबाद यांचे निवेदेस तुलानात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदापत्रकाच्या दरापेक्षा १७.७/- कमी नजरचुकीने देण्यात आलेली मंजुरीच्या ऐवजी अशी सदरील कामासाठी संबंधीताचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७-०७% कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते तसेच या कामाचे र. रु. ३७,९५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधनिक कार्यवाही व्हावी.

**विषय २४८/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावा सादर केला की, नंदनवन कॉलनीसाठी सेप्टीक टँक व बिल्डर्स सोसायटी शांतिपुरा येथे आर. सी. सी, एन पी-२ कलास ची लाईन टाकण्याच्या कामासाठी र. रुपये- ५,९५२४८/- यास शासनाची प्रशासकीय मान्यता (विशेष अनुदान) विकास /१० ९०/प्र.क्र/३७ (अ) योजना/ दिनांक १९-१-९१ व्दारे मिळालेली आहे. सदरच्या कामासाठी निविदा सुचना क्र.७ दै. मराठवाडा व दै. सकाळमध्ये दि. ५-९-९१ व्दारे

प्रगट निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) श्री. आर. एल. बारवाल ४.३४% जास्त
२) श्री. एस. ए. नवाब ७% जास्त
३) श्री. मौला अजिलयान खॉन १०% जास्त
४) श्री. मे. पॉल कन्स्ट्रक्शन ८% जास्त

तुलानात्मकदृष्टया श्री. आर. एल. बारवाल यांचे दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.३४% जास्त होते मात्र श्री. आर. एल. बारवाल यांचे दर जास्मत असल्यामुळे त्यांनी दिलेल्या दराबाबत वाटाघाटी करीता प. क्र. १८६ दि. २-११-९१ नुसार कार्यकारी अभियंता यांचे दालनात दि. १२-११-९१ रोजी बालविण्यात आले असता त्यांनी त्यांचे ०४% जास्त या दराने काम करण्यास तयार असल्याचे लेखी पत्र दिले आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नंदनवन कॉलनीसाठी सेप्टीक टँक आणि बिल्डर्स सोसायटी शांतीपुरा येथे आर. सी. सी. एनची-२ कामाची लाईन टाकणेचे काम दि. १२-११-९१ रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २४९/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बुढीलेन येथे समाजमंदिर बांधणेच्या कामसाठी सा. बां. खात्याचे सन ९०-९१ चे डी. एस. आर दरराने र. रु ८४,०००/- च्या अंदाजपत्र कास मा. आयुक्तानी मंजुरी दिल्यानंतर कार्यालयीन निविदा सुचनाक्र.११ दि. २८-१०-९१ अन्वये निविदा मागविल्या असताना एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

१) श्री. सय्यद गयासोद्दीन ०.०२% कमी
२) श्री. अताऊल्ला खॉन ६.७८६%कमी

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा. ६.७८६% कमी दराची निविदा श्री. अताऊल्लहखान यांची आहे. निविदा मंजुरीस्तव सादर- सदर खर्च सं. नगरसेवक श्री. अन्वर बेग यांचे स्वेच्छा निधी र. रु ५०,०००/- मधुन व उर्वरित रु. ३४,०००/- हे पुढील खर्चाच्या बजेटमधुन एप्रिल ९२ नंतर करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बुढीलेन येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी तुलानात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा- ६.७८६% कमी दराचे श्री. अताऊल्ला खॉन यांचे दरपत्रकास मंजुरी देण्यात येते. सदर खर्च सं. नगरसेवक श्री. अन्वर बेग यांचे सन ९१-९२ च्या स्वेच्छा निधीतुन रक्कम रु. ५०,०००/- व सन-९२-९३ च्या स्वेच्छा निधीतून रु.३४,०००/- या रकमेतून करण्यास वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय २५०/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वार्ड क्र- २० मधील अंजली सिनेमा ते नारळीबाग तसेच नेहरु कॉलेज समोरील रस्त्याचे खडीकरण करणे बाबतच्या

कामसाठी सन ९१-९२ च्या सा. बा. खात्याच्या डी. एस. आर. दराप्रमाणे र. रु १४८२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर खर्च सन ९१-९२ मध्ये भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २० मधील अंजली सिनेमा ते नेहरु कॉलेज (मार्गे नारळी बाग) या रस्त्याचे खडीकरण करण्याच्या कामासाठी र.रु. १,४ ८२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येतो. सदर कामाचा खर्च सन ९१-९२ च्या भांडवली रस्ते या शिर्षकातून करण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## -:ऐनवेळचे विषय :-

**विषय २५१/२० :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल स्लम भागात खांडकी पेन्हींग व खडी रस्त्याचे काम करणेसाठी अंदाजपत्रक र. रु. ६८,०००/- ला मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सुचना क्र. ११(९१-९२) व्दारे स्थानिक वृत्तपत्र दै. सकाळ व दै. मराठवाडा मध्ये प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १) श्री. मीर हिदायत अली | २%अधिक |
| २) श्री. शेख शरीफ | ३%अधिक |
| ३) श्री. जाधव कन्स्ट्रकशन | ०.१% कमी |

तुलनात्मकदृष्टया मे. जाधव कन्स्ट्रकशन यांची निविदा कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१% कमी आहे करीता मे. जाधव कन्स्ट्रकशन यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१% कमी दराची निविदा मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल स्लम भागात खांडकी पेन्हींग व खडी रस्त्याचे काम करण्यासाठी तुलानात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.१% कमी दराच्या मे. जाधव कन्स्ट्रक्शन यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २५२/२१ :**

उप आयुक्त महानगरपालिका औ. बाद यांनी मा. आयुक्त यांचे मंजुरीनुसार प्रस्ताव सादर केला आहे की, शहागंज मनपा शॉंपीग सेंटर मधील दुकान क्र. ७४ या दुकानावरील दिर्घकाळचे भाडे थकबाकी कारणाने सदरहू दुकान कार्यालयाने नियमाप्रमाणे रिकामे करुन ताब्यात घेतलेले आहे. सदरहु भविष्यातील भाडे उत्पन्नाची बुडवणूक होवू नये म्हणून नव्याने भाडयाने द्यावयाचे आहे.

अध्यक्ष जय किसान भाजीपाला व फलोत्पादन शेतकरी सहकारी संस्था म. ता. जि. औरंगाबाद संस्था नोंदणी क्र. अेजीडी/आर अे एस आर (सीआर ) ३०१-८७-८८/१९८७ दिनांक २-११-८७ यांनी शहागंज शॉपींग सेंटर मधील दुकान भाडयाने देण्याबाबत विनंती केलेली आहे.

सदरहू दुकान अर्जदार संस्थेस सहाय्यक संचालक नगर रचना ठरवून देतील त्या भाडे दराने व मा. आयुक्त ठरवून देतील त्या आटी शर्थीवर-११ महिन्याच्या काळासाठी भाडेपटटयाने देणेबाबत विचार होणेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. तुळशीराम भगुरे :** शहागंज मनपा शॉपींग सेंटर दुकान क्र. ७४ प्रमाणे आणखी किती दुकाने यांचे भाडे थकलेले आहे. त्या बाबतची माहिती देण्यात यावी. आणि अशी दुकाने रिकामी करुन घेण्यात यावी आणि अशी दुकाने रिकामी करुन घेण्यात यावी.

**श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. गिरजाराम हाळनोर :** शहागंज मनपा मार्केट मधील दुकाने कोणत्या कारणासाठी भाडयाने दण्यात आली आहेत याची माहिती द्यावी रिकामे करुन घेण्यात आलेले दुकानासाठी चालु रेट दराप्रमाणे भाडे आकाराण्यात यावे.

**श्री. केशव सोनवणे :** शहागंज मनपा शॉपींग सेंटर मधील दुकान ज्या पध्दतीने रिकामे रिकामे घेऊन शेतकरी सहकारी संस्थेस भाडयाने देण्यात येत आहेत. त्याच पध्दतीने इतर शेतकरी संस्थानी मागणी केली तर अशाप्रकारे दुकान रिकामे करुन भाडयाने देण्यात येईल काय ? दुकान भाडयाची थकबाकी असलेले अशी किती दुकाने आहेत. याप्रमाणे दुकान भाडयाची थकबाकी असलेले इतर दुकानेयाच बरोबर रिकामे करुन का घेण्यात आाली नाही आणि अशा दुकान भाडे थकलेल्या सर्व दुकानाचे बाबतीत एकाच वेळी प्रस्ताव का दाखल केला नाही. याबाबतची माहिती पुढील सभेत देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज मनपा शॉपींग सेंन्टर मधील दुकान क्र. ७४ या दुकानाचे भविष्यातील भाडे उत्पन्नाची बुडवणूक होऊ नये म्हणून नियमाप्रमाणे रिकामे करुन घेण्यात आलेले सदर दुकान अध्यक्ष जय किसान भाजीपाला व फलोत्पादन शेतकरी सहकारी संस्था मर्यादीत ता. जि. औरंगाबाद या नोंदणी कृत संस्थेस सहाय्यक संचालक नगररचना यांनी ठरवून दिलेल्या भाडे दराने आणि मा. आयुक्त ठरवून देतील त्या अटी व शर्तीवर ११ महिन्याच्या कालवधीसाठी भाडेपटटयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २५३/२२ :**

वार्ड क्र. २९ मधील मनपा शाळेतील विद्यार्थ्याना ब्लॅक बोर्ड योजने अंतर्गत अध्ययन व अध्यापन (मुळाक्षरे फिकस फिकचर फन ॲन्ड लर्न / प्राणी संग्रह) नुसार साहित्य वाटप करण्यासाठी सं. सभासद श्री. विजय पालीवाल यांच्या स्वेच्छा निधीतुन र. रु ४७००/- खर्च करण्याबाबत संबंधीत नगर सेवकाने लेखी विनंती केली आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २९ मधील महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना ब्लॅक बोर्ड योजने अंतर्गत अध्ययन व अध्यापन करीता (मुळाक्षरे फिकस फिचर- फॅान ॲन्ड लर्न प्राणी संग्रह) लागणारे र. रु ४७०००/- पर्यंतच्या खर्चाचे साहित्य सं. नगर सेवक श्री. विजय पालिवाल याचें सन १९९०-९१ व मंजुर दरानुसार खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | सभापती स्थायी समिती. |
| औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद | औरंगाबाद महानगरपालिका, |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक- ४ जानेवारी १९९२ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत शनिवार दिनांक- ४ जानेवारी १९९२ रोजी मा. सभापती श्री. मोहंमद इस्माईल अब्दुल करीम यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ३.०० वाजता समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यलयीन अधिका-यांसह निम्ननिर्दिष्ट सन्माननिय सभासद उपस्थित होते.**

१. श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग
२. श्री. फैय्याजखान अहेमदखान
३. श्री. अतिम बेग मिर्झा कलीम बेग
४. श्री. जावेद हसनखाँन कासीम हसनखाँन
५. श्री. विजय गोविंदलाल पालीबाल
६. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
७. श्री. भगुरे तुळशीराम छगन
८. श्री. बारवाल गजानन रामकिसन
९. श्री.विधाते प्रभाकर सिताराम
१०. श्री. सोनवणे केशव काशीनाथ
११. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय २५४/१ :**

दिनांक १७-१२-९१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. अलिम बेग :** लेखा विभागातर्फे बँकेत भरणा करण्यात येणा-या रकमेच्या बँक बुकाचे रिकन्सिलेशन करण्याचे काम चालु आहे काय ? याचा खुलासा व्हावा.

**मुख्यलेखा परिक्षक :** महानगरपालिका तर्फे बँकेत भरण्यात येणा-या रकमेबाबतच्या रजिस्टरचे रिकन्सीलेशन करण्याचे काम चालु असून हे काम यापुर्वीच दोन आणि बदली होवून आलेले दोन असे चार कर्मचारी करीत आहेत.

**श्री. अलीम बेग :** बँक रिकन्सिलेशनच्या कामासाठी चालु असलेले रजिस्टर सभागृहात मागविण्यात यावे.

**मा. सभापती :** सं. सभासदांच्या सुचनेप्रमाणे रजिस्टर सभागृहात मागविण्यात यावे.

**श्री. गीरजाराम हाळनोर :** गणेश कॉलनीमधील हनुमान मंदिराजवळ असलेल्या विहिरीपासून जाण्याचा रस्ता बंद केला आहे. तो रस्ता पुर्ववत चालु ठेववा यासाठी लेखी अर्जही केलेले आहे. त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा. शहर अभियंता :** गणेश कॉलनीतील हनुमान मंदिराजवळ असलेल्या विहिरीमुळे जाण्याचा रस्ता बंद केल्याबाबतची माहिती पुढील सभेत देण्यात येईल.

**मा. सभापती :** संबंधीत अधिका-यांनी पुढील सभेत माहिती द्यावी.

**श्री. केशव सोनवणे :** महापालिके तर्फे ए-१ वर करुन घेण्यात येणा-या कामाबाबतची माहिती देण्याकरिता लेखी पत्र दिले आहे. त्याबाबत काय कार्यवाही झाली.

**मा. सभापती :** ए-१ वर करुन घेण्यात येणा-या कामाबाबतची माहिती पुढील सभेंत देण्यात येईल.

**श्री. केशव सोनवणे :** कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण हया विभागातर्फे मागविण्यात आलेल्या टेंडरपैकी एका कामाचे टेंडरसंबंधी ठेकेदाराने प्रशासनास पत्र दिले आहे. व त्या संदर्भात संबंधीत ठेकेदाराने न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणात कार्यकारी अभीयंता, मा. आयुक्त मा. सभापती आणि सभागृह यांना प्रतिवादी केले आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** सं. सभासदांनी केलेल्या सुचनेप्रमाणे त्याबाबतचे एक पत्र दि. २-१-१९९२ ला मिळाले आहे. प्राप्त झालेल्या पत्रानुसार संबंधीत विभागाकडून देण्याबाबतचे पत्र दिले आहे. तसेच या प्रकरणी आज कार्यकारी अभियंता यांचेशी चर्चा करण्यात आली. त्यावेळी या प्रकरणात खंडपिठाकडे अपील दाखल केल्याचे समजले सदर प्रकारणात मार्ग काढण्याच्या दृष्टीने या टेंडरशी संबंधीत असलेल्या ठेकेदारांना बोलवण्यात आले होते. ठेकेदाराने टेंडरसोबत सॅम्पल दाखल न केल्यामूळे या कामाचे टेंडर रिकॉल करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

**श्री. केशव सोनवणे, श्री अलीम बेग :** मिळालेल्या माहितीनुसार सदर प्रकरणात टेंडर रिकॉल करण्याबाबत जी कार्यवाही ताबडतोब करण्यात आली अशीच कार्यवाही इतर सर्वसाधारण संचिकाबाबत करण्यात येत नाही.

**शहर अभियंता :** कामाची तातडी लक्षात घेऊन कार्यवाही केली जाते.

**श्री. गिरजाराम हाळनोर श्री. केशव सोनवणे :** संबंधीत अधिका-याच्या खुलाशाप्रमाणे अधिकारी ठरवतील त्याप्रमाणे संचिकेची तातडी ठरते असे दिसते. याउलट एखादया कामाविषयी सभासदांना सुचना केल्यावरही त्याकामाचे मंजुरीबाबत अशाप्रकारची तातडी दाखवली जात नाही.

**मा. सभापती :** सदर कामाचे संचिका पाहण्यात आली. या कामासाठी दोन टेंडर निर्धारित वेळेपेक्षा ०.०२ मिनिट उशिरा आली आहेत. याशिवाय काही टेंडर कार्यकारी अभियंता यांनी स्वत: कडे ठेवले हाते. तेंव्हा टेंडर टेंडर बॉक्स सिल करण्यास ०.०५ मिनिटाचा कालावधी लागतो. तेंव्हा कार्यकारी अभियंता यांनी स्वत:जवळ टेंडर कसे ठेवले याबाबत विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी तो त्यांचा अधिकार असल्याचा खुलासा केला आहे.

**श्री. केशव सोनवणे :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकण ५ चे कलम-१ (अ) (२) २ (२) अन्वये टेंडर ओपन करतांना स्थायी समितीचे दोन सदस्य हजर असणे आवश्यक आहे. तेंव्हा या कामाचे टेंडर ओपन करतांना स्थायी समितीचे सभासद हजर नव्हते म्हणून टेंडर रद्द करण्यात यावे. तसेच टेंडर ओपन करतांना स्थायी समितीचे सभासद हजर होते काय ? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापाती :** सदर टेंडरबाबत आक्षेप अर्ज आला असतांना त्याबाबतची चर्चा झाली काय ? याचा खुलासा व्हावा.

**कार्याकारी अभियंता :** सदर कामाचे टेंडर बाबत दाखल झालेल्या आक्षेप अर्जाची माहिती मा. आयुक्त यांनी दिली. त्या वेळी मा. आयुक्त यांनी टेंडर स्विकारण्याबात सुचना दिल्या.

**मा. उप आयुक्त** : सभागृहातील चर्चा लक्षात घेता सदर कामाचे टेंडर रिकॉल झाले ही बाब लक्षात घेता. यापुढे अशी चुक होणार नाही अशी कबुली देवून स्थायी समितीच्या आदेशाचे पालन करावे.

**मा. सभापती** : सदर कामाचे प्रकरण कोर्टात दाखल झाले आहे. तेंव्हा यासाठी येणारा खर्च कोण देणार. या कामाचे टेडर स्विकारतांना जी पध्दत उपयोगात आणली ती व्यक्तीगत पध्दत झाली आहे.

**श्री. केशव सोनवणे, श्री. गिरजाराम हाळनोर** : सदर प्रकरणात टेंडर रिकॉल करण्याबाबत ज्या पध्दतीचे तातडीने काम होते त्याच पध्दतीने अधिकाऱ्यांनी इतर कामाबाबत तातडीने लक्ष घालुन काम केले असते तर ड्रेनेजबाबत वृत्तपत्रामध्ये बातम्या छापून आल्या नसत्या नागसेन कॉलनी येथील ड्रेनेजच्या कामाचे टेंडर रिकॉल करण्याबाबत मंजुरी मिळालेली असतांनाही सदर प्रकरणी अद्याप कार्यवाही का झाली नाही याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : सदर प्रकरणी संचिका पुढील सभेत ठेवण्यात यावी. म्हणजे त्या सभेत त्यावर निर्णय घेण्यात येईल.

**श्री. अलीम बेग** : एखाद्या कामामध्ये अंदाजपत्रकाच्या रकमेव्यतिरिक्त १०% जादा काम करता येते काय ? याचा खुलासा व्हावा.

**शहर अभियंता** : सं. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे अंदाज पत्रकाच्या रकमेपेक्षा १०%जादा काम करता येते.

**श्री. गिरजाराम हाळनोर** : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे अंदाजपत्रकाच्या रकमेपेक्षा १०%जादा काम करण्याच्या पध्दतीवर ज्योतीनगर येथील ड्रेनेजचे काम करुन घेण्यात यावे.

**उप अभियंता ड्रेनेज** : ज्योतीनगर येथील ड्रेनेजच्या कामाच्या टेंडरचे दर ३०% कमी आहे. खुल्या बाजारात पाईपचे दर वाढवलेले आहेत.त्यामुळे सदर काम करुन देण्यास गुत्तेदार तयार असल्यास हे काम करुन घेता येईल.

**मा. उप आयुक्त** : सध्या दोन वर्षाचे बँक रिकरिंगचे ऑडीट करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. या पुर्वीच्या रिकान्सिलेशनच्या बेरजेत साडपत आहे. त्यासाठी १९९० पासून मागील वर्षाचे बँक रिकन्सिलेशन करण्याचे काम चालू केले आहे तेंव्हा बँक रिकन्सिलेशन रजिस्टरचे पुर्ण ऑडीट झाल्यावर याबाबतची माहिती कळेल.

**श्री.केशव सोनवणे** : बँक रिकन्सिलेशन रजिस्टरची पाहणी केली असता वाढलेली किंवा कमी झालेली रक्कम पुढील पानावर घ्यावयास पाहिजे. तेंव्हा बँक रिकन्सिलेशन रजिस्टरचे ऑडीट योग्य प्रकारे झाले नाही तर झोन-५ प्रमाणे पुन्हा प्रकरण घडेल याची नोंद घ्यावी.

**मा.उप आयुक्त** : बँक रिकन्सिलेशन रजिस्टरच्या कामासाठी आणखी कर्मचारी देवून दोन महिन्यात पुर्ण करुन स्थायी समितीपुढे ठेवता येईल.

**श्री. तुळशीराम भगुरे** : औरंगाबाद महानगरपालिकेकडे किती गाडया आहेत या सर्व गाडयावर औरंगाबाद महानगरपालिका असें नांव टाकलेले आहे मग आरोग्य वैद्यकिय यांचे गाडीवरच औरंगाबाद महानगरपालिका असे नाव का नाही.

**श्री. गिरजाराम हाळनोर** : आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे गाडीवर औरंगाबाद महानगरपालिका असे नाव टाकलेले नसल्यामुळे या गाडीचा दुरुपयोगही होऊ शकतो.

**ठराव :**

दिंनाक १७-१२-९१ पार पडलेल्या स्थायी समितीच्या इतिवृत्तातील(१) ठराव क्र.२३२ मधील वैद्यकिय देय्य भत्याबाबतच्या चर्चेत.

**आरोग्य वैद्याकिय अधिकारी :** श्रीमती हरणाबाई खरात यांनी वैद्यकिय देय भत्त्याची रक्कम मिळणेबाबत दोन वेगवेगळया प्रकारची बिले दाखल केली आहेत. तसेच वैद्यकिय देय भत्त्याबाबतच्या प्रचलित नियमावलीतील त्रुटी लक्षात घेता याबाबतचे नविन नियम तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. सदर नियमावली एक महिन्याचे आत सभागृहात सादर केली जाईल. अशी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

२) ठराव क्र. २३३/०२ मध्ये दिनांक १-६-९१ पासून वाढलेल्या रु. १-४० पैसे प्रति हजार लिटर या वाढील दराने याऐवजी दिंनाक १-६-९१ पासून वाढलेल्या रुपये १-६५ पैसे हजार लिटर्स दराने अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३) ठराव क्र. २४४/१३ बाबत स्थळ पाहणी करण्यात आली असून प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एमपी लॉ कॉलेज ते नागेश्वर वाडी (खडकेश्वर) येथील खडी रस्ता तयार करण्याच्या कामसाठी श्री. कैसररखान यांचे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५% कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वरील दुरुस्ती व वाढ यासह दिनांक १७-१२-९१ च्या स्थायी समितीने इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय २५५/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कबीर नगर येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रु २,१२,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च कमकुवतघटकासाठी कल्याणकारी योजना" या शिर्षकाखाली करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कबीरनगर येथे समाज मंदिर रक्कम रु २,१२,५००/- च्या अंदापत्रकास सर्वानमुते मंजुरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजनास या शिर्षकाखाली करण्यात यावा.

**विषय २५६/३ :**

शहर अभियंता यांनी प्रंस्ताव सादर केला की, सिल्लेखाना कत्तलखाना शेजारी असलेल्या स. न. ७५९९ खुली जागेस संरक्षितभिंत बांधणेच्या कामासाठी र. रु. ९१५५३/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानुसार दि. २८-११-९१ रोजी दै. मुकदस व स्वरंगंगा मध्ये निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली त्यानुसार एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) मिर हिदायत अली १% कमी
२) श्री. सिद्यीकी आय. जे. ३% जास्त
३) श्री. एस. के. इकबाल अहेमद ४% जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची श्री. मिर हिदायत अली यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. प्रभाकर विधाते :** संरक्षित भिंत बांधण्यात येणारी स.न. ७५९९ ची खुली जागा कोणाच्या मालकिची आहे. याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** संरक्षित भिंत बांधण्यात येणारी स. न. ७५९९ ची खुली जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्लेखाना कत्तलखाना शेजारी असलेल्या स. न. ७५९९ या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १% कमी दराच्या श्री. मिर हिदायत अली यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय २५७/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील विविध वार्डात सोडियसव्हेपर दिवे नगरसेवक स्वेच्छा निधीतुन लावण्याकरीता र. रु. ५,५०,३९४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामासाठी दैनिक औरंगाबाद डॉन व दैनिक नवा मराठा या वृत्त्पत्रातुन निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या पैकी मे. सत्य इले. व मे. पगारिया एन्टरप्राईजेस यांनी फिटींग सोबत ब्रॅकेट व क्लॅम्प न दिल्यामुळे त्यांच्या निविदेचा विचार सकेला जाईल उर्वरित तीन निविदाचे दर खालल प्रमाणे

१) मे. मेघदुत (ब्रॅकेट व कलॅमासह) (बजाज मे) (१७८ फिटींग) प्रति फिटींगचे एकूण रक्कम दर रुपये ३,२२८,=२३ - ५,८२,२७४ = ९४

२) मे. संदीप (कॅपोरि औरंगाबाद, (बजाज)१७८ फिटींग ३५५८=०० ६५४९२४ = ००

३) मे. मेहता ट्रेडर्स, मुंबई (बाजमेक) १७८ फिटींग ३४५२=५० - ६२१७४५ = ००

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर मे. मेघदुत इलेकट्रीकल्स व इलेकट्रॉनिक्स यांची निविदा सर्वात कमी म्हणजे रुपये ५८२२७४ = ९४ आहे. तरी त्यांनी दिलेल्या दरास व एकूण १७८ नग फिटींग मागविणेस्तव व एकूण रकमेच्या खर्चास मंजुरीस्तव विचरार्थ सादर

**संवाद :**

**श्री. केशव सोनवणे :** सदर कामाचे टेंडरमध्ये दिशाभुल केली आहे. त्यामुळे मनपाचे अंदाजे रुपये ४७/४८ हजाराचे नुकसान होणार आहे. यापुर्वीही सोडीयम व्हेपरचे दिवे लावताना मंजुरा कंपनी व्यतिरिक्त अन्य कंपनीचे दिवे लावण्याची तक्रार करण्यांत आली होती.

**मा. सभापती :** ठेकेदाराने सोडियम व्हेपरचे दिवे लावण्याचे काम केल्यानंतर कंपनीचे कर्मचा-यांना पाचारण करुन मंजुरीनुसार कंपनीचेच दिवे लावण्यात आले आहेत किंवा नाही याची तपासणी करुन घेण्यात यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर:** प्रस्तावात कोणत्या वॅटचऽ सोडियम व्हेपर दिवे लावण्यात येतील याचा उल्लेख नाही.

**मा. सभापती :** प्रमाणात सोडियम व्हेपरचे दिवे लावण्याबाबत प्रत्येक नगरसेवकांच्या तक्रारी आल्या आहेत सन. १९९०-९१ या वर्षातही नगरसेवक स्वेच्छा निधीतुन सोडियम व्हेंपरचे दिवे लावण्यात आले नाहीत. तेंव्हा सन १९९०-९१ चे स्वेच्छा निधीतून संबंधीत नगरसेवकांचे वार्डात सोडियम व्हेपरचे दिवे लावण्यात येणार असल्याने या प्रस्तावास मंजुरी देणे आवश्यक आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध वार्डात नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन सोडियम व्हेपरचे ब्रॅकेट व कॅलम्पसह बजाज मेलचे दिवे लावण्याकरीता प्रति फिटींग रुपये

३२२८.२३ पैसे या तुनात्मकदृष्टया सर्वात कमी या दराचे मेसर्स मेघदुत इलेकट्रीकल व इलेटॅ्रनिक्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. उकत दराने -१७८ फिटींग मागविण्याकरिता रक्कम रु. ५८२२७४ रुपये ९४ पैसे च्या खर्चास सर्वानमुते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सभासदांनी त्यांचे वार्डात सोडियम दिवे लावण्याबाबत अनेक दिवसापासून सतत मागणी केली असल्यामुळे सोडियम दिवे लावण्याचे काम तातडीने हाती घेता यावे यासाठी या ठरावास स्विकृती देण्यास सर्वानमुते मंजुरी देण्यात येते.

**विषय २५८/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मौलाना आझाद कॉलेजसमोरील गितानगरकडे जाणा-या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामसाठी सा. बां. खात्याच्या सन-८९-९० च्या डि. एस. आर. दराने र. रु. ६१,६००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि.५-११-९० ला मंजुरी दिल्यानुसार सदर कामासाठी दुस-यांदा कार्यालयीन निविदा क्र.१ दि १०-४-९१ रोजी निविदा मागविल्या असता एकूण फक्त एकच मे. रे. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०% जास्त दराची निविदा प्राप्त झाली.

दिनांक १६-५-९१ रोजी ठेकेदारास पत्र देऊन दर कमी करणेबाबत वाटाघाटी करण्यासाठी बोलविले असता त्यांनी दि. २-१२-९१ रोजी लेखी पत्राद्वारे कळविले आहे की ३०%जास्त ऐवजी २४%जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहेत.

सन- ९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तुलना केली असता सदरील दर ७.६३% कमी येतात करीता मे. रे. कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौलाना आझाद कॉलेज समोरी गितानगर कडे जाणा-या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी मे. रे. कन्स्ट्रकशन यांनी दि. २/१२/९१ रोजी लेखी कळविल्यानुसार उक्त काम संबंधीता कडुन अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २४%जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय २५९/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की बहादुरपुरा येथील दत्त मंदिरासमोरील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९८-९० च्या सा. बां. खात्याच्या डी. एस. आर. दराप्रमाणे र. रु. ८९०००/-च्या अंदाजपत्रकास दि. ८-४-९१ रोजी मा. आयुक्तांची मान्यता मिळाली आहे.

सदर कामासाठी दुस-यांदा कार्यलयीन निविदा क्र.३ दिनांक २९-१०-९१ रोजी निविदा मागविल्या असता मे.रे.कन्स्ट्रकशन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४०% जास्त दराची फक्त एकच निविदा प्राप्त झाली.

परंतु सन-९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तुलना केली असता सदरील दर २.९४% जास्त येतात. करीता मे.रे. कन्स्ट्रकशन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४०%जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बहादुरपुरा येथ्पील दत्त मंदिरासमोरी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४०% जास्त दराच्या मेसर्स रे. कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २६०/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, काली मस्जिद येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९०-९१च्या डि. एस. आर. दराप्रमाणे र. रु. ३१६४०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर कामासाठी दुस-यांदा कार्यालयीन निविदा क्र. ४ दि. २९-१०-९१ अन्वये निविदा मागविल्या असता मे. रे. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त दराची फक्त एकच निविदा प्राप्त झाली सन ९१-९२ च्या दरसुचीशी तुलना केली असता सदरील दर ०.१७% जास्त येतात प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे काली मस्जिद येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त दराच्या मेसर्स रे. कन्स्ट्रकशनश यांचे दरपत्रकास सर्वानमुते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २६१/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पदमपुरा येथील" पंचवटी" ते हॉटेल नंदनवन" या ८० फुट डी.पी. रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी सन ९०-९१ चे सा. बां. खात्याचे डि. एस. आर. दराने र. रु ४,५०,५६९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून शासनाचे सन ९०-९१ च्या (रु-७कोटी) योजनेत त्यास मान्यता मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ४ दि.२९-१०९१ चे निविदा सुनचेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे .

| | |
|---|---|
| १) श्री. कुलवंतसिंग | ०.३०% कमी. |
| २) श्री. कैसर खान | २% जास्त. |
| ३) श्री. एस. ए.नवाब | ४% जास्त. |
| ४) श्री. मे. विशाल कन्स्ट्रकशन | १०% जास्त. |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गजानन बारवाल :** हॉटेल पंचवटी ते हॉटेल नंदनवन या ८० फुट डी.पी. रोडचे रुंदीकरण करण्यासाठी लागणारी आवश्यक जागा मनपाच्या ताब्यात आहे. काय याचा खुलासा व्हावा

**शहर अभियंता :** प्रस्तावात दर्शविलेले रस्त्याचे रुंदीकरणासाठी काही जागा ताब्यात असून ताब्यात नसलेल्या उर्वरित जागेवर कार्यवाही चालू आहे.

**श्री. आलीम बेग :** प्रस्तावात दर्शविलेले रस्त्याचे रुंदीकरणासाठी जेव्हढी जागा उपलब्ध आहे. त्याठिकाणी रुंदीकरणाचे काम करण्यात यावे..

**श्री. प्रभाकर बिधाते :** वार्ड क्र. ३ मधील मकाई गेट ते मकबरा या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम अर्धवट स्थितीत आहे. ते पुर्ण करण्यात यावे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** वार्ड क्र.१५ येथील चेलीपुरा पोलीस चौकी ते रोषनगेट पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम का थांबलेले आहे. याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** वार्ड क्र. १५ मधील चेलीपुरा पोलीस चौकी ते रोषनगेट पर्यतंच्या रस्त्यात बाधीत होणा-या काही मालमत्ता अद्याप संपादन झालेल्या नाहीत अशी माहिती मिळाली आहे. याबाबत संबधीत वार्डाचे नगरसेवक मा. आयुक्त व महापालिकेचे संबंधीत अधिकारी यांनी बाधीत होणा-या मालमत्ता धारकांची प्रत्यक्ष भेट घेऊन यातुन काही मार्ग काढता येईल काय ? असा प्रयत्न केला जाईल तसेच बाधीत होणा-या मालमत्ताधारकांनी संपादनाबाबत मनाई हुकुम घेतला असेल तर त्यासाठी प्रशासनातर्फे नविन विधिज्ञ नेमण्यात यावा आणि या कामाचे संबंधाचे प्राप्त झालेल्या हुकुमाच्या प्रति सोमवार पर्यत सभागृहाकडे देण्याची व्यवस्था करावी म्हणजे सदर प्रकरणी प्रत्यक्ष संबंध साधता येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पद्‌मपुरा येथील हॉटेल पंचवटी ते हॉटेल नंदनवन या ८० फुट डी.पी. रोडचे रुंदीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा०.३०% कमी दराच्या श्री. कुलवंतसिंग याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २६२/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला क्रांतीचौक ते विनायकराव पाटील चौकापर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजुने खडी रस्त्याचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी सन ९०-९१ चे सा. बा. खात्याचे डि. एस. आर. दराने र. रु ९८१८६/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून शासनाचे सन ८९-९० च्या (रुपये ३.८५ कोटी) योजनेत सदरच्या कामाचा समावेश असून त्यास मनपा सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.६३/५ दि. १५-८-९-९० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.११ (९१-९२) द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) श्री. कुलवंतसिंग ०.३५% कमी
२) श्री. मनजितासिंग ०.१०% कमी
३) श्री. रविंद्रसिंग १% जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३५% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक ते विनायकराव पाटील चौक पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुचे रुंदीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.३५% कमी दराच्या श्री. कुलवंतसिंग याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २६३/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गोपाल टी. सेंटर ते उस्मानपुरा, गुरुद्वारा, गोपाल टी. सेंटर ते उस्मानपुरा, गुरुद्वारा, पर्यतच्या रस्त्याच्या

रुंदीकरणाचें काम करणेसाठी सन ९०-९१ चे सा. बां. खात्याचे डि.एस. आर. दराने रक्कम रु ५१,१००/- च्या अंदाजपत्रकास दि-१८-१०-९१ ला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.११ (९१-९२) द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

१) श्री. मनजितसिंग ०.४०% कमी
२) श्री. कुलवंतससिंग ०.२०% कमी
३) श्री. रविंद्रसिंग १% जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४०% कमी दराचे श्री. मनजितसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गोपाळ टी सेंटर ते उस्मानपुरा गुरुद्वारा पर्यंतच्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.४०% कमी दराच्या श्री. मनजितसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २६४/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दिल्ली गेट येथील शहर सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने रोडचे खडी रस्त्याचे काम करणेसाठी सन-९०-९१ चे सा. बां. खात्याचे डि. एस. आर. दराने तयार करण्यात आलेल्या र. रु ८६२५०/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम हाती घेण्याकरीता कार्यलयीन निविदा सुचना क्र.११ (९१-९२) चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे.

१) श्री. अशरफ अ. गणी २% जास्त.
२) श्री. जफरखान ३% जास्त
३) श्री. इ. वी. पठाण ५% जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची श्री. अशरफ अब्दुल गणी यांची निविदा होती. परंतु दर जास्त दिल्यामुळे ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलाविले असता त्यांनी २% जास्त ऐवजी १% कमी दराने काम करण्यास संमती पत्र दिलेले आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर सौंदर्यीकरण करणाच्या दृष्टीने दिल्लीगेट येथील रोडचे खडी रस्त्याचे काम गुत्तेदार श्री. अशरफ अब्दुल गणी यांचेशी झालेल्या वाटाघ्याटीनुसार अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १% कमी दराने संबंधीता कडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २६५/१२ :**

सहाय्यक आयुक्त-२ मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९१-९२ या वर्षासाठी चतुर्थ श्रेणी स्त्री शिपाई सेविका स्त्री मजुरीणी यांना साडया व गणवेश

वाटप करावयाचे आहे. यासाठी निविदा ५/१२/९१ रोजी मागविण्यात आल्या होत्या एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.

१) मे. रमेश बिन्नीज टेकस्टाईल
२) हिरा क्लॉथ सेंटर
३) मे. रमेश संतोष जैन
४) जे. के. इंटरप्राईजेस

प्राप्त झालेल्या निविदांचा तुलनात्मक तकता सोबत जोडला आहे. निविदा सोबत देण्यात आलेल्या साडया ब्लाऊज पिसेस शर्ट सलवार व ओढणीचे कापड दरवर्षीप्रमाणे पसंत करण्यासाठी चतुर्थश्रेणी महिला कर्मचा-यांना बोलवण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे कापडाची (साडया ब्लाऊज पिस, शर्ट सलवार व ओढणी ) पसंत केली.

| **अ.क्र** | **वस्तु** | **नग** | **दर** | **एकूण किंमत** |
|---|---|---|---|---|
| १) | नऊवारी रंगीन साडी (तीतली) | ८०० | १९९ | १५९२००=०० |
| २) | ब्लाऊज पिस | ८०० | २०.५० | १६४००=०० |
| ३) | नऊवारी पांढरी साडी | १० | १५१ | १५१०=०० |
| ४) | सहावारी पांढरी साडी | १०० | १६६ | १६६००=०० |
| ५) | शर्ट सलवार | १७० | २४५ | ४१६५०=०० |
| ६) | ओढणी | १७० | ४८ | ८१६०=०० |
| ७) | पांढरे ब्लऊज पिस | ११० | २०.५० | २२५५=०० |
| | | | **एकुण रक्क्म रुपये.** | **२४५७६५=००** |

(म्हणजे रुपये २,५०,०००/-)

प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद** :

**मा. सभापती** : कार्यालयातर्फे दरवर्षी चतुर्य श्रेणी स्त्री शिपाई, सेविका स्त्री सफाई कामगार यांना वाटप करण्यात येणा-या साडया व गणवेश यांचे नमुने कर्मचा-यांना दाखवुन त्यांचेपसंतीनुसार मंजुरी करण्याची प्रथा पुर्वीपासून चालत आली आहे. त्यानुसार सन. १९९१-९२ या वर्षासाठी वाटप करण्यात येणा-या साडया व गणवेश यांचे नमुने चतुर्यश्रेणी कर्मचा-यांना दाखवुन त्यांचे पसंतीनुसार खरेदी करण्यात येते आहे. चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना वाटप करण्यात येणा-या गणवेश बाबत कर्मचा-यांचे दोन संघटनांकडून वेगवेगळही माहिती आली आहे. संघटनेतर्फे करण्यात आलेल्या मागणीत भिन्नता आहे. या भिन्नतेच्या पुर्ततेसाठी पुढील वर्षी तीन/चार महिने आगोदर गणवेश वाटप बाबतचे टेंडर मागवून त्याबाबतची पुर्तता करण्यात येईल. तसेच वाटप करण्यात येणा-या साडयांचे बॉर्डरवर अे. एम. सी. असा मार्क देण्याची व्यवस्था करता येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ या वर्षासाठी चतुर्थ श्रेणी स्त्री, सफाई कामगार सेविका शिपाई, या कर्मचा-यांना वाटप करण्याच्या साडया व गणवेशासाठी चतुर्थ श्रेणी महिला कर्मचा-यांनी पसंत केल्यानुसार खालील दर्शविल्याप्रमाणे मंजुरी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | वस्तु | नग | दर | एजन्सीचे नांव | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १) | नऊवारी रंगीन साडी (तितली) | ८०० | १९९.०० | रमेश बिन्नीज टेकस्टाईल | १५९२००=०० |
| २) | ब्लाऊज पीस | ८०० | २०.५० | | १६४००=०० |
| ३) | नऊवारी पांढरी (साडी)) | १० | १५१.०० | | १५१०=०० |
| ४) | सहावारी पांढरी साडी | १०० | १६६=०० | | १६६००=०० |
| ५) | शर्ट सलवार | १७० | २४५=०० | रमेश संतोष जैन | ४१६५०=०० |
| ६) | ओढणी | १७० | ४८=०० | | ८१६०=०० |
| ७) | पाढरे बलाऊज पीस | ११० | २०.५० | रमेश बिन्न्नीज टेकस्टाईल | २२५५=०० |
| | | | | एकुण रक्कम रु. | २,४५,७६५=०० |

(म्हणजेच रु. २,५०,०००/-)

दरवर्षीप्रमाणे स्त्री कामगारांना संक्रांतीच्या सणासाठी गणवेशाचे वाटप होत असल्याने येत्या संक्रांतीच्या सणास कर्मचा-यांना गणवेश वाटणे सोयीस्कर व्हावे यादृष्टीने या ठरावास स्विकृतीही देण्यात येते. तेंव्हा संबंधीत विभागाने योग्य ती वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय २६६/१३ :**

महानगरपालिकेच्या इयत्ता २ री ते ७ वी च्या गतवर्षीच्या वार्षीक परिक्षेत किमान ७०%गुण मिळविलेल्या सर्वजाती धर्माच्या विद्यर्थ्याना रु. ५०,०००/- चे शालेय साहित्य व गणवेश वाटप करावयाचे आहेत. परंतु त्यामध्ये पुढीलप्रमाणे राखीव जागा ठेवण्यात येणार आहेत. अनुसूचित जाती १२ १/२% अनुसूचित जमाती १२ १/२ % विमुक्त भटक्या जमाती १२ १/२ % व इतर मागासवर्गीय जाती १२ १/२ % आणि इतरांसाठी ५०%यासाठी दैनिक मराठवाडा व दैनिक सकाळ या स्थानिक वृत्तपत्रातून जाहीर निविदा सुचना व प्रकाशीत एजन्सीकडून निविदा प्राप्त झाल्या त्याच्या तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वस्तुचे नांव१.२ | आर. बी. इंटरप्राईजेस ५-१-७ उस्मानपुरा औरंगाबाद ३ | रमेश बिन्नीज टेक्स्टाईल सराफा औरंगाबाद ४. | मुरलीस्टेशनसं सुपारी हनुमानरोड औरंगाबाद.५ |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | संतोष सेटस कॉर्पोरेशन जनरल |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | सप्लायर्स औरंगाबाद.६ |
| १.स्कुल बॅग बाटा खाकी रंग क्र-१४ | ३३=०० | ३३=०० | ३०=०० | २९=०० |
| २) कंपास पेटी (कॅमल कॅडेट) | ३=७५ | १०=०० | ०८=०० | ०९=०० |
| ३) बॉलपेन (साधीरिफीलवाले) | २=७५ | ०१=९० | ०१=७५ | ०२=०० |
| ४)पाटी (पत्र्याची) (१०" ८") | ०७=०० | ०७=७५ | ०६=५० | ०७=२५ |
| ५) ड्राईंग वही (१०पृष्ट) | ०४=५० | ०६=०० | ०४=२० | ०५=०० |
| ६) रंगपेटी (कॅमल, बॉक्स) | ०२=७५ | ०४=०० | ०३=५० | ०४=९० |
| ७) वही (नोट बुक) २०० पुष्ट | ०४=२३ | ०४=५० | ०४=०० | ०४=५० |
| ८) खाकी टेरिकॉट हाफशर्ट -११नं साईज | ३८=०० | ३८=०० | ३९=०० | ३६=५० |
| ९) खाकी टेरिकॉट हाफशर्ट - १२ साईज | ४१=५० | ४१=५० | ४३=०० | ३९=५० |
| १०) खाकी टेरिकॉट हाफशर्ट १४ न साईज | ४४=०० | ४३=५० | ४७=०० | ४१=५० |
| ११) खाकी टेरिकॉट हाफशर्ट-१४नं साईज | ४७=०० | ४८=५० | ५१=०० | ४४=५० |
| १२)खाकी टेरिकॉट हाफशर्ट १५ नं साईज | ५०=०० | ५१=०० | ५५=०० | ४७=५० |
| १३)पांढरा टेरिकॉट बुशर्ट २२नं साईज | ४७=०० | ४५=०० | ४७=०० | ४१=०० |
| १४)पांढरा टेरिकॉट बुशर्ट २४नं साईज | ५२=०० | ५२=०० | ५१=०० | ४९=०० |
| १५)पांढरा टेरीकॉट बुशर्ट २६ नं साईज | ५७=०० | ६२=०० | ५५=०० | ५२=०० |
| १६) पांढरा टेरिकॉट बुशर्ट २८ नं साईज | ६२=०० | ६८=०० | ५९=०० | ५८=०० |
| १७) पांढरा टेरिकॉट बुशर्ट. ३० नं.साईज | ७२=०० | ७२=०० | ६८=०० | ६७=०० |
| १८) निळा टेरिकॉट | ६७=०० | ६५=०० | ६९=०० | ६०=०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| स्कर्ट.६न. साईज | | | | |
| १९) निळा टेरिकॉट स्कर्ट ७ नं साईज | ७२=०० | ७०=०० | ७४=०० | ७२=५० |
| २०) निळा टेरिकॉट स्कर्ट ७ न. साईज | ७७=०० | ७४=०० | ७९=०० | ७७=५० |
| २१)निळा टेरिकॉट स्कर्ट ९.नं साईज | ८२=०० | ७९=०० | ८४=०० | ८४=०० |
| २२)निळा टेरिकॉट स्कर्ट १० नं साईज | ८७=०० | ८०=०० | ८९=०० | ९०=०० |
| २३) पांढरा टेरिकॉट ब्लाऊजहनं साईज | ४७=०० | ४३=०० | ४८=०० | ४८=०० |
| २४) पांढरा टेरिकॉट ब्लाऊज ७ नं. साईज. | ५४=०० | ४८=०० | ५६=०० | ५४=०० |
| २५) पांढरा टेरिकॉट ब्लाऊज ८-नं साईज | ५७=०० | ५३=०० | ६०=०० | ५८=५० |
| २६) पांढरा टेरिकॉट ब्लाऊज९ नं साईज | ६२=५० | ५९=५० | ६५=०० | ६५=०० |
| २७) पांढरा टेरिकॉट ब्लाऊज १० नं साईज | ६७=५० | ६२=५० | ७०=५० | ७२=०० |
| २८) निळी टेरिकॉट सलवार पांढरा टेरिकॉट कमीस. | १७८=०० | १६०=०० | २००=०० | २५०=०० |

अ. क्र. २ व ६ या साहित्याचे दर आर. बी. इंटरप्राईजेस-उस्मानपुरा, औरंगाबाद यांनी सर्वात कमी नमुद केले आहेत. अ. के. १८ते २८ या साहित्याचे दर रमेश बिन्नीज टेक्सस्टाईल, सराफा औरंगाबाद यांनी सर्वात कमी नमुद केले आहेत. अ. क्र. ३-४-५ व ७ या साहित्याचे दर मुरली स्टेशनरी सुपारी हनुमान रोड औरंगाबाद यांनी सर्वात कमी नमुंद केले आहेत. अ.क्र. १-८-९-१०-११-१२-१३-१४-१५-१६- व १७ या साहित्याचे दर संतोष सेल्स कॉपेरिशन, औरंगाबाद यांनी सर्वात कमी नमुद केले आहेत. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या इयत्ता दुसरी ते सातवीच्या गतवर्षीच्या वार्षीक परिक्षेत किमान ७०% गुण मिळविलेल्या अनुसुचितजमाती- अनुसुचित जाती विमुक्त भटकया जमाती व इतर मागासवर्गीय जाती यांना प्रत्येकी १२/१/२ % आणि इतरांसाठी ५०%याप्रमाणे सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप करण्यासाठी प्रस्तावातील अनुक्रमांक २ व ६ चे साहित्यासाठी मे. आर.बी इंटरप्राईजेस उस्मापुरा औरंगाबाद अनुक्रमांक १८ते२८ चे साहित्यासाठी म. रमेश बिन्नीज टेकस्टाईल सराफा-औरंगाबाद आणि अनुक्रमांक -३-४-५ व ७ चे साहित्याकरीता मे. मुरली स्टेशनर्स,सुपारी हनुमान रोड-औरंगाबाद आणि अनुक्रमांक -१-८-९-१०-११-१२-१३-१४-१५-१६व १७ चे साहित्यासाठी मे. संतोष सेल्स कॉर्पोरेशन औरंगाबाद यांचे प्रत्येकी सर्वात कमी दराचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच अनुक्रमांक १-ते२८ पर्यंतचे साहित्य खरेदीसाठी रक्कम रु. ५०,०००/- चे खर्चास सर्वानुमते कर आकारणी करण्यात यावी.

# -: ऐनवेळचे विषय :-

**विषय २६७/१४ :**

मुख्य निर्धारण अधिकारी २ यांनी प्रस्ताव दिला आहे की, ९२-९३ यापुढील वित्तीय वर्षासाठी औरंगाबाद माहापालिका क्षेत्रातील मालमत्तावरील कराचे दर हे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे प्रकरण नऊ व कलम १९ अन्वये स्थायी समितीने दिनांक २०-२-९२ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन ९२-९३ या वित्तीय वर्षासाठी खालील दर स्थायी समिती चे मंजुरीस्तव प्रस्तावित आहेत. खालील करांचे दर हे करयोग्य मुल्यावर आकारले जातील

१) सामान्य कर - ३०% (सध्या अमलात असलेल्या दर २२% त्याऐवजी ३०%)

२) साफसाफाई कर ३%

३) सर्वसाधारण पाणी पटटी ३%

(मुं.प्रां. मं. अ. १९९४ चे कलम १३० प्रमाणे तसेच ज्या दरांना महानगरपालिकचे नळ कनेक्शन नाही)

४) वृक्ष कर- ०.५०%

५) अग्निशमन कर ०.७५%

तसेच राज्य शिक्षण कर व रोजगार हमी उपकर या कराची आकारणी करयोग्य मुल्यांवर खालीलप्रमाणे व दराने शासन निर्णया नुसार करण्यात येईल.

| अ. क्र. | करयोग्य मुल्य | राज्यशिक्षण कर निवासी | निवासेतर | रोजहमीउपकर निवासेतर वापर |
|---|---|---|---|---|
| १ | रुपये- १ ते ७४ | - | - | - |
| २ | रुपये ७५ ते१५० | २% | ४% | १% |
| ३ | रुपये १५० ते ३०० | ३% | ६% | १.५०% |
| ४ | रुपये ३०० ते ३००० | ४% | ८% | २% |
| ५ | रुपये ३००० ते ६००० | ५% | १०% | २.५०% |
| ६ | रुपये ६००० ते त्यापेक्षा जास्त | ६% | १२% | ३% |

विशेष साफसफाई कर ९२-९३ साठी अमलात असलेले सन ९२-९३ साठी स्थायी समितीचे मंजुरीसाठी प्रस्तावित आहेत.

१) मोंढा व शहागंज भाजीमंडई रु. ४,५०,०००/-

२) रेल्वे यार्ड रु. १,२०,०००/-

३) एस. टी. स्टँड रु. ६०,०००/-

४) हॉटेल्स, मोठे रु. १०,०००/-

अ) मध्यम हॉटेल हॉस्पीटल, थियेटर रु १८००/-बी

ब) लहान हॉटेल टपरी रसंवती ज्युसबार इ-रु ६००/-सी

क) कोणतीही टपरी रु. ३६०/- डी-

तरी वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेले मालमत्ता कराचे दराचे प्रस्ताव मंजुरीसतव सादर.

**संवाद :**

**श्री. गजानन बारवाल, श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. अलीम बेग,श्री. तुळशीराम भगुरे, श्री.जावेद हसन खॉन श्री.नारायण फत्तेलष्कर :** सध्यादुष्काळी परिस्थिती असल्या मुळे पुर्वीच्याच दराने मालमत्ता कर आकारणी करण्यात यावी.

**ठराव :**

सन १९९२-९३ या वित्तील वर्षासाठी प्रस्तावात दर्शविलेल्या दराने मालमत्ता कराची आकरणी न करता यापुर्वी असलेल्या दरप्रमाणेच मालमत्ता कर आकरणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सर्वसाधारण समेस शिफारस करण्यात येते.

**विषय २६८/१५ :**

सिडको एन-६ भागातील पाणीपुरवठा सुधारणाच्या दृष्टीने त्या भागातील छोटया जलवाहिन्या बदलुन त्याऐवजी २०० मी.मी. १५०मी.मी व १०० मीमी व्यासाच्या ए.सी. जलवाहिन्या टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. ९,८३८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते व त्या दि. १३-३-९१ च्या सर्वसाधारण सभेने विषय क्र. ९५/४ अन्वये मान्यता दिली होती. सदरील अंदाजपत्रकात या कामावर मंजुरीचा खर्च रक्कम रु. २,७३,७१७/- एवढा आहे. दिनांक- १३-३-९१ (३०/१ड) च्या सर्वसाधारण सभेमध्ये सिडको भागातील पाईप लाईन बदलणे तसेच इतर कामासाठी रु २० लाखाची खास बाब म्हणुन तरतुद करण्यात आली असून सदरील कामाचा खर्च या खास तरतुदीमधुन करण्यात येईल. सदरील कामासाठी स्थानिक वर्तमान पत्रातुन (दैनिक अजिंठा व दैनिक आलमगीर टाईम्स) जाहीर निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यास प्रतिसाद मिळुन एकूण चार निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यात सर्वात कमी दराची निविदा श्री. संजिव खर्डीकर यांनही ४.१% जास्त दराची निविदा स्विकारणेबाबत चा प्रस्ताव मा. आयुक्त महोदय यांचेकेडे पाठविण्यात आला होता. परंतु मा. आयुक्त महोदयांनी सदरील कामासाठी फेरनिविदा मागविणेबाबत आदेश दिले होते. त्यानुसार सदरील कामासाठी वर्तमान पत्रातुन फेरनिविदा मागविण्यात आल्या त्यात फक्त दोनच निविदा विकल्या गेल्या व तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची श्री. संजिव खर्डीकर यांची निविदा अंदाजपत्रकीय दराची आहे. दुसरी निविदा श्री. एन. एस.मालपाणी यांची ४.५०% जास्त दराची आहे. श्री. संजिव खर्डीवर यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने काम करणेबाबत पत्र देण्यात आले होते. परंतु त्यांनी निविदेतील दर जुने असून नविन दरसुचीप्रमाणे हे दर (अंदाजपत्रकीय दर) ७.७% कमी दराने सदरील काम करण्यास नकार दिला आहे. त्यानुसार श्री. संजिव खर्डीकर यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन ६ भागातील पाणीपुरवठा सुधारण्याच्या दृष्टीने या भागातील छोटया जलवाहिन्या बदलुन त्या ऐवजी १००,२०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया व अंदाजपत्रकीय दराच्या श्री संजय खर्डीकर यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

प्रस्तावातील कामाची तातडी लक्षात घेता संबंधीत गुत्तेदारास निर्धारित वेळेत काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने या कामासाठी आवश्यक असलेले साहित्य महापालिकेतर्फे वेळोवेळी पुरविण्यात यावे तसेच या कामासाठी आवश्यक असलेले साहित्य महापालिकेकडे उपलब्ध

नसल्यास संबंधीत गुत्तेदारास खुल्याबाजारातुन आवश्यक साहित्य खरेदी करण्यास परवानगी देण्यात येते. असे सर्वानुमते ठरले वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय २६९/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला सिल्लेखाना येथे कब्रस्थानासाठी संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता सा. बा. खात्याचे सन १९८९-९० च्या डि. एस. आर. दराने रक्कम रु. ९९२४२-०० चे अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांची दि. ३०-११-९० रोजी मंजुरी मिळालेली असून सदरचा खर्च डि. पी. रोड या सदाराखाली करण्यात येईल.

सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. (६) ९० दि. २१-१२-९० च्या निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियाजित दिनांकापर्यंत एकूण (३१) एकतीस निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण (६) सहा निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याच्या तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) श्री अे. के. अरोरा | २५%कमीदराने |
| २) श्री. सय्यद अर्शद | ०८%कमीदराने |
| ३) श्री. गिरीश सिकची | २४%कमीदराने |
| ४) श्री. एस. एच. असोशिएटस | १३%कमीदराने |
| ५) श्री. मोला अलियारखॉन | २५%कमीदराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २५%कमीदराने श्री. अे.के. अरोरा व श्री. मोला अलियारखान या दोघांच्या निविदेतील दर समसमान असल्यामुळे त्यांना दि. २१-१-९१ च्या पत्रान्वये दर वाटाघाटी साठी बोलावले असता दिलेल्या वेळेत श्री. मोला अलियारखॉन हे गैरहजर राहील्यामूळे श्री. अे.के. अरोरा यांचे निविदेस दिनांक १६-४-९१ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ५३९/२५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

परंतु श्री. अे.के. अरोरा याचां कार्यलयीन पत्र क्र. मनप/श.अ./८३६/९१ दि. २-१२-९१ नुसार काळया यादीत समावेश केल्यामुळे त्यांची निविदा रद्द करण्यात आली व तसेच श्री. गिरीश सिकची यांचा सुध्दा काळया यादीत नांव सामाविष्ट असल्यामुळे त्यांची २४%कमी दराची असलेली निविदेचा विचार करण्यात आला नाही तथापी मोला अलियारखॉन यांची २५% कमी दराची निविदा असल्यामुळे त्यांना पुन्हा दि. १३-१२-९१ चे पत्राद्वारे वाटाघाटीसाठी बोलावले असता परत एकदा ते गैरहजर राहील्यामुळे मे. एस. एच. असोशिएट यांना पत्रद्वारे पहिल्या कमी दराच्या ठेकेदाराच्या दरात काम करण्यास तयार आहे का म्हणुन विचारणा केली असता त्यांनी त्यांचे दि. १३-१२-९१ च्या पत्राद्वारे उलट टपाली पेट्रोलीयम पदार्थाच व बांधकाम साहित्याचे दर फार वाढल्यामुळे पहिल्या कमी ठेकेदाराच्या दराने काम करण्यासाठी असमर्थता दाखवुन त्यांनी दिलेल्या दरात म्हणजे १३% कमी दराने काम करण्यासाठी तयारी दाखविली असून तसे लेखी सम्मतीपत्र कार्यालयास सादर केलेले आहे. व त्यानुसार मे.एस. एच. असोशिएटस् यांचे निविदेस दि २३-१२-९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

तरी श्री. अे.के. अरोरा याचां काळया यादीत समावेश केल्यामुळे व मोला अलियाखॉन यांना वाटाघाटीसाठी दिलेल्या वेळेत ते गैरहजर राहिल्या कारणाने मे. एस. एच. असोशिएटस यांची १३% कमी दराची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला सिल्लेखाना येथील कब्रस्थानासाठी संरक्षितभिंत बांधण्याचे काम मेसर्स एस. एच. असोशिएष्ट यांचेकडील दि. १३-२-९१ च्या लेखी पत्रानुसार अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १३%कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २७०/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पद्मपुरा येथे व्यायम शाळेचे बांधकाम करणेसाठी सन १९९०-९१ चे सार्वजनीक बांधकाम खात्याचे डि. एस. आर. दराने रक्कम रु. ६६,४०६/- चे अंदाजपत्रकास दि. २०-११-९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली असून सदरचा खर्च जिल्हा नियोजन व विकास मंडळ (डि.पी.डी.सी.फंड) या सदराखाली करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२/९१-९२ दि. २६-११-९१ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि. ३-१२-९१ पर्यत एकूण (८) आठ निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांक ७-१२-९१ रोजी एकूण एकच निविदा दर भरलेली प्राप्त झाली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीप्रमाणे आहे.

१) मे. एस. एच. असोशियटस ५% कमी दराने

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्राकाचे दरापेक्षा ५% कमी दराने मे. एस. एच. असोशिएटस् यांची निविदा असून मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे पदमपुरा येथे व्यायाम शाळेचे बांधकाम करण्यासाठी अंदापत्रकाचे दरापेक्षा ५% कमी दराची मे. एस. एच. असोशिएटस् यांची एकच निविदा प्राप्त झाली असल्यामुळे त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामाच्या खर्च जिल्हा नियोजन व विकास मंडळाचे रकमेतुन करण्यात यावा.

**विषय २७१/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बनेवाडी येथे स्मशानभुमिचे बांधकाम करणेच्या कामासाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि. एस. आर दराने रक्कम रु २,७०,०००/- चे अंदाजपत्रकास दिनांक २०-११-९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरचा खर्च जिल्हा नियोजन व विकास मंडळ (डि.पी. डी. सी.फंड) या सदराखाली करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. (१२) १९९१-९२ चे निविदा सुचनाद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दिनांक ३-१२-९१ पर्यत एकुण (९) नऊ निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांक ७-१२-९१ ला एकूण (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे. एस. एच. असोशियएटस | ०.१५%कमी |
| २) श्री. एस. ए. नवाब | २%जास्त |
| ३) श्री. कुलवंतसिंग | ३% जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१५% कमी दराने मे. एस. ए. असोशिएटस् यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवाडी येथे स्मशान भुमिचे बांधकाम करण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापक्षा ०.१५%कमी दराच्या मेसर्स एस. एच. असोशिएटस याचें दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. या कामाचा खर्च जिल्हा नियोजन व विकास मंडळ या फंडाचे खर्चातुन करण्यात यावा.

**विषय २७२/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, श्रेयनगर ते टिळकनगर या ५० डी. पी. रोडचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. दराने रक्कम रु १,८०,०००/- चे अंदाजत्रकास दि. २०-११-९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरचा खर्च डी. पी. डी. सी. फंडातुन करण्यात येईल.

सदर कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र (१२) १९९१-९२ दि. २६-११-९१ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दिनांक ३-१२-९१ पर्यत एकुण दोन निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दि. ७-१२-९१ ला एकुण (२) दोनच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) श्री. अब्दुल कलीम | ०.२५% कमीदराने |
| २) श्री. अब्दुल सलाम | १.१०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.२५% कमी दराने श्री. अब्दुल कलीम यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावा दर्शविल्याप्रमाणे श्रेय नगर ते टिळक नगर या ५० फुट डि. पी. रोडचे खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.२५% कमी दराचे श्री. अब्दुल कलीम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च जिल्हा नियोजन व विकास मंडळ या फंडाचे खर्चातुन करण्यात येईल. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २७३/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की बेगमपुरा येथे व्यायाम शाळेचे बांधकाम करण्याच्या कामासाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि. एस. आर. दराने रक्कम रु. ६६४०६=०० चे अंदाजपत्रकास दि. २५-१२-९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरचा खर्च डी. पी. सी. फंड या सदरातील करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. (१२) १९९१-९२ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि. ३-१२-९१ पर्यत एकूण (७) सात निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांक

७-१२-९१ ला. एकूण (१) एकच निविदा दर भरलेली प्राप्त झाली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीप्रमाणे आहे.

१) श्री. एम. जी. महेबुब अली ०.०५% कमी दराने

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराने श्री. एम. जी. महेबुबअली यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेगमपुरा येथे व्यायाम शाळेचे बांधकाम करण्यासाठी श्री. एम. जी. महेबुबअली यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराची एकच निविदा प्राप्त झाली असल्यामुळे सदर काम संबंधीताकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च जिल्हा नियोजन व विकास मंडळ या फंडाचे खर्चातुन करण्यात येईल. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २७४/२१ :**

वार्ड क्र. १४ शहाबाजार चेलीपुरा रोड येथे जुनी अस्तित्वात असल्यालेली ड्रेनेज लाईन काढून त्याठिकाणी ३००मी.मी. व्यासाची व ४५०मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक रक्क्म रु १,२४,७००/-ला शासकीय अनुदानांतर्गत मंजुरी मिळालेली आहे. त्यानुसार काम प्रगती पथावर आहे.

याठिकाणी काम करत असतांना शहागंज ते दिल्ली गेट पाण्याच्या टाकीकडे जाणारी लोखंडी पाण्याची मुख्य वाहिनी ठिकठिकाणी आडवी असल्यामुळे अंदाजपत्रकीय दरापेक्षा खोदकामाची परिमाणे वाढत आहेत.सदरील खोदकाम हे अतिशय कठीण दगडातील आहे. सदरील प्रकरणी मा. आयुक्त महोदयांना स्थळ पाहणी केलेली आहे. त्यानुसार त्यांनी वस्तुस्थिती मान्य केली आहे. त्याचप्रमाणे सदरील कामामध्ये ड्रेनेज लाईनचा मार्ग काही अपरिहार्य कारणामुळे बदलावा लागला. परिणामी ड्रेनेज लाईनची लांबी वाढली त्यामुळे अंदाजपत्रकीय रकमेत बरीच वाढ झाली. तसेच ड्रेनेज लाईनच्या खोदकाम केलेल्या खड्डयामध्ये नजीकच्या गटारीमधुन सतत पाणी झीरपत असल्यामुळे हे पाणी काढणे आवश्यक होते. सदरील बाबीचा मुळ अंदाजपत्रकात समावेश केलेला नव्हता.

सबब वरील प्रमुख कारणांमुळे व इतर किरकोळ बदलामुळे सदरील कामासाठी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु २,३७,१७९=००चे तयार करण्यात आलेले आहे. मा. आयुक्त महोदयांनी समक्ष स्थळ पाहणी केलेली असून सुधारीत अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली आहे. सदरील वाढीव काम शासकीय अनुदानांतर्गत करावयाच्या सन १९९०-९१ च्या बचतीमधुन करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १४ शहाबाजार चेलीपुरा रोड येथे आस्तिवात असलेली जुनी ड्रेनेज लाईन काढून त्या ठिकाणी ३०० व ४५० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या मुळ कामामध्ये प्रस्तावात दर्शविले त्या प्रमुख कारणांमुळे व इतर बदलामुळे सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,३७,१७९/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील वाढीव कामाचा खर्च सन १९९०-९१ च्या शासकीय अनुदानातील बचतीमधुन करण्यात येईल. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय २७५/२२ :**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्तावात सादर केला आहे की श्री. महेंद्र यादव समुदाय संघटक यांच्या विनंती अर्जानुसार समुदाय संघटक व जेष्ठ स्वच्छता निरिक्षक या पदाची सारखीच वेतन श्रीणी म्हणजे स. ३९५-१५-५००-२०-७०० द. रो. २०-८०० या सुधारीत वेतन श्रेणी रुपये १४००-४०-१६००-५०-२३०० द. रो. ६०- २६०० अशी आहे. तसेच श्री. महेंद्र यादव समुदाय संघटक यांनी शैक्षणिक पात्रता स्वच्छता निरिक्षकाचा कोर्स पास केलेला आहे. त्यामुळे महेंद्र यादव यांना समुदाय संघटक ऐवजी जेष्ठ स्वच्छता निरिक्षक म्हणुन पदनाम बदलण्यास हरकत नाही.

करीता श्री. महेंद्र यादव समुदास संघटक यांचे पदनाम जेष्ठ स्वच्छता निरिक्षक म्हणुन करण्याकरीता प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समुदाय संघटक श्री. महेंद्र यादव यांच्या विनंतीनुसार समुदाय संघटक व जेष्ठ स्वच्छता निरिक्षक या पदाची सारखीच वेतन श्रेणी म्हणजे रु ३९५-१५-५००-२०-७००-द. रो. २०-८०० सुधारित वेतन श्रेणी रुपये १४००-४०१६००-५०-५-२६०० द.रो. ६०-२६०० अशी असल्यामुळे श्री. महेंद्र यादव यांना समुदाय संघटक ऐवजी जेष्ठ स्वच्छता निरिक्षक म्हणून पदनाम बदलण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

श्री. महेंद्र यादव यांना वरील प्रमाणे पदनाम बदलण्यास मंजुरी देण्यात आली असली तरी जेष्ठ स्वच्छता निरिक्षक या पदासाठी त्यांची जेष्ठता ठरावाच्या तारखेपासून ग्राहय धरण्यात येईल. तसेच श्री. मेहंद्र यादव यांना पशुधन आणि विकास विभागाकडे नेहमी करीता काम देण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती.
औरंगाबाद महानगरपालिका

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक-२४-१-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त बुधवार दिनांक २४-१-९२ रोजी समिती सभागृहात मा. सभापती श्री. मो. इस्माईल अब्दुल करीम यांचे अध्यक्षते खाली स्थायी समिती सभेस ३.०० वाजात सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सं. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग
२) श्री. फैय्याजखान अहमदखान
३) श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
४) श्री. भगुरे तुळशीराम छगन
५) श्री. बारवाल गजाजन रामकिशन
६) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
७) श्री. सोनवणे केशव काशीनाथ्
८) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र. २७६/१ :**

दिनांक ४/१/९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री केशव सोनवणे :** स. सभासद श्री. प्रभाकर विधाते यांनी गुंडाळलेल्या स्थितीत कोणती वस्तु आणली आहे. याचा खुलासा व्हावा.

**श्री प्रभाकर विधाते :** शहराच्या स्वच्छतेसाठी वार्ड क्र. ३ मधील सफाई कामगारांना साफसफाईसाठी देण्यात आलेले झाडु बाबतचा हा नमुना सभागृहापुढे देण्यात येत आहे. अशा प्रकारेचे निकृष्ट दर्जाचे झाडु सफाई कामगारांना पुरविल्यामुळे वार्डाची सफाई तर होतच नाही परंतु जागोजागी कचरा मात्र तसा पडुन राहतो. अशा प्रकारचे निकृष्ट झाडु कामगारांना पुरविल्यानंतर शहराची स्वच्छता कशी व्हावी याचा विचार करुन सभागृहाने पुरविण्यात आलेल्या निकृष्ट झाडु बाबत माहिती द्यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** स.सभासदांचे सभागृहासमोर दाखल केलेल्या निकृष्ट झाडु प्रमाणेच वाहन चालकांना पुरविण्यात येणारे बुटही अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहेत. तेव्हा याबाबतही सभागृहाने माहिती द्यावी.

**मा. सभापती :** भांडार अधिक्षक किंवा सहाय्यक आयुक्त -२ यांना सभागृहात उपस्थित राहण्याबाबत सुचित करण्यात यावे.

**श्री. केशव सोनवणे :** निवडणुक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना दोन आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत सभागृहात अनेकवेळा चर्चा झाली आहे. परंतु अद्यापपर्यंत निवडणुक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगावु वेतनवाढ देण्यात आलेली नाही. आगावु वेतनवाढ देण्याबाबतची मागणी गेल्या दोन वर्षापासुन करण्यात येत आहे. तेव्हा निवडणुक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगावु वेतनवाढ देण्याबाबत आजच सभागृहात कायमस्वरुपी निर्णय घेण्यात यावा अशी सर्व सभासदांची मागणी आहे.

**मा. सभापती :** निवडणुक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगावु वेतनवाढ देण्याच्या प्रकरणी सभागृहात आणी सर्वसाधारण सभेत याबाबत चर्चा झालेली आहे. दोन्ही सभागृहाच्या निर्णयाप्रमाणे अगावू वेतनवाढ देण्याचे अधिकार असलेले अधिकारी याबाबत निर्णय घेतील.

**मा. उपआयुक्त :** निवडणुक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगावू वेतनवाढ देण्याबाबत या पुर्वीच सभागृहात सविस्तर खुलासा केलेला आहे. आगावू वेतनवाढ देण्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या प्रशासकीय समितीची बैठक अद्याप झालेली नाही. या समितीच्या बैठकीचे वेळी निवडणुक काळात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या आगावु वेतनवाढी बाबत सभागृहाचे विचार समितीपुढे मांडले जातील. आगावु वेतनवाढ देतांना कर्मचाऱ्यांचे मागील तीन वर्षाचे गोपनीय अहवालाचे अवलोकन करावे लागते ही प्रशासकीय बाब आहे. तेव्हा त्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. आगावू वेतनवाढ देण्याबाबत गतवर्षी २६ जानेवारी या दिवसी समितीची मिटींग झाली.

**श्री केशवराव सोनवणे :** कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल चांगले नसतांनाही प्रशासनातर्फे अशा कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत. आवश्यकता भासल्यास अशा कर्मचाऱ्यांची नावेही देण्यात येतील.

**मा. सभापती :** सं. सभासदांची सुचना लक्षात घेता अगावू वेतनवाढ देण्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या प्रशासकीय समितीची आगामी बैठक केव्हा होईल याबाबतच्या खुलासा प्रशासनातर्फे व्हावा.

**मा. उपआयुक्त :** आगावु वेतनवाढ देण्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या प्रशासकीय समितीची बैठक फेब्रूवारी १९९२ अखेरपर्यंत आयोजित करण्यात येईल.

**श्री तुळशीराम भगुरे :** यापुर्वी झालेल्या सभेत वैद्यकीय देय भत्याबाबतचे नियमाची प्रत सभासदांना देण्यात येईल. असे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी सभागृहात आश्वासन दिले आहे. पंरतु या आश्वासनाची अद्याप पुर्तता झालेली नाही.

**मा. सभापती :** आरोग्य विषयक बैठकीसाठी अन्य कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक असल्यामुळे आजच्या स्थायी समितीच्या सभेस उपस्थित राहता येणार नाही. असे पत्र आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडुन प्राप्त झाले आहे.

**श्री तुळशीराम भगुरे :** या आगोदर संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेत सुध्दा आरोग्य वैद्यकीय अधिकारी उपस्थित नव्हते त्यावेळी ही संबंधीत अधिकाऱ्यांनी असे पत्र दिले होते काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** वैद्यकीय देय भत्याबाबत नविन नियमावली तयार करुन सभागृहापुढे मांडण्यात येईल असे आश्वासन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी दिले होते. परंतु आरोग्य वैद्यकीय अधिकारी आजच्या सभेस उपस्थित नाही. तेव्हा प्रत्येक सभेच्या वेळी एकाच मुद्यांवर सभागृहात वारंवार चर्चा होत असल्यामुळे अन्य मुद्यांबाबत सभागृहात चर्चा करता येत नाही. तेव्हा आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना आगामी सभेच्या वेळी वैद्यकीय देय भत्याबाबतचे सर्व तयारीनिशी सभागृहात उपस्थित राहावे.

**श्री केशव सोनवणे :** औरंगाबाद शहरास २०% जादा पाणी मिळणार असे वृत्त स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाले. पण प्रत्यक्षात मात्र त्याबाबतची अंमलबजावणी झालेली नाही किंवा पाणी पुरवठयात कपात करण्यात आली काय याचा खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता :** विद्युत पुरवठा करणाऱ्या डी.पी. ची नादुरुस्ती आणि मुख्यजलवाहिनी फुटल्यामुळे सिडको भागातील पाणी पुरवठा वितरणात व्यत्यय आलेला आहे. आणि पर्यायाने २०% वाढीव पाणी पुरवठा वितरण फक्त दोन-तीन दिवसच दिले गेले.

**श्री केशव सोनवणे :** सिडको भागातील एन-९, एन-९ एच, एन-१३, टि.व्ही. सेंटर अशा विविध १२ भागांना आतापर्यंत २२ गॅप मिळाले आहेत. माहे ऑक्टोबर - नोव्हेंबर-डिसेंबर १९९१ मध्ये याच भागांना व्यवस्थित पाणी मिळाले मग आताच पाण कमी का येते याचा खुलासा व्हावा. पुन्हा एम.आय.डी.सी. कडुन पाणी घ्यावे लागल्यास त्यासाठी होणाऱ्या खर्चास कोण जबाबदार राहिल.

**कार्यकारी अभियंता जलगृह अभियंता :** पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन फुटल्यामुळे गेल्या १७/१८ दिवसापासुन ग्रॅव्हीटीने पाणी मिळत नाही. याप्रकरणी संबंधीत विभागास आजच भेट दिली आहे. त्यावेळी आज सांयकाळपासुन पाणी सोडण्यात येईल असा खुलासा करण्यात आला आहे. शहरास पाणी पुरवठा करण्याऱ्या जलवाहिनीवरुन रेल्वेस्टेशन व यासारख्या अन्य ग्राहकांनाही पाणी पुरवठा केला जातो. हे ग्राहक पंपीग बंद झाल्यावरही पाणी घेत असतील. रेल्वे स्टेशन व यासारख्या अन्य ग्राहक परिसर अभियांत्रिकी यांचे ग्राहक असल्यामुळे त्यामुळे आपले नियंत्रण असु शकत नाही. तरी पण शहरास होणारा अपुरा पाणी पुरवठा लक्षात घेता याबाबतचे पत्र आजच संबंधीत विभागास देण्यात आले आहे. तसेच नादुरुस्त असलेली वितरण जलवाहिनी संध्याकाळपर्यंत दुरुस्त होईल.

**मा. सभापती :** शहराच्या सर्व भागास योग्य प्रकारे पाणी पुरवठा होईल अशी व्यवस्था करण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी प्रयत्न करावे.

**श्री गिरजाराम हाळनोर :** नागरीकांनी बांधकाम परवानगीसाठी दाखल केलेल्या प्रकरणात एन.ए. ची अट घातल्यामुळे बांधकाम परवानगीचे २५० प्रकरणे सध्या कार्यालयात पडुन आहेत. तेव्हा एन.अे. बाबत. सभागृहात माहिती देण्यात यावी.

**सहा. संचालक नगर रचना :** महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ प्रमाणे ज्या कृषी जमिनी आहेत अशा कृषी जमिनी अकृषी करुन त्या निवासोपयागी उपयोगात आणण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडुन आदेश देण्यात येतात. त्यानंतरच अशा जमिनीवर बांधकाम करण्याबाबत परवानगी देण्यात येते.

**विधी सल्लागार :** महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे १९६६ चे कलम ४४ प्रमाणे कृषी जमिनीचे अकृषी जमिनीत रुपांतर करण्यात येते अशा प्रकारे जमिनीत झालेल्या बदलानिमीत्त नियमानुसार फी भरावी लागते यापुर्वी उक्त अधिनियमाच्या कलम -४५ प्रमाणे दंड आकारुन एन.अे. परवानगी देण्यात येत होती.

**मा. उपआयुक्त :** महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ ची कलम ४४ प्रमाणे कृषी जमिनीचे अकृषी जमिनीत रुपांतर करण्यासाठी नियमाप्रमाणे पैसे भरुन एन. अे. बाबतची ऑर्डर घेतली तर नेहमी करीता एन.अे. बाबतचा योग्य निर्णय होतो. या उलट उक्त अधिनियमाचे कलम ४५ प्रमाणे एन.अे. बाबत ऑर्डर देण्यात आली तर पुन्हा याच अधिनियमाचे कलम ४४ प्रमाणे एन.अे. ची

रक्कम भरावी लागते. तेव्हा कलम ४४ प्रमाणे एन.अे. बाबत झालेली कार्यवाही ही नियमाप्रमाणे होते. तसेच याबाबत महापालिकेस शेअर्सही मिळतो.

**श्री केशव सोनवणे :** मो. इंदिरानगर वार्ड क्र. ३७ येथील मुख्य सार्वजनिक रस्त्याचे डांबरीकरणाचे काम शासकीय अनुदानातुन हाती घेण्या बाबत विरोधी पक्षनेता यांनी लेखी विनंती करुनही अद्याप सदर रस्त्याचे काम झालेले नाही.

**मा. सभापती :** मो. इंदिरानगर वार्ड क्र. ३७ येथील रस्त्याचे डांबरीकरण होणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास प्राधान्य देऊन काम हाती घेण्याबाबत संबंधीत विभागाने कार्यवाही करावी.

**श्री केशव सोनवणे :** गणेश कॉलनी येथील विहीरीवर स्लॅब टाकणे आणि विहिरी कडे जाणारा रस्ता खुला करणे याबाबत गत सभेत चर्चा झालेली आहे. तसेच सदर प्रकरणी मा. आ. चंद्रकांत खैरे यांनी एक पत्रही दिले आहे. तेंव्हा या प्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** सुचनेप्रमाणे गणेश कॉलनी येथील विहिरीची व रस्त्याची पाहणी केली या ठिकाणी घर बांधलेले आहे. ते घर कसे बांधले याची कल्पना नाही विहिरीवर जाण्यासाठी बोळ उपलब्ध आहे. सदर विहिरीचे पाणी चांगले असले तरी विहिर जुनी असल्यामुळे या विहीरीवर स्लॅब टाकता येणार नाही. त्याठिकाणी असलेला रस्ता चांगला आहे.

**श्री गिरजाराम हाळनोर :** गणेश कॉलनी भागातील विहिरीवर जाण्यासाठी पुर्वी जो रस्ता होता त्या ठिकाणी मनपाने पर्यायी रस्ता जागा दिल्यामुळे नागरीकांनी घरे बांधली आहे. व विहिरीवर जाणारा रस्ता बंद झालेला आहे.

**सहा. संचालक नगररचना :** गणेश कॉलनी विहिरीवर जाणारा हा रस्ता सहा फुट रुंद आहे.

**श्री केशव सोनवणे :** गणेश कॉलनी येथील विहिरीवर जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करुन देणे आणि विहिरीवर स्लॅब टाकण्याची मागणी होती. अतिरिक्त शहर अभियंता यांच्या सुचनेप्रमाणे स्लॅब टाकणे शक्य नसल्यामुळे संरक्षण म्हणुन या विहिरवर लोखंडी जाळी टाकण्यात यावी.

**श्री गिरजाराम हाळनोर :** पिर बाजार भाजी मार्केट येथील काम अर्धवट स्थितीत पडुन आहे. तेव्हा याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**उपअभियंता इमारती :** या कामासाठी आवश्यक असलेले सिमेंट उपलब्ध नाही त्यामुळे काम एक महिन्यापासुन बंद आहे.

**मा. सभापती :** गेल्या चार दिवसापुर्वी पिरबाजार शाळेस भेट दिली असता या शाळेची अत्यंत वाईट परिस्थिती आहे या भागातील काही लोक शाळेच्या ओटयावर बसता त्यासाठी ओटयास जाळी बसविण्याची तरतुद करण्यात यावी.

**शहर अभियंता :** सध्या कार्यालयाकडे सिमेंट उपलब्ध नाही. सिमेंट खरेदी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ ठेवण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव मंजुर होताच चार-पाच दिवसात काम सुरु करण्यात येईल.

**मा. सभापती :** कार्यालयाकडील सिमेंटचा साठा संपण्यापुर्वी काम्पसाठी आवश्यक असलेल्या सिमेंटच्या मागणीचा दुसरा प्रस्ताव प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात यावा. म्हणजे कामासाठी सिमेंट उपलब्ध नाही म्हणुन काम बंद आहे अशी परिस्थिती निर्माण होणार नाही. तेव्हा यापुढे सिमेंटच्या साठा संपण्यापुर्वीच सिमेंट मागणी बाबत दुसरा प्रस्ताव सभागृहासमोर येईल अशी व्यवस्था

संबंधीत अधिकाऱ्यांनी करावी तसेच स.सदस्य सिमेंट मागणी बाबतचा तसेच स. सदस्य श्री. अयुब गुलाम जिलानी यांनी त्योच वार्डातील ड्रेनेज लाईनचे कामाबाबत काय कार्यवाही झाली याबाबत पत्र दिले आहे. या वसाहतीमध्ये प्रशासनातर्फे पाणी पुरवठा लाईन, विद्युत व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

**कार्यकारी अभियंता :** सदर वसाहतीतील बांधकामे विना परवानगी असल्याचा अहवाल सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडुन प्राप्त झालेला आहे.

**मा. सभापती :** वार्ड क्र. १२ मध्ये पाणी पुरवठा, विद्युत व्यवस्था अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या असतांनाही या भागात ड्रेनेज लाईन टाकण्याच्या प्रकरणी सहाय्क्क संचालक नगररचना यांचा रिपोर्ट का घेण्यात आला याचा खुलासा व्हावा तसेच अनाधिकृत वसाहतीमध्ये नळ, लाईट, ड्रेनेज अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सभागृहाने ठराव मंजुर केलेला असतांना वरील प्रमाणे कार्यवाही का करण्यात आली. तेव्हा सभागृहाचे ठरावाप्रमाणे या भागात काम करण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी. आणि पुढील सभेत त्या बाबतचा प्रस्ताव मांडण्यात यावा.,

हरी मस्जिद भागात ड्रेनेज, पाणी रस्त्यावर वाहत आहे. या कामाची पाहणी दिड महिन्यापुर्वी मा. आयुक्त यांनी केली. पण अद्याप काम झालेले नाही तेव्हा या प्रकरणी ही त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.

**श्री गिरजाराम हाळनोर :** नागसेन नगर भागातील ड्रेनेजचे कामही अशाच प्रकारचे असुन बरेच दिवसापासुन  बंद आहे.

**अतिरिक्त शहर अभियंता :** नागसेन नगर भागातील ड्रेनेज लाईनच्या कामाकरीता पुन्हा दरपत्रके मागविण्यात बाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे.

**श्री केशव सोनवणे :** एन-वन वर करुन  घेण्यात येणाऱ्या कामाबाबतच माहिती पुढील सभेत देण्यात येईल, असे रुलींग देण्यात आले आहे. त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** जलनिःसारण विभागाकडुन याबाबतचा तक्ता नुकताच प्राप्त झाला असुन येत्या मंगळवार पर्यंत सर्व सभासदांना त्याची प्रत पाठविण्यात येईल.

**श्री गजानन बारवाल :** ठराव क्र. २७५ मध्ये श्री महेंद्र यादव यांना नेहमी करताच पशुधन वैद्यकीय अधिकारी यांचेकडे काम देण्यात यावे अशी मंजुरी देण्यात आली आहे. यातील नेहमी या शब्दाने संबंधीतावर अन्याय होत आहे असे वाटते. तेव्हा ठराव क्र. २७५ मधील नेहमी हा शब्द वगळण्यात यावा.

**सहा. आयुक्त-१/मा. उप आयुक्त :** ठराव क्र. २७५ अन्वये श्री महेंद्र यादव यांना समुदाय संघटक ऐवजी जेष्ठ स्वच्छता निरिक्षक म्हणुन पदनाम बदलण्यास मंजुरी देण्यात आली आहे. अशा प्रकारे जेष्ठ स्वच्छता निरिक्षक म्हणुन पदनाम बदलण्यास मंजुरी देण्यात आल्यामुळे स्वच्छता निरिक्षक म्हणुन काम करत असलेल्या कर्मचाऱ्यावर अन्याय होणार आहे. ही बाब लक्षात घेता नियमाप्रमाणे श्री. महेंद्र यादव यांना समुदाय संघटक ऐवजी स्वच्छता निरिक्षक म्हणुन पदनाम बदलण्यास आणि या पदाकरीता त्यांची जेष्ठता ठरावाच्या तारखेपासुन ग्राहय धरण्यात येईल. अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** दि. ४.१.९२ रोजी संपन्न झालेल्या सभेत ढापे प्रकरणी झालेल्या चर्चेत या संबंधीची संचिका पुढील सभेत ठेवण्यात यावी म्हणजे त्यावर निर्णय घेण्यात

येईल असे रुलींग देण्यात आले आहे. तेव्हा याबाबतची संचिका संबंधित अधिकाऱ्याने दाखल करावी.

**उप-अभि.ड्रेनेज/कार्यकारी अभियंता :** सदर संचिका विभागाकडुन मागविण्यात येत आहे.

**श्री प्रभाकर विधाते :** सभागृहात दाखल केलेल्या झाडु प्रकरणी काय कार्यवाही झाली. याचा खुलासा व्हावा. संबधीत अधिकारी अद्याप सभागृहात उपस्थित झालेले नाहीत.

**मा. सभापती :** आयोजित स्थायी समितीचे दिवशी ज्या अधिकाऱ्याचे प्रस्ताव विषयपत्रिकेवर नसतील अशा अधिकाऱ्यांना सुध्दा कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. अशी सुचना प्रशासनातर्फे सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना देण्याची व्यवस्था करण्यात यावी. आणि सफाई कामगारांना वाटप करण्यात येणाऱ्या झाडु प्रकराणी स. सभासद श्री प्रभाकर विधाते, श्री गिरजाराम हाळनोर, श्री तुळशीराम भगुरे यांनी मा. उपआयुक्त यांचेसह भांडार विभागाची पाहणी करावी.

**सहा. आयुक्त-२ :** नियमाप्रमाणे पुरवठा धारकांकडुन १२०० झाडु मागविण्यात आले होते. पुरवठा करण्यात आलेले झाडु निकृष्ट दर्जाचे आहे असे निर्दशनास आल्यावर आवश्यकतेनुसार ३०० झाडू ठेवुन बाकीचे ९०० झाडु पुरवठा धारकास परत करण्यात आले आहेत. तसेच पुरवठा धारकास बिलही देण्यात आले नाही.

**मा. सभापती :** ढापे खरेदी प्रकरणातील टेंडर मागविणे व याच प्रकरणी पुन्हा टेंडर मागविणे या प्रकरणी विधी सल्लागार यांनी आपला अहवाल द्यावा. ढापे प्रकरणी अहवाल प्राप्त होईपर्यंत आजची सभा ००.१५ मिनीटा करीता तहकूब करण्यात येते. (वेळ ४.४५ वाजता)

००.१५ मिनीटाकरीता तहकुब केलेली सभा उपस्थित असलेल्या सर्व सं. सभासदांच्या उपस्थितीत ठिक ५.०० वाजता पुन्हा सुरु झाली.

**विधी सल्लागार :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) तसेच प्रकरण ५ नियम २ (२) अन्वये मा. आयुक्त यांना निविदा स्विकारणे बंधनकारक नाही. तसेच एक किंवा अनेक निविदा नाकारता येतात. त्यानुसार मा. आयुक्त यांनी कार्यवाही करता येते.

**मा. उपआयुक्त :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) मध्ये २५००/- रुपये खर्चाच्या कामासाठी टेंडर मागविता येतात. परंतु स्थायी समितीने मंजुरी दिल्यास एखाद्या कामासाठी ठराविक कंपनीच्या माल घ्यावयाचा असल्यास समितीला तसा निर्देश देता येईल असा त्याचा अर्थ निघतो.

**मा. सभापती :** स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतरही काही कामांमध्ये प्रशासनातर्फे पुन्हा दरपत्रके मागविण्यात येतात. यात वैयक्तिक उद्देश दिसुन येतो. तेव्हा अशा प्रकारे स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतरही ज्या कामाची दरपत्रके पुन्हा मागविण्यात आली आहेत अशा कामास आणि काही कामामध्ये अधिकारी वैयक्तिक हेतु दाखवुन पुन्हा दरपत्रके मागवितात यामुळे महापालिकेचा पैसा निष्कारण खर्च होतो. अशा प्रकारे निष्कारण खर्च झाल्याबाबत हे सभागृह प्रशासनाचा निषेध व्यक्त करते.

**ठराव :**

दि. ४.१.९२ च्या सभेतील

१) ठराव क्र. २५६ मध्ये स. न. ७५९९ याऐवजी स. नं. १७५९९ अशी दुरुस्ती.

२) ठराव क्र. २६७ मध्ये सन १९९२-९३ या वित्तीय वर्षासाठी प्रस्तावात दर्शविलेल्या यानंतर वाढीव दराने आणि "मालमत्ता कर आकारणी न करता यापुर्वी असलेल्या" यानंतर सन १९९१-९२च्या अशी वाढ करण्यास.

३) ठराव क्र. २७५ मधील नेहमी करता आणि जेष्ठ हे दोन शब्द वगळण्यास तसेच दिनांक १.४.९२ पासुन किंवा नेमणूकीच्या दिनांकापासुन जी नियमानुसार ठरविली जाईल त्या नुसार श्री महेंद्र यादव यांची स्वच्छता निरिक्षक या पदाकरिता जेष्ठता ग्राहय धरण्यात येईल. या बाबत संबंधीताकडुन लेखी सहमती प्राप्त झाली तरच या प्रकरणी नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी. अशी वाढ करण्यास वरील अनुक्रमांक १ ते ३ मध्ये दर्शविलेली दुरुस्ती आणि वाढ यासह दिनांक ४-१-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २७७/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, कैलास नगर जवळील स्मशान भुमीस (स्मशान मारुती) कंपाऊंड वॉल बांधणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १६३६४०/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाली आहे.

सदर कामासाठी दुसऱ्यांदा कार्यालयीन निविदा क्र. ४/जा.क्र.मनपा/बांध वि-१/४६६९/९१ दिनांक २९/१०/९१ रोजी निविदा मागेविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकुण तेरा निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या वेळेपर्यंत दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक २२.११.९१ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री पॉल कन्स्ट्रक्शन | ३.९१% जास्त |
| २) | श्री शाहीद अस्लम | अंदाजपत्रकाच्या दराने |

वरील पैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा अंदाजपत्रकाच्या दराने श्री. शाहीद असलम यांचे दरपत्रक आहे. विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री एकबालसिंग गील :** बेगमपुरा स्मशान भुमिमध्ये आजुबाजूच्या ठिकाणचे नागरीक अत्यंविधीसाठी येतात तेव्हा या स्मशान भुमीत संरक्षित भिंत व बगीचा तयार करण्याची व्यवस्था करण्यात यावी.

**मा. सभापती :** पुढील सभेच्या वेळी ज्या स्मशान भुमिमध्ये उपलब्ध आहेत. तसेच पाण्याची सोयही आहे. अशा ठिकाणी बगीच्या तयार करण्याताबतची आणि संरक्षित भिंत नसलेल्या ठिकाणी संरक्षित भिंत बांधण्याचे अंदाजपत्रक तयार करुन सभागृहात मांडण्याची व्यवस्था संबंधित विभागाने करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलास नगर जवळील स्मशान भुमीस कंपाऊंड वॉल बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दराने श्री. शाहीद असलम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७८/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, लेबर कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक र. रु. ३,१८,८००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लेबर कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र. रु. ३,१८,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७९/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मोहल्ला शहाबाजार येथील मस्जिद (निशान) ला संरक्षित भिंत बांधणे च्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ७१२३०/- ला मा. आयुक्त यांनी दि. २४-१-९१ रोजी मान्यता दिलेली आहे.

सदरील कामासाठी तिसऱ्या वेळेस कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/जा. क्र. मनपा/बां.वि-१/६३४८/९१ दि. १३-१२-९१ रोजी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या शेवटच्या तारखेपर्यंत एकुण तेरा निविदा विकल्या गेल्या त्यापैकी एकुण दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक ३०/१२/९१ रोजी उघडण्यात असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सय्यद रफिकउद्दीन | २% | कमी |
| २) | एस.एच. असोसिएटस | १२% | कमी |

वरीलपैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १२% कमी दराची निविदा मेसर्स एस.एच. असोसिएटस यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला शहाबाजार येथील मस्जिद (निशान) ला संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १२% कमी दराच्या निविदेस सर्वानूमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८०/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मोहल्ला सिध्देश्वर कॉलनी कुंभारवाडा येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९६,५९०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक ८/४/९१ रोजी मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी तिसऱ्या वेळेस कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/ जा. क्र. / बां. वि. १/६३४८/९१ दिनांक १३/१२/९१ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकुण तीन निविदा विकल्या गेल्या त्यापैकी दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक ३०.१२.९१ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | १२% | जास्त |
| २. | श्री पी.एम. चोरडीया | अंदाजपत्रकाप्रमाणे | |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकाच्या दराप्रमाणे श्री पी.एम. चोरडीया यांची निविदा आहे. तेंव्हा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. सिध्देश्वर कॉलनी, कुंभारवाडा येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तिसऱ्या वेळेस मागविलेल्या निविदेनुसार तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे श्री पी.एम. चोरडीया यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

डांबरीकरणाची कामे फक्त उन्हाळयात होत असल्यामुळे प्रस्तावात दर्शविलेल्या कामासाठी हे सभागृह आजच्या स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजुरी देत आहे. तेव्हा संबंधित

विभागाने शक्य तितक्या लवकर काम सुरु करण्याबाबत कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २८१/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, आझम कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु., ९८,२३०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची दि. ८/४/९१ रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदरील कामासाठी तिसऱ्या वेळेस कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/जा.क्र. मनपा/बां. वि/१/६३४८/९१ दिनांक १३/१२/९१ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकुण तीन निविदा विकल्या गेल्या व त्यापैकी दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१) मे. गुरुनानक इंडस्ट्रीज २०% जास्त

२) श्री पी.एम. चोरडीया अंदाजपत्रकीय दराने

वरीलपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दराने श्री पी.एम. चोरडीया यांच्या निविदाचे दर आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आझम कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराचे श्री.चोरडीया यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

डांबरीकरणाची कामे फक्त उन्हाळयात होत असलयामुळे प्रस्तवात दर्शविलेल्या कामासाठी हे सभागृह आजच स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे. तेंव्हा संबंधित विभागाने शक्य तितक्या लवकर काम सुरु करण्याबाबत कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २८२/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, करीम कॉलनी येथील इकबालखान यांच्या घराजवळील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९९,७४०/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाली आहे.

सदर कामासाठी तिसऱ्या वेळेस कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/जा.क्र./६३४८/९१ दिनांक १३.१२.९१ ला निविदा मागविण्यात असता निविदा विक्रीच्या वेळेपर्यंत एकुण तीन निविदा विकल्या गेल्या त्यापैकी दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक ३०.१२.९१ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१) श्री पी.एम. चोरडीया अंदाजपत्रकाप्रमाणे

२) श्री गुरुनानक इंडस्ट्रीज २५% जास्त

वरील पैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दराच्या श्री. पी. एम. चोरडीया यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे करीम कॉलनी येथील इकबालखान यांच्या घराजवळील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराचे श्री. पी.एम. चोरडीया यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

डांबरीकरण करणाची कामे फक्त उन्हाळयातच होत असल्यामुळे प्रस्तावात दर्शविलेल्या कामासाठी हे सभागृह आजच स्विकृती देण्यास सर्वानूमते मंजुरी देत आहे. तेव्हा संबंधित विभागाने शक्य तितक्या लवकर काम सुरु करण्याबाबत कार्यवाही करावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २८३/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांन प्रस्ताव दिला आहे की, अंजठा हॉटेल, नगारखाना गल्ली, नाझ गल्ली व सुपारी हनुमान रोड येथे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. १,९२,५००/- च्या रक्कमेस स्थायी समिती बैठक दिनांक २४/४/९१ विषय क्र. २३ प्रमाणे मान्यता मिळालेली होती. परंतु सन ९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे सुधारीत अंदाजपत्रक र. रु. २,६३,१२०/- च्या रक्कमेस मा. आयुक्त यांची मान्यता दि. २.१२.९१ रोजी मिळाली आहे.

सदरील कामासाठी दुसऱ्या वेळेस कार्यालयीन नोटीस क्र. ५/जा.क्र. मनपा/बां.-वि-१६३४८/९१ दि. १३.१२.९१ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकुण तीन निविदा विकल्या गेल्या व त्यापैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक ३०.१२.९१ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री पी.एम. चोरडीया | ३.७७% | कमी |
| २. | मे. रे. कन्स्ट्रक्शन | २% | कमी |
| ३. | मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | ३०% | जास्त |

वरीलपैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा कमी दराची श्री. पी.एम. चोरडीया यांच्या निविदाची रु. २६३१२०/- च्या रक्कमेस व निविदास मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अंजठा हॉटेल, नगारखाना गल्ली, नाझगल्ली व सुपारी हनुमान रोड येथे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३.७७% कमी दराच्या श्री पी.एम. चोरडीया यांचे दरपत्रकास आणि सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,६३,१२०/-च्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते.

डांबरीकरण करणाची कामे फक्त उन्हाळयातच होत असल्यामुळे प्रस्तावात दर्शविलेल्या कामासाठी हे सभागृह आजच स्विकृती देण्यास सर्वानूमते मंजुरी देत आहे. तेव्हा संबंधित विभागाने शक्य तितक्या लवकर काम सुरु करण्याबाबत कार्यवाही करावी. असे सर्वानुमते ठरले.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८४/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मुजीब कॉलनी अंतर्गत रस्त्यास २० मी.मी. जाडीचे मिक्स सिल सरफेसींग करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९८५७०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक ८.४.९१ रोजी मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील कामासाठी तिसऱ्या वेळेस कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/जा.क्र./६३४८/९१ दिनांक १३.१२.९१ ला निविदा मागविण्यात असता शेवटच्या तारखेपर्यंत एकुण तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक ३०.१२.९१ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१) श्री. गुरुनानक इंडस्ट्रीज २०% जास्त

२) श्री. पी.एम. चोरडीया अंदाजपत्रकाच्या दराने

वरील पैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दराची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुजीब कॉलनी अंतर्गत रस्त्यास २० मी.मी. जाडीचे मिक्स सिल सरफेसिंग करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराच्या व श्री पी.एम. चोरडीया यांचे अंदाजपत्रकीय दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८५/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शांतीपुरा कॉलनी येथे नविन उद्यान तयार करणे बाबतचे कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ३,७७,१००/- ला मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली असुन त्या अनुषंगाने सदर कामाचे "बी-१" नमुन्यात सुचना दिनांक ९.१२.९१ रोजी दैनिक लोकविजय व मुफस्सीर इत्यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले. त्यानुसार विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण तीन कोरे दरपत्रके विकण्यात आले व स्विकारणेच्या तारखेस एकुण तीन दरपत्रके दर भरुन प्राप्त झाली.

सदरील खर्च शासकीय अनुदानातुन करण्यात येणार आहे. दरपत्रके उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले. दराचे तपशील खालील प्रमाणे आहे.

१) कुलवंतसिंग ०.३०% कमी दराने

२) एस.एच. असोशिएटस २% जास्त दराने

३) आर. अे. शेख ३% जास्त दराने

सदरील दरपत्रकास तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दरपत्रक श्री. कुलवंतसिंग गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३०% कमी दराचे आहे. करीता विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नविन उद्यान शांतीपुरा कॉलनी येथे नविन उद्यान तयार करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.३०% कमी दराच्या श्री. कुलवंतसींग यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,७७,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८६/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, उस्मानपुरा येथील खुल्या जागेवर उद्यान करणेबाबतचे कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ८८८५०/- ला मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली असुन त्या अनुषंगाने सदर कामाचे "बी-१" निविदा सुचना दिनांक ९.१२.९१ रोजी दैनक लोकविजय व मुफतसीर इत्यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले. त्यानुसार विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण ११ (अकरा) कोरे निविदा पत्रके विकण्यात आले व स्विकारणेच्या तारखेस एकुण तीन दरपत्रके दर भरुन प्राप्त झाली. त्याचे तपशील दरभरुन प्राप्त झाली. त्याचे तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | वेलवर्थ कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| २) | कुलवंतसिंग | ५% जास्त दराने |
| ३) | विशाल कन्स्ट्रक्शन | संबंधीत गुत्तेदार यांचे विनंती अर्जा अन्वये की दरपत्रक उघडण्यात येऊ नये. |

सदरील दरपत्रकात तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दरपत्रक वेलवर्थ कन्स्ट्रक्शन गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकाचे दराचे करीता विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. उस्मानपुरा येथील खुल्या जागेवर उद्यान तयार करणे बाबतचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे श्री. वेलवर्थ कन्स्ट्रक्शन गुत्तेदार यांच्या अंदाजपत्रकीय दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८७/१२ :**

वार्ड क्र. २८ शहागंज भाजी मार्केट येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.६३८००/- चे तयार करण्यात आलेले असुन सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दिनांक ५.१२.९१ ला मंजुरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १३/१५२७/९१ दि. १०.१२.९१ नुसार दैनिक अंजिठा व अलमगिर टाईम्स या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण तीन निविदा विकण्यात आल्या होत्या त्यापैकी केवळ दोन निविदा वसुल झालेल्या असुन त्याचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अब्दुल रशीद शेख | ७% | कमी |
| २) | कैसरखान | ५% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ७% कमी दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २८ शहागंज भाजी मार्केट येथे २५० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे व श्री अब्दुल रशिद शेख यांचे अंदाजपत्रकीयय दरापेक्षा ७% कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८८/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सातारा येथील सिडकोच्या अकराव्या स्किमची ड्रेनेज लाईन महानगरपालिकेच्या ड्रेनेज लाईनला जोडावयाची असल्यामूळे ड्रेनेज लोड वाढत असल्यामुळे ३०० एम.एम. ऐवजी ४५० एम.एम. व्यासाची लाईन टाकावी लागेल. त्यासाठी लागणारे आर.सी.सी. एन.बी. -२ क्लासचे पाईप खरेदी करण्यासाठी निविदा सुचना क्र. ९/१९९१/९२ जी की, दैनिक लोकमत टाईम्स, दैनिक सिटीजन्स मध्ये प्रसिध्दीस करण्यात येऊन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्य नियोजित तारखोस फक्त एक निविदा विक्री झाली. निविदा स्विकृतीच्या नियोजीत तारखेस एक सिलबंद निविदा प्राप्त झाली. जी की, मे. एम.एस.एस. आय.डी.सी. औरंगाबाद यांची आहे.

| तपशिल | अंदाजीत दर | निविदेतील दर | शेरा |
|---|---|---|---|
| ४५० एम.एम. | २४५.०० | २८६.३१ | १६.८६% |
| एन.पी.२क्लास | प्रती | प्रती | जास्त |
| पाईप कॉलरसह | रनिंग | रनिंग | - |
| आय.एस.आय. | मिटर | मिटर | - |
| मार्क सहीत | | | |

तरी मे. एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांनी दिलेला अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.८६% जास्त दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

एम.एस.एस. आय.डी.सी. औरंगाबाद यांनी दिलेला दर नोव्हेंबर ९१मध्ये झालेल्या रेट कॉन्ट्रॅक्ट दराप्रमाणे आहेत. पाईपच्या व्यास ३०० मी.मी. ऐवजी ४५० मी.मी. करावा लागल्यामुळे होणारा अधिकचा खर्च सिडको भरावयास तयार आहे. मुळ काम ८९-९० च्या शासकीय विशेष अनुदानाअंतर्गत चालु आहे.

तरी एम.एस.एस. आय.डी.सी. औरंगाबाद कडुन रुपये २८६.३१ प्रती रनिंग मिटर या दराने ४५० मी.मी. आर.सी.सी. एन.पी. २ क्लासचे पाईप खरेदी करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** पाईप लाईनच्या कामासाठी कार्यालयातर्फे आवश्यक असलेले पाईप, जॉईन्टस रिंग इत्यादी साहित्य पुरविण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. पुरविण्यात येणारे हे साहित्य ज्या ठिकाणी साठविण्यात आले आहे. त्या ठिकाणी चौकीदाराची व्यवस्था नाही. त्यामुळे एखाद्या कामासाठी आवश्यक असलेल्या साहित्याची गुत्तेदारातर्फे मागणी झाल्यावर त्याबाबतचा गेटपास तयार करुन गुत्तेदारास दिला जातो. परंतु प्रत्यक्षात साहित्याचा साठा असलेल्या ठिकाणाहुन गुत्तेदारा किती पाईप, जॉईंट रिंग घेऊन जातात याबाबत कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. तसेच पुरविण्यात आलेल्या साहित्याचा पुरेपुर उपयोग प्रत्यक्षात कामावर केला जातोय असे नाही. ही बाब लक्षात घेता यापुढे पाईप खरेदी बाबत मंजुरी दिली जाणार नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सातारा येथील सिडकोच्या अकराव्या स्किमची ड्रेनेज लाईन महापालिकेच्या ड्रेनेज लाईनला जोडावयाची असल्यामुळे ड्रेनेज लाईनवर वाढणारा लोड लक्षात घेता ३५० मी.मी. ऐवजी ४५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्या करीता

आवश्यक असलेले ४५० मी.मी. व्यासाचे आर.सी.सी. एन.पी-२ क्लासचे (कॉलर व आय.एस.आय. मार्क सहित ) पाईप खरेदीसाठी प्रती रनिंग मिटर रु. २८६.३१ (म्हणजेच अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १६.८६% जास्त दराचे) या दराच्या मे. एम.एस.एस.आय. डी.सी. औरंगाबाद यांचे (नोव्हेंबर ९१ मध्ये झालेल्या रेट कॉन्ट्रॅक्ट प्रमाणे) दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८९/१४ :**

कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ८ मधील हर्सुल येथील फिल्टरेशन प्लँटचे संरक्षित भिंत दुरुस्ती करण्याच्या कामाचे र. रु. २८१८०/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९०-९१ चे दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन मा. आयुक्तांनी दिनांक ४.७.९१ अन्वये सदरील अंदाजपत्रकास मंजुरी दिली आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली कामे पाणी पुरवठा सन १९९१-९२ या शिर्षकाखाली करण्यात येईल. फिल्टर बेड संरक्षित भाग असुन सदर ठिकाणी पाणी पुरवठा विभागाचे मुख्य भांडार आहे. वेळी अवेळी सदरील ठिकाणी खुल्या जागेत पाणी पुरवठा साहित्य पाईप, जॉईन्ट वगैरे इत्यादी चोरी जाण्याचा संभव आहे. करीता सदरील ठिकाणाची संरक्षित दगडी भिंत त्वरीत दुरुस्त करणे आवश्यक आहे.

दिनांक २४.९.९१ अन्वये उपरोक्त कामासाठी बि-१ नमुन्यात दैनिक अजिंठा व दैनिक आलमगिर टाईम्स या स्थानिक वर्तमानपत्रातुन जाहिर निविदा मागविण्यात आल्या असता एकुण २२ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेस नियोजीत दिनांकास एकुण १४ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जफरखान महमुदखान | २९.३० % | कमी दराने |
| २) | के.बी. काल्डा | २५.२५ % | --//-- |
| ३) | अब्दुल रशिद शेख सांडु | २४.८७ % | --//-- |
| ४) | कूलवंतिंग दिवानसिंग | १९.१० % | --//-- |
| ५) | एस.ए. साठे | १५.०० % | --//-- |
| ६) | अे. के. साबळे | १८.९० % | --//-- |
| ७) | प्रमोद चिंचोळे | २१.६५ % | --//-- |
| ८) | एस. के. मिसाळ | २१.२१ % | --//-- |
| ९) | अब्दुल सलाम अब्दुल गफुर | १३.१० % | --//-- |
| १०) | एल. आर. गोरे | २३.९१% | --//-- |
| ११) | व्ही. एम. कन्स्ट्रक्शन | २४.५% | --//-- |
| १२) | विशाल कन्स्ट्रक्शन | १५ % | --//-- |
| १३) | आर. सी. शिंदे | २१.५% | --//-- |
| १४) | काथार बी. एम. | ७.५% | --//-- |

तुलनात्मक दृष्टया प्राप्त चौदा निविदापैकी ठेकेदार श्री. जफरखान महमुदखान यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २९.३०% कमी दराची आहे. मंजुरीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ८ हर्सुल येथील फिल्टरेशन प्लाँटचे खुल्या जागेत असलेले पाणी पुरवठा साहित्य (पाईप, जॉईंट वगैरे) चोरीस जाण्याची संभव असल्याने फिल्टरेशन प्लाँटच्या संरक्षित भिंतीची दुरुस्ती करण्याच्या कामासाठी तुलनात्मक

दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २९.३०% कमी दराच्या श्री. जफरखान महमुदखान यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

प्रस्तावातील कामाची तातडी लक्षात घेता सदर काम तातडीने सुरु करता यावे याकरीता या ठरावास आजच सर्वानुमते स्विकृती देण्यात येते. तेव्हा संबंधित विभागाने त्वरीत काम हाती घ्यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९०/१५ :**

वार्ड क्र. ( ) मोहल्ला त्रिमुर्ती चौक ते आकाशवाणी रस्त्यावर १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. टाकणे बाबत अंदाजपत्रक रककम रु. ६५,५९१/- चे तयार करण्यात आले असुन सदर अंदाजपत्रक सन १९८९-९० च्या दरसुचीनुसर तयार करण्यात आले. सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. १७/१०४/९१ दि. २०.१.९१ नुसार बी-१ निविदेत निविदा मागविल्या असता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.२२% कमी दराचे श्री शेख रफिक शे. रहिम यांचे दरपत्रक होते. सबंधीताने २% अनामत रक्कम व मुद्रांकन दाखल न केल्याने संबंधितास काळया यादीत समाविष्ट करुन कार्यालयीन निविदा सुचना क्र. १०/१४७८/९१ दिनांक ३.१२.९१ नुसर दैनिक लोकमत व औरंगाबाद टाईम्स दैनिकात जाहिरात देवुन बी-१ नमुन्यात दुसरी वेळ निविदा मागविल्या असता एकुण सहा निविदा विकण्यात आल्या होत्या. त्या सर्वच्या सर्व सहाही निविदापत्रके प्राप्त झाली असुन त्याचे तुलनात्मक तक्ता दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री सय्यद रफिकोद्दिन | १५ % | जास्त |
| २) | एस. जी. वनवे | १५ % | जास्त |
| ३) | श्री सय्यद सिराजोधीन | ५ % | जास्त |
| ४) | श्री देशमुख एस. अे. | २.०५ % | कमी |
| ५) | श्री आर.एस. भाटीया | ४.९९ % | कमी |
| ६) | श्री व्ही. एन. साळवे | १५ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराचे श्री व्ही. एम. साळवे यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे त्रिमुर्ती चौक ते आकाशवाणी या रस्त्यावर १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. लाईन टाकण्याच्या कामासाठी दुसऱ्या वेळेस मागविण्यात आलेल्या निविदा सुचना नुसार तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १५% कमी दराच्या श्री वि.एन. साळवे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९१/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्या महानगरपालिका मध्ये विशेष शासकीय अनुदानाची अनेक कामे रेगांळलेली आहेत. वास्ताविक शासनाचा हा पैसा खर्च होऊन कामे व्हावयास पाहिजे होती. परंतु उपअभियंत्याची संख्या कमी असल्याने कार्यक्रम कार्यान्वीत करण्याच्या कामाला गती येत नाही. त्यासाठी सहा महिन्यासाठी उप अभियंत्याचे पद निर्माण करुन भरणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व साधारण सभेने एक उप अभियंत्यांचे पद जलनि:सारण विभागाकरीता निर्माण करण्यास मंजुरी दिली आहे. व उपअभियंताच्या पदास

शासनाची मंजुरी मिळण्याकरीता शासनास प्रस्ताव पाठविला आहे. प्रस्ताव शासनास पाठवुन जवळ-जवळ १ १/२ वर्ष झाले आहे. व दिनांक २०.११.९१ रोजी स्मरण पत्र देण्यात आले आहे. शासन मंजुरी देईल या आशेवर पद भरण्याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम-५३ अन्वये ६ महिन्या करीता सदरील पद निर्माण करुन पदोन्नती द्वारे भरण्याकरीता दिनांक ७-१-९२ रोजी निवड समितीची बैठक बोलावण्यात आली होती. निवड समितीने उप-अभियंता पदावर पदोन्नती द्वारे नियुक्ती करण्याकरीता श्री. सिद्दीकी एम.एच. अफसर, सहा. अभियंता यांच्या नावाची शिफारस केली आहे.

करीता उप अभियंता हे पद सहा महिन्याकरीता शासन पदास मंजुरी देईल. या आशेवर व शासकीय अनुदानातील प्रलंबीत कामे पुर्ण होण्याकरीता भरण्यास प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव व उप अभियंता पदावर निवड समितीने शिफारस केलयाप्रमाणे श्री सिधीकी एम.एच.अफसर सहा.अभियंता यांची पदोन्नती द्वारे नियुक्ती करण्यास मंजुरी मिळण्याकरीता प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री केशव सोनवणे :** उप अभियंता या पदाकरीता आतापर्यंत प्रशासनातर्फे भरण्यात आलेल्या उप-अभियंता पदाच्या विचार केला असता ओपनच्या दोन जागा भरावयाच्या बाकी आहेत. अशी माहिती मिळाली आहे. तसेच शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता स्लम विभाग, उद्यान विभाग आणि सिडकोच्या नविन भाग या करीता नविन जागा भराव्या लागतील. या बाबीच्या विचार करता उप अभियंता पदाबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**सहाय्यक आयुक्त-१ :** सेवा भरती नियमानुसार पदोन्नती देतांना पदवी धारकासाठी ४०% आय.टी.आय. धारकांकरीता २०% जागा ठेवण्यात याव्यात असा नियम आहे. सध्या दोन पदवीधर सहा पदवीधारक आणि चार आय.टी.आय. धारक असे एकुण १२ उप अभियंता कार्यरत आहे.

**श्री गिरजाराम हाळनोर :** सेवा भरती नियमास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे काय?

**श्री गजानन बारवाल, श्री एकबालसिंग गील :** शाखा अभियंता श्री. वझे आणि रामटेके यांनी पदोन्नती मिळणे बाबत दोन पत्रे दिली आहेत. त्यावर काय निर्णय झाला याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** स्लम विभाग आणि उद्यान विभाग याकरीता दोन उपअभियंता पदांची मागणी करतांना पदवीधर /पदवीधारक/आय.टी.आय. धारक अशां वेगवेगळी पदांची मागणी करावी लागेल तसे न करता प्रशासनाने ज्या ज्या कर्मचाऱ्यांना आदेश देतांना न्यायालयात दाखल असलेले समोर प्रकरण समोर ठेवुन आदेश दिलेले आहेत. त्यामुळे न्यायालयात असलेल्या या प्रकरणी न्यायालयाचा काही निकाल झाल्यास पदोन्नती दिलेल्या या सर्वांना पुन्हा कनिष्ठ अभियंता या पदावर काम करावे लागेल. पदोन्नती देतांना यापुर्वी प्रशासनातर्फे सभागृहासमोर ठेवण्यात आलेला नाही. आज सभागृहासमोर जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे तो नियमाप्रमाणे ठेवण्यात आला आहे. यापुर्वी फक्त पदोन्नती दिलेल्या आदेशाची प्रत माहितीसाठी देण्यात आली आहे.

**श्री गिरजाराम हाळनोर :** कनिष्ठ अभियंता पदाची नेमणुक करतांना जर उमेदवार खाजगी शिक्षण संस्थेतुन उत्तीण झाला असेल तर नेमणुक देतांना उमेदावारांकडुन पदोन्नती मागणार नाही.

**सहा. आयुक्त -१, विधी सल्लागार :** अशा आशयाचा बॉंड घेतला जातो काय? अशी पध्दत नाही.

**मा. सभापती :** शाखा अभियंता श्री.रामटेके यांचे न्यायालयातील प्रकरणात आवश्यक असलेले सर्व कागदपत्र संबंधित विभागाने त्वरीत पुरवावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विशेष शासकीय अनुदानातील कामांना गती प्राप्त होण्याकरीता शासन मंजुरी देईल या आशेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिकेवर अधिनियम १९४९ चे कलमे ५३ अन्वये आणि निवड समितीच्या शिफारशी नुसार उप अभियंता जलनि:सारण या पदावर श्री. सिद्दीकी एम. एच. अफसर, सहाय्यक अभियंता यांना सहा महिन्याकरीता पदोन्नतीद्वारे नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९२/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, खुल्या बाजारातुन सिमेंट खरेदीस्तव सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कंपनीस कार्यालयाचे पत्रक क्र. ३९४ दि. १८.१२.९१ द्वरे दरपत्रक मागविले असता त्यांनी दिनांक २६.१२.९१ रोजी दर पत्रक देवुन प्रति टन रु. १५६०/- प्रमाणे दर दिला. तसेच कंपनीच्या अटी खालील प्रमाणे आहेत.

१) सिमेंटच्या दर प्रति टन रु. १५६०/- असुन सिमेंटचा पुरवठा रेल्वेस्टेशन किंवा सी.सी. आय. गोडाऊन पर्यंतचा आहे.
२) स्थानिक वाहतुक रेल्वेस्टेशन ते मनपा गोडाऊन पर्यंत कार्यालयास वेगळी करावी लागेल.
३) जकात कर कार्यालयास वेगळा सोसावा लागेल. वरील दरात वाहतुक व जकात कराचा समावेश नाही.
४) शासनामार्फत दरात काही वाढ झाल्यास ती कार्यालयास सोसावी लागेल.
५) सिमेंटची रक्कम अग्रिम धन (ॲडव्हान्स) द्यावी लागेल.
६) मागणी प्रमाणे पुरवठा ३० दिवसात करण्यात येईल.
७) सदरील दराची मुदत ही दिनांक ७.१.९२ असुन त्यानंतर विचार करता येणार नाही.

तरी सी.सी.आय. कंपनीच्या दरास (रु. १५६०/-प्रती टन) व १००० मे. टन सिमेंट खरेदीस खर्च रक्कम रु. १५,६०,०००/- इतकी रक्कम व तसेच रेल्वेस्टेशन ते मनपा गोडावुन पर्यंत उपलब्ध वाहतुक ठेकेदारामार्फत सिमेन्ट वाहतुक करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीकडुन प्रस्तावात दर्शविलेल्या अनुक्रमांक १ ते ७ पर्यंतच्या अटीसह प्रती टन रु. १५६०/- या दराने १००० मे. टन सिमेंट खरेदी करण्यासाठी र. रु. १५ लाख ६० हजाराच्या खर्चास तसेच रेल्वेस्टेशन ते मनपा गोडावुन पर्यंतची सिमेंट ची वाहतुक उपलब्ध ठेकेदारामार्फत करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९३/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एम्प्लॉयमेन्ट कार्यालयापासुन ते क्रांतीचौक पोलीस स्टेशन या ५० फुटी डी.पी. रोडचे डांबरीकरण

करणेच्या कामांसाठी सन १९९०-९१ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने रक्कम रु. २,८८,१९० चे अंदाजपत्रकास दि. १५.११.९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन सदरचा खर्च शासनाचे अनुदान या सदराखाली करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. (१२) ९१-९२ दिनांक २६.११.९१ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट फेरनिविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित दि. ३.१२.९१ पर्यंत एकुण तीन निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांक ७.१२.९१ ला एकुण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | १२.७२% | कमी दराने |
| २) | श्री पी.एम. चोरडीया | ७.७७% | कमी दराने |
| ३) | मे. रे. कन्स्ट्रक्शन | १% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२.७२% कमी दराने मे. गुरुनानक इंडस्ट्रीज यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावातील कामाची स्थळ पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २९४/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महापालिकेच्या अस्थापनेवरील अग्निशमन अधिकारी या पदाची वेतनश्रेणी रु. १४०० ते २३००/- ऐवजी १६४०/- ते २९००/- वाढ करण्याची स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. परंतु श्री झनझन यांनी बि.एससी. बी. ई. (फायर) ची पदवी घेतलेली आहे. त्यांची नेमणुक महापालिकेमध्ये सुरवातीला रु. ३३५-६८० या वेतनश्रेणी मध्ये झाली आहे. अग्निशमन अधिकारी यांची जबाबदारी शैक्षणिक अर्हता तसेच कामाचे स्वरुप पाहता त्यांना (६००-९५०) सुधारीत वेतनश्रेणी रु. २०००-६०२३०० द.रो. ७५-३२०० ही वेतनश्रेणी देण्याची शिफारस करण्यात येते.

करीता अग्निशमन अधिकारी या पदाची वेतनश्रेणी रु. ३३५-६८० या वेतनश्रेणी ऐवजी रु. ६००-९५० सुधारित वेतनश्रेणी रुपये २०००-६०-२३०० द.रा. ७५-३२०० या प्रमाणे वेतनश्रेणीत वाढ करण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री केशवराव सोनवणे :** अग्निशमन अधिकारी म्हणुन कार्यरत असलेले अधिकारी हे अग्निशमन अभ्यासाप्रमाणे पदवीधर आहेत. तेव्हा त्यांच्या नेमणुकीच्या तारखेपासुन संबंधित अधिकाऱ्यांना प्रस्तवात दर्शविलेली सुधारीत वेतनश्रेणी देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन अधिकारी यांची जबाबदारी शैक्षणिक अर्हता तसेच कामाचे स्वरुप पाहता अग्निशमन अधिकारी या पदाची वेतनश्रेणी रु. २०००-६०-२३०० द.शे.७५-३२०० याप्रमाणे वेतनश्रेणीत वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९५/२० :**

अग्निशमन दलासाठी अँब्युलन्स व्हॅन खरेदी करण्यासाठी रु. ५ लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. डायरेक्ट मॅन्युफॅक्चरींग कंपनीकडुन दरपत्रके मागविण्यात येतील. हा खर्च फायर ब्रिगेड वाहन खरेदी साठी देण्यात आलेल्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

**संवाद :**

**श्री गजानन बारवाल :** ग्रामीण भागातील अग्निशमन कार्यासाठी पाठविण्यात येणाऱ्या अग्निशमन स्कॉडच्या खर्चाची रक्कम बऱ्याच प्रमाणात थकबाकीमध्ये असल्याची माहिती मिळाली आहे. तेव्हा अशा प्रकारे थकबाकी असलेली रक्कम वसुलीबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा. उपआयुक्त :** ग्रामपंचायतींना जिल्हा परिषदेमार्फत शासकीय अनुदान दिले जाते. तेव्हा ज्या ग्रामपंचायत हद्दीमध्ये अग्निशमनच्या कार्यासाठी महापालिकेच्या अग्निशमन दलाचा उपयोग करुन घेण्यात आला आहे. त्याबाबतच्या खर्चाची रक्कम अशा ग्रामपंचायतांना जिल्हा परिषदेमार्फत देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेतुन कपात करुन महापालिकेकडे जमा करावी. अशा अशयाचे पत्र जिल्हा परिषदेकडे देण्यात यावे अशी सुचना मा. आयुक्त यांनी दिली आहे. तेव्हा सदर प्रकरणी मा. आयुक्त यांचे सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन दलासाठी आवश्यक असलेले एक ॲब्युलन्स व्हॅन तयार करणाऱ्या कंपनीकडुन दरपत्रके मागवुन खरेदी करण्यासाठी र. रु. पाच लाखाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी. सदर खर्च फायर ब्रिगेड वाहन खरेदी या तरतुदीतुन करण्यात यावा.

**विषय क्र. २९६/२१ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १ मधील येथील उंच जलकुंभा भोवती चेनलिंक संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे र. रु. १,१९४००/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी चे सन १९८९-९० चे दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदरील काम सन १९९०-९१ च्या शासकीय अनुदानातुन करावयाचे असुन त्यास शासन निर्णय क्र. विकास प्र.प क्र. ३७ (अ) योजना क्र. ८ दिनांक १९.१.९१ अन्वये शासनाची मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामास निविदा मागविण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. १८.१०.९१ अन्वये मान्यता दिली. त्यानुसार जा.क्र. मनपा/पापु/३/२०२९/९१ दि. १९.११.९१ अन्वये सुचना क्र. १० वर्ष ९१-९२ नुसार दैनिक नवा मराठा व दैनिक औरंगाबाद डॉन व दै. महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रातुन जाहीर निविदा प्रसिध्दीस दिली असता सदरील निविदा सुचना दै. औरंगाबाद डॉन व दै. नवा मराठा या वर्तमान पत्रातुन प्रसिध्द झाली. कोरी निविदा पत्रके विक्रीच्या नियोजित दिनांकास एकुण दहा कोरी निविदा पत्रके विक्री झाली व निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांकास एकुण चार निविदा दर भरुन प्राप्त प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल असा आहे.

१. ठेकेदार श्री विशाल कन्स्ट्रक्शन २% जास्त दराने

२. अन्सारी निहाल अहेमद १% कमी दराने
३. कुलवंतसिंग दिवानसिंग ३% जास्त दराने
४. झवर मेघराज सजनानी ४% जास्त दराने

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराची ठेकेदार श्री. अन्सारी निहाल अहेमद यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १% कमी दराची आहे.

करीता अंदाजपत्रकीय र. रु. ११९४००/- चे खर्चास व ठेकेदार श्री अन्सारी निहाल अहमद यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १% कमी दराची निविदा स्विकारणे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १ मिटमिटा येथील उंच जलकुंभा भोवती चेनालिंक संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. ११९४००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १% कमी दराच्या गुत्तेदार श्री. अन्सारी निहाल अहमत यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९७/२२ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ६ मधील रोजाबाग सेटलींग टँक साठी संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे र. रु. ५,०७,५००/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी चे सन १९८९-९० चे दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदरील काम सन १९९०-९१ च्या शासकीय अनुदानातुन करावयाचे असुन त्यास शासन निर्णय क्र. विकास १०९० प्र.क्र. ३७ (अ) योजना क्र. ८ दिनांक १९.१.९१ अन्वये शासनाची मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामास निविदा मागविण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. १६.१०.९१ अन्वये मंजुरी दिली. जा.क्र. मनपा/पापु/२/२०२९/९१ दि. १९.११.९१ अन्वये सुचना क्र. १० वर्ष ९१-९२ नुसार दैनिक नवा मराठा व दैनिक औरंगाबाद डॉन या वृत्तपत्रातुन जाहीर निविदा मागविण्यात आल्या होत्या तसेच महाराष्ट्र टाईम्स या राज्य पातळीवरील वर्तमानपत्रात सुध्दा सदरीची निविदा सुचना प्रसिध्दीस दिली होती. परंतु या वर्तमानपत्रात सदरील निविदा सुचना प्रसिध्द झाली नाही. कोरी निविदा पत्रके विक्रीच्या नियोजित दिनांकास एकुण सात कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांकास एकुण तीन निविदा दर भरुन प्राप्त प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

१. ठेकेदार श्री एम. अलीउधीन ०.४०% कमी दराने
२. कैसरखान बद्रोधीनखान २% जास्त दराने
३. कुलवंतसिंग दिवानसिंग ५ % जास्त दराने

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराची ठेकेदार श्री. एम. अलीउधीन यांची अंदाज पत्रकाचे दरापेक्षा ०.४०% कमी दराची आहे.

करीता अंदाजपत्रकीय र. रु. ५,०७,५००/- चे खर्चास व ठेकेदार श्री एम. अलीउधीन यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.४०% कमी दराची निविदा स्विकारणे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ६ रोजाबाग सेटलिंग टँक करीता संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. ५,०७५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.४०% कमी दराच्या गुत्तेदार श्री. एम. अतीउधीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानीक कार्यवाही व्हावी.

**"ऐनवेळचे विषय"**

**विषय क्र. २९८/२३ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १ मधील भिमनगर, भावसिंगपुरा येथील उंच जलकुंभास चेनलिंक संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे र. रु.१,१५,६५४=००/- व वॉचमन रुम बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक रु. ५४,१००/- असे एकूण रु. १,६९,७५४/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी चे सन १९९०-९१ चे दरसुची अनुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील काम १९९०-९१ च्या शासकीय अनुदानातून करावयाचे असून त्यास शासन निर्णय श्री. विकास १०९० प्र.क्र. ३७(अ) योजना क्र. ८ दिनांक १९-१-९१ अन्वये शासनाची मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामास बी-१ नमुन्यावर निविदा मागविण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. १६.१०.९१ अन्वये मंजुरी दिली. जा.क्र. मनपा/पापु/३/२०२९/९१ दि. १९.११.९१ अन्वये सुचना क्र. १० वर्षे ९१-९२ नुसार दैनिक नवा मराठा व दैनिक औरंगाबाद डॉन व दै. महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रातुन जाहीर निविदा प्रसिध्दीस दिली असता सदरील निविदा सुचना दै. औरंगाबाद डॉन व दै. नवा मराठा या वृत्तपत्रातुन प्रसिध्द झाली. कोरी निविदा पत्रके विक्रीच्या नियोजित दिनांकास एकुण अकरा कोऱ्या निविदापत्रके विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या नियोजित दिनांकास एकुण तीनच निविदा दर भरुन प्राप्त प्राप्त झाल्या. त्याचा तपशील असा आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | ईश्वर मेघराज सजनानी | - | २% | जास्त दराने |
| २. | कुलवंतसिंग दिवानसिंग | - | ०.३०% | कमी दराने |
| ३. | कैसरखान बद्रोधीनखान | - | ४% | जास्त दराने |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराची ठेकेदार श्री. कुलवंतसिंग दिवानसिंग यांची निविदा असुन अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.३०% कमी दराची आहे.

करीता अंदाजपत्रकीय र. रु. १,६९७५४/- चे खर्चास व ठेकेदार श्री. कुलवंतसिंग दिवानसिंग यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.३०% कमी दराची निविदा स्विकारणे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १ भिमनगर भावसिंग पुरा येथील उंच जलकुंभास चेनलींक संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. ११५६५४/- आणि वॉचमन रुम बांधण्याच्या कामासाठी र. रु. ५४,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सदरील कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.३०% कमी दराच्या श्री. कुलवंतसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९९/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, दिवान देवडी, फकिरवाडी, अंगुरीबाग या विभागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस. आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक र. रु. ३,८३,२७५/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिवान देवडी, फकिरवाडी, अंगुरीबाग या भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३८,३२७५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरचा खर्च भांडवली रस्ते या सदरातुन करण्यात यावा. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३००/२५ :**

महिंद्रा जिप्स खरेदी करण्यासाठी मे. महिंद्रा लिमिटेड मंबई हयांच्या कडुन दर मागवले असता त्यांनी त्यांनी डी.जी. एस. अँड डी दराने दर दिले असुन त्याच दि. ६.१.९२ चे दरपत्रक दि. २२.१.९२ रोजी मिळाले असुन त्यांनी सात (७) वेगवेगळया मॉडेल्सच्या जिपसाठी दर दिलेले आहेत.

त्यापैकी सी. जे. ५०० डी.आय.९१ व्हील बेस्ट व टु व्हील ड्राईव्हच्या जीप खरेदी करण्याची शिफारस करण्यात येते. प्रत्येक जीप ची किमंत रु. १९०५२९+१५% महाराष्ट्र सेल टॅक्स +११४१ रु. ट्रान्स्पोर्टशन चार्जेस (इतर लेव्हीज ) असे सर्व मिळुन रु. २,२३,०००/- किंमत होते. २ जीप खरेदी करण्यासाठी रु. ४,४६,०००/- खर्च येईल. कंपनीच्या नियमाप्रमाणे त्यांचे कडुन प्रोफार्मा इनव्हाईस मागवुन त्या प्रमाणे डिमांड ड्राफ्ट द्वारे पेमेंट केल्यानंतर ४ ते ६ आठवडयात जिपची डिलेव्हरी मिळेल. २ जिप्स खरेदी करण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मेसर्स महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड मुंबई यांच्याकडुन सी.जे. ५०० डी. आय. ९१  व्हील बेस व टु व्हील ड्राईव्ह जीप्स खरेदी करण्यासाठी प्रती नग रु. १,९०,५२९ + अधिक १५% महाराष्ट्र सेल टॅक्स अधिक टॅक्स रु. ११४०/- ट्रान्सपोर्ट चार्जेस अधिक (इतर लेव्हीज) रु. २,२३,०००/- या दराने दोन जीप खरेदी करण्यासाठी एकुण रक्कम रु. ४,४६,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०१/२६ :**

टाटा ४०७ हया मॉडेलची चेसिस कॅबीन व लोड बॉडीसह खरेदी करण्यासाठी मे. टाटा इंजिनियरींग अँड लोकोमोटीव्ह कंपनी ह्यांच्या कडुन दर मागविले असता त्यांनी डी.जी. एस. अँड डी रेट कॉन्ट्रॅक्ट प्रमाणे दि. २.१.९२ चे दरपत्रक असुन ते आपणास दि. ८.१.९२ रोजी प्राप्त झाले. प्रत्येक वाहनासाठी रु. २,१८,९५४.३०+ट्रान्स्पोर्टशन चार्जेस रु. ५७४+१५% महाराष्ट्र सेल टॅक्स असे सर्व एकुण रु. २५२४५७.२३/- एका वाहनासाठी लागतील.

आपणांस नविन वाहने खरेदीसाठी ठेवलेल्या रु. १५ लाखातुन २ वाहने व डिप्रिशिएशन फंडात ठेवलेल्या रु. १० लाखाच्या बजेट मधुन ४ वाहने खरेदी करावयाची असुन एकुण ६ वाहनांच्या खरेदीसाठी रु. ५,०४,९१४.४६ रु. १०,०९,८२८.९२ असे एकुण १५,१४,७४३.४६ खर्च येणार आहे. कंपनीने प्रोफार्मा इनव्हाईस पाठविले असुन बिलाची अदाई अदाई केल्यानंतर ४ आठवडयात वाहने मिळतील. तरी ६ वाहनांची खरेदी सन १९९१-९२ ह्या वर्षासाठी ठेवण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीतुन करुन वाहने खरेदी करण्यास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मेसर्स टाटा इंजिनियरींग अँड लोकोमोटीव्ह कंपनी यांचेकडुन (रुपये २,१८,९५४.०३ पैसे अधिक ट्रान्सपोर्ट चार्जेस रु. ५७४/- अधिक १५% सेल टॅक्स) असे एकुण रक्कम रु. २५२४५७.२३ पैसे प्रती नग या दराने टाटा ४०७ या मॉडेलची चेसिस कॅबिज व लोड बॉडीसह दोन वाहने, नविन वान खरेदी करीता ठेवलेल्या रुये १५ लाखातुन आणि चार वाहने डिप्रिशिअेशन या फंडातील रु. दहा लाखाच्या तरतुदीतून खरेदी करण्यास सर्वानुमते सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वरील प्रमाणे एकुण सहा वाहने खरेदी करीता (रक्कम रु. ५०४९१४.४६ +अधिक रु.१०,०९८२८=९२)एकूण रक्कम (रु.१५१४७४३.३८ पैसे) रु. पंधरा लाख चौदा हजार सातशे त्रेचाळीस रूपये पैसे अडोतीस च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर वाहने सन १९९१-९२ हया वर्षातील आर्थिक तरतुदीमधुन खरेदी करण्यात यावे. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०२/२७ :**

अॅम्बॅसेडर नोवा पेट्रोल डिलक्स मॉडेलची एक कार खरेदी करण्यासाठी हिन्दुस्थान मोटर्स, कलकत्ता हया उत्पादक कंपनीस दरपत्रक पाठविण्यासाठी पत्र लिहिले होते. परंतु त्यांचे उत्तर आले नाही तेव्हां कंपनीचे मुंबई ऑफिसचे मॅनेजर श्री. शा.ह्यांचेशी फोनवर बोलणी केली असता त्यांनी अधिकृत विक्रेत्या कडुनच कार खरेदी केल्यास कमी किमंतीत मिळेल. असे सांगितले. औरंगाबाद येथील दोन्ही अधिकृत विक्रेत्यांकडुन कारसाठी दरपत्रके आणले असून त्यांनी खालील प्रमाणे दर दिले आहेत.

१) मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. औरंगाबाद - रु. २,०३,०००/-

२) मे. मे. भरत इंजिनियरिंग कंपनी, औरंगाबाद - रु. २,०१,६३३/-

पैकी मे. भरत इंजिनियरिंग कंपनी औरंगाबाद हयांचे दर कमी असुन त्यांनी डिलेव्हरीच्या वेळी पुर्ण पेमेंट द्यावे अशी अट घातली आहे. तरी त्यास मंजुरी मिळावी तसेच कार घेतल्यानंतर त्यास अॅक्सेसरीज, कुशन इ. साठी अंदाजे रु. १५,०००/- खर्चाच्या अंदाजपत्रकास पण मंजुरी द्यावी. एकुण रु. २,१७,०००/- च्या खर्चास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अॅम्बॅसेडर नोवा पेट्रोल डिलक्स मॉडेलची एक कार खरेदी करीता मेसर्स भारत इंजिनियरिंग कंपनी औरंगाबाद यांचे रु. २,०१,६३३/- च्या सर्वात कमी दराचे दरपत्रकास आणि सदर कार खरेदी केल्यानंतर त्यासाठीच्या अॅक्सेसरीज, कुशन इत्यादीच्या अंदाजे रक्कम रुपये १५,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ॲम्बॅसेडर नोवा पेट्रोल डिलक्स मॉडेल ची एक कार खरेदी करीता मेसर्स भारत इंजिनियरिंग कंपनी औरंगाबाद यांचे रु. २,०१,६३३/- च्या सर्वात कमी दराचे दरपत्रकास आणि सदर कार खरेदी केल्यानंतर त्यासाठीच्या ॲक्सेसरीज, कुशन इत्यादीच्या अंदाजे रक्कम रुपये १५,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०३/२८ :**

वाड्र क्र. १ मधील मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना अध्ययन व अध्यपनाकरीता ब्लॅक बोर्ड योजने अंतर्गत मराठी मूळाक्षरे, फिक्सो, पिक्चर, प्राणी, संग्रहसंच हे साहित्य सन १९९०-९१ व १९९१-९२ या वर्षातील र. रु. ७५,०००/-च्या स्वेच्छा निधीतुन वाटप करण्याबाबत स. नगरसेवक श्री. अशोक सायन्ना यादव यांनी दिनांक २.१.९२ च्या पत्रकाद्वारे विनंती केली आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १ मधील मनपाच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना अध्ययन व अध्यपनाकरीता ब्लॅक बोर्ड योजने अंतर्गत मराठी मुळाक्षरे फिकसो, पिक्चर, प्राणी, संग्रहसंच हे साहित्य स.नगरसेवक श्री. अशोक सायन्ना यादव यांचे सन १९९०-९१ व १९९१-९२ या वर्षातील रककम रु. ७५,०००/- च्या स्वेच्छा निधीतुन वाटप करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०४/२९ :**

जकात अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये पुढील आर्थिक वर्षासाठी सन १९९२-९३ साठी सन १९९१-९२ या वर्षात ज्या दराने जकात कर वसुल केल्या जात होता. त्याच दराने पुढील वर्षात जकात कर वसुल केल्या जाणार आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गजानन बारवाल :** महापालिका अस्तित्वात आल्यानंतर सध्या अस्तित्वात असलेले जकात नाके शहरापासुन बऱ्याच अंतरावर आहेत. परंतु या नाक्यावर फोन किंवा वायरलेसची सोय नाही. शहरापासुन असलेले नाक्यांचे अंतर लक्षात घेता जकात नाक्यावर फोन किंवा वायर लेस व्यवस्था असणे आवश्यक आहे. काही दिवसापुर्वी माल वाहुन नेणाऱ्या दोन ट्रक चालकाकडे जकात कराच्या पावती बाबत मागणी केली असता सदर वाहन चालकाने जकात कराबाबत दंड जागेवर भरण्यास तयारी दर्शविली. परंतु सदर वाहन चालक ज्या नाक्यावरुन वाहनाने शहरात प्रवेश केला त्या नाक्यावर किंवा मध्यवर्ती नाक्यावर जाण्यास तयार झाले नाहीत. या वाहन चालकाकडे जकात भरल्याची पावती नव्हती तसेच माझ्याकडे नगरसेवकाबाबतचे ओळखपत्रही त्यावेळी उपलब्ध नव्हते आणि मला काही कामानिमीत्त न्यायालयात जायचे होते. त्यामुळे या विनाजकात वाहनाबाबत कार्यवाही करता आली नाही.

**श्री. तुळशीराम भगुरे :** माझ्याकडे फोन आहे. जकात नाक्यावरील कर्मचारी गाडी आल्यानंतर वाहन चालकास संबंधित मालकास बोलावुन घेण्याबाबत

सांगातात अशा वेळी वाहन चालक या दुरध्वनीवरुन मालकास बोलावुन घेतात आणि वाहनचालक गाडी घेऊन निघुन जातो. मग जकात नाक्यावर फोन कशा करीता घावयाचे.

**मा. उपआयुक्त :** अग्निशमन विभागाकरीता वायरलेसची व्यवस्था करण्यासाठी संबंधित विभागाकडे प्रकरण दाखल करण्यात आले असुन त्याबाबतची आवश्यक रक्कमही भरण्यात आली आहे.

**मा. सभापती :** शहरातील विविध जलकुंभा करीता वायरलेसची व्यवस्था करण्यासाठी पाणी पुरवठा विभागाचे अंदाजपत्रकात तरतुद करण्याबाबत काय कार्यवाही झाली. याचा खुलासा व्हावा.

**जलगृह अभियंता :** वायरलेसची व्यवस्था करणेबाबत अंदाजपत्रक तयार करुन मंजुरीसाठी ठेवण्यात आले आहे.

**मा. सभापती :** जकात विभागातील नाक्यासाठी फोन व एक जादा जिप गाडी देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९२-९३ या आर्थिक वर्षासाठी सन १९९१-९२ या वर्षात ज्या दराने कर वसुली करण्यात येत होती. त्याच दराने सन १९९२-९३ या वर्षात जकात कर वसुल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०५/३० :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण ) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १२ मधील किराडपुरा मो. नेहरु नगर येथे १०० मी.मी., १५० मी.मी. व २०० मी.मी. व्यासाची अे.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाचे र. रु. ३,८५,९६५/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९०-९१ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील ठिकाणी पाईप लाईन टाकल्यास किमान ५०० घरधारक स्वत:चे नळ कनेक्शन घेण्याची शक्यता आहे.

सदरील कामाचा खर्च भांडवली कामे, पाणी पुरवठा सन ९१-९२ या शिर्षकाखाली करण्यात येईल. मा. आयुक्तांनी दि. २५.१२.९१ रोजी दरपत्रकास मान्यता दिली आहे.

तरी रु. ३,८५,९६५/- चे अंदाजपत्रक मंजुरीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रा. १२ मधील किराडपुरा येथील नेहरु नगर येथे १००मी.मी. १५०, २०० मी. मी. व्यासाची अे.सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. ३,८५,९६५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| सचिव | सभापती-स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ४-२-१९९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मंगळवार दिनांक ४ फेब्रुवारी १९९२ दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभागृहात मा. सभापती श्री. मोहंमद इस्माईल अ. करीम यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग
२) श्री. फैय्याज खान अहमदखान
३) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
५) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
६) श्री. भगुरे तुळशीराम छगन
७) श्री. बारवाल गजानन रामकिसन
८) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
९) श्री. सोनवणे केशव काशिनाथ
१०) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र. ३०६/१ :**

दिनांक २४-१-१९९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री गिरजाराम हाळनोर :** वार्ड क्र. ५७ एकनाथ नगर येथील ड्रेनेज लाईनचे काम सुरु होऊन किती दिवस झालेले आहे अद्यापर्यंत ते काम पुर्ण का होत नाही. याचा खुलासा व्हावा.

**उपअभियंता ड्रेनेज :** एकनाथ नगर भागात ड्रेनेज लाईन टाकण्याच्या जागेवर असलेल्या अतिक्रमणामुळे या कामास विलंब लागत आहे.

**श्री अलीम बेग :** संजयनगर येथील ड्रेनेज कामासही अशाच प्रकारे विलंब झाला आहे. या वसाहतीतील ड्रेनेज कनेक्शन मिळुन घेणाऱ्या नागरीकांची यादी व आवश्यक ती रक्कम जमा करण्यात आली आहे. परंतु अद्याप काम झालेले नाही. रक्कम जमा केलेली असल्यामुळे ड्रेनेजचे काम केंव्हा होणार म्हणुन नागरीकांकडुन विचारणा होत आहे. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**श्री गिरजाराम हाळनोर :** एकनाथनगर नगर भागातील ड्रेनेज लाईनच्या जागेवर असलेले अतिक्रमण नागरीक स्वतःहुन काढुन घेण्यास तयार आहेत याबाबत संबंधित कनिष्ठ अभियंता यांना प्रत्यक्ष कल्पना देण्यात आली आहे. परंतु संबंधीत कनिष्ठ अभियंता यांनी यानंतर भेट घेतली नाही.

**जलनिःसारण अभियंता -१ :** एकनाथ नगर येथील ड्रेनेज लाईनच्या कामाबाबत स्वतः आपणाकडे येईल.

**कार्यकारी अभियंता :** शासनाचे योजनेनुसार खुटीच्या संडासाचे जलौधीत संडासात रुपांतर करण्याच्या कामाठी प्रत्येक झोन करीता स्वतंत्र्यरित्या या प्रमाणे दरपत्रके

मागविण्यात आली आहेत. ज्या झोन मध्ये दरपत्रक धारकास काम नसेल अशा गुत्तेदाराकडुन वरील काम करुन घेण्यात येईल.

**श्री प्रभाकर विधाते :** वार्ड क्र. ३ पहाडसिंगपुरा भागातील ड्रेनेज लाईनचे काम मंजुर झाले आहे. परंतु अद्याप हाती घेण्यात आले नाही.

**उप अभियंता स्लम :** पहाडसिंगपुरा भागातील ड्रेनेज लाईनच्या कामाकरीता म्हाडाकडुन कर्ज घ्यावयाचे आहे. तसेच ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकावयाची होती त्याजागेचा वाद होता. म्हणुन ड्रेनेज लाईन टाकण्याची जागा बदलण्यात आली आहे. म्हाडा कडील कर्ज प्रकरणी उद्या संबंधीत कार्यालयाशी संपर्क साधण्यात येईल.

**श्री गिरजाराम हाळनोर :** शहानुरवाडी /चौसर कॉलनी (स्लम) येथे ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहे. परंतु या ड्रेनेज लाईनमधुन पाणी वाहत नाही. तसेच या भागात सार्वजनिक संडासही बांधण्यात आले आहेत.

**उप अभियंता :** शहानुरवाडी /चौसर कॉलनी स्लम येथे दोन वर्षापुर्वी सार्वजनिक संडास व ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम झाले आहे. नागरिक या संडासचा उपयोग घेत नाही.

**मा. सभापती :** उप अभियंता ड्रेनेज व स्लम यांनी संयुक्तरित्या सदर कामाची पाहणी करावी.

**श्री गिरजाराम हाळनोर :** दिनांक २४.१.९२ च्या सभेत नागसेन नगर भागातील ड्रेनेज लाईनच्या कामाबाबत पुन्हा मागविण्यात आलेल्या दरपत्रकाबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात येईल असे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले आहे. परंतु विषयपत्रिकेवर तो विषय नाही.

**शहर अभियंता :** नागसेन नगर भागात ड्रेनेज लाईन टाकण्याबाबत पुन्हा मागविण्यात आलेली दरपत्रके प्राप्त झाली असुन प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याचे काम बाकी आहे.

**मा. सभापती :** नागसेन नगर ड्रेनेज लाईनच्या कामासाठी पुन्हा मागविण्यात आलेली दरपत्रके उघडल्यानंतर दाखविण्यात यावी.

**श्री तुळशीराम भगुरे :** वार्ड क्र.८ हर्सुल येथील वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांची घरे केव्हां हस्तांतरीत होणार?

**अतिरिक्त शहर अभियंता :** हर्सुल येथे म्हाडातर्फे बांधण्यात आलेली महापालिकेच्य वर्ग -४ च्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणार आहेत. म्हाडातर्फे बांधण्यात आलेल्या घरांचे विद्युती करणाच्या कामासाठी दरपत्रके मागविण्यात आली आहेत. हर्सुल येथे महापालिकेच्या वर्ग-४ कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या घरापैकी काही घरे म्हाडाच्या मालकीची आहेत. या म्हाडाच्या मालकीच्या घरांचे विद्युतीकरणाच्या कामासाठी आवश्यक असलेली रक्कम म्हाडातर्फे भरण्यात आल्यानंतर विद्युती करणाचे काम हाती घेण्यात येईल. आणि त्यानंतर वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांना घरे हस्तांतर करण्यात येतील.

**मा. सभापती :** मनपा वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांना हर्सुल येथील देण्यात येणाऱ्यांना घरांचे विद्युतीकरण आणि या कामासाठी म्हाडातर्फे आवश्यक असलेली रक्कम शक्य तितक्या लवकर भरणाऱ्याबाबत मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रयत्न करावे आणि त्याबाबत पुढील सभेत माहिती द्यावी.

**श्री केशव सोनवणे :** नाथ सुपर मार्केटचे बांधकाम करणारे गुत्तेदार कोण, बांधकाम करणाऱ्या गुत्तेदाराचे नांव काळया यादीत समाविष्ट केले आहे काय? तसेच

महानगरपालिकेतर्फे काळया यादीत नांव समाविष्ट करण्यात आलेल्या गुत्तेदारांच्या प्रकरणी स्थायी समितीची सभा आयोजित करण्यात येईल अशी चर्चा झाली होती. परंतु अशा प्रकारची सभा अद्याप झाली नाही. प्रशासनातर्फे काळया यादीत समावेश करण्यात आलेल्या गुत्तेदारापैकी काही गुत्तेदार मनपातर्फे प्रसिध्द झालेल्या कामाचे टेंडर घेऊन गेले आहेत. तेव्हां अशा गुत्तेदारांचे त्या कामासाठीचे टेंडर कमी दराचे आले तर त्याबाबत काय कार्यवाही करणार? याचा विचार करता काळया यादीत समाविष्ट केलेल्या गुत्तेदारांची यादी आणि त्याबाबत लवकर मिटींग घेण्यात यावी.

**मा. सभापती :** काळया यादीत नांव समाविष्ट केलेल्या गुत्तेदारांच्या बाबतीत संबंधीत विभागांना पत्र देण्यात आले आहे. लवकरच या प्रकरणी सभा घेण्यात येईल.

**श्री नारायण फत्तेलष्कर :** विद्युत विभागाचे भांडारातील नाकारा सामानाबाबत माहिती देण्यात यावी म्हणुन संबंधीत विभागास २/३ लेखी पत्र देण्यात आले आहेत. परंतु त्याबाबतची माहिती अद्याप संबंधित विभागाकडुन मिळालेली नाही.

**विद्युत उपअभियंता :** विद्युत भांडार विभागातील नाकारा सामानाची माहिती काढण्यात आली आहे. काढण्यात आलेली नाकारा सामानाची माहिती लवकरच देण्यात येईल.

**अतिरिक्त शहर अभियंता :** विद्युत भांडाराचे नाकारा सामानाबाबत घेण्यात आलेल्या माहितीनुसार -८५१४ नगर, ७१३७ नगर स्टार्टर, ३३८४ नग होल्डर २००० नग ४० वॅटचे चोक, १२८ नग -१२५ वॅटचे बल्ब, ३३ नग २५० वॅटचे बल्ब एवढे साहित्य आहे.

**श्री नारायण फत्तेलष्कर :** विद्युत विभागाच्या भांडारातील नाकारा साहित्याबाबत सभागृहात देण्यात आलेल्या माहितीमध्ये सोडीयम दिव्यांचे चोक, जी आय. पाईप व अन्य सामानाचा उल्लेख नाही.

**अतिरिक्त शहर अभियंता :** विद्युत विभागाच्या भांडारात असलेली जी. आय. पाईप उपयोगात आणले जातात.

**मा. सभापती :** आगामी सभेची विषय पत्रीका वाटप करण्याच्या वेळी सं. सभासदांनी विचारलेल्या आणि विद्युत विभागात खरेदी करण्यात आलेल्या सर्व साहित्याचे नाकारा सामानाबाबतची सविस्तर माहिती सर्व सं. सभासदांना देण्याची व्यवस्था मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी करावी.

**श्री नारायण फत्तेलष्कर :** वार्ड क्र. ७ मध्ये पाणी पुरवठा, ड्रेनेजची कामे रेटलिस्टवर करुन घेण्यात येत आहेत. तेव्हा वार्ड क्र. ७ मध्ये रेटलिस्ट करुन घेण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा व ड्रेनेजच्या कामाबाबची माहिती पुढील सभेत देण्यात यावी.

**श्री तुळशीराम भगुरे :** यापुर्वीही अशा प्रकारच्या माहितीची मागणी करण्यात आली होती. तेव्हां सर्व विभागाकडुन रेटलिस्ट व ए वन वर करुन घेण्यात आलेल्या कामाची माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती :** वार्ड क्र. ७ मधील रेटलिस्टवरील पाणीपुरवठा व ड्रेनेजच्या कामाबाबतची माहिती पुढील सभेत संबंधित अधिकाऱ्यांने देण्याची व्यवस्था करावी.

**श्री नारायण फत्तेलष्कर :** मराठा जागृती या स्थानिक वृत्तपत्रात नगरसेवकाचे नातेवाईक असा उल्लेख असलेली एक बातमी प्रसिध्द झाली आहे. याबाबत सभागृहात खुलासा व्हावा.

**मा. उपआयुक्त :** मराठा जागृती या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या या बातमीबाबत शहानिशा करुन घेण्यात येईल.

**श्री तुळशीराम भगुरे :** दिनांक २४.१.९२ च्या सभेतील वैद्यकीय देय भत्त्याबाबत झालेलय चर्चेनुसार वैद्यकीय देय भत्ता नियमाबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** महानगरपालिका कर्मचाऱ्यांना देय असलेल्या वैद्यकीय भत्त्याबाबतचे नियम तयार करुन मा. आयुक्त यांचेकडे मंजुरी साठी देण्यात आले आहे. त्यात काही त्रूटी आहेत. त्यापुर्ण करण्यासाठी सात दिवसाची मुदत देण्यात यावी. यानंतर माहिती देण्यात येईल.

**श्री अलीम बेग :** ठराव क्र. २८८मध्ये खरेदी करावयाच्या पाईप बाबतच्या रक्कमेचा उल्लेख नाही.

**श्री गजानन बारवाल, केशव सोनवणे :** ठराव क्र. २९१ अन्वये जलनि:सारण उपअभियंता या पदावर पदोन्नतीद्वारे नियुक्ती देण्यास मंजुरी देतांना स्लम आणि उद्यान विभागाकरीता दोन उप अभियंता पदाची पदे निर्माण करण्याबाबत प्रशासनातर्फे प्रस्ताव मांडण्यात यावा अशी रुलींग देण्यात आलेली असतांनाही त्याबाबतचा उल्लेख ठरावात नाही तरी योग्य ती दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती :** स्लम आणि उद्यान विभागाकरीता दोन उप अभियंता पदाची मागणी करणारा प्रस्ताव प्रशासनातर्फे मांडण्याबाबत दिलेल्या रुलींगच्या ठरावावत समावेश करण्यात यावा.

**श्री गिरजाराम हाळनोर :** प्रशासनातर्फे भरण्यात आलेली उप अभियंताची पदे कोणत्या आधारे भरण्यात आली याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** उप अभियंताची पदे भरतांना न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे उप अभियंता पदाचे आदेश काढण्यात आले आहे.

**मा. सचिव :** ठराव क्र. २७६ मधील अनुक्रमांक -३ मध्ये दिनांक १.४.९२ पासुन अशी नोंद घेण्यात अली आहे. त्याऐवजी ४.१.१९९२ पासुन या दुरुस्तीसह वाचावे.

**ॲड. इकबालसिंग :** ठराव क्र. २७६ अनुक्रमांक -३ अन्वये ठराव क्र. २७५ मधील "नेहमी करता" आणि "ज्येष्ठ" हे दोन शब्द वगळण्यास मंजूरी देण्यात आली आहे. यानंतर अनुक्रमांक -३ अन्वये जी जादा नोंद घेण्यात आली आहे. त्याबाबत सभागृहात चर्चा झालेली नसुन नोंद करण्यात आलेला सर्व जादा मजकुर काढुन टाकण्यात यावा.

**मा. उपआयुक्त :** श्री.महेंद्र यादव यांना ज्येष्ठ स्वच्छता निरिक्षक म्हणुन पदनाम बदलण्यास मंजुरी दिली तर सध्या कार्यरत असलेले सर्व कनिष्ठ स्वच्छता निरिक्षक न्यायालयात दाद मागतील. ही बाब लक्षात घेऊन नियमाप्रमाणे आवश्यक ती योग्य दुरुस्ती करण्यात आली आहे आणि याबाबत दिनांक २४.१.९२ च्या सभेत चर्चाही झाली आहे. त्यानंतरच नियमाप्रमाणे मजकुर नोंदविण्यात आला आहे.

**मा. सभापती :** मा. महेंद्र यादव यांचे कोणतेही नुकसान होईल अशी शब्दरचना यात नाही. याशिवाय मंजुर झालेल्या ठरावानुसार श्री महेंद्र यादव यांनी पदनाम बदलल्याने सहमती दिली तरच मंजुर झालेल्या ठरावाची अंमलबजावणी होईल.

**श्री. ॲड. इकबालसिंग गील :** ठराव क्र. २९४ मध्ये सुधारीत वेतन लागु करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असतांना ठरावात नोंद घेण्यात आली नाही.

**मा. सभापती :** यापुर्वी वेतनवाढीचा ठराव सभागृहात ठेवण्यात आला होता त्या तारखेपासुन सुधारित वेतनश्रेणी लागु करावी.

**ठराव :**

दिनांक २४.१.९२ च्या सभेतील ..

१) ठराव क्र. २७६ अनुक्रमांक ३ मध्ये दिनांक १.४.९२ ऐवजी दिनांक ४.१.९२ अशी नोंद घेण्यास ...

२) ठराव क्र. २२८मधील "नोव्हेंबर ९१ मध्ये झालेल्या रेट कॉन्ट्रक्टप्रमाणे" ही नोंद वगळण्यास आणि त्याऐवजी रु.२८६.३१ प्रती रनींग मीटर यादराने रु. "५,०६७६९/- च्या खर्चास आणि दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते" अशी.

३) ठराव क्र. २९१ मध्ये स्लम आणि उद्यान विभागाकरीता दोन उपअभियंता पदाची मागणी करणारा प्रस्ताव प्रशासनातर्फे मांडण्यात यावा अशी वाढ करण्यास

४) ठराव क्र. २९३ च्या कामाची पाहणी करण्यात आली असुन एम्प्लॉयमेन्ट कार्यालयापासुन ते क्रांतीचौक पोलीस स्टेशन या ५० फुट डि.पी. रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२.७२% कमी दराच्या मेसर्स गुरुनानक इंडस्ट्रीज यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

५) ठराव क्र. २९४ अन्वये मंजुर करण्यात आलेली सुधारीत वेतनश्रेणी दिनांक १६.१०.९१ पासुन लागु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

वरील अनुक्रमांक १ ते ५ मध्ये दर्शविलेली दुरुस्ती आणि वाढ यासह दिनांक २४.१.९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३०७/२ :**

उप आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, यापुर्वी स्थायी समितीने ठराव क्र. ५४५/३१ दिनांक ३०.३.९१ नुसार सन ९१-९२ सालाकरीता प्राणी संग्रहालयास कडबा (बाटुक) पुरवठा करण्यासाठी शेख इसाक शेख फकिर रा. जांभळी ता. पैठण यांची निविदा मंजुर झाली होती. (प्रती टन रु. १९००/-) परंतु संबंधित निविदाधारकाने वरील प्रमाणे पुरवठा करण्यास नकार दिला व त्यामुळे त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली. तसचे दुसरे निविदाधारक (कमी दराची निविदा जी की, शेख इसाक यांचे खालोखाल कमी दराची ) ने सुध्दा मंजुर दरात कडबा पुरवठा करण्यास नकार दिला. त्यामुळे पुन्हा एकदा निविदा स्थानिक वर्तमानपत्रातुन प्रसिध्दीस देवुन मागविण्यात आल्या. निविदा प्राप्त झालेल्या निविदा धारकाचे नांव व त्यांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| कडबा (बाटुक) पुरवठा | (दर प्रति टन)= |
|---|---|
| १. श्री शेख रशीद शहाबुधीन | रु. ३९००.०० |
| २. श्री अ. रऊफ | रु. ३७४०.०० |
| ३. श्री शे. गणी यासीन | रु. ३८००.०० |
| ४. श्री जनार्दन शेळके | रु. ३७६०.०० |

वरीलप्रमाणे (४) निविदा प्राप्त झाल्यापैकी श्री. अ. रऊफ यांनी दिलेले दर सर्वात कमी आहेत.

**संवाद :**

**श्री नारायण फत्तेलष्कर :** प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे बाटुक खरेदी केल्यास उद्यानातील प्राणी या बाटकाचे फक्त पानेच खातील आणि काडया तशाच पडुन राहतील. यामुळे महापालिकेचे नुकसान होणार आहे. तेव्हा संग्रहालयातील प्राण्यांकरीता कुटी घेण्यात यावी.

**पशुधन वैद्यकीय अधिकारी :** संग्रहालयातील प्राण्यांच्या दृष्टीने बाटुक हे पौष्टीक खाद्य आहे.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३०८/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहाबाजार येथे समाज मंदीर बांधणेच्या उर्वरीत कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९१-९२च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ८७,०००/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मंजुरी प्राप्त झाली असुन सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १३/९१ दिनांक ९.१२.९१ अन्वये निविदा बी-१ पध्दतीच्या मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारेखपर्यंत फक्त एकच कोरी निविदा विक्री झाली. निविदा स्विकारणेच्या तारखेपर्यंत तिच निविदा दर भरलेली प्राप्त झाली. सदरची निविदा दि. ३०.१२.९१ ला एकुण दोन गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आली.

सदरची निविदा ही २.९८% जास्त दराची श्री सय्यद शरिफ अहेमद यांची आहे. ती अंदाजपत्रक दरापेक्षा २.९८% जास्त दराची निविदा श्री. सय्यद शरिफ अहेमद गुत्तेदार यांची मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाबाजार येथे समाजमंदीर बांधणेच्या उर्वरीत कामासाठी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २.९८% जास्त दराच्या श्री. सय्यद शरिफ अहेमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०९/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पे आणि युज टाईप सुलभ शौचालय कॉम्पलेक्स, रेल्वेस्टेशन येथे बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. २२.७.९१ ठराव क्र. ७२/२२ अन्वये ६,०८,०००/- रुपयाचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.

सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा सुचना क्र. १२/९१ दि. २८.११.९१ अन्वये स्वरगंगा व दैनिक मुक्कदस या वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण तीन कोऱ्या निविदा फॉर्म विक्री झाल्या व शेवटच्या तारखेपर्यंत तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्या दिनांक २०.११.९१ ला एकुण तीन गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस. एम. मंडारे | १०.७९% | जास्त |
| २. | श्री. आर. एल. बारवाल | ४.७९% | जास्त |
| ३. | श्री. इस्कॉर्ट कन्स्ट्रक्शन | १५.००% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.७९% जास्त दराची श्री. आर. एल. बारवाल यांचे निविदा दर आहेत. सदर कामासाठी गुत्तेदाराने सादर केलेले दर

जास्त वाटत असल्यामुळे कार्यालयीन पत्र क्र. मनपा/इअ(मे)/४/९२ दिनांक ३.१.९२ अन्वये दर वाटाघाटीसाठी गुत्तेदारास पत्र दिले असता गुत्तेदाराने दि. ६.१.९२ ला सदरचे काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.७९% जास्त ऐवजी ३% जास्त दराने करण्याची लेखी संमती दिलेली आहे.

तरी श्री. आर. एल. बारवाल यांची ३% जास्त दराची निविदा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन येथे पे ॲण्ड युज टाईप सुलभ शौचालय कॉम्पलेक्स बांधण्याचे काम दिनांक ६.१.९२ च्या लेखी संमती नुसार अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने श्री. आर. एल. बारवाल यांचे मार्फत करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१०/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जिल्हाधिकारी कार्यालयापासुन नेहरु भवन पर्यंतच्या रस्त्याच्या दक्षिणेकडील बाजुचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. दराने रक्कम रु. ७,००,९७०/- चे अंदाजपत्रकास दिनांक १२.१२.९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन सदरचे काम हे सन १९८९-९० च्या शासकीय अनुदानातुन चालु असलेल्या कामातील बचतीमधुन करावयाचे आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. (१५) १९९१-९२ दिनांक २७-१२-९१ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता नियोजीत दिनांक ३-१-९२ पर्यंत एकुण तीन निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजीत दिनांक ७-१-९२ ला एकुण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. पी. एम. चोरडीया | १३.७७% | कमी दराने |
| २. | श्री. मे. रे. कन्स्ट्रक्शन | ११.३०% | कमी दराने |
| ३. | मे. गुरुनानक इंडस्ट्रिज | २% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १३.७७% कमी दराने श्री. पी. एम. चोरडीया यांची निविदा असुन मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयापासुन नेहरु भवन पर्यंतच्या रस्त्याच्या दक्षिणेकडील बाजुचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १३.७७% कमी दराच्या श्री. पी. एम. चोरडीया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

डांबरीकरणाची कामे फक्त उन्हाळयातच होत असल्यामुळे प्रस्तावात दर्शविलेल्या कामासाठी सभागृहातर्फे स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. संबंधित विभागाने शक्य तितक्या लवकर काम सुरु करण्याची कार्यवाही करावे. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३११/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पैठणगेट ते क्रांती चौक या रस्त्याचे नुतनीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. दराने रक्कम रु. ७,१०,९७२/- चे अंदाजपत्रकास दिनांक १२.१२.९१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन सदरचे कामास सन १९८९-९० च्या शासकीय अनुदानातील कार्यक्रमात या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. (१५) १९९१-९२ दिनांक २७-१२-९१ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दिनांक ३-१-९२ पर्यंत एकुण तीन निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजीत दिनांक ७-१-९२ ला एकुण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मे. रे. कन्स्ट्रक्शन | १४.३०% | कमी दराने |
| २. | श्री. पी. एम. चोरडीया | १३.७७% | कमी दराने |
| ३. | मे. गुरुनानक इंडस्ट्रिज | ०७% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १४.३०% कमी दराने श्री. मे. रे. कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा असुन मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट ते क्रांती चौक या रस्त्याचे नुतनीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १४.३०% कमी दराच्या मे. रे. कन्स्ट्रक्शन यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

डांबरीकरणाची कामे फक्त उन्हाळयातच होत असल्यामुळे प्रस्तावात दर्शविलेल्या कामासाठी सभागृहातर्फे स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. संबंधित विभागाने शक्य तितक्या लवकर काम सुरु करण्याची कार्यवाही करावे. असे सर्वानुमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१२/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भोलेश्वर मंदीर गुलमंडी येथे व्यायाम शाळेचे बांधकाम करणेच्या कामासाठी सन १९९०-९१ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. दराने रक्कम रु. ६६,४०६/- च्या अंदाजपत्रकास दिनांक २१.१.९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. (१५) १९९१-९२ दिनांक २७-१२-९१ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट फेरनिविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दिनांक ३-१-९२ पर्यंत एकुण पाच निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजीत दिनांक ७-१-९२ ला एकुण (४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. राजकुमार | ०३.५० % | कमी दराने |
| २) श्री. एन.पी. डिडोरे | ०८ % | जास्त दराने |
| ३) श्री. नरेंद्र एस. शेट्टी | ०९.९ % | जास्त |
| ४) श्री. संजय भाऊलाल देवतवाल | १२ % | जास्त |

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३.५०% कमी दराने श्री. राजकुमार झरे यांचे दरपत्रक असुन मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भोलेश्वर मंदीर गुलमंडी येथे व्यायाम शाळेचे बांधकाम करणेच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०३.५०% कमी दराच्या श्री. राजकुमार झरे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१३/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, समर्थनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. ४,९८,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रु. ४,९८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१४/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला आहे की, महावीर चौक ते नगर रोड नाक्यापर्यंच्या रस्त्यावर २५० वॅट सोडीयम व्हेपरचे दिवे फिटींग व पोलसह बसविणेच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९०-९१ च्या दरसुचीनुसार र. रु. १०,५४,०००/- चे तयार करण्यात आले असुन त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदरचा खर्च सन ९०-९१ च्या शासकीय अनुदानातुन करण्यात येईल. सदर कामाकरीता नऊ दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | मे. लुना इलेक्ट्रीक्लस | १.५% जास्त |
| २) | मे. प्रगत इलेक्ट्रीक्लस | ३ % जास्त |
| ३) | मे. शांती इलेक्ट्रीक्लस | ३ % जास्त |
| ४) | मे. सत्यम वायर्स | ४ % जास्त |
| ५) | मे. अशोक इंजिनियरिंग | ९ % जास्त |
| ६) | मे. आदित्य इलेक्ट्रीक्लस | ५ % जास्त |
| ७) | मे. स्वाती इलेक्ट्रीक्लस | १५ % जास्त |
| ८) | मे. हिंद इलेक्ट्रीक्लस कं. | ४.२ % जास्त |
| ९) | मे. मायक्रो इलेक्ट्रॉनिक्स व इले. कं. | १२.७५,५९६.०० (दर बी-१ निविदा नुसार % मध्ये दिलेले नाहीत.) |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५% जास्त दराचे मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महावीर चौक ते नगर रोड नाक्यापर्यंच्या रस्त्यावर २५० वॅट सोडीयम व्हेपरचे दिवे फिटींग व पोलसह बसविणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५% जास्त दराच्या मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१५/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला आहे की, मकबरा ते औरंगाबाद लेण्या पर्यंतच्या रस्त्यावर २५० वॅट सोडीयम व्हेपरचे दिवे फिटींग व पोलसह बसविणेच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९०-९१ च्या दरसुचीनुसार र. रु. ६,५६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदरचा खर्च सन ९०-९१ च्या शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

सदर कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात निविदापत्रके मागविण्यात आली असता एकुण नऊ दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| १) मे. शांती इलेक्ट्रीक्लस | ३% जास्त |
| २) मे. हिंद इलेक्ट्रीक्लस कं. | १.८० % जास्त |
| ३) मे. प्रगत इलेक्ट्रीक्लस | २.२७ % जास्त |
| ४) मे. सत्यम वायर्स | ४ % जास्त |
| ५) मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स | ५ % जास्त |
| ६) मे. लुना इलेक्ट्रीक्लस | ४ % जास्त |
| ७) मे. स्वाती इलेक्ट्रीक्लस | १५ % जास्त |
| ८) मे. अशोक इलेक्ट्रीक्लस कं. | १०.२ % जास्त |
| ९) मे. मायक्रो इलेक्ट्रॉनिक्स व इले. कं. | ८.३९,६९५/- (दर बी-१ निविदा नुसार % मध्ये दिलेले नाहीत.) |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.८०% जास्त दराची मे. हिंद इलेक्ट्रीकल्स कं. यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मकबरा ते औरंगाबाद लेण्या पर्यंतच्या रस्त्यावर २५० वॅट सोडीयम व्हेपरचे दिवे फिटींग व पोलसह बसविणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.८०% जास्त दराच्या मेसर्स हिंद इलेक्ट्रीकल्स कंपनी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१६/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, रोषनगेट ते सिडको पर्यंतच्या रस्त्यावर २५० वॅट सोडीयम व्हेपरचे दिवे फिटींग व पोलसह बसविणेच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९०-९१ च्या दरसुचीनुसार र. रु. ५,९६,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदरचा खर्च सन ९०-९१ च्या शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

सदर कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात निविदापत्रके मागविण्यात आली असता एकुण नऊ दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. शांती इलेक्ट्रीक्लस | ३% | जास्त |
| २) | मे. हिंद इलेक्ट्रीक्लस कं. | १.८५ % | जास्त |
| ३) | मे. प्रगत इलेक्ट्रीक्लस | २.२७ % | जास्त |
| ४) | मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स | ५ % | जास्त |
| ५) | मे. स्वाती इलेक्ट्रीक्लस | १५ % | जास्त |
| ६) | मे. सत्यम वायर्स | ४ % | जास्त |
| ७) | मे. अशोक इंजिनियरींग | ९ % | जास्त |

८) मे. लुना इलेक्ट्रीक्लस ४.५० % जास्त

९) मे. मायक्रो इलेक्ट्रॉनिक्स व इले. कं. ७.७३,७४१/- (दर बी-१ निविदा नुसार % मध्ये दिलेले नाहीत.)

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.८५% जास्त दराची मे. हिंद इलेक्ट्रीकल्स कं. यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोषनगेट ते सिडको पर्यंतच्या रस्त्यावर २५० वॅट सोडीयम व्हेपरचे दिवे फिटींग व पोलसह बसविणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १.८५% जास्त दराच्या हिंद इलेक्ट्रीकल्स कंपनी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१७/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, टेलिफोन एक्सचेंज ते एम्प्लॉयमेंट एक्सचेंज पर्यंतच्या रस्त्यावर २५० वॅट सोडीयम व्हेपरचे दिवे फिटींग व पोलसह बसविणेच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९०-९१ च्या दरसुचीनुसार र. रु. ६,६५,५००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदरचा खर्च सन ९०-९१ च्या शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

सदर कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात निविदापत्रके मागविण्यात आली असता एकुण दहा दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. कॅपको एजन्सीज | १.९८% जास्त |
| २) | मे. प्रगत इलेक्ट्रीक्लस | २.११ %जास्त |
| ३) | मे. हिंद इलेक्ट्रीक्लस | २ % जास्त |
| ४) | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | ४.५ % जास्त |
| ५) | मे. आदित्य इलेक्ट्रीक्लस | ५ % जास्त |
| ६) | मे. शांती इलेक्ट्रीकल्स | ३ % जास्त |
| ७) | मे. सत्यम वायर्स | ४ % जास्त |
| ८) | मे. अशोक इंजिनियरिंग | ९ % जास्त |
| ९) | मे. स्वाती इलेक्ट्रीक्लस | १५% जास्त |
| १०) | मे. मायक्रो इलेक्ट्रॉनिक्स व इले. कं. | रु. ८.०८ ६९०/- (दर बी-१ निविदा नुसार % मध्ये दिलेले नाहीत.) |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.९८% जास्त दराची मे. कॉपको एजन्सीज यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टेलिफोन एक्सचेंज ते एम्प्लॉयमेंट एक्सचेंज पर्यंतच्या रस्त्यावर २५० वॅट सोडीयम व्हेपरचे दिवे फिटींग व पोलसह बसविणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १.९८% जास्त दराच्या मे. कॅपको एजन्सीज यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१८/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मोहल्ला दादा कॉलनी वार्ड क्र. ३८ अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी र. रु. २,०६,२२०/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र. १८ (स्थायी समिती) दि. २२-७-९१ अन्व्ये मंजुरी मिळालेली आहे.

सदर काम हाती घेण्याकरीता तिसऱ्या वेळेस कार्यालयीन निविदा क्र. ५ दिनांक १३-१२-९१ रोजी निविदा मागविल्या असता एकुण दोन दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री पी.एम. चोरडीया | ३.७७% कमी |
| २) | मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | ३० %जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.७६% कमी दराची श्री. पी. एम. चोरडीया यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३८ दादा कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३.७७% कमी व दराच्या श्री. पी. एम. चोरडीया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

डांबरीकरणाची कामे फक्त उन्हाळयातच होत असल्यामुळे प्रस्तावात दर्शविलेल्या कामासाठी सभागृहातर्फे स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. संबंधित विभागाने शक्य तितक्या लवकर काम सुरु करण्याची कार्यवाही करावे. असे सर्वानुमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१९/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जुना मोंढा अंतर्गत रस्त्याचे ५० मी.मी. व २० जाडीचे मेकडॅम व भिक्ससिल सरफेसिंग करणेच्या कामासाठी र. रु. ४,२१,८३०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. १९६ दि. २-११-९१ अन्व्ये मान्यता प्राप्त झाली आहे.

सदर काम हाती घेण्याकरीता कार्यालयीन निविदा क्र. ५ दिनांक १३-१२-९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकुण तीन दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पी.एम. चोरडीया | ७.७७% कमी |
| २) | मे. रे. कन्स्ट्रक्शन | २ % कमी |
| ३) | मे. गुरुनानक इंडस्ट्रिज | ११% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी दराची मे. गुरुनानक इंडस्ट्रीज यांचि निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुना मोंढा (येथील) अंतर्गत रस्त्याचे ५० मी.मी. व २० जाडीचे मेकडॅम व मिक्ससिल सरफेसिंग करणेच्या कामासाठी कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ११% कमी दराच्या मेसर्स गुरुनानक इंडस्ट्रीज यांचे दर पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

डांबरीकरणाची कामे फक्त उन्हाळयातच होत असल्यामुळे प्रस्तावात दर्शविलेल्या कामासाठी सभागृहातर्फे स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. संबंधित विभागाने

शक्य तितक्या लवकर काम सुरु करण्याची कार्यवाही करावे. असे सर्वानुमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२०/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, चौराहा, धावणी मोहल्ला आणि सिमंत गल्ली येथील रस्त्याच्या डांबरीकरण करणेच्या कामासाठी र. रु. १,९५,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ६ दि. ६-७-९१ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील काम हाती घेण्यासाठी दुसऱ्या वेळेस कार्यालयीन निविदाक्र.५ दिनांक १३-१२-९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकुण दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. रे. कन्स्ट्रक्शन | ४ %जास्त |
| २) | मे. गुरुनानक इंडस्ट्रिज | ३०% जास्त |
| ३) | श्री. पी. एम. चोरडीया | अंदाजपत्रकीय दराप्रमाणे |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. पी. एम. चोरडीया यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चौराहा, धावणी मोहल्ला आणि सिमंत गल्ली येथील रस्त्याच्या डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. पी. एम. चोरडीया यांचे दर पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

डांबरीकरणाची कामे फक्त उन्हाळयातच होत असल्यामुळे प्रस्तावात दर्शविलेल्या कामासाठी सभागृहातर्फे स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. संबंधित विभागाने शक्य तितक्या लवकर काम सुरु करण्याची कार्यवाही करावे. असे सर्वानुमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२१/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रोकडीया हनुमान कॉलनी अंतर्गत रस्त्यास २० मीमी जाडीचे मिक्स सिल सरफेसींग करणेच्या कामासाठी र. रु. १,६२,६००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती बैठक दि. ११-७-९० विषय क्र. २ प्रमाणे मंजुरी मिळालेली आहे.

सदरील काम हाती घेण्याकरीता कार्यालयीन निविदा (दुसरी वेळ) क्र.४ दि. २९-१०-९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण फक्त एकच मे. रे. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४०% जास्त दराची निविदा प्राप्त झाली.

मे. रे. कन्स्ट्रक्शन यांचे निविदास मधील दर ४०% जास्त आहेत. परंतु निविदा मधील दर सन ८९-९० चे बनविण्यात आले होते. सन ९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तुलना केली असता सदरील दर ३.९१% जास्त येतात. करीता मे. रे. कन्स्ट्रक्शन यांची ४०% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोकडीया हनुमान कॉलनी अंतर्गत रस्त्यास २० मीमी जाडीचे मिक्स सिल सरफेसींग करणेच्या कामासाठी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४०% जास्त

(म्हणजे सन १९९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे ३.९१% जास्त ) दराच्या मे. रे. कन्स्ट्रक्शन यांच्या दर पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

डांबरीकरणाची कामे फक्त उन्हाळयातच होत असल्यामुळे प्रस्तावात दर्शविलेल्या कामासाठी सभागृहातर्फे स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. संबंधित विभागाने शक्य तितक्या लवकर काम सुरु करण्याची कार्यवाही करावे. असे सर्वानुमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२२/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जलनि:सारण विशेष कार्यक्रम ९०-९१ अंतर्गत कबीरनगर (भाग-२) च्या उर्वरीत भागात १५० मीमी व्यासावर जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाकरीता र. रु. १,९२,११३/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. १९१ दि. २-११-९१ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी निविदा सुचना क्र. ११/९१-९२ दि. १६-१२-९१ रोजी दैनिक मराठवाडा, सकाळ या वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. सय्य्द सिजाउधीन | ०.५% | कमी |
| २) | मे. विशाल कन्स्ट्रक्शन | ५% | कमी |
| ३) | श्री. अब्दुल खालेक | २% | अधिक |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची मे. विशाल कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कबीरनगर येथील भाग-२ च्या उर्वरीत भागात १५० मीमी व्यासावर जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५% कमी दराच्या मेसर्स विशाल कन्स्ट्रक्शंन यांचे दर पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२३/१८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. २ ज्युबली पार्क पंप हाऊस भोवती चेनालिक संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता र. रु. १,१३,९००/- च्या अंदाज पत्रकास स्थायी समिती ठराव क्र. १५४ दि. २५-९-९१ अन्व्ये मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामाकरीता दै. लोकमत व औरंगाबाद टाईम्स या वर्तमान पत्रातुन लघु निविदा क्र. ९/९१-९२ अन्वये जाहीर निविदा मागविल्या असता एकुण आठ दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिपक जैस्वाल | ५% | कमी |
| २) | श्री. जफरखान | २६.८६% | कमी |
| ३) | श्री. मजहरुल हक | ७% | कमी |
| ४) | श्री. आर. ए. शेख | २०.९६% | कमी |
| ५) | श्री. अब्दुल सलाम | १६.९५% | कमी |
| ६) | श्री. काल्डा के. बी. | २१.८५% | कमी |
| ७) | मे. विशाल कन्स्ट्रक्शन | २२.९० % | कमी |
| ८) | श्री. एस. ए. साठे | १६% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.८६% कमी दराची श्री. जफरखान यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**ॲड. इकबालसिंग गील :** प्रस्तावित कामासाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकाचे दर फारच कमी दराचे ओहत. त्यामुळे अशा प्रकारे कमी दरात चांगल्या प्रतीचे काम होईल असे वाटत नाही.

**श्री. गजानन बारवाल :** चेनलिंक संरक्षित भिंत बांधण्याचा प्रस्ताव सभागृहापुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. परंतु संरक्षणाच्या दृष्टीने प्रस्तावित ठिकाणी चेनलिंक संरक्षित भिंतीऐवजी संरक्षित भिंत बांधण्यात यावी.

**मा. सभापती :** १) प्रस्तावित कामासाठी चेनलिंक संरक्षित भिंती ऐवजी संरक्षित भिंत बांधण्याचा प्रस्ताव तयार करुन दरपत्रके पुन्हा मागविण्यात यावे.

३) हरी मस्जिद ते जाफरगेट पर्यंत ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी १०% कमी दराचे दर पत्रक आले होते. या कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविले असता ९% कमी दराचे दरपत्रक प्राप्त झाले. त्याप्रमाणे काम सुरु झाले होते. हरी मस्जिद ते जाफर गेट या भागात ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामांर्तगत खोद कामांसाठी मा. जिल्हाधिकारी यांचे परवानगीने तोटे लावुन खोदकाम करावे लागेल. अद्याप हे काम पुर्ण झालेले नाही. तेव्हां या भागातील ड्रेनेजची अडचण दुर करण्याच्या दृष्टीने या कामासाठी प्राप्त झालेल्या दरपत्रक धारकापैकी दुसऱ्या क्रमांकाचे कमी दराचे दरपत्रक धारक ऐवजी तिसऱ्या क्रमांकाचे कमी दराचे दरपत्रक धारकाकडुन सदरील काम करवुन घेण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावीत कामासाठी चेनालिक संरक्षित भिंतीऐवजी संरक्षित भिंत बांधण्याचा प्रस्ताव तयार करुन सदरील कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावीत असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३२४/१९ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ३ मधील पहाडसिंग पुरा येथे बौध्द लेणी असुन सदर धार्मीकस्थळी बौध्द भिक्कु व इतर धार्मीक लोक राहतात त्यांच्यासाठी व यात्रेकरुंसाठी पाणीपुरवठा व्यवस्था कायमस्वरुपी नसल्यामुळे या सर्वांना पाण्यासाठी दैनंदिन अडचण येते.

सदरील ठिकाण हे उंच सखल भागावर असुन बोरींग घेऊन पाणी पुरवठा करणे अशक्य आहे. करीता नियमित पाणी पुरवठा कायमस्वरुपी करणेसाठी जवळील प्रपोज्ड/अंडरटेकींग जी.एस.आर.च्या मुख्य आऊट लेट वरुन १" व्यासाची बोअर करुन २" व्यासाचे जी.आय. जलवाहिनी टाकुन पाणी पुरवठा करणे शक्य आहे.

सदरील धार्मिक स्थळ महानगरपालिका हद्‌दीमध्ये येते. या ठिकाणी महानगरपालिका कडुन विद्युत सोयी व रस्त्याचे डांबरीकरण इ. कामे करुन दिली आहेत. त्याचप्रमाणे सदर ठिकाणास पाणी पुरवठा करणे जरुरीचे आहे. सदरील धार्मीक स्थळास कायमस्वरुपी पाणी पुरवठा व्यस्था करणे आवश्यक असल्याने अंदाजपत्रकात लोखंडी पाईप चा समावेश करुन अंदाजपत्रक र. रु. १,८६,६००/- चे परिसर अभियांत्रिकीचे सन ९०-९१ चे दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. प्रभाकर विधाते :** प्रस्तावित कामाची जागा महापालिकेच्या मालकीची आहे काय?

**जलगृह अभियंता :** वार्ड क्र. ३ पहाडसिंग पुरा येथील बौध्द लेणी जवळील वनविभागाच्या गार्डन मधुन प्रस्तावित कामासाठी पाईपलाईन टाकुन वनखात्याचे जागेत बौध्द लेण्याच्या खाली हौद बांधण्यात येईल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** बौध्द लेण्याप्रमाणेच निपट निरंजन येथेही यात्रा भरत असते. या यात्रेसाठीही नेहमीच पाण्याची टंचाई भासते. तसेच निपट निरंजन हा भाग बौध्द लेणी अलिकडील बाजुस आहे. तेव्हां बौध्द लेण्याबरोबरच या पाईपलाईनवरुन निपट निरंजन भागास पाणी पुरवठा करण्यात यावा.

**मा. सभापती :** सं. सभासदांच्या सुचनेप्रमाणे बौध्द लेण्यास पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईनवर क्रॉस कनेक्शन करुन निपट निरंजन भागास पाणी पुरवठा करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३ पहाडसिंग पुरा येथील बौध्द लेणी येथे बौध्द भिक्कु व इतर धार्मिक लोक, तसेच यात्रेकरु यांच्यासाठी बौध्द लेणी या धार्मीक स्थळास प्रपोज्ड अंडरटेकींग जी.एस.आर. च्या मुख्य आऊट लेट वरुन १ इंच व्यासाचे बोअर करुन २ इंच व्यासाचे लोखंडी पाईप द्वारे पाणी पुरवठा करण्याच्या कामासाठी र. रु. १,८६,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच बौध्द लेण्यास पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईनवर क्रॉस कनेक्शन करुन निपट निरंजन भागासही पाणी पुरवठा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२५/२० :**

उप अभियंता (स्लम ) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. सिध्दार्थ नगर भागात ३५० मी.मी. व्यासाची पुर्नरचित अर्धगोलाकार गटार बसविणेच्या कामाकरीता रक्कम रु. ९८,७००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मंजुरी मिळाल्यानंतर सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. १२ (९१-९२) दि. २१.१२.९१ द्वारे स्थानिक वृत्तपत्रत दैनिक नवा मराठा, दैनिक डॉन मध्ये प्रसिध्दी करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकुण दोन दरनिर्दिष्ट प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) श्री. एस. बी. साधवानी - ०१.% कमी

२) श्री. सय्यद रफिकउधीन - ४.१% जास्त

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री. एस. बी. साधवाणी यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ नगर स्लम भागात ३०० मीमी व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार गटार बसविण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१% कमी दराच्या श्री. एस. बी. साधवाणी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२६/२१ :**

उपअभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, सादतनगर स्लम भागात वार्ड क्र. ५३ खडी रस्त तयार करणेच्या कामाकरीता र. रु. १,७४,५८५/- ला स्थायी समिती ठराव क्र. ४७ दि. ६.७.९१ द्वारे मंजुरी मिळाल्यानुसार सदरील कामासाठी निविदा सुचना क्र. १२ (९१-९२) द्वारे नवा मराठा व दै. औरंगाबाद डॉन मध्ये प्रसिध्दीस देऊन प्रगट निविदा मागविल्या असता एकुण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. एम. बी. काथार | ५% | जास्त |
| २) | श्री. स. सिराजुधीन | २% | जास्त |
| ३) | श्री. शेख शरीफ | ०.५५% | कमी |
| ४) | मे. विशाल कन्स्ट्रक्शन | ८.५% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५५% कमी दराची श्री. शेख शरीफ यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सादत नगर स्लम भागात (वार्ड क्र. ५३) खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.५५% कमी दराच्या श्री. शेख शरीफ यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२७/२२ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, राहुलनगर स्लम भागात दगडी गटारचे बांधकाम करण्यासाठी अंदाज पत्रक रक्कम रु. १४,३७०/-ला मा. आयुक्तांनी मंजुरी मिळाल्यानंतर कार्यालयीन निविदा सुचना क्र. १३ (९१-९२) अन्वये दै. नवा मराठा दै. औरंगाबाद डॉन मध्ये प्रसिध्दीस देऊन निविदा मागविल्या असता एकुण अकरा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. खलील अहेमद | - | २१.११% | कमी |
| २. | श्री. मिर्झा आर. बी. | - | १९% | कमी |
| ३. | श्री. काथार बी. एम. | - | १०% | कमी |
| ४. | श्री. झेड मुसा | - | २०% | कमी |
| ५. | श्री. सु. सिराजुधीन | - | १९% | कमी |
| ६. | श्री. गौस खान | - | २२.८% | कमी |
| ७. | श्री. स. रफिकोधीन | - | १६.११% | कमी |
| ८. | श्री. मन्नान खान | - | २५% | कमी |
| ९. | श्री. शेख अशरफ अहेमद | - | १२% | कमी |
| १०. | श्री. रणजितसिंग गुजराल | - | २१% | कमी |
| ११. | श्री. अब्दुल रशिद | - | २३% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराची श्री. मन्नान खान यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राहुलनगर स्लम भागात दगडी गटारीचे बांधकाम करण्यासाठी तुलनात्मदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५% कमी दराच्याी

श्री. मन्नानखान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. संबंधित विभागाने कामाचा आदेश त्वरीत द्यावा. आणि स्लम व जलनिःसारण विभागातील कामासाठी कमी दराचे दरपत्रक भरुन ते जे गुत्तेदार वेळेवर काम पुर्ण करणार नाही. अशा गुत्तेदारांची नांवे काळया यादीत समाविष्ट करण्याबाबत संबंधित शाखा प्रमुखांनी डायरेक्ट कार्यवाही करावी.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२८/२३ :**

वार्ड क्र. ४३ समर्थनगर येथे ३०० मीमी व्यायासी आर.सी.सी. ड्रेनेज लाईन दुरुस्त करणेच्या कामाकरीता र. रु. २७,४००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १० दि. ३-१२-९१ नुसार लोकमत व औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात देवुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण सात निविदा विकल्या होत्या पैकी केवळ श्री एन. के. उदारे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.७५% कमी दराची निविदा प्राप्त झाली.

प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४६ समर्थ नगर येथे ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता श्री. एन. के. उदारे यांची एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे प्रस्तावित काम संबंधित गुत्तेदाराकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.७५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२९/२४ :**

वार्ड क्र. ४१ मो. सादिया सिनेमा जवळ गटार बांधणे व ६०० मीमी व्यासाची आर.सी.सी. लाईन टाकणेच्या कामासाठी र. रु. १,४५,६१५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ५९५ दि. १६.४.९१ नुसार मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १/९१ दि. ७-५-९१ नुसार बी-१ निविदा मागविल्या असता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री स. अथर अली यांचे दरपत्रक होते. सदर निविदेस स्थायी समिती ठराव क्र. १६ दि. २६-५-९१ नुसार मंजुरी मिळाली असुन दि. १८-८-९१ नुसार संबंधीतास कामाचे आदेशही देण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात काम करतांना रोडवर आलेले अतिक्रमणाचा विचार करुन सदर कामाचा मार्ग बदलणेस्तव मंजुरी मिळणेस्तव शिफारस केली असता प्रस्तावित असलेल्या गटारीऐवजी काही ठिकाणी ६०० मी.मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणेच्या प्रस्ताव असल्याने निविदेत असलेल्या दरात बदल हेत असल्याने मा. आयुक्तांनी सदर कामाची फेरनिविदा मागवावी असे आदेशीत केले.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना क्र. १०/९१ दि. ३-१२-९१ नुसार दै. लोकधर्म व औरंगाबाद टाईम्स मध्ये जाहिरात देवुन बी-१ नमुन्यात दुसरी वेळ, निविदा मागविल्या असता एकुण दोन दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स. रफिकोधीन | ४% कमी |
| २. | श्री. सिराजोधीन | ४% कमी |

प्राप्त निविदाचे दर सारखे आहेत. परंतु तुलनात्मकदृष्टया करीत असलेल्या कामाची प्रत,कालावधी याचा विचार करुन श्री. स. रफिकोधीन यांना सदर काम देण्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४१ येथील सादिया सिनेमाजवळ गटार बांधणे व ६०० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी दि. ३-१२-९१ च्या निविदेनुसार प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी कामांची प्रत व कालावधीचा विचार करता सदरील काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% कमी दराने श्री. सय्य्द रफिकोधीन यांचेकडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३०/२५ :**

वार्ड क्र. ३८ रोहीदासपुरा भवानी नगर येथे गटार बांधणेच्या कामाकरीता र. रु. ८२,९००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मंजुरी मिळाल्यानंतर सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १० दि. ३-१२-९१ नुसार दैनिक लोकमत व औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहीरात देवुन बी-१ निविदा मागविल्या असता एकुण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.कैसरखान | १.१५% कमी |
| २. | श्री. एस. अे. बहोधीन | १५% कमी |
| ३. | श्री. सईदखान | १२.९९%कमी |
| ४. | श्री. रफिकउधीन | १०.१५%कमी |
| ५. | श्री. गयासुधीन | १२% कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची श्री. एस.ए. बहोद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३८ रोहिदास पुरा, भवानी नगर येथे गटार बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे १५% कमी दराच्या श्री. एस. ए. बाहोधीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

संबंधीतास कामाचा आदेश त्वरीत देण्यात यावा. आणि स्लम व जलनिःसारण विभागातील कामासाठी कमी दराचे दरपत्रक भरुन जे गुत्तेदार वेळेवर काम करणार नाहीत अशा गुत्तेदारांची नावे काळया यादीत समाविष्ट करण्याबाबत संबंधीत शाखा प्रमुखांनी डायरेक्ट कार्यवाही करावी. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३१/२६ :**

वार्ड क्र. २ बेगमपुरा लालमंडी येथे ३०० मी.मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता र. रु. १,४७,८००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मंजुरी मिळाली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १० दि. ३-१२-९१ नुसार दैनिक लोकमत व औरंगाबाद टाईम्स मध्ये जाहीरात देवुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स. रफिकउधीन | १३% जास्त |
| २. | श्री. एस. अे. बहोधीन | २% कमी |
| ३. | श्री. विशाल कन्स्ट्रक्शन | १३% कमी |
| ४. | श्री. आर. एस. भाटीया | १५.९९%कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.९९% कमी दराची श्री. आर. एस. भाटीया यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २ बेगमपुरा लालमंडी येथे ३०० मी.मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे १५.९९% कमी दराच्या श्री. आर. एस. भाटीया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

संबंधीतांस कामाचा आदेश त्वरीत देण्यात यावा आणि स्लम व जलनि:सारण विभागातील कामासाठी कमी दराचे दरपत्रक भरुन जे गुत्तेदार वेळेवर काम करणार नाहीत अशा गुत्तेदारांची नावे काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबत संबंधीत शाखा प्रमुखांनी डायरेक्ट कार्यवाही करावी. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३२/२७ :**

वार्ड क्र. ३६ शेरखान कॉलनी येथे गटार बांधणेच्या कामाकरीता र. रु. ३१,२००/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १० दि. ३-१२-९१ नुसार दैनिक लोकमत व औरंगाबाद टाईम्स मध्ये जाहीरात देवुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण आठ दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) श्री. स. रफिकोधीन - ३% कमी
२) श्री. सिराजुधीन - ४% कमी
३) श्री. एस. ए. देशमुख - १२% कमी
४) श्री. गयासुधीन - १४% कमी
५) श्री. कैसरखान - १५% जास्त
६) श्री. झेन बाबुसा - १५.७८६कमी
७) श्री. एस. ए. बाहोधीन - १६% कमी
८) श्री. जाफरखान - २०.८६%कमी

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.८६% कमी दराची श्री. जफरखान यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३६ शेरखान कॉलनी येथे गटार बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे २०.८६% कमी दराच्या श्री. जफरखान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

संबंधीतास कामाचा आदेश त्वरीत देण्यात यावा आणि स्लम व जलनि:सारण विभागातील कामासाठी कमी दराचे दरपत्रक भरुन जे गुत्तेदार वेळेवर काम करणार नाहीत अशा गुत्तेदारांची नावे काळया यादीत समाविष्ट करणेबाबत शाखा प्रमुखांनी डायरेक्ट कार्यवाही करावी. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३३/२८ :**

वार्ड क्र. १४ शहराबाजार ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता र. रु. ४१,४००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १० दि. ३-१२-९१ नुसार दैनिक लोकमत व औरंगाबाद टाईम्स मध्ये जाहीरात देवुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. स. सिराउधीन | - | ८% कमी |
| २) | श्री. शेख शरीफ | - | ८% कमी |
| ३) | श्री. शेख सलीम जानेमिया | - | ७% कमी |
| ४) | श्री. अब्दुल रशिद शेख | - | २१.३८%कमी |
| ५) | श्री. एफ. एस. पठाण | - | १८.५०%कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.३८% कमी दराची श्री. अब्दुल रशिद शेख यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १४ शहाबाजार येथे २५० मीमी व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे २१.३८% कमी दराच्या श्री. अब्दुल रशिद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

संबंधीतास कामाचा आदेश त्वरीत देण्यात यावा आणि स्लम व जलनि:सारण विभागातील कामासाठी कमी दराचे दरपत्रक भरुन जे गुत्तेदार वेळेवर काम करणार नाहीत अशा गुत्तेदारांची नावे काळया यादीत समाविष्ट करणेबाबत शाखा प्रमुखांनी डायरेक्ट कार्यवाही करावी.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३४/२९ :**

काचीवाडा येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरीता र. रु. ३७,८५०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १० दि. ३-१०-९१ नुसार दैनिक लोकमत व औरंगाबाद टाईम्स मध्ये जाहीरात देवुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | झेन बाबुसा | - | ७.७८६% | कमी |
| २) | श्री. कैसरखान | - | १५% | कमी |
| ३) | श्री. रणबिरसिंग | - | १५.९०% | कमी |
| ४) | श्री. अब्दुल रशिद शेख | - | २२.८६% | कमी |
| ५) | श्री. शेख शरीफ | - | १९% | कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.८६% कमी दराची श्री. अब्दुल रशिद शेख यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे काचीवाडा येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरीता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे २२.८६% कमी दराच्या श्री अब्दुल रशिद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

संबंधीतास कामाचा आदेश त्वरीत देण्यात यावा आणि स्लम व जलनि:सारण विभागातील कामासाठी कमी दराचे दरपत्रक भरुन जे गुत्तेदार वेळेवर काम करणार नाहीत अशा गुत्तेदारांची नावे काळया यादीत समाविष्ट करणेबाबत शाखा प्रमुखांनी डायरेक्ट कार्यवाही करावी. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३५/३० :**

वार्ड क्र. ३७ इंदिरानगर येथे ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. मुख्य ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता र. रु. ९१,३००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ३ दि. ३-१२-९१ नुसार दैनिक लोकमत व औरंगाबाद टाईम्स या स्थानीक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | स. रफिकउधीन | - | २.१५% | कमी |
| २) | श्री. विशाल कन्स्ट्रक्शन | - | १५% | कमी |
| ३) | श्री. अब्दुल कुरेशी | - | १८% | कमी |
| ४) | श्री. मिर्झा आर. बी. | - | २३% | कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराची श्री. मिर्झा आर. बी. यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३७ इंदिरानगर येथे ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. मुख्य ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे २३% कमी दराच्या श्री. मिर्झा आर. बी. यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

संबंधीतास कामाचा आदेश त्वरीत देण्यात यावा आणि स्लम व जलनिःसारण विभागातील कामासाठी कमी दराचे दरपत्रक भरुन जे गुत्तेदार वेळेवर काम करणार नाहीत अशा गुत्तेदारांची नावे काळाय यादीत समाविष्ट करणेबाबत शाखा प्रमुखांनी डायरेक्ट कार्यवाही करावी. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३६/३१ :**

प्रकल्प अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र शासनाचे अ. शा. पत्र क्र. एन. आर. वाय. १७९१/११७०/सी.आर.६१/नवि-३ मंत्रालय मुंबई दि. २४ सप्टेबंर, ९१ नुसार नेहरु रोजगार योजनेच्या अंमलबजावणी साठी महागनरपालिका क्षेत्रात मार्केट सर्व्हे करणे आवश्यक आहे.

बहुतांश लाभार्थी एकाच प्रकारच्या उद्योग धंद्यासाठी/व्यावसायासाठी या योजनेखाली बँकाकडुन कर्ज घेऊन व्यवसाय सुरु करण्याचा प्रयत्न करतात. परंतु एकाच प्रकारेच्या उद्योग धंद्याची संख्या त्या शहरामध्ये गरजेपेक्षा जास्त असल्याने असे व्यवसाय पुढे चालु शकत नाही. या बाबी लक्षात घेवुन पुणे येथील मार्केटींग अँड इकोनॉमिक कन्सल्टनसी सर्व्हिसेस (एमई अे. आर. आय. सी.) या व्यावसायीक संस्थेमार्फत असे सर्व्हेक्षण करुन घेण्याबाबत शासनाची शिफारस आहे. सदर संस्थेचे पत्र दि. १८ ऑक्टो. ९१ नुसार त्यासाठी रु. ३९,८५०/- खर्च कळविला आहे. सदर काम संस्थेशी करार करुन त्यांना देण्यात येईल साधारण: १६ आठवडयात पुर्ण करण्यात येईल. त्या साठी ५०% आगाऊ रक्कमेची मागणी संस्थेने केली आहे. प्रस्ताव मान्तेस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रस्तावित प्रकरणी चर्चा केली. महाराष्ट्र शासनाच्या पत्रकानुसार नेहरु रोजगार योजनेच्या अंमलबजावणी साठी उद्योगधंदे व व्यवसायासाठी प्राप्त झालेल्या प्रकरणात महापालिकेने त्याबाबतचा आवश्यक तो सर्व्हे आणि आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करुन सदर प्रकरणे बँकेकडे मंजुरीसाठी पाठविली तरी बँकेमार्फत या प्रकरणात पुन्हा सर्व्हे करुन बँकेच्या सर्व्हेनुसारच लाभार्थींना कर्ज मंजुर केले जातो. तेंव्हा पुणे येथील संस्थेमार्फत सर्व्हेसाठी रक्कम खर्च करणे योग्य होणार नाही.

**ठराव :**

नेहरु रोजगार योजनेअंतर्गत बँकेच्या सर्व्हेनुसार लाभार्थीना उद्योग धंदे व व्यवसायासाठी कर्ज मंजुर होत असल्याने पुणे येथील संस्थेमार्फत सर्व्हेसाठी रक्कम खर्च करणे योग्य होणार नाही. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३३७/३२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जलनिःसारण विशेष कार्यक्रम अंतर्गत चिकलठाणा येथे आर.सी.सी. एन.पी-२ क्लासचे ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. २६,३०,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता (विशेष अनुदान) विकास /१०९०/प्र.क. ३७(अ) योजना ८ दि. १९.१.९१ द्वारे मिळालेली आहे. सदरच्या कामासाठी निविदा सुचना क्र. ३/९१-९२ जी की, दै. लोकमत औरंगाबाद टाईम्स मध्ये दि. ३०-५-९१ ला प्रसिध्दीस देवुन निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) मे. उदय इंजिनियरिंग कंपनी - ३८% जास्त
२) श्री. एल. एम. पडघन - ३९% जास्त
३) श्री. आर. एल. बारवाल - ३५.३५% जास्त

तुलनात्मकदृष्टया श्री. आर. एल. बारवाल यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.३५% जास्त दराची निविदा सर्वात कमी आहे. श्री आर. एल. बारवाल यांचा दर जास्त असल्याने त्यांनी दिलेल्या दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी कार्यालयीन प. क्र. ३८/९३ दि. २०-१-९२ द्वारे त्यांना दि. २१-१-९२ ला बोलावण्यात आले असता त्यांनी मा. आयुक्तांचे दालनात मुख्य लेखा परिक्षक व कार्यकारी अभियंता यांचे समक्ष सदरील काम ८.९०%जास्त या दराने करण्यास तयार असल्याबाबत लेखी पत्र दिले आहे. ठेकेदाराचे दर ९१-९२ च्या दरसुचीनुसार तुलना केली असता २.३८% कमी येतो.

करीता श्री. आर. एल. बारवाल यांची ८.९०% जास्त दराची निविदा विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री केशव सोनवणे :** जलनिःसारण विशेष कार्यक्रम योजनेअंतर्गत नारेगांव ते चिकलठाणा पर्यंत टाकण्यात येणाऱ्या विशेष जलनिःसारण वाहिनीतुन वाहुन येणारे जलनिःसारण पाणी चिकलठाणा येथे आल्यानंतर पुढे कुठे वाहुन जाणार किंवा सोडले जाणार याचा खुलासा व्हावे.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे प्रस्तावित प्रकरणी मा. कार्यकारी अभियंता यांचेशी चर्चा झाली आहे. सर्वच ठिकाणी सेप्टीक टँक बांधुन जलनिःसारण वाहीनीतून वाहून आलेले पाणी साठवून ठेवणे योग्य होणार नाही. तरी पण नारेगांव ते चिकलठाणा या जलनिःसारण वाहिनीतुन वाहुन येणारे पाणी उघडयावर पसरले जाऊ नये म्हणुन चिकलठाणा येथे सेप्टीक टँक तयार करुन त्यात सोडले जाईल.

**श्री केशव सोनवणे :** नारेगांव ते चिकलठाणा या जलनिःसारण वाहिनीतुन या परिसरात राहत असलेल्या २५,०००/- लोक वस्तीच्या जलनिःसारणाचा ताण राहणार नाही. ही बाब लक्षात घेता प्रस्तावित कामाच्या योजनेसाठी सेप्टीक टँक बांधणे योग्य होईल काय याचा विचार करावा. सिडको हडको भागातही अशाच प्रकारे जलनिःसारण वाहिनीचे पाणी साठविण्यासाठी बांधण्यात आलेले सेप्टींग टँक योजना अयशस्वी ठरली आहे.

**मा. सभापती :** चालु आर्थिक वर्षात प्रस्तावित काम झाल्यानंतर पुढील आर्थिक वर्षाच्या रक्कमेतुन चिकलठाण्यापासुन पुढे जलनिःसारण वाहिनी टाकण्याचे काम केले जाईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलनिःसारण विशेष कार्यक्रमा अंतर्गत मो. चिकलठाणा येथे आर.सी.सी. एन-पी-२ क्लासची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी गुत्तेदारा श्री. आर. एल. बारवाल यांचेशी दरपत्रकाचे दराबाबत झालेल्या वाटाघाटीअंती संबंधिताने लेखी दिलेल्या संमतीनुसार उक्त काम गुत्तेदार श्री आर. एल. बारवाल यांचे कडुन अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ८.९०% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३८/३३ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर बायजीपुरा येथे ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता र. रु. ५५,५००/- च्या अंदाजपत्रकास दि. ५-१०-९१ ला मंजुरी देण्यात आली. ज्यापैकी प्रस्तुत कामावर खर्च रु. ३०,०००/- मा. विरोधी पक्ष नेता मा. शंकर मगर यांचे सन १९९१-९२ चे स्वेच्छा निधीतुन करण्यांची संमती दिलेली आहे. अंदाजपत्रकास वरील प्रमाणे मंजुरी मिळाल्यानुसार सदर कामासाठी कार्यालयाची निविदा सुचना क्र. १२ (९१-९२) द्वारे दै. नवा मराठा व औरंगाबाद डॉन मध्ये प्रसिध्दी देवुन प्रगट निविदा मागविल्या असता एकुण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. स. रफत अली | - | ६% | जास्त |
| २) | श्री. स. सिराजुधीन | - | ७% | जास्त |
| ३) | श्री. एस. ए. बाहाउधीन | - | ५% | जास्त |
| ४) | श्री. सलीम अहमद | - | ४% | जास्त |
| ५) | श्री. एम. एम. बेग | - | १% | जास्त |
| ६) | श्री. मिर्झा आर. बी. | - | ०.२% | कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२% कमी दराची श्री. मिर्झा आर. बी. यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे इंदीरानगर बायजीपुरा येथे ३०० मी.मी व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.२% कमी दराच्या श्री.मिर्झा आर. बी. यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ३३९/३४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, तिसऱ्या तिमाहीसाठी सिमेंट कॉपोरेशन ऑफ इंडिया यांच्यकडुन १००० मे. टन सिमेंट खरेदी करण्यात आले होते. व त्यात रेल्वे स्टेशन ते मनपा गोडावुन पर्यंत वाहतुक कार्यालयामार्फत करावयाची होती. स्थायी समिती मधील विषय क्र. २२८/१७ दिनांक २८/११/९१ द्वारे सिमेंट खरेदीसह उपलब्ध ठेकेदारामार्फत सिमेंट वाहतुक करणेस स्थायी समितीमध्ये मान्यता मिळाली होती.

दुसरी तिमाही सिमेंट वाहतुक बाबत स्थायी समितीमध्ये विषय क्र. २२४/१३ दि. २८.११.९१ द्वारे तुलनात्मकदृष्टया कमी दराचे म्हणजे प्रती टन रु. ४०/- प्रमाणे श्री व्ही. ए. खान यांच्या दरपत्रकास मान्यता मिळाली होती. व त्याआधारे तिसऱ्या तिमाहीसाठी प्राप्त झालेले १००० मे. टन सिमेंट वरील दराने र. रु. ४०/- प्रमाणे श्री व्ही. ए. खान वाहतुक ठेकेदारामार्फत सदरील सिमेंट वाहतुक करण्यात आले.

तरी रेल्वेस्टेशन ते मनपा गोडावुन (बायजीपुरा) पर्यंत १००० मे. टन सिमेंट प्रती टन र. रु. ४०/- प्रमाणे एकुण रु. ४०,०००/- तसेच श्री.व्ही.ए.खान,वाहतूक ठेकेदारामार्फत केलेल्या सिमेंटसाठी कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ठराव क्र. २२८ अन्वये तिसऱ्या तिमाहीसाठी मंजुर झालेले १००० मे. टन सिमेंटची रेल्वे स्टेशन ते मनपा गोडावुन पर्यंत प्रति टन रुपये ४०/- या मंजुर दराप्रमाणे श्री. व्ही.ए. खान यांच्याकडुन करण्यात आलेल्या वाहतुकीस सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४०/३५ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव केला आहे की, आरोग्य केंद्रासाठी फर्निचर व साहित्य खरेदी करण्यासाठी २४-१२-९१ रोजी निविदा मागविण्यात आले होते. त्या खालील प्रमाणे

१) इन्शा हार्डवेअरसिटी चौक, औरंगाबाद
२) वर्षा मेटल कैलास नगर, औरंगाबाद
३) नरी मान ट्रेडींग सेन्टर , औरंगाबाद

वरील तीन निविदा प्राप्त झाल्या तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार

१) इंशा हार्ड वेअर त्यांचे कमी दराचे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | लोखंडी बेंच | - | प्रति नग | ६९०.०० |
| २) | बिन हाताची खुर्ची (गोदरेज) | - | प्रतीनग | ४२५.०० |
| ३) | लोखंडी आलमारी | - | प्रती नग | २८२५.०० |
| ४) | लोखंडी टेबल | - | प्रती नग | ३४००.०० |
| ५) | इन्स्ट्रमेंट कॅबिनेट | - | प्रती नग | ४९५०.०० |
| ६) | लाकडी स्टुल | | | ४२२५.०० |
| ७) | ऑफिसर टेबल | | | |

८) रिवॉल्हींग खुर्ची नं. ७०२ (गोदरेज) प्र. न. ४७००/-

२) नरिमान ट्रेडिंग सेंटर

नं. २६५५ व नं. २६६० प्र. नग २०३८.००

९) रेफ्रीजरेटर १६५ लिटर (गोदरेज) प्र. न. ८२००/-

वरील प्रमाणे कमी दराचे दरपत्रक मंजुर करुन त्यांचेबरोबर करार करण्यासाठी मान्ता द्यावी व एक लाख रुपये पर्यंतच्या खर्चास मंजुरी द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरोग्य केंद्रा करीता आवश्यक असलेले खालील साहित्य खरेदी करता त्या समोर दर्शविले ज्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरास आणि दरपत्रक धारकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | दर प्र. नग | दरपत्रक धारकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | लोखंडी | रु. ६९०.०० | इन्शा हार्डवेअर सिटी चौक औरंगाबाद |
| २. | बिनहाताची खुर्ची (गोदरेज) | रु. ४२५.०० | |
| ३. | लोखंडी आलमारी | रु. २८२५.०० | |
| ४. | लोखंडी टेबल | रु. ३४००.०० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | इन्स्ट्रुमेंट कॅबिनेट | रु. ४९५०.०० | |
| ६. | लाकडी स्टूल | रु. ३५०.०० | |
| ७. | ऑफिसर टेबल (गोदरेज) | रु. ४२२५.०० | |
| ८. | रिवॉल्व्हींग खुर्ची न. ७०२ (गोदरेज) | रु. ४७००.०० | |
| ९. | ऑफिसर रिवॉल्व्हींग खुची नं. २६६० | रु. २०३८.०० | नरिमान ट्रेडींग सेंटर औरंगाबाद |
| १०. | रेफ्रिजेटर १६५ लिटर (गोदरेज) | रु. ८०००.०० | |

वरील दराने साहित्य खरेदी करीता रुपये एक लाखाच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४१/३६ :**

सिडको एन-७, एन-९, व एन-१२ भागातील विविध सेक्टर मध्ये पाणी पुरवठयाबाबत नागरीकांच्या तक्रारी वाढत आहेत. कारण या भागातील जुन्या जलवाहिन्या कमी व्यासाच्या आहेत. काही भागातील जलवाहिन्या पीव्हीसीच्या असल्यामुळे त्या वारंवार फुटतात. त्यामुळे या भागातील काही घरांना अत्यंत कमी दाबाने तसेच कमी प्रमाणात पाणी पुरवठा होतो.

त्या भागातील पाणी पुरवठयात सुधारणा करण्याच्या दृष्टीने तेथील अस्तित्वात असलेल्या जुन्या कमी व्यासाच्या तसेच पी.व्ही.सी. जलवाहिन्या बदलणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानुसार सिडको एन-७, एन-९, एन-११ व एन-१२ भागातील विविध सेक्टर मध्ये घराच्या समोरील बाजुस २००, १५०व १०० मी.मी. व्यासाच्या नविन जलवाहिन्या टाकण्याचे कामासाठी सुमारे ११,३३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.या अंदाजपत्रकास कामाच्या मटेरीयलची किमंत रु. ७७८३१०/- एवढी येते. तसेच त्यावर रु. २,८०,५०८/- एवढा मजुरीचा खर्च अपेक्षित आहे.

सदरील कामावर होणारा खर्च दिनांक १३-३-९१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेने सन १९९१-९२ च्या अंदाजपत्रकात बाब क्र. ३० (ड) नविन बाब या शिर्षाखाली सिडको भागातील जुन्या जलवाहिन्या बदलणे व टाकणेच्या कामासाठी रक्कम रु.२० लाखाच्या करण्यात आलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको, एन-७, एन-९, वएन-११, एन-१२ भागातील पाणी पुरवठयात सुधारणा करण्याच्या दृष्टीने या भागात अस्तित्वात असलेल्या जुन्या कमी व्यासाच्या पी.व्ही.सी. जलवाहिन्या बदलुन त्याऐवजी उक्त भागातील विविध सेक्टरमध्ये घराच्या समोरील बाजुस १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची नविन जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. ११,३३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सचिव | सभापती - स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १५-२-१९९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत.**

**शनीवार दिनांक १५ फेब्रुवारी १९९२ दुपारी ३.०० वाजता सभापती श्री. मो. इस्माईल अ. करीम यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग
२) श्री. फैय्याज खान अहमदखान
३) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
५) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
६) श्री. भगुरे तुळशीराम छगन
७) श्री. बारवाल गजानन रामकिसन
८) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
९) श्री. सोनवणे केशव काशिनाथ
१०) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर

**विषय क्र. ३४२/१ :**

दि. ४-२-९२ रोजी संपन्न झालेल्या समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. तुळशीराम भगुरे :** महानगरपालिका कार्यालयात कार्यालयीन अधिक्षकाची पदे आहेत काय असल्यास किती पदे आहेत. या बाबतची माहिति द्यावी.

**सहाय्यक आयुक्त -१ :** कार्यालयीन अधिक्षक (ऑफिस सुपरींटेंन्डेन्ट) ही पदे सध्या कार्यालयात कार्यरत नाहीत. पण विभागीय कार्यालयाकरीता प्रत्येकी एक कार्यालयीन अधिक्षक (ऑफिस सुपरींटेंन्डेन्ट) देणे बाबतची कार्यवाही चालु आहे.

**मा. सभापती :** कार्यालयीन अधिक्षकांचे जागेबाबतीत पुढील सभेत माहिति घेण्यात यावी.

**श्री तुळशीराम भगुरे :** दि. ४-२-१९९२ च्या सभेतील चर्चेनुसार वैद्यकीय देय भत्त्याबाबतचे नियमाबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** वैद्यकीय देय भत्त्याबाबतचे नियम तयार करुन मा. आयुक्त यांचेकडे सादर करण्यात आले आहेत. सादर करण्यात आले ते नियम विधी सल्लागार यांचेकडे पाठविल्याची माहिती मिळाली आहे.

**श्री प्रभाकर विधाते :** सिध्दार्थ उद्यानातील प्राणी मरण पावल्याची बातमी दैनिक देवगीरी तरुण भारतमध्ये प्रसिध्द झाली आहे. तेव्हा याबाबत माहिती देण्यात यावी.

**डॉ. कुलकर्णी :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमी बाबत काहीही माहिती नाही.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** सिध्दार्थ उद्यानामधील सर्व जनावरांची माहिती पुढील सभेत देण्यात यावी.

**मा. सभापती :** सन १९८९ मध्ये घडलेल्या घटनेबाबतचे वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे. त्याला तीन वर्षाच्या कालावधी घेऊन गेले आहे.

**श्री. गजानन बारवाल, श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. गिरजाराम हाळनोर :** वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली बातमी तीन वर्षापुर्वीची असली तरी प्राणी संग्रहालयातील प्राण्यांची सध्या उपासमार होते असे वृत्तप्रसिध्द झाले आहे.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकाऱ्यांनी आगामी सभेत याबाबतची माहिती द्यावी.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** समाज मंदिराची जागा कोणाच्या मालकीची आहे. याचा खुलासा व्हावा.

**उपअभियंता (इमारती) :** पहाडसिंग पुरा समाज मंदिराची जागा महापालिका मालकीची आहे.

**शहर अभियंता :** पहाडसींग पुरा येथे बांधण्यात येणाऱ्या समाज मंदीराच्या जागेबाबतची माहिती घेऊन त्या नंतर खुलासा करण्यात येईल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** बेगमपुरा येथे जिल्हा परिषदेची शाळा होती सन १९७८ मध्ये जिल्हा परिषदेची सदर शाळा जळाली. त्यावेळी शाळेतील संपुर्ण रेकॉर्डही जळाले.याच शाळेत शिक्षण घेतलेल्या दोन विद्यार्थ्यांना आवश्यक ते प्रमाणपत्र मिळत नाही. तेव्हां याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** शाळा हस्तांतर करतांना महापालिका व जिल्हा परिषद यांचेमध्ये शालेय इमारती व जागा यासह जिल्हा परिषद शाळा महापालिकेकडे हस्तांतर झाल्याबाबत काही करार झाला आहे काय? किंवा या शालेय इमारती बाबत भाडे दिले जाते काय? याची माहिती देण्यात यावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** महापालिकेकडे शाळा हस्तांतर करतांना करार झाला असेल असे वाटते.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** चेलीपुरा शाळेच्या मागील बाजुस असलेली जागा कोणाची आहे. सदर जागा महापालिकेच्या ताब्यात आहे काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी बाल आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमात असल्यामुळे बेगमपुरा शाळेतील विद्यार्थ्यांना शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र देण्यातबाबतची माहिती पुढील सभेत दिली जाईल. तसेच पहाडसिंग पुरा समाज मंदीर कामाबाबतची पुढील सभेत माहिती देण्यात येईल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे पहाडसिंग पुरा समाज मंदीराचे कामाबाबतची माहिती पुढील सभेत देण्यात येणार असल्यामुळे सदर काम तोपर्यंत बंद ठेवण्यात यावे. लवकरच जिल्हा परिषद लोक नियुक्त प्रतिनिधींच्या ताब्यात येईल. ही बाब लक्षात घेता जिल्हा परिषदेतर्फे सदर काम थांबविण्यात येणार नाही. अशी हमी घेता काय? याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** जिल्हा परिषदेकडुन ज्या शाळा महापालिकेकडे हस्तांतर झाल्या आहेत त्या शाळा जिल्हा परिषद मालकीच्या जागेत भरत असतील तर अशा शाळा त्या इमारतीसह हस्तांतर झाल्या आहेत काय? आणि अशा शाळा इमारतींसह हस्तांतर झाल्या असतील तर या इमारतीचे नगर भुमापन कार्यालयामधील रेकॉर्डमध्ये तशी नोंद घेतली आहे काय? तसेच शाळा हस्तांतर प्रकरणी काही करार झाला आहे काय? याबाबतची माहिती देण्यात यावी किंवा योग्य त्या दुरुस्तीबाबत नविन पत्र व्यवहार करण्यात यावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** जिल्हा परिषद शाळा महापालिकेकडे हस्तांतर करतांना शिक्षकांप्रमाणेच शालेय इमारती ही हस्तांतर झाल्या असतील असे वाटते. तरी पण या प्रकरणी चार-आठ दिवसात माहिती देण्यात येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** चेलीपुरा शाळेच्या जवळ असलेल्या महापालिका शाळेची जागा महापालिका मालकीची आहे असे मुख्याध्यापक यांचे म्हणणे आहे. तेव्हां याबाबतही पुढील सभेत माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती :** स. सभासदांनी मांडलेल्या सुचनेबाबत अभ्यास केलेला आहे. येथील पाच एकर जागा जिल्हा परिषदेला देण्यात आली आहे. आपणास कोणताही अडथळा नाही म्हणुन जिल्हा परिषद पुर्ण जागा आपलीच आहे. असे समजुन चालत आहे. परंतु याजागेबाबत वाद आहे. तेव्हां महापालिका मालकीबाबत नगर भुमापन कार्यालयाचे कार्ड असेल तर ते दाखवावे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** बुरुड समाजाचे स्मशान भुमी येथे संरक्षित भिंत व रुमचे बांधकाम कोणातर्फे चालु आहे.

**उपअभियंता :** बुरुड समाज स्मशान भुमी येथे संरक्षित भिंत बांधण्याचे काम महापालिकेतर्फे चालु आहे.याच स्मशान भुमीत रुमचे बांधकाम कोण करते हे माहित नाही.

**मालमत्ता अधिकारी :** बुरुड समाजाचे स्मशान भुमी येथे विना परवाना बांधण्यात आलेले संडास व बाथरुमचे बांधकाम तोडुन टाकण्यात आले आहे. सदर बांधकाम हे कोणी केले हे कळु शकले नाही.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** स्मशान भुमीची जागा कोणाच्या मालकीची असते. तसेच स्मशान भुमीच्य जागेवर खाजगी इसम बुल्डोझर चालवुन सपाटीकरण करु शकतो काय ? याबाबतची माहिती देण्यात यावी.

**मालमत्ता अधिकारी :** स्मशान भुमीची जागा महापालिका मालकीची आहे. बुरुड समाजाच्या स्मशान भुमीत बांधण्यात आलेले रुम महापालिकेने बांधले आहे असे समजते.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** बुरुड समाजाच्या स्मशान भुमीत बांधण्यात आलेले रुम महापालिकेने ताब्यात घ्यावे. तेथे स्मशान जोगी राहतील. अशी व्यवस्था करावी. दुसरे कोणीही राहणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे मालमता अधिकारी यांनी आगामी सभेपर्यंत व्यवस्था करावी.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** दि. ४-२-९२ च्या सभेतील निर्णयानुसार वार्ड क्र. ७ मधील पाणी पुरवठा व ड्रेनेज कामाबातच्या रेट लिस्टच्या माहितीबाबत खुलासा व्हावा. या भागात सिडकोतर्फे टाकण्यात आलेले जी. आय. पाईप कार्यालयात जमा केले आहेत. काय याचा खुलासा व्हावा.

**जलगृह अभियंता :** सिडकोतर्फे टाकण्यात आलेले जी. आय. पाईप काढण्यात आलेले नाही. सदर पाईप जमिनीतच आहेत.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** वार्ड क्र. ७ मध्ये जुने पाईप काढणे व नविन पाईप टाकणे बाबतच्या रेटलिस्ट कामाची पाहणी करावयाची आहे. या कामाचे ठेकेदार कोण? काम किती रक्कमेचे आहे. इत्यादी तसेच दि. ४-२-९२ च्या सभेतील चर्चेनुसार विद्युत विभागाचे भांडारातील नकारा सामानाच्या माहितीबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** सं. सभासदांच्या सुचनेप्रमाणे विद्युत भांडारातील नकारा सामानाबाबत मागील सभेत माहिती देण्यात आली आहे. त्या व्यतिरिक्त

उरलेल्या सामानाची माहिती पुढील प्रमाणे ३८३ नग ब्रॅकेट, ७२५ नग क्लॅम्प ३६ नग एम.व्ही. चोक -४० २५० वॅट चोक, ४६ नग एस. व्ही. बल्ब, २४ नग एस. व्ही. चोक. २४ नग ४०० वॅट एस.व्ही. बल्ब आणि ८८ नग चोक ब्रॅकेट आणि क्लेमा हे साहित्य पुन्हा उपयोगात आणता येते.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** विद्युत भांडारातील नकारा सामानाबाबत दिलेल्या पत्राप्रमाणे माहिती मिळाली नाही. विद्युत विभागाचे भांडारातील नकारा सामानाबाबतच्या माहितीसाठी सं. सभासद श्री नारायण फत्तेलष्कर, ॲड इकबालसिंग गिल व प्रभाकर विधाते यांचा समावेश असलेली उपसमिती आणि वार्ड क्र. ७ येथील पाणी पुरवठा व ड्रेनेजच्या रेटलिस्टच्या कामाची पाहणी करण्यासाठी सं. सभासद श्री नारायण फत्तेलष्कर, श्री, अलीम बेग आणि श्री केशव सोनवणे यांचा समावेश असलेली उपसमिती तयार करण्यात येते. सदर उपसमितीने शक्य तितक्या लवकर आपला अहवाल सादर करावा.

**श्री गजानन बारवाल :** कर्मचाऱ्यांनी निगडीत असलेल्या खालील बाबी बाबत सभागृहात माहिती देण्यात यावी.

१) महापालिकेतील वरिष्ठ लिपीक श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीची संचिका प्रशासनाकडे बऱ्याच (दोन वर्ष) दिवसांपासुन प्रलंबित आहे.

२) इतर संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देऊन जागा भरण्यात येत असतांना वरिष्ठ लिपीक वर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना प्रशासन का कार्यवाही करीत नाही.

३) वरिष्ठ लिपीक वर्गातील बहुतेक कर्मचारी महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याचे काम करीत आहे. जसे जकात निरिक्षक, कर निरिक्षक आदी जे कर्मचारी महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आहोरात्र कष्ट करतात. त्यांच्या पदोन्नतीसाठी प्रशासन गप्प का आहे.?

४) वरिष्ठ लिपीक श्रेणीतील कर्मचारी वर्षानु वर्षे महापालिकेची सेवा करीत असल्याने त्यांच्या पदोन्नतीसाठी प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव सादर करावा व जे कर्मचारी पात्र असतील त्यांच्या नावाचा विचार करावा.

**मा. सभापती :** सं. सभासदाने विचारलेल्या बाबींबाबत प्रशासनाने माहिती द्यावी.

ठराव क्र. ३२३ अन्वये प्रस्तावित कामासाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २६.८६% कमी दराचे (दरपत्रकधारक) श्री.जफरखान यांनी अर्जाद्वारे ज्युब्ली पार्क पंपहाऊस येथील कंपाऊंड वॉलचे काम चांगल्या प्रकारे करुन देण्याबाबत हमी दिली आहे. तेव्हा संबंधीताचे लेखी पत्रकानुसार प्रस्तावित काम गुत्तेदार श्री. जफरखान यांचेकडुन उक्त करुन घेण्यात यावे.

**ठराव :**

ठराव क्र. ३२३ मधील सदरील कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावीत अशी नोंद वगळुन प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्युब्ली पार्क पंप हाऊस भोवती संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २६.८६% कमी दराच्या श्री. जफर खान यांचे दरपत्रकास दि. १२.२.९२ च्या लेखी पत्रानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी. अशा प्रकारच्या दुरुस्ती व वाढ

यासह दिनांक ४-२-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३४३/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गुलशन महल समोरील १०० फुट डीपी. रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन ९०-९१ च्य डी.एस.आर. दराप्रमाणे र. रु. १,५३०७०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मान्यता मिळाली आहे.

सदर कामामासाठी कार्यालयाचे निविदा क्र. ५ दि. १३-१२-९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकुण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पी. एम. | ८.७७% कमी |
| २) | गुरुनानक इंडस्ट्रीज | २५% जास्त |
| ३) | रे. कन्स्ट्रक्शन | २% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.७७% कमी दराची मे. पी. एम. चोरडीया यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलशन महल समोरील १०० फुट डीपी. रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्म्कदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ८.७७% कमी श्री. पी. एम. चोरडीया यांचे दर पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

डांबरीकरण करणाची कामे फक्त उन्हाळयातच होत असल्यामुळे प्रस्तावात दर्शविलेल्या कामासाठी हे सभागृह आजच स्विकृती देण्यास सर्वानूमते मंजुरी देत आहे. तेव्हा संबंधित विभागाने शक्य तितक्या लवकर काम सुरु करण्याबाबत कार्यवाही करावी. असे सर्वानुमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४४/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सेव्हन हिल सोसायटी अंतर्गत रस्ते तयार करण्याच्या कामासाठी र. रु. १,६१,७७०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि. २२-७-९१ विषय क्र. १६ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदरील काम हाती घेणे करीता दुसऱ्या वेळेस कार्यालयीन नोटीय क्र. दिनांक ८-१-९२ अन्वये निविदा मागविल्या असता एकुण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शेख शरीफ | ०.५% जास्त |
| २) | वेलवर्थ कन्स्ट्रक्शन कं. | ०.५% कमी |
| ३) | राजासिंग कन्स्ट्रक्शन | १% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५ % कमी दराची श्री. वेलवर्थ कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३४५/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जालना रोड ते जाफर गेट पर्यंतच्या १०० फुट डी.पी. रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण करणेच्या कामासाठी

अंदाजपत्रक र. रु. २८३३७६०/- च्या रक्कमेस मा. आयुक्त यांनी दि. ३०-१२-९१ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरील खर्च सन ९०-९१ च्या सरकारी अनुदानातुन होईल यापैकी १,२६०,०००/- च्या कामाची कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६ दि. ८-१-९२ अन्वये निविदा मागविल्या असता एकुण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | विशाल कन्स्ट्रक्शन | - | ३.९५% | जास्त |
| २) | पॉल कन्स्ट्रक्शन | - | १.५५% | कमी |
| ३) | कुलवंतसिंग | - | १.२७८६% | जास्त |
| ४) | एस. ए. नवाब | - | ३% | जास्त |
| ५) | एस. एच. असोशिएटस | - | ३% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५५% कमी दराची मे. पॉल कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोड ते जाफर गेट पर्यंतच्या १०० फुट डी.पी. रस्त्योच रुंदीकरण, डांबरीकरण, दुभाजक करणेच्य कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १.५५% कमी दराची मे. पॉल कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४६/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रोशनगेट ते मध्यवर्ती जकात नाक्या पर्यंतच्या ८० फुट डी.पी. रस्त्याचे रुंदीकरण करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ७,२१,७४०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मान्यता मिळाली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६ दि. ८-१-९२ अन्वये निविदा मागविल्या असता एकुण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | एस. एच. असोशिएटस | - | १.६% | कमी |
| २) | विशाल कन्स्ट्रक्शन | - | २.१५% | जास्त |
| ३) | एस. ए. नवाब | - | ३% | जास्त |
| ४) | कुलवंतसिंग | - | १% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.६% कमी दराची मे. एस. एच असोशिएटस निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेट ते मध्यवर्ती जकात नाका पर्यंतच्या ८० फुट डी.पी. रस्त्याचे रुंदीकरणाचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १.६% कमी दराची मे. एस. एच. असोशिएट यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४७/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मकबऱ्याकडे जाणाऱ्या ८० फुट डी.पी. रस्त्याच्या पश्चिमेकडील बाजुस खडी रस्ता व कर्बीन करण्याच्या कामासाठी र. रु. ३,०३,२२५/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६/दि. ८-१-९२ अन्वये निविदा मागविल्या असता एकुण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. एस. अे. नवाब | - | १.५०% | जास्त |
| २) | विशाल कन्स्ट्रक्शन | - | २% | जास्त |
| ३) | एस. एच. असोशिएटस | - | १% | जास्त |
| ४) | कुलवंतसिंग | - | ०.७०% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.७०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मकबऱ्याकडे जाण्याऱ्या ८० फुट डी.पी. रस्त्याच्या पश्चिमेकडील बाजुस खडी रस्ता व कर्बीन करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.७०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४८/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बायजीपुरा येथील जिनींग फॅक्टरी जवळील ५० फुट डी.पी. रस्त्याचे रुंदीकरण डांबरीकरण व कर्बीग करण्याच्या कामासाठी र. रु. १०,८६९००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. १२.१२.९१ रोजी मान्यता दिलेली आहे. सदरील खर्च सरकारी अनुदान सन ८९-९० मधुन होणार आहे.

या पैकी रुपये ६,००,०००/- च्या कामाची  कार्यालयीन निविदा नोटीस क्र. ६ दि. ८-१-९२ अन्वये निविदा मागविल्या असता एकुण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | कुलवंतसिंग | - | १% | जास्त |
| २) | एस. ए. नवाब | - | १.०४% | कमी |
| ३) | विशाल कन्स्ट्रक्शन | - | ०.७४% | जास्त |
| ४) | एस. एच. असोशिएटस | - | २% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०४% कमी दराची  मे. एस. ए. नवाब यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपुरा येथील जिनींग फॅक्टरी जवळील ५० फुट डी.पी. रस्त्याचे रुंदीकरण डांबरीकरण व कर्बीग करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १.०४% कमी दराची एस. ए. नवाब यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४९/८ :**

वार्ड क्र. ३८ दत्तनगर दादा कॉलनी येथे २५० मी.मी. व्यासाची आर. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता र. रु. १,४४,२५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन सदर काम प्राप्त शासकीय अनुदानातुन करण्यास मंजुरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. २/९१ दिनांक २९-५-९१ नुसार निविदा मागविण्यात आल्या होत्या या कामासाठी एकच २०.९% कमी दराची अे. के. अरोरा यांची निविदा प्राप्त झालेली निविदा सदर निविदेस स्थायी समिती ठराव क्र. १२८ दि. ३०-८-९१ नुसार मंजुरी मिळाली होती. गुत्तेदार अे. के. अरोरा यांना २% अनामत कार्याल्यात जमा करणेस्तव दि. १६-९-९१ ला पत्रक देण्यात आलेले होते. व सदर पत्र पोस्टाने पाठविण्यात आले सदर पत्र घेण्यास त्यांनी नकार दिला आहे. तसेच त्यांनी २% अनामत व दहा रुपयांच्या मुद्रांक कार्यालयात दाखल करणेस्तव पुर्तता केलेली नाही. हे पाहता मा. आयुक्तांनी संबंधीत गुत्तेदार यांची १% अनामत रक्कम जप्त करुन फेर निविदा मागवावी असा दिनांक २०-१२-९१ ला आदेश दिलेला आहे. त्याचप्रमाणे श्री. अरोरा यांना काळयायादीत टाकलेले आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२/१/९२ दिनांक १-१-९२ नुसार दै. देवगिरी तरुण भारत व सिटीजन्स या दैनिकात जाहिरात देवुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या (दुसऱ्यांदा) असता एकुण आठ निविदा विकण्यात आल्या. पैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | विशाल कन्स्ट्रक्शन | १६% | कमी |
| २) | श्री. आर. एस. भाटीया | १५.९९% | कमी |
| ३) | श्री. स सिराजउधीन | ८% | कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराचे मे. विशाल कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३५०/९ :**

वार्ड क्र. १४ शहा बाजार येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत र. रु. २८३५०/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२/१/९२ दिनांक १-१-९२ नुसार दै. देवगिरी तरुण भारत व सिटीजन्स या दैनिकात जाहिरात देवुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण पाच दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मो. अझरोधीन | १५.८६% | कमी |
| २) | श्री. स. सिराजउधीन | ५.१०% | कमी |
| ३) | श्री. आय. जे. सिधीकी | ५% | कमी |
| ४) | श्री. मिर्झा आर. बी. | २% | कमी |
| ५) | श्री. राजेंद्र व. शिंदे | २०.४०% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.४०% कमी दराची श्री. राजेंद्र व शिंदे यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १४ शहाबाजार येथे १५० मी.मी. व्यासाची आर. सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व

अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २०.४०% कमी दराची श्री. राजेंद्र व शिंदे यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५१/१० :**

वार्ड क्र. २२ प्रज्ञा नगर लक्ष्मी कॉलनी येथे १५० मी.मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत र. रु. १,१०,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यास आलेले सदर काम शासकीय अनुदानांतर्गत करण्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२/१/९२ दिनांक १-१-९२ नुसार दै. देवगिरी तरुण भारत व सिटीजन्स या दैनिकात जाहिरात देवुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण तीन दरनिदिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. बी. अे. काल्डा | १३.९% | कमी |
| २) | श्री. मिर्झा आर. बी. | १२% | कमी |
| ३) | श्री. स. सिराजुधीन | ५% | कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.९% कमी दराची श्री. बी. अे. काल्डा यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३५२/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शिवशंकर कॉलनी येथील रोडच्या बाजुस गटारीचे बांधकाम करणेच्या कामासाठी सन ९०-९१ च्या सा. बां. खात्याचे डी.एस. दराने र. रु. २६६०००/- च्या अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर कामासाठी जि. नी. वि. मंडळाकडुन दिनांक २०-१०-९१ चे पत्राद्वारे मंजुरी मिळालेली असुन प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च डी. पी. डी. सी. फंडातुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२ दि. २६.११.९१ चे सुचनेद्वारे प्रगट मागविल्या असता एकुण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. एस. एम. मंडोरे | - | २०.५०% | कमी |
| २) | श्री. एस. एच. असोशिएटस | - | १७.९४% | कमी |
| ३) | श्री. कुलवंतसिंग | - | ९.१०% | कमी |
| ४) | श्री. कैसरखान | - | ७.८६% | कमी |
| ५) | मे. विशाल कन्स्ट्रक्शन | - | ६% | कमी |
| ६) | श्री. एस. ए. बहाऊधीन | - | ३% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.५०% कमी दराची श्री. एस. एम. मंडोरे यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३५३/१२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जलनि:सारण विशेष कार्यक्रमांतर्गत हिमायत ते हर्सुल टँक चे वाढीव काम करणेबाबतचे कामासाठी शासनाची प्रशासकीय मान्यता (विशेष अनुदान) विकास /१०९०/ प्र.क्र. ३७ अ- योजना -८ दिनांक १९-१-९१ नुसार मिळालेली आहे. सदरच्या कामाचे अंदाजपत्रक सन ९०-९१ च्या डी.एस. आर. प्रमाणे रुपये ४४,४२,२२३/- चे बनविण्यात आले आहे. ज्यास मा. आयुक्तांनी दिनांक २३/१२/९१ रोजी मान्यता दिली आहे. सदरचे सिव्हील काम रु. ३१,५०,०४०/- साठी निविदा सुचना क्र. १२-९१-९२ (दुसरी वेळ) जी की, दैनिक मराठवाडा व सकाळ मध्ये दि. ३०-१२-९१ रोजी प्रसिध्दीस देवुन सिलबंद निविदा मागविल्या असता एकुण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. उदय इंजिनियरिंग कं. | २% | कमी |
| २) | श्री. आर. एस. बारवाल | १७% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची मे. उदय इंजिनियरींग कं. यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलनि:सारण विशेष कार्यक्रम अंतर्गत हिमायत बाग ते हर्सुल टँक बी वाढीव काम करणेबाबतचे कामापैकी सिव्हील कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २% कमी दराची मे. उदय इंजिनियरिंग कंपनी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

कामाची तातडी लक्षात घेता प्रस्तावित कामासाठी हे सभागृह आजच सर्वानूमते स्विकृती देत आहे. संबंधित अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

**विषय क्र. ३५४/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जलनि:सारण विशेष कार्यक्रम योजनेअंतर्गत रुपये १००.०० लाखाची तरतुद सन ९०-९१ साठी नाला ट्रेडींगसाठी करण्यात आली आहे. ज्यास शासनाची प्रशासकीय मान्यता (विकास अनुदान) विकास/१०९०/प्र. क्र. ३७ अ. योजना-८ दि. १९.१.९१ नुसार मिळालेली आहे.

वरील योजनेअंतर्गत मा. आयुक्त यांचे दिनांक २०-११-९१ च्या मान्यतेनुसार सुपर मार्केट ते नागेश्वरवाडी ब्रीजपर्यंच्या नाल्याच्या काठास संरक्षित भिंत बांधावयाच्या र. रु. २३,७७,७५९/- च्या कामासाठी निविदा सुचना क्र. ११/९१/९१-९२ जी की, दै. मराठवाडा, सकाळ, लोकसत्ता मध्ये जा. क्र. २३३/९१ दै. १६/१२/९१ नुसार प्रसिध्दीस देवुन निविदा मागविल्या असता एकुण तेरा निविदा विकल्या पैकी चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. उदय इंजिनियरिंग कं. | ५% | जास्त |
| २) | मे. जी. एम. बालचंदानी | १२% | कमी |
| ३) | मे. कॉंक्रीट बिर्ल्डस | ८% | जास्त |
| ४) | श्री. आर. एल. बारवाल | १०% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% कमी दराची मे. जी. एम. बालचंदानी यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** सुपर मार्केट डी. वाटरिंगच्या कामामध्ये स्थापन करण्यात आलेल्या उपसमितीच्या अहवालात ताकीद देण्यात यावी. असे रुलींग दिले आहे. याचा अर्थ सदर कामामध्ये काहीतरी गडबड आहे. हे सिध्द होते. संबंधित गुत्तेदाराशी पत्रव्यवहार केला असता मागील तीन वर्षात काम मिळाले नाही असे उत्तर दिले आहे. हे योग्य वाटत नाही. ही बाब लक्षात घेता प्रस्तावित कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावी.

**ठराव :**

गुत्तेदाराचे काम करण्याची कॅपेसिटी नाही ही बाब लक्षात घेता प्रस्तावित कामासाठी शॉर्ट टेंडर नोटीसद्वारे पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावी आणि त्याबाबतचा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३५५/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जलनि:सारण विशेष कार्यक्रम योजने अंतर्गत सन ९०-९१ साठी नाला ट्रेडींगसाठी रु. १००.०० लाखाची तरतुद करण्यात आली आहे. ज्यास शासनाची प्रशासकीय मान्यता (विकास अनुदान) विकास/१०९०/प्र. क्र. ३७ अ. योजना-८ दि. १९.१.९१ नुसार मिळालेली आहे.

वरील योजनेअंतर्गत मा. आयुक्तांच्या नागेश्वरवाडी नाला जंक्शन ते सिध्दार्थ गार्डन पर्यंतच्या नाल्याच्या काठास संरक्षित भिंत बांधावयाच्या र. रु. २९,६४,५६३/- च्या कामासाठी निविदा सुचना क्र. ११/९१/९१-९२ जी की, दै. मराठवाडा, सकाळ, लोकसत्ता मध्ये जा. क्र. २३३/९१ दै. १६/१२/९१ नुसार प्रसिध्दीस देवुन निविदा मागविल्या असता एकुण बारा निविदा विकल्या पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. आर. एल. बारवाल | १५% | कमी |
| २) | मे. जी. एम. बालचंदानी | ११% | कमी |
| ३) | मे. कॉंक्रीट बिल्र्डस | १४.८८% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची श्री. आर. एस. बारवाल यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. अलीम बेग, श्री. नारायण फत्तेलष्कर, ॲड. इकबालसिंग गील :** प्रस्तावित कामाप्रमाणेच बसैयेनगर टाऊन हॉल फाजीलपुरा येथील पंचायत समिती ते किलेअर्क येथील नाल्यावर नाला टेडींगचे काम अन्य नाला ट्रेडिंगच्या कामासाठी आलेल्या कमी दराच्या दरपत्रकानुसार बचत होणाऱ्या रक्कमेतुन करुन घेण्यात यावे.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलनि:सारण विशेष कार्यक्रम योजने अंतर्गत नागेश्वरवाडी नाला जंक्शन ते सिध्दार्थ गार्डन पर्यंतच्या नाल्याच्या काठास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १५% कमी

दराच्या श्री. आर. एस. बारवाल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

पावसाळयापुर्वी काम होणे आवश्यक असल्यामुळे प्रस्तावित कामास सभागृहातर्फे आजच स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३५६/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जलनि:सारण विशेष कार्यक्रम योजने अंतर्गत सन ९०-९१ साठी नाला ट्रेडींगसाठी रु. १००.०० लाखाची तरतुद करण्यात आली आहे. ज्यास शासनाची प्रशासकीय मान्यता (विकास अनुदान) विकास/१०९०/प्र. क्र. ३७ अ. योजना-८ दि. १९.१.९१ नुसार मिळालेली आहे.

वरील योजनेअंतर्गत मा. आयुक्त यांचे दिनांक २०-११-९१ च्या मान्यतेनुसार नागेश्वरवाडी पुल ते नाला जंक्शन पर्यंतच्या नाल्याच्या काठास संरक्षित भिंत बांधावयाच्या र. रु. २९,१९,५६३/- च्या कामासाठी निविदा सुचना क्र. ११ जी की, दै. मराठवाडा, सकाळ, लोकसत्ता मध्ये जा. क्र. २३३/९१ दै. १६/१२/९१ नुसार प्रसिध्दीस देवुन निविदा मागविल्या असता एकुण पाच निविदा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. आर. एल. बारवाल | - | ८.८८% | कमी |
| २) श्री. एस. ए. नवाब | - | १६.७८६% | जास्त |
| ३) श्री. एस. एम. मंडोर | - | १४.९०% | जास्त |
| ४) मे. जी. एम. बालचंदानी | - | १०% | कमी |
| ५) मे. काँक्रीट बिल्डर्स | - | २०% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराची श्री. जी. एम. बालचंदानी यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

गुत्तेदाराचे काम करण्याची कॅपेसिटी (क्षमता) नसल्यामुळे दुसरे कमी दराचे गुत्तेदार पहिले कमी दराचे गुत्तेदाराचे दरात म्हणजे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १०% कमी दराने प्रस्तावित काम करुन देण्यास तयार असतील तर सदर काम त्यांचेकडुन करुन घेण्यास यावे असे सर्वानुमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

पावसाळयापुर्वी काम होणे आवश्यक असल्यामुळे प्रस्तावित कामास या सभागृहातर्फे आजच स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३५७/१६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व. ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, शासकीय विशेष विकास अनुदान ९०-९१ अंतर्गत हर्सुल ते हिमायत बाग मुख्य जलनि:सारण वाहिनी टाकण्याच्या कामास जाने.-९१ मध्ये मंजुरी मिळाली.

या कामाचे सुधारित अंदाजपत्रक रु. ४४,४२,२२३/- ला मा. आयुक्तांनी दि. २३-१२-९१ रोजी मंजुरी दिली. सदर कामाच्या सिव्हील बाबीची निविदा बोलावुन निविदा मंजुरीची प्रकीया चालु आहे.

या कामासाठी लागणारे आर.सी.सी. एन-पी-२ क्लासचे पाईप खरेदीसाठी एम.एस.एस.आय.डी.सी. कडुन दर मागविले असता त्यांनी खालील प्रमाणे दर दिले आहेत.

अ) ४०० मी.मी. व्यास कॉलरसह - १२०० मी. रु. २३९.५० प्र. मिटर आय.एस.आय. मार्क.

ब)	५०० मी.मी. व्यास कॉलरसह - २२०० मी. रु. ३३०.५० प्र. मिटर आय.एस.आय. मार्क.

वरील दर महाराष्ट्र शासनाशी झालेल्या रेट कॉन्ट्रॅक्टप्रमाणे आहेत. पाईपची एकुण किमंत रु. १०,१४,५००/- होते. तरी एम.एस. एस. आय. डी.सी. कडुन वरील दराने रु. १०,१४,५००/- चे सदर पाईप खरेदी करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासकीय विशेष अनुदान १९९०-९१ अंतर्गत हर्सुल ते हिमायत बाग मुख्य जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी लागणारे ४०० मी.मी. व्यासाचे कॉलरसह (आय.एस.आय. मार्क) प्रती रनिंग मिटर रुपये २३९.५० पैसे या दराने १२०० रनिंग मिटर आणि ५०० मी.मी. व्यासाचे कॉलरसल (आय.एस.आय.मार्क) प्रती रनिंग मिटर रुपये ३३०.५० पैसे यादराने २२०० रनिंग मिटर आर.सी.सी. एन.पी.-२ क्लासचे पाईप मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांचेकडुन खरेदी करण्यास आणि सदर पाईप खरेदीसाठी एकुण रक्कम रु. १०,१४,५००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५८/१७ :**

मुकूंदवाडी, संजयनगर भागात २५०, २००, १५०, व १०० मी.मी. व्यासाची जलवाहिन्या टाकण्याचे रक्कम रुपये १६०८०००/- चे काम विशेष अनुदान योजनेतुन हाती घेण्यात आले असुन सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५४ दि. २०-११-८९ अन्वये मंजुरी मिळाली आहे. तसेच स्थायी समिती ठराव क्र. ७३० दिनांक २४-४-९० अन्वये श्री एम. एम. बेग यांचे दर पत्रक मंजुर करण्यात आले असुन सदरील काम ९०% पुर्ण झाले आहे. या कामासाठी सी. आय. स्पेशल्स तसेच स्कुल व्हॉल्व भांडारात उपलब्ध नसल्यामुळे काम पुर्ण होऊ शकले नाही. कामाची निकड लक्षात घेता सदरील अंदाजे रक्कम रु. ७१३७३.०० चे साहित्य मागविण्यासाठी निविदा सुचना काढणे बाबत आदेश देण्यात आले होते. त्यानुसार कार्यालयीन नोटीस पापु/५३३/९० दिनांक ३-१२-९१ अन्वये वर्तमानपत्रातुन जाहीर निविदा मागविल्या असता दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | बालाजी इंडस्ट्रीज | - | ३३% जास्त दराने |
| २) | एम. एस. एस. आय.डी.सी.सी. | - | १५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची एम. एस. एस. आय. डी.सी. याची निविदा विचारार्थ सादर. सदरील खर्च या कामासाठी मंजुर झालेल्या रु. १६०८०००/- च्या रक्कमेतुन करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकूंदवाडी, संजयनगर भागात टाकण्यात येणाऱ्या १००, १५०, २००, १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी आवश्यक असलेल्या सी.आय.स्पेशल तसेच स्लुस व्हॉल्व खरेदीसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १५% कमी दराच्या मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर साहित्य खरेदी करीता येणारा एकुण रुपये ७१,३७३/- चा खर्च या कामासाठी मंजुर झालेल्या रु. १६,०८०००/- या रक्कमेतुन करण्यात यावा. वैधानीक कार्यवाही व्हावी.

## -:ऐनवेळचे विषय:-

**विषय क्र. ३५९/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मोहल्ला काचीवाडा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सा. बां. खात्याच्या डि.एस.आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु. १,९०,७१०/- चे तयार करण्यात आलेले आहे.

सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

मोहल्ला काचीवाडा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी र. रु. १९०७१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय ३६०/१९ :**

वार्ड क जलनिसानि:सारण अभियंता यानी प्रस्ताव सादर केला की, हरी मस्जिद ते नाल्यापर्यंत ६०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. २,०५,४५८/- चे तयार करण्यात आलेले असुन सदर कामास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली असुन त्वरीत निविदा काढण्याच्या आदेश दिला करीता आदेशानुसार निविदा सुचना क्र. ६/१०८७/९१ दि. १२-९-९१ ला बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण सहा निविदा विकण्यात आलेल्या होत्या.त्यापैकी एकुण चार निविदा प्राप्त झालेल्या असुन त्यांच्या तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. फारुकी ए. एम. | - | ९% | कमी |
| २) | श्री. कैसरखान | - | ९% | जास्त |
| ३) | श्री. स. रिाजुधीन | - | १% | कमी |
| ४) | श्री. बशीरखान लालखान | - | ५% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% कमी दराचे श्री. ए. एम. फारुकी यांचे दरपत्रक आहे. सदरील दरपत्रकास स्थायी समितीचा ठराव क्र. १८३/१० दि. २८-११-९१ नुसार मंजुरीसुध्दा मिळालेली आहे. तद्नंतर संबंधित गुत्तेदार यांना २% अनामत रक्कम दाखल करणेस्तव अनामत रक्कम दाखल करणेस्तव पत्रक देण्यात आले होते. परंतु संबंधिताने २% अनामत न भरता अर्धी रक्कम कार्यालयात जमा केली आहे. यावरुन असे दिसते की, संबंधित गुत्तेदार काम करण्यास टाळाटाळ करत आहे.

करीता स्थायी समितीत दि.४-२-९२ ला सभापती यांनी कामाची अत्यंत गरज लक्षात घेता चर्चेअंती असे ठरले की, सदर काम श्री. स. सिराजुधीन यांनी त्यांच्या निविदेतील १% कमी दराने देण्यास मा.आयुक्त यांनी दि. ७-२-९२ ला मंजुरी दिलेली आहे. कारण या कामातील दुसऱ्या क्रमांकावरील लोव्हेस्ट गुत्तेदार यांचा ५% कमी आहे. परंतु श्री. बशीर खान यांनी या विभागातील दोन कामे अर्धवट सोडुन दिलेली आहे. व त्यांची काम करण्याची इच्छा दिसत नाही.

करीता श्री. स. सिराजुधीन यांची १% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** गुत्तेदार श्री सय्यद सिराजुधीन यांनी प्रस्तावित काम करुन देण्याबाबत लेखी पत्र दिले आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हरी मस्जिद ते नाला पर्यंत ६०० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम गुत्तेदार श्री. सय्यद सिराजुधीन यांचेकडुन अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६१/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नागसेन नगर स्लम भागात ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेसाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ९९,०००/- ला मा. आयुक्त महानगरपालिका यांनी मंजुरी दिल्यानंतर सदरील कामासाठी कार्यालयीच निविदा सुचना क्र. १३ (९१-९२) स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकविजय व दैनिक मुफसीर मध्ये प्रसिध्दीस देवुन प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत एकुण सात निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस एकुण चार निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्यास असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. देवराव वाहुळ | -अंदापत्रकाचे दरापेक्षा | ०.१% | कमी |
| २) | मे. विशाल कन्स्ट्रक्शन | - --//-- | ०.८% | जास्त |
| ३) | श्री. मिर्झा आर. बी. | - --//-- | ०.१% | जास्त |
| ४) | स. रफिकउधीन | - --//-- | १५% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया श्री. देवराव वाहुळ यांचे टेंडर कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.१% कमी आहे. करीता श्री. देवराव वाहुळ यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१% कमी दराचे टेंडर मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागसेन नगर स्लम भागात ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१% कमी दराच्या श्री. देवराव वाहुळ यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६२/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मांडकी ट्रेचिंग ग्राऊंड पासुन नारेगांव कडे सुमारे एक किलो मिटर लांबी करीता नविन खडी रस्ता तयार करणेसाठी अंदाजपत्रक र. रु. १,९९,०००/- तसेच याच रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी अंदाजपत्रक रु. ३,१९,८००/- चे तयार करण्यात आले असुन सदरील कामे त्वरीत जरुरी असल्यामुळे त्वरीत करणे साठी मांडकी ट्रेचिंग ग्राऊंड ते नारेगांव पर्यंत सुमारे एक किलोमिटर लांबीचा नविन खडी रस्ता करणेसाठी अंदाजपत्रक रक्कम रूपये १,९९,०००/- व याच रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठीचे अंदापत्रक र. रु. ३,१९,८००/- ला मंजूरी घेणे तसेच सदरील कामासाठी होणारा खर्च १९९२-९३ चे अर्थसंकल्पीय तरतुदीमधुन करण्याची मंजुरी मिळणेसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मांडकी ट्रेचिंग ग्राऊंड ते नारेगांव पर्यंत एक किलो मिटर लांबीचा नविन खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी र. रु. १,९९,०००/- च्या आणि याच रस्त्याचे डांबरीकरणाच्या कामासाठी र. रु. ३,१९,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६३/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संजय नगर मुकुंदवाडी स्लम भागात १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ४,०७,०००/- चे तयार करण्यात आले असुन सदरील कामासाठी लागणारा खर्च दुर्बल घटकांसाठी ५% अनुदान या लेखाशिर्षाखाली सुधारीत अंदाजपत्रक सन ९१-९२ मध्ये तरतुद केलेल्या रक्कमेतुन करणे व सदरील काम आवश्यक व तातडीने करणे असल्यामुळे संजयनगर मुंकूदवाडी भागात १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेसाठी अंदाजपत्रक रक्कम रूपये ४,०७,०००/- ची मंजुरी घेणीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजय नगर मुकूंदवाडी स्लम भागात १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी र. रु. ४,०७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च सन १९९१-९२ च्या सुधारीत अंदाजपत्रकातील दुर्बल घटकांसाठी ५% अनुदान या लेखा शिर्षकातुन करण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६४/२३ :**

मा. उपआयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका वाचनालयातील पुस्तके, मासिके व इतर साहित्य बांधणी करीता वृत्तपत्रात जाहिरात देवुन सर्वात कमी दर खालील प्रमाणे निश्चित केलेले आहेत.

मंजुर करण्यात आलेले दर

| | साधी बांधणी | हाफ रेकझीन | फुल रेकझीन | लेदर बायडिंग | शिलाई |
|---|---|---|---|---|---|
| पुस्तके | ४.२५ | ५.०० | ८.०० | - | - |
| मासिक कव्हर | ३.०० | ३.७५ | - | - | - |
| मासिक एकत्रित | ५.०० | ६.०० | - | - | - |
| बालविभाग एकत्रित | ३.५० | ४.०० | - | - | - |
| रजिस्टर | ९.४० | १२.०० | - | - | - |
| लहान रजिस्टर | - | - | १७.९० | २५.०० | - |
| मोठे शिलाई | - | -- | - | - | ००.५० |

निरनिराळया बांधणी प्रकारानुसार वरीलप्रमाणे सर्वात कमी असलेल्या दरानुसार कोणत्याही किंवा सर्व बांयडर्स दरपत्रक धारकाकडुन बांधणी करुन घेण्यात येणार आहे. पुस्तक बांधणी करीता (१९९१-९२) रुपये ४०,०००/- ची तरतुद करण्यात आली आहे. तरी पुस्तके/मासिके इत्यादी बांधणीचे दर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका वाचनालयातील पुस्तके /मासिके व इतर साहित्य बांधणी करीता निरनिराळया बांधणी प्रकारानुसार प्रस्तावातील अनुक्रमांक १ ते ७ प्रमाणे सर्वात कमी दर निश्चीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरील निरनिराळया बांधणी प्रकारानुसार सर्वात कमी असलेल्या दरान्वये कोणत्याही किंवा सर्व बायंडर्स दरपत्रक धारकाकडुन बांधणी करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६५/२४ :**

आरोग्य व वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, आरोग्य विभागास सन १९९१-९२ वर्षाकरीता शल्य साहित्य खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार कमी दराचे दरपत्रक मे. किंकरे ब्रदर्स व मे. बालाजी इंटरप्राईजेस हयांचे होते. त्यानुसार दि. २.११.९१ रोजी स्थायी समिती समोर मंजुरी साठी प्रस्ताव ठेवण्यात आले होते. परंतु शल्य साहित्य दरपत्रके स्थगित ठेवण्यात आले होते. महापालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी जरुरी असणारी शल्य साहित्य दरपत्रके कमी दराची-मे. किंकरे ब्रदर्स.

| अनुक्रमांक | दर | अनुक्रमांक दर | |
|---|---|---|---|
| १९४ | ९.७५ | ३४७ | ३६.०० |
| २१३ | २८८०.०० | ३५० | ११०=०० |
| २१४ | ३९०.०० | ३५१ | २०.०० |
| २१५ | ३६०.०० | ३५५ | १५०.०० |
| २१९ | ३६६०.०० | ३५६ | १५.०० |
| २३८ | २५० | ३५८<br>ए.बी.सी. ८५ ८० ७० | १५.०० |
| २४३ | ३२५.०० | ३६७ | ३०.०० |
| २४४ ए.बी.सी.<br>४७०.०० ३७०.०० ३५०.०० | - | ३७२ | ११० |
| २७९ | ९०.०० | ३७५ | ६५.०० |
| २८० | ४८.०० | ३७६ | ४९.०० |
| ३२० | ५५०.०० | ३७९ | ए-१४, बी-३३, सी-४९ |
| ३२१ | २४०.०० | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२८ | २२००.०० | ३८० | १२६.०० |
| ३४३ | १२.०० | ३८२ | ए-३४, बी.४२ |
| ३६० | ५५.०० | | |
| ३८७ | १४०.०० | | |
| ३९२ | ९.५० | | |
| ३९३ | ११.५० | | |
| ३८३ | ५.५० | | |
| एकुण | ३२=०० | | |

२) मे. बालाजी इंटरप्राईजेस अनुक्रमा

| अनुक्रमांक | दर |
|---|---|
| १९२ | ५.९५ |
| ३७७ | ५०.०० |
| ३९१ | ए.१२.००<br>बी.१७.७५<br>सी.२२.००<br>डी-४०.००<br>ई.९०.०० |
| एकुण | (३) |

कमी दराचे दरपत्रके मंजुर करुन त्याचे बरोबर खरेदीसाठी करार करणेसाठी मंजुरी द्यावी. व २ लाख रुपयेच्या खर्चास मान्यता द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९१-९२ वर्षाकरीता आरोग्य विभागासाठी आवश्यक असेलेले शल्य साहित्य खरेदीसाठी प्रस्तावात दर्शवल्यिाप्रमाणे ३२ ॲटम करीता ॲटम क्रमांकासमोर दर्शविलेल्या दराने मे. किंकरे ब्रदर्स आणि ३ ॲटम करीता ॲटम क्रमांकासामेर दर्शविलेल्या दराप्रमाणे मे. बालाजी इंटरप्रायईजेस यांचेकडुन शल्य साहित्य खरेदी करण्यास आणि शल्य साहित्य खरेदी करता रक्कम रु. २,००,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

सभापती-स्थायी समिती
महानगरपालिका औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २४-२-१९९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत.**

**सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी १९९२ दुपारी ३.०० वाजता सभापती श्री. मो. इस्माईल अ. करीम यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात विशेष स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. इकबालसिंग प्रितमसिंग
२) श्री. फैय्याज खान अहमदखान
३) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
५) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
६) श्री. भगुरे तुळशीराम छगन
७) श्री. बारवाल गजानन रामकिसन
८) श्री. सोनवणे केशव काशिनाथ
९) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव

**विषय क्र. ३६६/१:**

१९९१-९२ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन १९९२-९३ चे मुळ अंदाजपत्रकास मंजुरी देणेबाबत.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची करवाढ नसतांनाही अर्थसंकल्पात पाच कोटीची वाढ दाखविण्यात आली आहे. ती वाढ कशा प्रकारे वाढविण्यात आली याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** सन १९९१-९२ च्या अर्थसंकल्पात जकात करापासुन बारा कोटी उत्पन्न अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात उद्दिष्टापेक्षा जास्त वसुली झाली आहे. तसेच शहराचा विस्तार होत असुन जकात कर मालमत्ता कर यापासुन आणि पाणी पट्टी पासुन तीन ऐवजी चार कोटी टॅकर द्वारे २.३० कोटी वाढीव उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. अशा प्रकारे सन १९९२-९३ वर्षात पाच कोटीची वाढ झाली आहे.

**श्री नारायण फत्तेलष्कर :** सन १९९२-९३ च्या अंदाजपत्रकाच्या ठळक वैशिष्टयातील अनुक्रमांक पाच व सहा बाबत खुलासा व्हावा.

**मा. आयुक्त :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर करीता पंचवीस लाखाची तरतुद आहे. रिसर्च सेंटरच्या पायापर्यंतचे काम पुर्ण झाले आहे. एकुण कामाचे दोन भाग करण्यात आले आहेत. चालु वर्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेटंर चे काम पुर्ण करण्याची इच्छा आहे. या कामासाठी शासनाकडुन ५०टक्के अनुदान मिळाले आहे. तसेच छत्रपती शाहु महाराजांचा पुतळा तयार असुन चालु अर्थसंकल्पामध्ये सदर पुतळा बसविण्यासाठी तरतुद करण्यात आली आहे. त्याच बरोबर इतर थोर पुरुषांचे पुतळे बसविण्याबाबत विचार केला जाईल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्यासारख्या थोर पुरुषांचे पुतळे उभारण्याबाबत सर्वसाधारण सभेत मागणी करण्यात आली असता त्याबाबतचे ठराव मंजुर झाले आहेत.

**मा. आयुक्त :** थोर पुरुषांचे पुतळे उभारतांना पुतळे उभारण्यासाठी असलेली जागा आणि पुतळे तयार करणे इत्यादी बाबतचा विचार करणे आवश्यक आहे. म्हणजे त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** सन १९९२-९३ अर्थसंकल्पात किमान २/४ पुतळे उभारण्यासाठी तरतुद करण्यात यावी.

**मा. आयुक्त :** छत्रपती शाहु महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी अर्थसंकल्पात केलेली २.५० लाखाची तरतुद याच कामासाठी लागेल असे नाही. या तरतुदीतुन शिल्लक राहिलेल्या रक्कमेत इतर थोर पुरुषांचे पुतळे बसविण्याबाबत विचार करता येईल.

**मा. सभापती :** औरंगाबाद शहरात थोर पुरुषांचे पुतळे उभारण्यासाठी २.५० लाख रुपयांची जादा तरतुद सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पात करण्यात यावी.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** १९९२-९३ च्या अर्थसंकल्पाच्या ठळक वैशिष्टयातील अ.क्र. दहाबाबत खुलासा व्हावा. संरक्षण करण्यात येणाऱ्या जागा कोणत्या.

**सहाय्यक संचालक नगर रचना :** मनपाच्या मोकळया जागेचे संरक्षण व विकास अंतर्गत शाळा, लेआऊट मधील ओपन स्पेस या जागांसाठी तार कुंपन करण्याची यात तरतुद करण्यात आली आहे.

**मा. आयुक्त :** शहर विकास आराखडयानुसार आरक्षित केलेल्या जागा मोकळया झाल्यानंतर अशा आरक्षित जागांना तार कुंपण करण्याची यात तरतुद करण्यात आली आहे. विकास आराखडयात ११५ आरक्षित जागा आहेत. अशी माहिती मिळाली आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** आरक्षित जागा ताब्यात मिळल्याबरोबर सदर जागेस तार कुंपन करणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त :** आरक्षित जागा ताब्यात आल्यानंतर सदर जागेस तारकुंपन करण्याच्या प्रकरण बाबतची प्रशासकीय कार्यवाही पुर्ण होईपर्यंत ताब्यात मिळालेल्या आरक्षित जागेवर पुन्हा अतिक्रमण होते. ही बाब लक्षात घेता ताब्यात मिळालेल्या जागेवर शक्य तितक्या लवकर तारकुंपन करण्या बाबत स्थायी समितीने प्रशासनास अधिकार दिले तर काम लवकर होईल आणि आरक्षित जागेवर अतिक्रमण होणार नाही.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** आरक्षित जागा ताब्यात घेतल्यानंतर सर्वसाधारण सभेने दिलेल्या मंजुरीनुसार ताब्यात मिळालेल्या जागेस तारकुंपन करण्याच्या कामासाठी रु. २५,०००/- पर्यंतचे काम ताबडतोब सुरु करुन तार कुंपणाच्या कामासाठी लागणाऱ्या जादा खर्चाकरीता प्रकरण स्थायी समितीकडे पाठविण्यात यावे. पाठविण्यात आलेल्या प्रकरणात खर्च करण्यात येणाऱ्या रुपये रु. २५,०००/- च्या खर्चास खुलासा देण्यात यावा.

**श्री. केशव सोनवणे :** आरक्षित जागा ताब्यात घेण्यात येणार आहे. असे ठरविल्याबरोबर त्या जागेचे संरक्षणाबाबतचा प्रस्ताव अंदाजपत्रकासह स्थायी समिती कडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावा.

**मा. उपआयुक्त :** ताब्यात घेण्यात येणाऱ्या आरक्षित जागांचे संरक्षणासाठी करावयाचे तार कुंपणाकरीता प्रती रनिंग मिटर या प्रमाणे दर निश्चित केल्यास सोयीचे होईल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पात स्मशान भुमीमध्ये विद्युत दाहिनी बसविण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे काय? याचा खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** स्मशान भुमीत बसविण्यात येणाऱ्या विद्युत दाहिनी साठी संबंधित कंपनीशी पत्रव्यवहार झाला असुन मार्च अखेरपर्यंत विद्युत दाहिनी बसविण्यात येईल असे वाटते.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टयामध्ये अं. क्र. १२ नुसार नविन शाळा इमारती बांधण्याच्या कार्यक्रम होती घेण्यात येईल. असे नमुद केले आहे. या इमारती कोणत्या आणि त्या कोणकोणत्या ठिकाणी बांधण्यात येणार याचा खुलासा व्हावा. तसेच जिल्हा परिषदेतर्फे ज्या शाळा मनपाकडे हस्तांतरित झाल्या आहेत. अशा शालेय इमारतीच्या बाबतीत नगर भुमापन कार्यालयात मनपा मालकीबाबत नोंद करण्यात यावी.

**मा. सभापती :** मागील स्थायी समिती मध्ये जिल्हा परिषदेकडुन मनपाकडे हस्तांतरित झालेल्या शाळांबाबत चर्चा झालेली आहे. त्यानुसार संबंधीत विभागाकडुन खुलासा प्राप्त झाला असुन जिल्हा परिषदेकडुन मनपाकडे हस्तांतरित झालेल्या शाळांच्या बाबतीत नगरभुमापन कार्यालयात नामांतर झालेले नाहीत. जिल्हा परिषद शाळा शासनाच्या आदेशाप्रमाणे मनपाकडे हस्तांतर झाल्या आहेत. मालमत्ता विभागास जिल्हा परिषदेकडुन मनपाकडे हस्तांतर झालेल्या शाळांचे नगर भुमापन कार्यालयात नामांतर करुन घेण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

**श्री. अलीम बेग :** रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये एखादी शालेय इमारत तोडण्यात आली तर अशा शालेय इमारतीसाठी अर्थसंकल्पात पर्यायी तरतुद केली आहे काय? याचा खुलासा व्हावा. जाफर गेट भागातील रस्ता रुंदीकरणामध्ये अशाच प्रकारचे एक शालेय इमारत तुटणार आहे. सदर जागा मार्केट कमेटीची आहे.

**शहर अभियंता :** अर्थसंकल्पामध्ये विकास इमारतीसाठी तीन लाखाची तरतुद करण्यात आली आहे. त्यातुन अशी व्यवस्था करता येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** अर्थसंकल्पातील विकास इमारतीसाठी ठेवण्यात आलेल्या तीस लाखाच्या तरतुदीतुन एकनाथनगर भागातील शाळा पुर्ण होईल काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. आयुक्त :** एखादी इमारती ही एकाच वर्षात पुर्ण होईल असे नाही. त्यामुळे सदर इमारतीचे बांधकामासाठी अंदाजपत्रकानुसार प्रत्येक वर्षी त्या इमारतीचे बांधकामासाठी अर्थसंकल्पात तरतुद केली जाते.

**अतिरिक्त शहर अभियंता :** अर्थसंकल्पात तीस लाख तरतुद असलेल्या विकास इमारती या शिर्षकातुन शालेय इमारतीच बांधल्या जातात. इतर इमारतीसाठी अर्थ संकल्पात वेगळी तरतुद करण्यात आली आहे.

**श्री गिरजाराम हाळनोर :** अर्थसंकल्पामध्ये पोहण्याच्या तलावासाठी पुन्हा तरतुद करण्यात आली आहे. बरीच रक्कम खर्च करुनही पोहण्याचा तलाव अद्याप नागरीकांसाठी खुला झालेला नाही. ही बाब लक्षात घेता अर्थसंकल्पातील

तरतुदीनुसार पोहण्याचा तलाव नागरिंकांसाठी उपयोगात येईल काय याचा खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** पोहण्याच्या तलावाचे काम करणाऱ्या गुत्तेदाराशी चर्चा केली त्यात काही अडचणी आहेत याबाबत वैधानीक सल्ला घेऊन पंचनामा करुन पोहण्याचा तलावाचे काम सुरु करण्यात येईल.

**श्री नारायण फत्तेलष्कर, श्री केशव सोनवणे :** सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टयामध्ये अ. क्र. १५ नुसार विजेचे नविन पोल बसविण्यासाठी तरतुद दाखविण्यात आली आहे. त्यानुसार शहरात महानगरपालिकेतर्फे पोल बसविले जातात आणि याच पोलवरुन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ नागरीकांना खाजगी कनेक्शन देते. व त्यातुन म.रा.वि. मंडळास आर्थिक उत्पन्न प्राप्त होते. ही बाब लक्षात घेता विद्युत मंडळाकडुन पोल बाबत सबसिडी मिळविण्यात यावी.

**मा. सभापती :** स. सभासदांची सुचना योग्य असुन सदर प्रकरणी सर्वसाधारण सभेमध्ये त्या अशयाचा ठराव मंजुर करुन यासबंधी संबंधीत विभागाचे मा. मंत्री याचेंशी पत्र व्यवहार करता येईल.

**मा. आयुक्त :** जिल्हा नियोजन व विकास मंडळाचे फंडात शहरातील पोलबाबत तरतुद करण्यात येत होती. ही पध्दत आता बंद झाली आहे. म्हणुन विजेचे नविन नविन पोल करीता अर्थसंकल्पात तरतुद करावी लागली. स. सभासदांची सुचना योग्य असुन सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाशी चर्चा करावी लागेल.

**श्री गजानन बारवाल :** जी.आय. पोल साठी तीन लाखाची वेगळी तरतुद करण्यात यावी. नगर सेवकांच्या स्वेच्छा निधीतुन जी.आय. पोलसाठी रक्कम दिली जाणार नाही.

**मा. उपआयुक्त :** सार्वजनिक दिवाबत्तीसाठी जी.आय. पोलची आवश्यकता असले तर असे पोल मनपातर्फे खरेदी करण्यात यावे आणि मनपा तर्फे खरेदी करण्यात येणारे पोल कलात्मक आकाराचे खरेदी केल्यास शहराच्या सौंदर्यात भर टाकता येईल.

**श्री केशव सोनवणे :** अर्थ संकल्पात विद्युत पोलसाठी करण्यात आलेल्या तरतुदीतुन नविन मागणी करण्यात आलेले पोल बसविण्यात येणार का? किंवा नविन वसाहतीसाठी पोल बसविण्यात येणार याबाबतचा खुलासा व्हावा जर नविन मागणी आणि नविन वस्त्या दोन्हीसाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली असेल तर ती तरतुद कमी पडेल. सध्या शहरात ८०० ते १००० पोल बाबतची मागणी आहे. तसेच नविन वस्त्यातही पोल द्यावे लागतील. तेव्हा त्यांचाही विचार करावा.

**मा. सभापती :** १) नविन वसाहतीतील पोलसाठी सहा लाखाची तरतुद करण्यात यावी.
२) पान क्र. ४४ वरील नविन पोल बसविणे या शिर्षकातील वीस लाखाच्या तरतुदीतील सतरा लाख पोलसाठी व तीन लाख रुपये नगरसेवकांनी मागणी केलेल्या आय. पोलसाठी ठेवण्यात यावे.

**श्री गिरजाराम हाळनोर :** अर्थसंकल्पात नविन दूरध्वनी साठी तरतुद करण्यात आली आहे. तेव्हा खरेदी करण्यात येणारे दूरध्वनी कोठे बसविण्यात येणार याचा खुलासा करावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** सध्या कार्यालयात एक पी.बी.एक्स असुन तो कमी पडतो म्हणुन नविन पी.बी. एक्सवर जादा दूरध्वनीची व्यवस्था करुन नव्याने तयार होत असलेल्या इमारतीत हा पी.बी. एक्स बसविण्यात येणार आहे.

तसेच विषय समित्यांचे सभापती, अधिकारी यांचे कार्यालयातील अंतर्गत काम महाराष्ट्र शासनाचे अंगीकृत असलेल्या मेल्ट्रॉन कंपनीतर्फे बसविण्यात येणाऱ्या इंटरकॉम व्यवस्थेवर चालेल.

**श्री केशव सोनवणे :** कार्यालयात असलेले इंटरकॉम व्यवस्था कुचकामी असुन त्याबाबत अनेक तक्रारी आहेत.

**श्री गिरजाराम हाळनोर :** पान क्र. ४३ वर नविन वाहन खरेदीकरीता तीस लाखाची तरतुद करण्यात आली आहे. या तरतुदीतुन पाण्याचे टँकर खरेदी करण्याचा समावेश आहे काय? याचा खुलासा व्हावा. लग्न सराईच्या काळात नागरीकांना टँकरद्वारे पाणी मिळत नाही. कोटला कॉलनी येथे बऱ्याच वेळा भेट दिली असता फक्त तीन चार टँकर चालु आहेत असे दिसुन आले. त्यामुळे नागरिकांना टँकर मिळविण्यासाठी बऱ्याच त्रास होतो. दिवसेंदिवस शहराचा व्याप वाढत आहे. ही बाब लक्षात घेता अर्थसंकल्पात नविन टँकर खरेदीसाठी तरतुद असणे आवश्यक आहे.

**मा. आयुक्त :** अर्थसंकल्पातील नविन वाहन खरेदीसाठी तरतुद करण्यात आली आहे. प्रत्यक्ष वाहन खरेदीच्या वेळी कोणते वाहन घ्यावयाचे ते ठरवता येईल.

**श्री नारायण फत्तेलष्कर :** पडेगांव येथील कत्तलखान्यातुन बाहेर पडणारे घाण पाणी कत्तलखान्याच्या शेजारी असणाऱ्या नाल्यात सोडले जाते. त्यामुळे सदर भागातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येऊन आरोग्य विषयक तक्रारी वाढतील ही बाब लक्षात घेता पडेगांव कत्तलखान्यातुन बाहेर पडणारे घाण पाणी नाल्यात उघडयावर न सोडता कत्तलखान्याजवळ सेप्टीक टँक बांधुन त्यात सोडण्यात यावे.

**श्री अलीम बेग :** पडेगांव कत्तलखान्यातुन बाहेर पडणारे घाण पाणी सेप्टीक टँकमध्ये साचल्यामुळे रोगराई होऊन त्या परिसरातील नागरिकांना काही त्रास होईल काय? या बाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचा सल्ला घेण्यात यावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता :** पडेगांव कत्तलखान्यातुन बाहेर पडणाऱ्या घाण पाण्यासाठी सेप्टीक टँक बांधणे योग्य होणार नाही. स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे कत्तलखान्यातुन बाहेर पडणारे घाण पाणी सेप्टीक टँकमध्ये सोडल्यास सादर सेप्टीफ टँकमध्ये जमा होणारे घाण पाणी व इतर अनावश्यक घाण यामुळे सेप्टीक टँक वेळोवेळी साफ करावा लागेल. त्याऐवजी कत्तलखान्याचे घाण पाण्यासाठी अन्य व्यवस्था करणे योग्य होईल.

**मा. सभापती :** पडेगांव कत्तलखान्यासाठी अर्थसंकल्पात दर्शविण्यात आलेली दीड लाखच्या ऐवजी तीन लाख रुपयांची तरतुद करण्यात यावी.

**श्री गजानन बारवाल :** अर्थसंकल्पाचे पान ६५ वर साठा खरेदी साठी ६५ लाख रुपयांची तरतुद दर्शविण्यात आली आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**शहर अभियंता :** साठा खरेदी या शिर्षका अंतर्गत ६५ लाखाच्या तरतुदीतुन कार्यालयीन कामासाठी आवश्यक असलेले सिमेंट, लोखंड, इत्यादी साहित्य आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येईल.

**श्री. अलीम बेग :** अर्थ संकल्पाचे पान क्र.  ४१ वर जलनि:सारणाच्या कामासाठी ८० लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. तरीपण चालु वर्षाच्या अर्थसंकल्पातुन हाती घेण्यात आलेल्या ड्रेनेज कामापैकी किती रक्कमेची स्पील ओव्हर कामे यात समाविष्ट करण्यात आली आहेत. याचा खुलासा व्हावा. माझ्या अंदाजाप्रमाणे ८० लाखाच्या तरतुदीमध्ये ३० लाखाची स्पील ओव्हर कामे असतील.

**श्री. गजानन बारवाल :** कन्व्हर्शन ऑफ ड्राय लॅट्रीन या योजनेअंतर्गत अर्थसंकल्पात करण्यात आलेली रुपये पाच लाखाची तरतुद अत्यंत कमी आहे. बऱ्याच नागरकांची सेप्टीक संडास ड्रेनेज लाईनला जोडुन घेण्याबाबत आवश्यक ती रक्कम भरली आहे. तसेच अनेक प्रभागामध्ये कन्व्हर्शनचे काम करणे बाकी आहे. या शिवाय पडेगांव, मिटमिटा, एकनाथनगर या सारख्या भागातही विचार करणे आवश्यक आहे.

**श्री. केशव सोनवणे :** सिडकोतर्फे बांधण्यात आलेल्या वसाहती लवकरच महापालिकडे येतील. ही बाब लक्षात घेता सिडको प्रशासनाकडुन विकास खर्चाचा शेअर्स घेण्यात यावा. सिडकोच्या वसाहती मनपाच्या ताब्यात आल्यानंतर या वसाहतीतील ड्रेनेज व पाणी पुरवठा लाईन महापालिकेने टाकलेल्या मुख्य लाईनला जोडल्या जाते. त्यानुसार शहरासाठी जादा पाणी पुरवठा होणाऱ्या समांतर जलवाहिनीच्या कामासाठी महापालिकेला लोकवर्गणीची जी रक्कम भरावी लागली या लोक वर्गणीच्या रक्कमेतही सिडकोचा सहभाग असणे आवश्यक आहे. कारण समांतर जलवाहिनीमुळे होणाऱ्या जादा पाणी पुरवठयाचा लाभ सिडको वसाहतीसाठी ही होणार आहे.

**मा. आयुक्त :** सं. सभासदांची सुचना योग्य आहे. सिडको वसाहतील किती पाणी द्यावे लागेल आणि त्यानुसार सिडको प्रशानाकडुन किती शेअर्स वसुल करावा लागेल. याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत कार्यकारी अभियंता यांना सुचितकरण्यात आले आहे. अर्थात वरील प्रकरणी मागणी अद्याप सिडको प्रशासनाला केली नाही. तरीपण महानगरपालिकेकडुन अशा प्रकारची मागणी झाल्यास सिडको प्रशासन प्रस्ताव नाकारणार नाही असे वाटते. याशिवाय वाळुज भागही सिडको प्रशासनाकडे येत आहे. नविन समांतर जलवाहिनीतुन मिळणारे १०० एम.एल.डी. पाण्यापैकी शहराची गरज लक्षात घेता २५ एम.एल.डी. पाणी शिल्लक राहील शिल्लक राहणारे हे २५ एम.एल.डी. पाणी पाच वर्षाकरीता वाळुज परिसरात दिले तर ते २०% (पी.सी.) लोकवर्गणी देण्यास तयार आहेत. समांतर जलवाहिनी टाकण्याच्या कामापैकी नक्षत्रवाडी ते शहरापर्यंतचे पाईप लाईन टाकण्याचे काम सन १९९४ पर्यंत पुर्ण होईल.

**श्री. केशव सोनवणे :** सभागृहात देण्यात आलेली सुचना योग्यच आहे. त्याप्रमाणे लोकवगर्णी घेण्यास हरकत नाही. परंतु ड्रेनेज लाईन बाबत काय निर्णय घेण्यात येणार. ड्रेनेज बाबतही सिडको प्रशासनाकडून काही प्रमाणात शेअर घेतलाच पाहिजे.

**मा. आयुक्त :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे मागणी करता येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. गजानन बारवाल :** अर्थसंकल्पामध्ये मालमत्ता हस्तांतरीत करण्याकरीता दोन लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. त्यात वाढ झाली आहे. त्यात वाढ करता येईल.

**मा.सभापती :** शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन बांधकाम पुर्णत्व यासाठी स्वतंत्र कायस्वरुपी स्कॉड नेमण्यात यावा. म्हणजे महापालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढेल. बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतल्यानंतर नागरीक जादा बांधकाम करतात. अशा जादा बांधकामापासुन महापालिकेला मिळणारे जादा उत्पन्न बुडते. तसेच कामाची गती वाढविण्याच्या दृष्टीनेही विचार होणे आवश्यक आहे. एखाद्या कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, टेंडर काढणे, स्थायी समितीची मंजुरी घेणे इ. कामचा कालावधी लक्षात घेता या कामासाठी भरलेल्या टेंडरची ९० दिवसाची मुदत निघुन जाते. व ठेकेदार या नियमाचा फायदा घेतात. यामुळेही महापालिकेचे आर्थिक नुकसान व वेळ वाया जातो. या बाबीचा विचार करुन सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

**मा. आयुक्त :** सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या प्रकरणातील बरीच अंदाजपत्रके जुन आहेत. तरीपण नवीन अंदाजपत्रकात मा. सभापती यांचे सुचनेप्रमाणे दखल घेता येईल. याशिवाय प्रत्येक मासिक सभेच्या वेळी प्रत्येक कामाचा आढावा घेतला जातो.

**मा. सभापती :** सं. सभासदांच्या सुचना लक्षात घेता प्रशासनातर्फे दाखल करण्यात आलेल्या सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पात खालील प्रमाणे दुरुस्ती व वाढ करण्यात यावी.

| अ. क्र. | लेखा शिर्षक<br><br>उत्पन्न | पान क्र. | प्रशासनाने सुचविलेली मुळ रक्कम | स्थायी समितीने शिफारस केलेली रक्कम (आकडें हजारात) |
|---|---|---|---|---|
| १) | रस्ता तयार करणे दुरुस्ती बाबत अनुदान | (७) | ४००० | ५००० |
| | खर्च | | | |
| १) | पाणी खरेदी | २५ | ४०००० | ३९००० |
| २) | पुतळे खरेदी व दुरुस्ती | ३६ | २५० | ५०० |
| ३) | मनपा फंडातुन करावयाची जलनिःसारण कामे | ४० | ८००० | ९००० |
| ४) | अधुनिक कत्तलखाना | ४२ | १५० | ३०० |
| ५) | अ) नविन पोल बसविणे<br>ब) जी. आय. पोल | ४४ | २००० | १७०० |
| ६) | सर्वसामान्य पोल | ४४ | - | ६०० |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासनातर्फे सभागृहासमोर सादर करण्यात आलेल्या सन १९९१-९२ च्या सुधारित अंदजापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच प्रशासनातर्फे सन १९९२-९३ वर्षाकरीता सभागृहासमोर दाखल करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात खालील प्रमाणे दुरुस्ती व फेरविचार सुचविण्यात येतात.

| अ. क्र. | लेखा शिर्षक<br><br>उत्पन्न | मुळ अंदाजपत्रकातील तरतुद | स्थायी समितीने शिफारस केलेली रक्कम (आकडें हजारात) |
|---|---|---|---|
| १) | रस्ता तयार करणे दुरुस्ती बाबत अनुदान | ४००० | ५००० |
| | खर्च | | |
| १) | पाणी खरेदी | ४०००० | ३९००० |
| २) | पुतळे खरेदी व दुरुस्ती | २५० | ५०० |
| ३) | मनपा फंडातुन करावयाची जलनिःसारण कामे | ८००० | ९००० |
| ४) | अधुनिक कत्तलखाना | १५० | ३०० |
| ५) | अ) नविन पोल बसविणे<br>ब) जी. आय. पोल | २००० | १७०० |
| ६) | सर्वसामान्य पोल लेआऊट मधील | - | ६०० |

वरील दर्शविल्याप्रमाणे जमा आणि खर्च यातील फेरफार यासह सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**सन १९९२-९३ चे अंदापत्रक**

आकडे हजारात

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| प्रारंभीची शिल्लक | ११५ | सर्वसाधारण प्रशासन खाते | १९५०० |
| महानगरपालिका कर | २७११०० | | |
| विशिष्ट कराान्वये येणारी वसुली | ८३८० | सार्वजनिक आरोग्य व सुखसोयी | ११२१५ |
| कराव्यतिरिक्त मनपाच्या मिळकती व अधिकारापासुन मिळणारे उत्पन्न | ६९९१ | सार्वजनिक सुरक्षा खाते व लोकशिक्षण | १०५२२५<br>२८८०१ |
| देणग्या व अनुदाने | ६०४२५ | किरकोळ | ५९२२० |
| संकीर्ण | ४६७५ | भांडवली खर्चासाठी वर्ग | १५०३८० |
| कर्ज | २४४०० | अग्रिम | ३५०० |
| अग्रिम वसुली | २०५० | अखेरची शिल्लक | २९५ |
| **एकुण** | **३७८०२१** | **एकुण** | **३७८१३६** |

प्रारंभीच्या शिल्लकेसह एकुण जमा = ३७८१३६

**भांडवली खर्च**

**पाणी पुरवठा**

| | | |
|---|---|---|
| अ) | लोकवर्गणी | ६००० |
| ब) | मनपा फंडातुन करावयाची कामे<br>वायलेस सेट खरेदी | १०,०००<br>५०० |
| | पाणी पुरवठा सिडको जुनी पाईप लाईन टाकणे व बदलणे | २००० |
| | जलनिःसारण | |
| अ) | मनपा फंडातुन करावयाची कामे | ९००० |
| ब) | कन्व्हर्शन ऑफ ड्राय लॅट्रीन | ५०० |
| | झोपडपट्टी सुधारणा<br>ट्रान्सपोर्ट नगर | १००००<br>३००० |
| | रस्ते बांधणी | १२००० |
| | इमारत बांधणी | |
| | प्रशासकीय इमारत | ५०० |
| | मटन बीफ मार्केट | ५०० |
| | अद्यावत कत्तलखाना | ३०० |
| | प्राथमिक आरोग्य केंद | ५०० |
| | उर्दु वाचनालय | ५०० |
| | खडकेश्वर वाचनालय | ७०० |
| | वाचनालय (सामान्य) | २०० |
| | विकास इमारती | ३००० |
| | इतर इमारती व उर्वरीत कामे | ३५०० |
| | सुपर मार्केट | ५०० |
| | मनपा विश्रामगृह | २०० |
| | इतर भांडवली | |
| | नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड विकास | ५०० |
| | पोहण्याचा तलाव | ८०० |
| | सिकंदरअली वज्द मेमोरियल | १००० |
| | शहराचे सौंदर्यीकरण | १००० |
| | नविन वाहन खरेदी घसारा निधीची दहा लाखाची तरतुद वळती करुन | ३००० |
| | मा. सभासदांच्या स्वेच्छा निधी | ४५०० |
| | हरीत औरंगाबाद | ८० |
| | डी.पी.डी.सी. | ९०० |
| | नेहरु रोजगार योजना | |
| | मायको इंटरप्राईजेस | २७०० |
| | सेल्टर ऑफ ग्रेडेशन | ३००० |
| | ट्रेनिंग | ५०० |
| | म्हाडा सर्वे रिर्पोट | १०० |
| | कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना ५% | ३५०० |

| | | |
|---|---|---|
| | फायर टेंडर खरेदी | १५०० |
| | विकास योजनेअंतर्गत भूखंडाचे संरक्षण | २००० |
| | नविन पोल बसविणे | |
| | एम.एन.इ.बी. सोसायटी | १७०० |
| | जी.आय.पोल | ३०० |
| | नविन पोल सर्वसाधारण | ६०० |
| | सुधारित विकास योजना | ५०० |
| | कॉम्प्युटर( संगणक ) | ७०० |
| | सिध्दार्थ उद्यान संरक्षित | १००० |
| | भिंत बांधणे, रस्त्यावर गाडी पार्कींग करणे | १०० |
| | मौलाना अबुल कलाम आझाद | ५०० |
| | छत्रपती शिवाजी महाराज | ५०० |
| | साठा खरेदी अग्रीम | ६५०० |
| | शासकीय अनुदान व मनपा फंडातुन करावयाची कामे | ४०००० |
| | एकुण | १५०३८० |
| | | |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रारंभीच्या शिल्लकेसह | - | ३७८१३६ | |
| एकुण भांडवह | - | १५०३८० | एकुण - १५०३८० |
| दुबेरची जमा | - | ६८९५० | दुबेरची - ६८९५० |
| एकुण | - | ५९७४६६ | ५९७४६६ |

वरीलप्रमाणे सन १९९२-९३ च्या अंदाजपत्रकातील जमा व खर्चास सर्वानुमते मंजुरी देवुन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
मनपा-औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती - स्थायी समिती
मनपा-औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ४-३-१९९२ रोजी भरलेल्या विशेष स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत.**

**बुधवार दिनांक ४ मार्च १९९२ सकाळी ११.०० वाजता मा. सभापती श्री. मो. इस्माईल अ. करीम यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात विशेष स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग
२) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
३) श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
४) श्री. भगुरे तुळशीराम छगन
५) श्री. बारवाल गजानन रामकिसन
६) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
७) श्री. विधाते प्रभाकर सिताराम
८) श्री. सोनवणे केशव काशिनाथ
९) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव

**विषय क्र. ३६७/१ :**

श्री. डी. बी. शिसोदे, शाखा अभियंता पाणी पुरवठा विभाग यांनी दाखल केलेल्या अपीलावर चर्चा करणे.

**अपील :**

**प्रकरण :** खाते निहाय चौकशीत अन्यायाने वेतनवाढ व निलंबन काळ गणणे.

मी डी.बी. शिसोदे शाखा अभियंता पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका औरंगाबाद खालील प्रमाणे मा. आयुक्त यांचे आदेश क्र. मनपा/अस्था:-१/२३५०/९१ दिनांक १७.६.९१ विरुध्द आपणाकडे मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे नियम ५६(४) च्या तरतुदीस अधिन राहुन अपील करीत आहे. तसेच मा. आयुक्त यांच्या आदेश दि. १७.६.९१ च्या नंतर मी कार्यालयाकडे दि. १-७-९१ रोजी चौकशी अहवालाच्या निर्णयाची व साक्षीदाराच्या प्रमाणीत नकल मिळण्यासाठी अर्ज केला आहे. सदर नकलच्या प्रती दि. १०-७-९१ रोजी मिळाल्या आहेत. याकरीता नकल मिळाल्यापासुनच्या तारखेपर्यंत मुदतीत माझे अपील आपणाकडे सहानुभूतीपुर्वक विचार करण्यासाठी सादर करीत आहे.

१) माझी नियुक्ती औरंगाबाद नगरपालिकेत १९६३ साली झाली. तद्नंतर जेव्हां नगरपालिकेचे रुपांतर डिसेंबर १९८२मध्ये महानगरपालिकेत झाले. तेव्हा सर्व कर्मचाऱ्यांप्रमाणे माझी सेवा महानगरपालिकेत वर्ग झाली व तेंव्हापासुन मी विविध विभागात माझेवर सोपविलेली कामे अति दक्षतेने व कुठल्याही प्रकारे त्यात टाळाटाळ न करता जबाबदारीने केली.

२) महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांचे आदेश क्र. मनपा/अस्थापना-१/१११३/९० दिनांक १-३-९० रोजी आदेश काढुन (नक्कल जोडली आहे.) मला मनपा विरुध्द कर आकारणी ७०-७२ व फेर आकारणी ८२-८३ या प्रकरणात न्यायालयात प्रलंबित प्रकरणी संबंधित वकीलांशी संपर्क साधणे व आवश्यक असलेले कागदपत्र सादर करणेस नियुक्त केले तसेच या आदेशाच्या प्रती सर्व संबंधीतास म्हणजे विधी

सल्लागार करमुल्य निर्धारण अधिकारी यांना पण देण्यात आल्या. कर मुल्या निर्धारण अधिकाऱ्यास दिलेल्या प्रतीत स्पष्ट उल्लेख केला आहे की, संबंधीत कर्मचाऱ्यांना लागणाऱ्या कागदपत्राचा पुरवठा त्यांनी त्वरीत करुन द्यावा. नसता सर्वस्वी जबाबदारी ही करमुल्य निर्धारण अधिकारी यांचेवर राहील. (नकल जोडली आहे.)

३) मला न्यायालयातील प्रकरणांत कागदपत्र सादर करणेकरीता जे आदेश १-३-९० रोजी झाले. त्यानुसार मी प्रत्येक प्रकरणात प्रत्येक तारखेस संबंधीत वकीलांशी संपर्क साधुन प्रकरणात होत असलेली प्रगती मी कळवत होतो. बहुतांशी प्रकरणात मुखत्वे श्री. एम.डी. जोशी यांना नेमण्यात आले होते.

४) मी १-३-९० च्या आदेशास अनुसरुन न्यायालयीन कामात विविध प्रकरणात हव्या असलेल्या कागदपत्राच्या नकला करमुल्य निर्धारण अधिकाऱ्याकडुन उपलब्ध करुन देणेस मागणी केलेली आहे. या व्यतिरिक्त मी दि. ३-८-८९ रोजी करमुल्य निर्धारण अधिकाऱ्यांना एक सविस्तर पत्र दिले ज्यात न्यायालयीन प्रकरणात मुख्यत्वे कोणत्या कागदपत्रांची उपलब्धता करणे आवश्यक आहे. याची एक यादी दिलेली आहे. (नक्कल जोडली आहे.) व यातच असा स्पष्ट उल्लेख केला आहे. की, जर नेमलेल्या तारखेस कागदपत्राचा पुरवठा झाला नाही (म्हणजे उपलब्ध) झाले नाही, तर प्रकरणात मनपा विरुध्द निकाल देण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मी याच पत्रात देखील विंनती केली की, या कामी माहितगार कारकुन द्यावा. जेणेकरुन प्रकरणात हवे असलेले कागदपत्रे व माहिति पुरवणे सोपे होईल. परंतु असे सखेद नमुद लागते की, प्रत्येक प्रकरणात १५ ते २० दिवस अगोदर कागदपत्रे पुरविणेस विनंती करुन देखील हवी असलेली माहिती व कागदपत्राचा पुरवठा कार्यालयाक्डून झाला नसल्याने मी प्रयत्नांची पराकाष्टा करुन देखील अशी कागदपत्रे सादर करणेस असमर्थ ठरलो. वास्तविक अशी कागदपत्रे त्वरीत उपलब्ध करुन देणे ही जबाबदारी करमुल्य निर्धारण अधिकाऱ्यांचे परम कर्तव्य होते.

५) मला कोर्टातील प्रलंबन प्रकरणात कागदपत्र सादर करणेस दिनांक १-३-९० रोजी नियुक्त करण्यात आले त्याप्रमाणे मी काम करता असतांना एका एकी दि. २९-३-९० रोजी मा. आयुक्त यांनी त्यांचे पत्र क्र. अेएमसी/डी.एम.सी./पीए/९०/४८ द्वारे (नक्कल जोडली आहे.) मला एक मोघम प्रकारची नोटीस (मेमो) देऊन त्यात विधी सल्लागाराकडुन असा आरोप करण्यात आल की मी कोर्टातील प्रकरणात हजर रहात नसुन मा. न्यायालयाने उप आयुक्त व आयुक्त यांचे प्रतिज्ञापत्र सादर करणेस आदेशित केले आहे. मला माझा खुलासा करणेस ३१-३-९१ पावेतो सुचविले.

वास्तविक पाहता मी कोणत्या प्रकरणात न्यायालयात उपस्थित नव्हतो, कोणत्या तारखेस प्रकरण चौकशीस्तव होते व मी कोणता लेखी व तोंडी पुरावा सादर केला नाही याचा कसलाच उल्लेख या नोटीसमध्ये नमुद करण्यात आला नाही.

सदरची नोटीस मला मिळताच मी दि. ३१-३-९० रोजीच खुलासेवार उत्तर दिल आहे. (प्रत जोडली आहे) ज्यात मी स्पष्ट खुलासा केला आहे की, दिवाणी दावा क्रमांक २७२/८५ आणि २७३/८५ मध्ये नेमलेल्या वकीलांशी २८-३-९० रोजी संपर्क साधला आहे. परंतु या प्रकरणात कर मुल्य निर्धारण अधिकाऱ्याकडुन कागदपत्रे मागुन देखील उपलब्ध न झाल्याने मी सादर करु शकलो नाही.

६) माझा वरील खूलासा विचारात न घेताच मा. आयुक्तांनी त्यांचे आदेश मा. मनपा/अस्थापना/१९०८/९० दि. २४-४-९० नुसार (नक्कल जोडली आहे.) निलंबीत केले व तदनंतर दि. ५-५-९० रोजी माझे विरुध्द खाते निहाय चौकशी करणेस्तव शहर अभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती केली.

७) शहर अभियंता यांनी त्यांचे पत्र क्र. मनपा/अस्थापन/१/७०७५/९० दि. ९-५-९० रोजी माझे विरुध्द खाते निहाय चौकशी करणेकामी खालील प्रमाणे ३ (तीन) आरोप ठेवले. (नक्कल जोडली आहे)

१. आपली नेमणूक न्यायालयातील प्रलंबित असलेल्या प्रकरणाबाबत साक्ष पुरावा व संबंधीत कागदपत्रे पुरविण्याबाबत करण्यात आली होती. तसेच संबंधीत प्रकरणात महानगरपालिका वकीलाशी वेळोवेळी संपर्क साधुन कार्यवाही करावी परंतु तुम्ही अनुपालन केलेले नाही.

२. दिवाणी दावा क्र. २७२/८५ व २७३/८५ या प्रकरणात वेळेच्या आत कागदपत्रे संबंधीत वकीलाकडे सुपूर्द केली नाही. मा. न्यायालयाने त्या बद्दल गंभीर दखल घेतलेली आहे व कार्यालयाविरुध्द ताशेरे दिले आहेत.

३. तुम्ही आपले काम चोखपणे न करता निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केला आहे व कार्यालयाचय कामात अडथळा आणला आहे.

तसेच अभिकथन पत्र व साक्षिदाराची यादी दिली (पत्राच्या नकला जोडल्या आहेत). सदरील आरोप पत्र मला १२-७-९० रोजी प्राप्त झाले व त्यास २१-७-९० रोजी प्राप्त झाले व त्यास २१-७-९० रोजी सर्व आरोपांचा खुलासेवार उत्तर दिले. (नक्कल जोडली आहे.)

८) माझे वडील उत्तर दिल्यानंतर चौकशी अधिकारी यांनी सविस्तर चौकश करुन माझे प्रकरणात चौकशी करुन माझे प्रकरणात चौकशीचा अहवाल सादर केला. सदरील अहवाल चौकशी अधिकारी यांनी माझे विरुध्द एकही आरोप सिध्द होत नसल्याचे नमुद करुन मला पुर्ववत कामावर हजर करुन घेवुन माझा निलंबन कालावधी हा संपुर्ण सेवा काल गणला जावा असा अभिप्राय दिला. (चौकशी अहवालाची प्रत जोडली आहे.)

सदरील अहवाल आयुक्तांनकडे सादर केल्यानंतर आयुक्तांनी या अहवालाची संमती न दर्शविता सदरील अहवाल तोंडी साक्षी पुरावा न घेतल्याने त्या स्थितीपासुन परत चौकशी करणेत यावी असा आदेश दिला. (आयुक्तांचे पत्र क्र. एमसी/इसटी/-१/११५/९१ दिनांक ९-१-९१ जोडले आहे.)

९) आयुक्तांच्या वरील आदेशास अनुसरुन चौकशी अधिकारी यांनी परत तोंडी पुरावा घेऊन चौकशी केली. या प्रकरणात सर्वश्री :-

१. एम. वाय कांबळे विधी सल्लागार
२. एम. डी. जोशी ॲडव्होकेट
३. व्ही. एम. निकम कर मुल्य निर्धारण अधिकारी
४. ए. आर. शिंदे कर मुल्य निर्धारण अधिकारी

यांच्या साक्षी घेण्यात आल्या मी ज्यांची फेर तपासणी केली. या प्रकरणात मुख्यत्वे दोन न्यायालयीन प्रकरणी माझेवर दोषारोप ठेवण्यात आले तेव्हा या दोन प्रकरणाबाबत साक्षिदारांना उलट तपासणी केली. या प्रकरणात मुख्य साक्ष श्री एम. वाय. कांबळे विधी सल्लागार व एम. डी. जोशी, वकील यांची साक्ष महत्त्वाची आहे. दोषारोपात असे म्हटले की, माझ्या हलगर्जीपणामुळे कोर्टाने आयुक्तांवर ताशेरे ओढले. या बाबत विधी सल्लागार यांची साक्ष फारच महत्त्वाची ठरते. त्यांनी त्यांच्या

साक्षीत (उलट तपासणीत) स्पष्ट खुलासा केला आहे की, आयुक्तांनी त्यांच्या शपथपत्रात मा. कोर्टात हजर नसल्याचा किंवा माझा नाम निर्देश देखील केला नसुन प्रकरणात कार्यालयीन अडचणीमुळे कागदपत्रे सादर करणे शक्य झाले नाही असा खुलासा केला आहे.

वरील सर्व साक्षी पुरावे लक्षात घेता. तसेच श्री. एम. डी. जोशी यांच्या लेखी खुलासा (सर्व साक्षीदारांच्या जबानी घेतलेल्या नकला जोडल्या आहेत.) विचारात घेऊन चौकशी अधिकाऱ्यांनी परत रितसर चौकशी अहवाल सादर केला ज्यात त्यांनी स्पष्ट नमुद केले आहे की, माझे विरुध्द दोन्ही आरोप सिध्द होत नाहीत म्हणुन मला दोन्ही आरोपातुन निर्दोष ठरविण्यात आले.

सदरील अहवाल आयुक्तांकडे सादर केल्यानंतर त्यांनी या अहवालाबाबत सहमती न दर्शविता आकस बुध्दीने मला वित्तीय नुकसान पोहोचविण्याच्या दृष्टीतुन माझा निलंबन काल हा रजेत गणला जावा व माझी एक वेतनवाढ दोन वर्षास्तव गोठीत रोखण्याचे आदेशित केली. (प्रत सोबत जोडली आहे.)

हे की, आयुक्त यांचे आदेश नैसर्गिक न्यायाविरुध्द आहे.

हे की, खाते निहाय चौकशीत जर कर्मचारी दोषी ठरला असेल व त्यास जर शिक्षा देणे असेल तर त्या कर्मचाऱ्यास नियम ६.१९ च्या तरतुदीनुसार दुसरी नोटीस (Second Show Cause) देणे जरुरी आहे. ज्यात कर्मचाऱ्यांस दोषी ठरल्यामुळे अमुक शिक्षा का करण्यात येवु नये असा स्पष्ट उल्लेख करुन त्याचे स्पष्टीकरण मागविणे जरुरी आहे. अशा नोटीसी शिवाय कोणत्याही सक्षम अधिकाऱ्यास एकतर्फी शिक्षा देता येत नाही.

मला आयुक्तांनी अशा प्रकारची कुठलीच नोटीस दिलेली नाही. तेव्हा आयुक्तांचे शिक्षा देणेचे आदेश हे (Aribitary Against Natural Justice) आहेत. तेव्हां त्यांचे आदेश रद्यबातल होणे जरुरी आहे. व माझा निलंबन काळ सेवा काळ म्हणुन गणला जावा व रोखलेली वेतनवाढ रद्य व्हावी.

वास्तविक पाहता या प्रकरणी माझा कसलाच संबंध येत नाही. व माझे कडुन कुठलाच अक्षम्य गुन्हा घडलेला नसतांना मला निलंबीत करणे योग्य नव्हते. मी कुठल्याच प्रकारचे मनपाचे वित्तीय नुकसान केलेले नाही. किंवा पैशाचा अपहार केला नाही. तेव्हा ज्यावेळी मी कुठल्याच प्रकारचा गंभीर गुन्हा केला नव्हता जेव्हा मला मुळातच निलंबन करणेस नको होते. परंतु माझे निलंबन देखील आकस बुध्दी ठेवुन करण्यात आले. असे समजण्यास वाव आहे.

तेव्हा वरील बाबींचा विचार करुन व चौकशी अधिकाऱ्यांनी सविस्तर चौकशी अंती मी निर्दोष असल्यामुळे मला पुवर्वत कामावर घेवुन निलंबन काळ हा सेवा काळ गणल्या जावा अशी शिफारस केली असल्याने सदरील अहवालास अनुसरुन माझी रोखलेली एक वेतनवाढ रद्य करुन माझा निलबंन काळ हा सेवा काळ गणला जावा. असे आदेश स्थायी समितीने देवुन मा. आयुक्तांनी दिलेले आदेश रद्यबातल करण्यात यावे. हि विंनती मी, स्थायी समितीस करीत आहे.

कुठलाही आरोप सिध्द होत नसल्याने माझ्या २८ वर्षाच्या काळात माझे विरुध्द कुठल्याही प्रकारे खाते चौकशी किंवा इतर शिक्षा मला झालेली नाही. उलटपक्षी मी एक (confirmed) कायम स्थायी स्वरुपी कर्मचारी असल्याने वास्तविक पाहता मला मुळातच आयुक्तांनी स्थायी समितीच्या संमती शिवाय निलंबीत करता येऊ शकत नाही. तेव्हा वरील सर्व बाबींचा विचार करुन मला जे (१४) महिने निलंबीत करण्यात आले ते मुळात चुक आहे.

वरील सर्व बांबीचा विचार करुन मा. स्थायी समितीने सहानुभूतीपुर्वक विचार करुन आयुक्तांचे आदेश रद्य ठरवुन माझा निलंबन काळ सेवा काळ गणला जावा व रोखलेली वेतनवाढ रद्य करणेस आदेश द्यावेत हि विनंती.

आपला विश्वा्स

डी. बी. शिसोदे
शाखा अभियंता पा. पु.
मनपा औरंगाबाद.

**याची प्रत :-**

१) श्री मा. ______________________ महानगरपालिका, औरंगाबाद.
२) महापौर, महानगरपालिका, औरंगाबाद.
३) मा. आयुक्त मनपा, औरंगाबाद.
४) मा. उपआयुक्त मनपा औंरगाबाद.
५) मा. सचिव महानगरपालिका, औरंगाबाद.

**संवाद :**

**श्री. तुळशीराम भगुरे :** सभागृहात ठेवण्यात आलेले अपील हे वैयक्तिक कर्मचाऱ्यांनी दाखल केले आहेत. किंवा प्रशासनातर्फे दाखल झाले आहे याचा खुलासा व्हावा.

**मा. उपआयुक्त :** सभागृहासमोर असलेल्या प्रत्येक अपीलाबाबत प्रशासनातर्फे अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर अहवालाबाबत सभागृहाने विचार करुन मगच प्रकरणात निर्णय घ्यावा असे वाटते.

**मा. सभापती,श्री.केशव सोनवणे, श्री.अलीम बेग :** कर्मचाऱ्याकडुन दाखल झालेल्या अपीलावर विचार विनिमय करण्यासाठी प्रशासनातर्फे खूलासा दाखल करण्यात यावा म्हणुन लेखी पत्र दिले होते. प्रशासनातर्फे सभागृहासमोर दाखल करण्यात येणारा खुलासा यापुर्वीच दाखल झाला असता तर त्याचा अभ्यास करता आला असता.

**विधी सल्लागार :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) मध्ये नमुद केल्याप्रमाणे एखाद्या कर्मचाऱ्यास बडतर्फ केले. खालच्या पदावर आणले किंवा नोकरीतुन काढुन टाकले असेल तर ३० दिवसाच्या आता स्थायी समितीसमोर अपील करता येते. इतर प्रकरणात अपील करता येत नाही. याशिवाय उक्त अधिनियमाचे कलम ५६(१) (ड) मध्ये दर्शविल्याप्रमाणे नगरपालिका सचिव, मूख्य लेखा परिक्षक यांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यास शास्ती लावता येते.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** महानगरपालिका कर्मचाऱ्यास निलंबीत करण्याचे अधिकार कोणास आहेत याचा खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१) (अ) व (ब) अन्वये स्थायी समितीचे मंजुरीने महानगरपालिका कर्मचाऱ्यास निलंबन /बडतर्फ करता येते. तसेच उक्त अधिनियमाचे कलम ५६ (१) (क) प्रमाणे कलम ४५ अन्वये नेमलेल्या अधिकारी यांचे व्यतिरिक्त महापालिकेचे

नेमलेल्या इतर कर्मचाऱ्यांवर मा. आयुक्त यांनी शास्ती लावण्याचे अधिकार आहेत.

**मा. उपआयुक्त :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे विषय पत्रिकेवर वरील अनुक्रमांक २,३ व ११ ही प्रकरणे स्थायी समितीचे अधिकारात कलम ५६ (४) अन्वये येऊ शकतात. अन्य प्रकरणाबाबत मा. आयुक्त यांना अधिकार आहेत.

**मा. सभापती :** प्रत्येक व्यक्तिला त्याच्यावर झालेल्या अन्यायाबाबत न्याय मागण्याचे अधिकार आहेत. श्री. शिसोदे, शाखा अभियंता यांचे प्रकरणात दोन चौकशी अहवाल आहेत. पहिल्या चौकशी अहवालात श्री. शिसोदे, शाखा अभियंता यांना निर्दोष ठरविले आहे. यानंतर पुन्हा झालेल्या चौकशी अहवालानुसार त्यांना शिक्षा झाली हे कसे काय याबाबत खुलासा व्हावा.

**मा. उपआयुक्त :** चौकशी करण्यात आलेल्या प्रकरणात चौकशी अहवाल हा अंतिम असतो असे नाही. चौकशी अहवालानंतर नियुक्ती अधिकारी यांचा निर्णय अंतिम ठरतो. चौकशी प्रकरणामध्ये काही त्रुटी आढळुन आल्यास नियुक्ती अधिकारी दोषी कर्मचाऱ्यास शिक्षा देऊ शकतो.

**श्री. अलीम बेग :** शाखा अभियंता श्री. शिसोदे यांना ज्या प्रकरणात शिक्षा झाली त्या प्रकरणात प्रतिज्ञा पत्रानंतर किती दिवसांनी न्यायालयात कागदपत्र दाखल केले या बाबत खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार :** प्रतिज्ञा पत्रानंतर पुढील तारखेस कागदपत्र दाखल केले.

**मा. सभापती :** शाखा अभियंता श्री शिसोदे यांना ज्या प्रकरणात शिक्षा झाली त्या प्रकरणाची कागदपत्रे गहाळ होती म्हणुन शाखा अभियंता श्री. शिसोदे यांना कागदपत्र दिल गेले नाहीत. आणि म्हणुन या प्रकरणात श्री. शिसोदे यांना शिक्षा करणे योग्य नाही. तसेच संबंधीत प्रकरणाचे सुनावणीचे वेळी या प्रकरणाचे वकील न्यायालयात हजर नव्हते. म्हणुन न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत. तेव्हां संबंधीत वकीलावर काय कार्यवाही केली. एकंदर सर्व चर्चेवरुन ज्या ज्या प्रकरणात कर्मचाऱ्यांना शिक्षा झाली आहे. त्या सर्वांना स्थायी समिती समोर अपील करता येते असे सभागृहाला वाटते.

**मा. उपआयुक्त :** सदर प्रकरणी प्रशासनातर्फे लेखी खुलासा (से) खालील प्रमाणे :

**टीप्पणी :**

श्री. डी. बी. शिसोदे, कनिष्ठ अभियंता यांनी न्यायालयातील मालमत्तासंबंधी प्रलंबित असलेल्या प्रकरणातबाबत साक्षी पुरवठा व संबंधीत कागदपत्रे वेळीच न पुरविल्यामुळे कार्यालयीन अदेश क्र. मनप/अस्था/-१/१९०८/९० दि. २४-४-९० अन्वये निलंबीत करण्यास आले होते. व खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. श्री. बी. अमरनाथ माजी शहर अभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती. चौकशी अधिकारी यांनी चौकशी करुन श्री शिसोदे कनिष्ठ अभियंता यांच्या विरुध्द लावण्यात आलेले आरोप सिध्द होऊ शकत नाही. म्हणुन तिन्ही आरोपातुन निर्दोष ठरविले आहे. व निलबंन काळ संपुर्ण सेवाकाळ गणण्यात यावा. अशी शिफारस केली आहे. जरी चौकशी अधिकारी यांनी श्री शिसोदे, कनिष्ठ अभियंता यांना निर्दोष ठरविले असले तरी नियुक्ती अधिकाऱ्याला चौकशी अहवाल योग्य न वाटल्यामुळे त्यांची एक वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरीता बंद केली व निलंबन काळ देय रजेत रुपांतरित करण्याचा निर्णय घेतला.

तथापी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये मा. आयुक्तांनी जर एखाद्या कर्मचाऱ्यास पदावन्नत केले. नोकरीतुन काढुन टाकणे किंवा बडतर्फ

केले तर मा. आयुक्तांच्या आदेशाविरुध्द स्थायी समिती समोर अपील करता येते. परंतु श्री. शिसोदे यांना वरील पैकी कोणतीही शिक्षा झालेली नाही. फक्त मा. आयुक्तांच्या अधिकार कक्षेतील असलेली शिक्षा करण्यात आलेली आहे.

**ठराव :**

महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस (शिस्त आणि अपील ) नियम १९७९ चे कलम ५ मध्ये ज्या शास्ती दर्शविलेल्या आहेत त्या शास्ती विरुध्द सदरील नियमांचे नियम क्र. १७ अन्वये वरिष्ठ प्राधिकरणाकडे अपील करता येते. शाखा अभियंता श्री. शिसोदे यांचे प्रकरणातील दोन्ही चौकशी अहवालात त्यांना निर्दोष ठरविले असतांनाही मा. आयुक्त यांनी दोन्ही चौकशी अहवाल विचारात न घेता शाखा अभियंता श्री. शिसोदे यांना दोषी ठरवुन त्यांच्या दोन वेतनवाढी रोखलेल्या आहेत. हे योग्य वाटत नाही. म्हणुन (नविन) मा. आयुक्त यांनी यावर पुन्हा विचार करुन श्री. शिसोदे यांची शिक्षा रद्द करावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६८/२ :**

श्री. पारसमल जवानमल चंडालिया, कनिष्ठ लिपीक यांनी दाखल केलेल्या अपिलावर चर्चा करणे.

अपील :- विषय

आयुक्त महानगरपालिका औरंगाबादचे दिनांक १६-५-९१ चे केस क्रमांक एम.एस.सी./इसटी/१९६६/९१ चे आदेशा विरुध्द अपील ज्यामध्ये अपिलार्थीस नाका कारकुन या पदावरुन शिपाई या पदावर पदावन्नत करुन इतर शिक्षा केली त्याबाबत.

माननीय महोदय,

माननीय आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे केस क्रमांक एम.एस.सी. / इसटी /१/१९६६/९१ दिनांक १६-५-९१ चे आदेशाचे नाराजीने अपीलार्थी आपले अपिल माननीय स्थायी समिती समोर दाखल करीत आहे. सदरील आदेशान्वये अपीलामधील नाका कारकुन (ज्युनी. क्लर्क) या पदावरुन पदावन्नत करुन शिपाई या पदी नियुक्त केले आहे. तसेच सोबत इतरही शिक्षा आदेशीत केल्या आहेत.

अपिलार्थी आपले अपिल विदीत मुदतीमध्ये संबंधीत अधिकाऱ्यांनी अपिलार्थी पुर्ववत नेमणूक करण्यास नकार दिल्यामुळे सदरील आदेशाचे प्रतिसह दाखल करीत आहे.

सदरील अपील करणे कामी खालील प्रमाणे इतर मुद्दे मांडण्यात येत आहे.

अपीलाचे मुद्दे.

१) माननीय आयुक्त महानगरपालिका यांनी दिलेला आदेश हा बेकायदेशीर, परिस्थितीचे कायद्याचे विरुध्द न्याय्य दृष्टीकोनातुन चुकीचा असुन कोणताही अधिकार नसतांना दिला आहे.

२) असे की, सदरील आदेश हा कोणत्याही प्रकारची चौकशी न करता तसेच अपिलार्थीला त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न देता व साक्षीदारांना न तपासता आणि अपीलार्थीला साक्षीदारांची पुर्नतपासणी करण्याची संधी न देता मा. आयुक्तांनी दिला आहे. म्हणुन सदरील आदेश हा बेकायदेशीर व न्यायीक तत्वाचे विरुध्द असुन कायदेशीर तरतुदींचा व नियमांच्या विरुध्द आहे. तसेच सदरील हा "महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस" (कन्डक्ट ऑफ सर्व्हिस नियम १९८९) याचे तरतुदीविरुध्द आहे.

३) असे की, अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यास दिनांक २३-११-८९ च्या आदेशाने निलंबीत करण्यात आले होते. व अपीलार्थीचे म्हणणे आहे की, जेव्हां सदरील निलंबनाचा आदेश देण्यात आला होता. त्या वेळेस अपिलार्थी रजेवर होता व औरंगाबाद मध्ये वास्तव्यास नव्हता. अपिलार्थी हे त्यांची मुलगी चंद्रकांता हिचे किडनीचे उपचाराकामी व्यस्थ होता आणि म्हणुन अपीलार्थीनी त्याचे कार्यालयाकडुन वैद्यकीय रजा घेतलेली होती. अपीलार्थीचे मुलीस डॉ. पारगांवकर यांचे दवाखान्यात उपचारार्थ दाखल केले होते. व तिला दरदिवासआड "डायलिसीस " करावे लागत होते. सर्व प्रकारच्या उपचारानंतरही अपिलार्थी मुलीचे प्रकृतीमध्ये फरक पडला नाही व म्हणुन अपिलार्थीस त्यांचे मुलीस मुंबई येथे "बॉम्बे हॉस्पीटलमध्ये" पुढील उपचारासाठी न्यावे लागले. व तेथुन त्यास हैद्राबाद (आंध्रप्रदेश) येथील महावीर हॉस्पीटल येथे मुलीस दाखल करणे भाग पडले. त्याकाळी अपीलार्थी त्यांचे मुलीचे प्राण वाचविण्यासाठी किडनी दान करणाऱ्या व्यक्तीच्या शोधात होता. वरील सर्व प्रकारामुळे अपीलार्थीस कार्यालयीन काम करणेसाठी वेळ नसल्यामुळे त्याने दिर्घ मुदतीची रजा घेतलेली होती. अपीलार्थीस किडनी दान करणारी व्यक्ती मिळाल्यामुळे त्यांचे मुलीचे प्राण वाचले. अपीलार्थी धावपळ करुन मुलीचे रक्षणात यशस्वी झाला व त्याचे मुलीचे महावीर हॉस्पीटल, हैद्राबाद आंध्रप्रदेश येथे किडनीचे रोपन कार्य झाले. अपीलार्थीची मुलगी त्यानंतर ३० दिवसांनी तिव्र ह्दय विकाराचे झटक्याने हैद्राबाद येथे दिनांक २१-१-९० रोजी मरण पावली. अपिलार्थीने तिचे शव हैद्राबाबद (आंध्रप्रदेश) येथुन औरंगाबाद येथे एकटयानेच आणले. कारण त्यांचे इतर कुटूंबिय मंडळी औरंगाबाद येथेच होती. अपीलार्थीने शेवटी सर्व अत्यंविधी संदर्भात विधी पार पाडले. या सर्व परिस्थितीत अपिलार्थीची मानसिक स्थिती खालावलेली होती आणि अपिलार्थी कोणत्याही प्रकारचे निर्णय घेण्यास असमर्थ होता. अपिलार्थीचे निलंबन या काळामध्ये झाले.

४) असे की, अपिलार्थीने औरंगाबाद येथे आल्यानंतर चौकशी करता असे समजले की, अधिष्ठाता वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालय औरंगाबाद यांनी महापालिकेने जकातीपोटी वसुल केलेल्या रक्कमेबाबत सरकारी ठराव नियमाप्रमाणे वैद्यकीय वस्तुंची जकातीबाबत पत्र पाठविले आहे. अपिलार्थीस पुढे असे समजले की, निरनिराळया जकात नाक्यामधुन घाटी/रुग्णालयाला पाठविण्यात आलेल्या पावत्यांच्या रक्कमेमध्ये (वैद्यकीय रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडुनच वैद्यकीय रुग्णालयातील भांडार गृहातील ) वाढ करण्यात आली आहे. अपीलार्थीला पुढे असेही समजले की, दोन व्यक्ती नामे श्री. जोशी आणि श्री. माने दोघेही वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयातील कर्मचारी (भांडारगृहातील) यांना निलंबीत करण्यात आले आहे. अपिलार्थीचे म्हणणे आहे की, महापालिकेच्या जकात नाक्यातील कामकजामध्ये छापील पावती पुस्तके ज्याला "सी" बुक्स म्हणतात यातील पावत्या जकात रोख घेतल्यानंतर संबंधितांना दिल्या जातात सदर जकाती बाबतच्या पावत्या तीन प्रती मध्ये तयार केलेल्या जातात पैकी मुळ प्रत जी व्यक्ती जकात कर भरते त्या व्यक्तीस दिली जाते. आणि इतर दोन पावत्या महानगरपालिकेच्या दप्तरी ठेवल्या जातात अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यास असे समजले की, मुळ पावत्या ज्या अधिष्ठाता वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालय यांचे नांवे देण्यात आल्या होत्या त्या त्यांचे कर्मचाऱ्यांकडुन म्हणजे वरील निलंबीत दोन व्यक्तीकडुन (भांडार

गृहातील) खोडसाळपणाने बनावटरित्या रक्कम वाढवुन त्यात फेरबद्दल केला होता. महानगरपालिकेच्या जकात नाक्यावर योग्य ती जकात अदा केल्यावर या व्यक्तींनी ओरीजनल पावत्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या योग्य त्या रक्कमेमध्ये फेर बदल केलेत. आणि मुळ दर्शविण्यात आलेल्या रक्कमेवर काही अंक (आकडे) वाढवुन /अंकात फेर बदल करुन वैद्यकीय महाविद्यालय रुग्णाल्याच्या कोषागारातुन जास्त रक्कम हडप करण्याच्या उद्देशाने मुळ पावत्यामध्ये बदल केले व रक्कमेचा अपहार केला सध्या अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांचे आदेशानुसार सदरील व्यक्ती निलंबीत आहेत.

५) अपीलार्थीचे म्हणणे आहे की, त्यास असे दिसुन आले की, अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांनी विनंती करुन सर्जीकल आणि इतर सामानाच्या जादा आकारीले गेलेल्या जकात कराबाबत पैसे परत मिळवत अशी विनंती केली होती. पुढे असेही दिसुन येते की, सन १९८१ ते १९८७ पर्यंत रक्कम रु. ६११९१.३५ पैसे हे अधिष्ठाता यांना दिलेल्या जकातीच्या पावत्यापेक्षा जास्त वसुल केले गेलेले आहेत. अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, अपीलार्थीस निलंबीत आदेश दिला त्यावेळी सदरील रक्कम ६११९१.३५ पैसे चा अपहार अपिलार्थीने एकटयाने केला असा अरोप केला गेला आहे.

६) अपीलार्थीचे असेही सांगणे आहे की, अपीलार्थीने वेळोवेळी अर्ज करुन त्यास मुळ कागदपत्रे पाहण्याची संधी मिळावी मुळ कागदपत्राच्या प्रमाणित नकला मिळाव्यात आणि संबंधित साक्षीदारांचे जबाबाच्या नकला मिळाव्यात यासाठी प्राथमिक चौकशीचे वेळी विनंती केली होती.

अपीलार्थीने प्रत्येक अर्जामध्ये कोणत्याही रकमेचा अपहार केला नाही. असेही निक्षुन सांगितले होते. परंतु अपिलार्थीस धमकावुन व दुष्परिणामाची भिती दाखवुन त्याने अपहार न केलेली रक्कम त्यास जमा करण्यास सांगण्यात आले. अपिलार्थी अशीही धमकी दाखविण्यात आली की, जर अपिलार्थीने रक्कम एकमुस्त जमा केली नाही तर त्याने ती रक्कम हप्त्या हप्त्या जमा करावी नसता अपिलार्थीस अटक करण्यात येईल आणि त्याला हातकडया घालुन शहरातुन फिरविले जाईल. यामुळे अपिलार्थी गोधंळात पडला आणि म्हणुन अपिलार्थीने रक्कम जमा करणेबाबत आणि तरी त्याची इच्छा असल्याबाबत अर्ज दिले. परंतु प्रत्येकवेळी आपल्या अर्जात अपिलार्थीने असे कळविले आहे की, त्याने कोणताही अपहार केलेला नाही. अपिलार्थीस असे अश्वासवन देण्यात आले होते की, आयुक्त महानगरपलिका औरंगाबाद हे त्यांनी जर रक्कम जमा केली तर त्यास परत नोकरीवर घेतील. (दि. इन्स्टेटमेन्ट) या सर्व कारणांमुळे अपीलार्थीने वरील प्रकारचे रक्कम जमा करण्याची इच्छा दर्शविणारे अर्ज दिलेले आहेत.

७) अपिलार्थी असेही सांगतो की, ज्यावेळी दि. २३-११-८९ रोजीचा निलंबन आदेश मिळाला त्यावेळी त्यास सदर आदेशाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे कागदपत्र म्हणजेच "मेमो ऑफ चार्ज" आरोपपत्र किंवा "चार्जशिट" किंवा कारणे दाखवा नोटीस किंवा इतर कागद ज्या योगे आरोपीस निलंबीत करण्यात आलेले आहे. असे काहिहि कागद मिळालेले नाहीत.

८) अपीलार्थी असेही सांगतो की, अपिलार्थीस महानगरपालिका, औरंगाबाद तर्फे ज्या क्र. एम.ए.सी./इसटी-१/६२०९/९०दि. ५-६-९० चे उपआयुक्तांचे सहीचे एक पत्र मिळाले ज्यायोगे अपिलार्थीस असे सांगण्यात आले की, अपिलार्थीने १५ दिवसाचे आंत रक्कम रुपये ६१४९१.३५ पैसे जमा करावे व अपिलार्थी विरुध्द

पुढील योग्य ती कार्यवाही का करु नये. असेही स्पष्टीकरण त्याने द्यावे. या पत्रात पुढे असेही कळविले, की जर अपिलार्थीने या पुत्राची दखल घेतली नाही त्याचे काहीही म्हणणे नाही असे समजुन पुढील कारवाई करण्यात येईल. या रक्कममध्ये मेसर्स मंगल पेपर मार्ट औरंगाबाद विजय साडी सेंटर औरंगाबाद आणि राज क्लॉथ सेटंर औरंगाबाद यांचे कडुन वसुल करण्यात यावयाच्या रक्कम रुपये २९०/-चा समावेश आहे. या पत्रासोबत अपीलार्थीस आरोपात्र देण्यात आले म्हणुन अपिलार्थीस अशी जाणीव झाली की, अपिलार्थी चे विरुध्द खाते निहाय चौकशी करण्यात येईल व हि चौकशी अपिलार्थीचे गैरहजेरीत अपिलार्थीस माहिती न देता संधी न देता प्राथमिक चौकशी करुन करण्यात येत आहे. अपिलार्थीने या जाणीवेमुळे दि. २८-६-१९९० रोजी एक अर्ज दिला. त्यानंतर अपिलार्थीने पुन्हा दिनांक २९-१०-१९९० रोजी दुसरा अर्ज दिला व त्यानंतर दिनांक ३१-१०-९० व १७-११-९०, २७-११-९०, १२-१२-९०, २२-३-९१ आणि शेवटी २६-३-९१ रोजी अर्ज देवुन उपआयुक्त महानगरपालिका /चौकशी अधिकारी यांना अशी विनंती केली की, अपीलार्थीस कागदपत्र पाहण्याची संधी देण्यात यावी व कागदपत्राच्या नकला मिळाव्यात तसेच जर साक्षीदारांचे जबाब नोंदविले असतील तर त्याच्याही नकला मिळाव्यात म्हणजे त्यायोगे अपिलार्थीस त्याचे म्हणणे मांडता येईल. व त्याचा बचाव करता येईल. दुदैवाने एव्हाढया वेळा विनंती करुन सुध्दा अपिलार्थीस कागदपत्रे पाहण्याची संधी देण्यात आली नाही किंवा ज्यास कोणत्याही प्रकारच्या नकला देण्यात आलेल्या नाहीत. अपीलार्थीनेत्यामुळे एक विनंती अर्ज देऊन त्यांचे तर्फे काम करणे व बचाव करणे कामी व त्याचेविरुध्द होणारी खाते निहाय चौकशीत काम करणेकामी वकील नेमण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली. परंतु त्याच्या या अर्जाचाही कोणत्याही प्रकारे उत्तर देण्यात आलेले नाही. वस्तुतः अपिलार्थीच्या अनेकवेळा दिलेल्या कोणत्याही अर्जास उत्तर महानगरपालिकेकडुन मिळाले नाही. आजपर्यंत सुध्दा अपिलार्थीस कोणत्याही प्रकारचे उत्तर न देत फक्त त्याने रक्कम जमा करावी एवढेच कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी हेही नमुद करतो की, मा. आयुक्त महानगरपालिका यांना प्रत्यक्ष भेटुन दिलेल्या दि. १२-१२-९० व १९-१२-९० च्या दोन अर्जात सुध्दा अपिलार्थीने असे नमुद केले की, त्याने कोणत्याही प्रकारचा रक्कमेचा अपहार केलेला नाही. व बनावट व खोटी कागदपत्र केलेली नाहीत. अपिलार्थीवर फार मोठा दबाव आणलेमुळे व त्यास निरनिराळया प्रकारची भिती दाखविल्यामुळे अपिलार्थी रु. १५,०००/- जमा करणेस तयार झाला आणि बाकीच्या रक्कमेबाबतीत अपिलार्थी असे आश्वासन देण्यास तयार झाला की, त्याचे राहते घर तो महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडे तारण ठेवण्यास तयार आहे. अपीलार्थी केव्हांही रक्कमेच्या अपहाराबाबत कबुल झालेला नाही किंवा त्याने केंव्हाही रक्कम स्विकारल्याबद्दल कबुली दिलेली नाही. वस्तुतः रक्कम महानगरपालिकेच्या कोषागारात जमा झालेली असुन ती पावती पुस्तकातील दुसऱ्या व प्रतीती दर्शविलेल्या प्रमाणेच योग्य रित्या जमा झालेली आहे. आणि केव्हांही "ऑडीट" मध्ये हिशेब तपासणीत या बाबतीत कोणत्याही प्रकारे हरकत घेण्यात आलेली नाही. आणि अपीलार्थीच्या विभागात अपिलार्थीच्या नाक्याच्या व्यवहारामध्ये सन १९८१ पासुन ते १९८७ पर्यंत कोणत्याही गैर प्रकाराची नोंद नाही किंवा हिशेब तपासणीत अक्षेप नाही अपीलार्थी असेही नमुद करतो की,

अपिलार्थीने दि. २४-११-९० रोजी त्यास चौकशी अधिकाऱ्यासमोर हजर होणेकामी वेळ मिळावा म्हणुन विनंती केली होती. कारण अपिलार्थी हा त्यावेळी कावीळ आजाराने पिडीत होता. याबाबतीत अपीलार्थीने डॉ. पारगांवकर यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र ज्यावर सिव्हील सर्जन औरंगाबाद हे दाखल केलेले आहे. परंतु एवढे असुनसुध्दा अपिलार्थीस त्याचे म्हणणे मांडणे कामी मुदत देण्यात आली नाही. उलटपक्षी महानगरपालिका तर्फे अपिलार्थीस दि.२६-३-९१, २-४-९१ आणि ९-४-९१ रोजी नोटीसा देण्यात आल्या व अशी विचारणा करण्यात आली की, अपिलार्थीने अपहारीत रक्कम जमा करावी. या नोटीसांवर उपआयुक्त, चौकशी अधिकारी मनपा यांच्या सहया आहेत.

९) अपिलार्थी असेही नमुद की, अपिलार्थीचा असा समज करुन देण्यात आला की, त्याने तात्पुरती रक्कम रुपये १५,०००/- जमा करावी व चौकशीनंतर जर अपीलार्थी निर्दोष आढळला तर त्यास ती परत करण्यात येईल म्हणुन अपीलार्थीने रक्कम रु. १५,०००/- महानगरपालिकेमध्ये जमा केली.

१०) अपीलार्थी असेही नमुद करतो की, अपीलार्थीचे विरुध्द कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यात आलेली नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे साक्षीदार वगैरे तपासण्यात आलेले नाहीत. आणि अपिलार्थीस त्याने विनंती केल्याप्रमाणे केव्हांही कागदपत्र दाखविले नाहीत. आणि दाखविण्याची संधीही दिलेली नाही.

११) अपिलार्थी असे नमुद करतो की, अपिलार्थीस दिनांक १६-५-९१ रोजी ची जा. क्र. अेएसटी/-१/१९६६/९१ असा नंबर असलेली आदेशाची प्रत मिळावी व आदेशान्वये अपिलार्थीस नाका कारकुन या पदावरुन शिपाई या पदावर पदावन्नत करण्यात आले. तसेच इतरही काही सुचना मा. आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका यांनी चौकशी अधिकारी/उपआयुक्त यांच्या अहवालानुसार केल्या आहेत. सदरील आदेश पाहुन अपिलार्थी अर्श्चयचकीत झाला कारण वस्तुत: त्याचे विरुध्द कोणतेही खातेनिहाय चौकशी झालेली नाही. त्याचे हजेरीमध्ये कोणीही साक्षीदार तपासलेले नाहीत. अपिलार्थीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आलेली नाही. अपीलार्थीस केव्हांही कागदपत्रे पाहण्याची संधी देण्यात आलेली नाही. अपिलार्थीस केंव्हाही त्यांनी विनंती केल्याप्रमाणे कागदपत्राच्या किंवा प्राथमिक चौकशीचे वेळी जर साक्षीदार तपासले असतील तर त्यांचे जबाबांचे नकला देण्यात आलेल्या नाहीत. अपिलार्थी विरुध्दचा त्यास नाका कारकुन पदावरुन शिपाई या पदावर पदावनत करणारा हुकूम हा या प्रकारे आकस्मीकरित्या व धक्कादायक स्वरुपाचा असुन तो बेकायदेशीर व आश्र्चकारक आहे.

१२) अपिलार्थी असे नमुद करतो की, अपिलार्थीने याबाबतीत संबंधीत कार्यालयात चौकशी केली परंतु कोणत्याही प्रकारचे योग्य ते उत्तर त्यास मिळाले नाही. म्हणुन अपिलार्थीने दि. २०-५-१९९१ रोजी अर्ज देवुन अशी विनंती केली की, त्यास त्याचे मुळनियुक्ती असलेल्या नाका कारकुन या पदावर त्यास पुन्हा नोकरीवर घेण्यात यावे. अपीलार्थीस असेही समजले की, दुसरी एक व्यक्ती नाके किरण सुरडकर यास सुध्दा नाका कारकुन पदावरुन निलंबीत करण्यात आले होते. त्याचे विरुध्द सुध्दा अपिलार्थी प्रमाणेच आरोप होते. परंतु सदर किरण सुरडकर नाका कारकुन यास त्याचे "दोन इंक्रिमेन्ट" रद्य करुन पुन्हा नाका कारकुन याच पदावर त्यास नेमणुक दिली आहे. अपिलार्थीने सदर सुरडकर यास नेमणुक दिलेली आदेशाची प्रत कार्यालयास मागीतली असता ती

देण्यात आली नाही. अपीलार्थीने दि. ४-७-९१ रोजी पुन्हा विनंती अर्ज करुन त्याचे प्रकरणे फेरविचारार्थ घ्यावे व त्याची नाका कारकुन म्हणुन फेर नियुक्ती करावी अशी विनंती केली परंतु अद्याप पावतो कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नसुन जबाब मिळालेला नाही.

१३) अपिलार्थी असे नमुद करतो की, त्याचेविरुध्द दिला गेलेला दि. २३-११-१९८९ चा निलंबनाचा आदेश हाच मुळात बेकायदेशीर निरर्थक कोणत्याही प्रकारचे अधिकार नसतांना दिलेला आहे. कारण अपिलार्थीस केव्हांही त्याचे म्हणणे मांडण्याची चौकशीचे वेळी हजर राहण्याची व इतर स्पष्टीकरण करण्याची संधी न देता व त्याची बाजु ऐकुन न घेता देण्यात आलेला आहे. खरे तर अपिलार्थीस निलंबीत करण्योच पुर्वी प्राथमिक चौकशीत करावयास हवी होती. आणि सदर चौकशीचे कागदपत्र अपिलार्थीस पाहण्याची व नकल अपिलार्थीस देण्याची व्यवस्था व्हावयास पाहिजे होती. फक्त अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय औरंगाबाद यांनी दिलेल्या जकात रक्कमेच्या अपीलार्थीस कोणताही आधार नसतांना निलंबीत करण्यात आले तसेच अपिलर्थीस कोणतेही स्पष्टीकरण न मागविता व कारण न दर्शविता एकतर्फी आदेश काढण्यात आले वस्तुतः आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांना असे कळविले होते की, त्यांची मागणी ही मुदती बाहेरची आहे. आणि त्यांची दखल घेता येत नाही. या प्रकरणी महानगरपालिकेने अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांना रक्कम दिलेली नसुन उलटपक्षी वैद्यकीय महाविद्यालय यांचा अर्ज नाकारण्यात आलेला आहे. अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय यांनी दाखल केलेल्या पावत्या या मुळात घाटी, मेडीकल हॉस्पीटलच्या कर्मचाऱ्यांनी अपहार करण्याच्या हेतुने बनावटरित्या व खोटया सादर केलेल्या आहेत. सदर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांनी त्या कर्मचाऱ्यांना निलंबीत केलेले आहे. आणि त्यांचेविरुध्द खातेनिहाय चौकशीही सुरु आहे. सदर कर्मचाऱ्यांच्या गैरकृत्यामुळे अपिलार्थीस शिक्षा होणे बेकायदेशीररित्या व अन्याय्य आहे. कारण त्यांनी महापालिकेत जमा केलेल्या रक्कमेच्या व्यतिरिक्त अधिक रक्कम त्यांचे कोषागारातुन घेतलेली आहे. आणि यास कारणीभुत असणाऱ्या व्यक्तींना दोषी न ठरविता अपिलार्थीसच दोषी ठरवुन कारवाई केली आहे.

१४) अपीलार्थी असे नमुद करतो की, कायद्याप्रमाणे अपीलार्थीच्या निलंबनाचे सहा महिन्याचे काळात अपीलार्थीचे विरुध्द काहीही निष्पन्न न झाल्यामुळे अपिलार्थीस त्याचे मुळपदी नाका कारकुन म्हणुन फेर नियुक्तीस ते पात्र आहे.

१५) अपिलार्थीचे असेही म्हणणे आहे की, अपिलार्थीस त्याने त्याचे हक्क अबाधित ठेवुन महापालिकेत जमा केलेल्या सगळया रक्कमा त्यास परत मिळाव्यात.

१६) अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, वस्तुतः अपिलार्थीस दबावाखाली आणुन आणि दुष्परिणामांची भिती दाखवुन त्याचे कडुन काही रक्कम जमा करण्यास भाग पाडलेले होते. तसेच अपिलार्थीस लेखी देणेस व उर्वरीत रक्कमेबाबत लेखी आश्वासन देण्याबाबत भाग पाडण्यात आले होते परंतु सदर लेखी देतेवेळेस सुध्दा अपिलार्थीने असे स्पष्ट नमुद केलेले आहे की, अपीलार्थी चे त्याचे बचावाचा हक्क आबाधित ठेवुन तो सदर लेखी स्वरुपात आश्वासन देत आहे. अपिलार्थीने असे हक्क अबाधीत ठेवुन दिलेले लेखी म्हणणे गैरसमजुतीने त्याची कबुली म्हणुन गृहीत धरले आहे. अपीलार्थी असे स्पष्ट करतो की, त्यांने

केव्हांही गैरवर्तवणुक केलेचे किंवा पैशाचा अपहार केल्याचे कबुल केले नाही. अपिलार्थी असे नमुद करतो की,अपिलार्थी चे कडुन दबावाखाली लिहुन घेतलेले म्हणणे व त्यातही हक्क अबाधीत दिलेले लेखी म्हणणे चुकीने गैरसमजुतीने व काल्पनीकपणे चुकीचा अर्थ लावुन अपिलार्थीची गैरकृत्याची कबुली म्हणुन गृहीत धरले आहे.

१७) अपिलार्थी चे असेही म्हणणे आहे की, त्याने रक्कम रु. ६११९१.३५ पैसे जमा करण्याचे गृहीत धरले असते तरीही अपिलार्थीस एकाचवेळी दोन प्रकारच्या शिक्षा देणे म्हणजेच त्यास पदावनात करणे उचीत होत नाही.

१८) अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, कोणत्याही प्रकारची चौकशी न करता अपिलार्थीस पदावनत करणारा आदेश करणे हे योग्य व उचीत नाही. तसेच अपिलार्थीस कोणतेही कागदपत्र पाहण्याची संधी न देता अपिलार्थीसमोर साक्षीदार न तपासता व अपिलार्थीस म्हणणे मांडण्याची संधी न देता असा आदेश देणे न्याय व उचीत नाही. अपिलार्थीचे असेही म्हणणे आहे की, अपिलार्थीस कोणीही संधी न व चौकशी न करता पदावनत करणे योग्य नव्हते म्हणुन अपिलार्थीस पदावनत करणारा आदेश हा व्यर्थ व बेकायदेशीर आणि कायद्याच्या व तत्वांना अनुसरुन केलेला नाही. तसेच सदर आदेश हा एम.सी.एस.आर. १९८१ च्या कलम ८ व ९ च्या नियमांच्या तरतुदींना अनुसरुन नसुन त्याचे विरुध्द आहे.

१९) अपिलार्थी असे नमुद करतो की, पदावनत करणारा आदेश व पदावनती म्हणजे एम.सी.एस.आर. १९८१ प्रमाणे अत्यंत कठोर अशी शिक्षण आहे. अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थी विरुध्द योग्य ते आरोप न ठेवता व सदर आरोपाबाबत योग्य प्रकारे चौकशी न करता साक्षीदार न तपासता व अपिलार्थीस कोणतीही संधी न देता अशा प्रकारची कठोर शिक्षा देणे हे न्याय व उचीत नाही.

२०) अपिलार्थी असे नमुद करतो की, खाते निहाय चौकशीच्या नियमाप्रमाणे सुध्दा चौकशी कमी ज्याचेवर आरोप असतील त्यास योग्य प्रकारे संधी दिली पाहिजे व त्याचे म्हणणे ऐकुण घेतले पाहिजे. परंतु अपिलार्थीस अशी कोणतीही संध देण्यात आलेली नाही. उलटपक्षी अपिलार्थीने वारंवार विनंती करुनही त्यास संधी नाकारण्यात आलेली आहे.

२१) अपिलार्थीचे असेही म्हणणे आहे की, अपिलार्थीस पदावन्नत करणे व अपिलार्थीचे विरुध्द आयुक्त महानगरपालिका यांनी दिलेला निलंबनाचा आदेश हे दोन्ही ही भारतीय घटनेच्या कलम ३०९ व ३११ (२) च्या तरतुदीच्या विरुध्द आहे.

२२) अपीलार्थी असे म्हणणे आहे की, अपिलार्थी त्याने हक्क अबाधीत ठेवुन जमा केलेली रक्कम रु. १५०००/- परत घेण्यास तो पात्र आहे. तसेच अपिलार्थी त्याची निलंबन काळातील व मागील इतर सर्व येणे असलेली रक्कम पगार इत्यादी मिळण्यास पात्र आहे. अपिलार्थीचे अस म्हणणे आहे की, त्यास निलंबन केल्यानंतर फक्त तीन ते चार महिन्यापर्यंत निलंबन काळामध्ये अर्धापगार दिला जात होता व त्यानंतर आजागायत अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची पगाराची किंवा इतर रक्कम खर्च इत्यादी देण्यात आलेली नाही. म्हणुन अपिलार्थी त्याचे मागील काळातील पुर्ण पगार भत्ते इत्यादी मिळण्यास पात्र आहे. तसेच अपिलार्थी इक्रीमेन्टस आणि इतर नोकरीतील फायदे मिळण्यास पात्र आहे. अपिलार्थी असेही नमुद करतो की, अपिलार्थीचा निलंबन काळ हा आजतागायत

अपिलार्थी नोकरीत आहे. असा धरण्यात यावा. कारण अपिलार्थी विरुध्द देण्यात आलेले सर्व आदेश बेकायदेशीर आणि न्यायाच्या तरतुदीच्या विरुध्द आहे.

२३) अपिलार्थी त्याचे इतर म्हणणे मांडणे कामी सुनावणीचे वेळी परवानगी देण्याची मागणी करत आहे.

२४) म्हणुन प्रार्थना की,

अ) अपिलार्थीचे अपील मंजुर करण्यात यावे. तसेच अपिलार्थीचा दिनांक २३-११-१९८९ चा निलंबनाचा आदेश आणि दिनांक १६-५-१९९१ चा पदावनत करणारा आदेश दोन्हीही आदेश रद्य ठरविण्यात यावेत अपिलार्थीचे हक्कात हुकूम करण्यात यावा. अपिलार्थीस नाका कारकुन (ज्युनि. क्लर्क) म्हणुन त्याचे जकात नाकयाचे मुळ पदावर पुन्हा नियुक्त करणे अपिलार्थीस मागील काळातील पुर्ण पगार भत्ते इत्यादी देय रक्कम तसेच इंक्रिमेंन्टस इत्यादी रकमा देण्याची कृपा व्हावी. अपिलार्थीस सलगतेसह फायदे मिळावेत अपिलार्थीस त्याने हक्क अबाधीत ठेवुन भरणा केलेली रक्कम रुपये १५०००/- महानगरपालिका औरंगाबाद यांच्याकडुन परत मिळावी व महानगरपालिका औरंगाबाद यांना तसे आदेश व्हावेत.

अपीलार्थीचा निलंबन काळ हा आजतागायत पुर्ण वेळ नोकरी काळात गृहीत धरण्यात यावा. तसेच अपिलार्थीचा "सर्व्हिस बुक" मध्ये निलंबनाची आणि पदावनतेचे नोंद न घेण्याचे आदेश व्हावेत. जर अशा प्रकारची नोंद घेण्यात आलेली असेल तर सदर नोंद सर्व्हिस बुकातुन काढण्याचे आदेश व्हावेत.

अपिलार्थीचे गोपनिय अहवालामध्ये जर सदर बेकायदेशीर आदेशामुळे काही ताशेरे मारण्यात आले असल्यास रद्य करावेत व इतर योग्य तो हुकूम अपिलार्थीचे हक्कात व्हावा ही विनंती.

स्वाक्षरीत
पारसमल जवानमल चंडालिया
नाका कारकुन

**संवाद :**

**मा. सभापती :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (क) प्रमाणे श्री चंडालिया यांना निलंबीत करण्यापुर्वी स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली नाही. मा. आयुक्त यांना नगरपालिका कर्मचाऱ्यास निलंबीत करण्याचे अधिकार नाहीत.

**मा. उपआयुक्त, विधी सल्लगार :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (ब) प्रमाणे मा. आयुक्त यांना त्यांच्या अधिपत्याखाली कर्मचारी/अधिकारी असल्यामुळे मा. आयुक्त यांनी कार्यवाही केली आहे.

**श्री. केशव सोनवणे, श्री. गिरजाराम हाळनोर :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे कलम ६७ (३) (ब) अन्वये मा. आयुक्त यांना अधिकार आहेत. तर श्री. जैस्वाल यांचे प्रकरणात उच्च न्यायालयाने प्रकरण स्थायी समिती मार्फत ठेवण्यात यावे असे आदेश का दिले आहेत.

**मा. सभापती :** कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या अपिल प्रकरणात दिनांक २३/१/९२ व ३१/१/९२ च्या पत्रान्वये प्रशासनास खुलासा (से) दाखल करण्याबाबत

कळविण्यात आले होते वरील प्रमाणे लेखी सुचना करुनही प्रशासनातर्फे वेळेवर खुलासा दाखल केला जात आहे हे योग्य नाही.

**मा. उपआयुक्त :** न्यायालयीन प्रकरणातही खुलासा (से) दाखल करण्यास वेळ दिला जातो. तसेच चर्चेच्या वेळीही खुलासा (से) दाखल करता येतो.

**मा. सभापती :** महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस रुल्स १९४९ चे कलम (शिस्त आणि अपील) नियम १९७९ चे कलम ५ मध्ये ज्या शास्ती दर्शविल्या आहेत त्या शास्ती विरुध्द सदरील नियमाचे नियम क्र. १७ अन्वये वरिष्ठ प्राधिकारणाकडे अपील करता येते. या अन्वये सभागृहासमोर दाखल करण्यात आलेल्या अपिल प्रकरणात सुनावणी करण्यात येत आहे.

**मा. उपआयुक्त :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ बाबतचे सर्व अधिकार सर्वसाधारण सभेस आहेत. यापैकी काही अधिकार स्थायी समितीस व काही अधिकार मा. आयुक्त यांना दिले आहेत. त्यानुसार मा. आयुक्तांनी कार्यवाही केली. म्हणजेच सर्वसाधारण सभेचे अधिकारात कार्यवाही केली आहे.

**श्री. केशव सोनवणे, श्री. अलीम बेग, श्री. गिरजाराम हाळनोर :** एखाद्या कर्मचाऱ्यास त्याच्या मुळ पदापेक्षा कमी पदावर नियमाप्रमाणे पाठविता येते काय याचा खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार :** एखाद्या कर्मचाऱ्यास त्याच्या मुळ पदापेक्षा कमी पदावर पाठविता येत नाही.

**श्री. केशव सोनवणे :** सदर प्रकरणात संबंधिताचे दोन वेतनवाढ रोखण्यात येऊन त्यांना मुळ पदावर कामावर घेण्यात यावे.

**मा. उपआयुक्त :** सदर प्रकरणी प्रशासनातर्फे लेखी खुलासा (से) खालील प्रमाणे.

१) मा. आयुक्त यांनी दिलेला आदेश हा नियमास धरुन दिलेला आहे.

२) श्री चंडालिया यांना दि. ६-८-९० ते २३-११-९० दरम्यान ७ वेळेस त्यांची बाजु मांडण्यासाठी संधी देण्यात आली होती. परंतु श्री चंडालिया यांनी दि. १९-१२-९० रोजी समक्ष हजर राहुन रक्कम रु. ६११९१.३५ अफरातफर केल्याची कबुली दिली व तसा लेखी अर्ज दिलेला आहे. तसेच त्यांनी विनंती केली होती की, यापुढे त्यांच्या विरुध्द प्रस्तावित केलेली चौकशी मागे घेण्यात यावी. त्यामुळे त्यांचे म्हणणे संधी न देता महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस (कन्डक्ट ऑफ सर्व्हिस नियम १९८१) च्या तरतुदी विरुध्द आहे हे बरोबर नाही.

३) श्री. चंडालिया यांचे म्हणणे आहे की, त्यांना निलंबर केले त्यावेळी ते रजेवर होते व औरंगाबाद मध्ये नव्हते. परंतु जरी ते रजेवर असले तरी नियमानुसार ते कामावरच होते करीता त्यांचे हे म्हणणे नियमास धरुन नाही.

४) मुद्या क्र. ४ मध्ये अपिलार्थीचे जे म्हणणे आहे त्यांच्या केसशी काही संबंध येत नाही. मुख्य लेखा परिक्षक यांनी सविस्तर रेकॉडशी पाहणी करुन श्री चंडालिया यांनी र. रु. ६११९१.३५ ची अफरातफर केल्याचे सिध्द केलेले आहे.

५) मुख्य लेखा परिक्षक यांनी सादर केलेल्या अहवालावरुन श्री. चंडालिया यांनीच संपुर्ण रकमेचा अपहार केल्याचे स्पष्ट झाले आहे.

६) मुद्या क्र. ७ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही कारण की, त्यांना मुळ कागदपत्रे पाहण्यासाठी संधी देण्यात आली होती. तसेच त्यांना धमकी व भिती दाखवुन जर रक्कम एकमुस्त भरली नाही तर ती रक्कम हप्त्या हप्त्याने जमा करावी नसता त्यांना अटक करण्यात येईल आणि त्यांना हातकडया घालुन शहरातुन फिरविले जाईल. हे म्हणणे साफ खोटे असुन दिशाभुल करणारे आहे. श्री. चंडालिया यांनी स्वखुशीने रक्कम जमा करण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्यावर कोणतेही दडपण आणण्यात आले नव्हते किंवा त्यास परत नोकरीवर घेण्याचे आश्वासन दिले नव्हते.

७) मुद्या क्र. ७ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही. त्यांना ज्यावेळी निलंबन आदेश देण्यात आले होते. त्याचबरोबर नियमानुसार इतर कागदपत्रे देता येत नाही. ज्या अर्थी एव्हढया मोठया रकमेचा अपहार केल्याचे सिध्द झाले. त्या अर्थी त्यांना त्वरीत निलंबन करणे आवश्यक होते. नंतर त्यांच्या विरुध्द खातेचौकशी प्रस्तावित करुन आरोपपत्र, लेखा परिक्षण अहवाल व इतर कागदपत्रे देण्यात आलेली आहे.

८) मुद्या क्र. ८ मध्ये अर्जदाराचे म्हणण्यानुसार त्यांना रक्कम रुपये ६११९१.३५ पैसे जमा करण्याबाबत पत्र दिले होते. या व्यतिरिक्त त्यांचे जे म्हणणे आहे ते बरोबर नाही. चौकशी अधिकारी यांनी त्यांना त्यांची बाजु मांडण्यासाठी संधी दिलेली होती. मेडीकल कॉलेजतर्फे जेव्हां रिफंडबाबत अर्ज व मुळ पावती सादर करण्यात आली होती त्या मुळ पावती मध्ये खाडाखोड दिसल्यामुळे वर्ष १९८१ ते ८७ पर्यंतचे संपुर्ण रेकॉडचे लेखा परिक्षण करण्याचे ठरले.

९) मुद्या क्र. ९ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही.

१०) मुद्या क्र. १० मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही. नियमानुसार संपुर्ण चौकशी करण्यात येऊन निर्णय घेण्यात आलेला आहे.

११) मुद्या क्र. ११ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही.

१२) मुद्या क्र.१२ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही. श्री.किरण शिरोडकर यांच्या विरुध्द खाते चौकशी प्रस्तावित करुन नंतरच त्यांना शिक्षा करण्यात आलेली आहे.

१३) मुद्या क्र. १३ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही.

१४) मुद्या क्र. १४ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही. अफरातफरीची केस असल्यामुळे चौकशीसाठी जास्त वेळ लागला आहे.

१५) मुद्या क्र. १५ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही.

१६) मुद्या क्र. १६ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही.

१७) मुद्या क्र.१७ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही. प्रशासकीय दृष्टीकोनातुन तसेच नियमानुसार चौकशी करुन त्यांना शिक्षा करण्यात आलेली आहे.

१८) मुद्या क्र. १८ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही.

१९) मुद्या क्र. १९ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही.

२०) मुद्या क्र. २० मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही.

२१) मुद्या क्र. २१ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही.

२२) मुद्या क्र. २२ मध्ये अपिलार्थीचे म्हणणे बरोबर नाही. कारण त्यांनी रक्कम भरण्याची संमी दर्शविलेली आहे. नियमानुसार निलंबन भत्ता देण्यात आलेला आहे. तरी मा. सभापती, स्थायी समिती यांना विनंती की, श्री पारसमल चंडालिया यांचे विरुध्द असलेल्या आरोपासंबधी केलेल्या कार्यवाहीस ते पात्र आहेत व प्रशासनाने घेतलेल्या निर्णय योग्य आहे. तरी श्री. चंडालिया यांनी केलेले अपील फेटाळण्यात यावे.

**ठराव :**

महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस (शिस्त आणि अपिल) १९७९ चे कलम ५ मध्ये ज्या शास्ती दर्शविलेल्या आहेत त्या शास्ती विरुध्द सदरील नियमाचे नियम क्र. १७ अन्वये वरिष्ठ प्राधिकरणाकडे अपिल करता येते. दिनांक १६-५-९१ च्या आदेशान्वये श्री. चंडालिया यांना पदावनत केले आहे. याबाबत विधी सल्लगार यांचेशी झालेल्या चर्चेनुसार श्री. चंडालिया यांना पदावनत करता येत नाही. या आधारे श्री चंडालिया यांना त्यांच्या मुळ पदावर बहाल करण्यात येते. श्री. चंडालीया यांनी मा. आयुक्त यांचे अहवालानुसार पुर्ण रक्कम तसेच श्री. चंडालीया यांचे दोन वेतनवाढी कायमस्वरुपी बंद करण्यात यावेत आणि निलंबन काळ त्यांना हक्क असलेल्या रजेत रुपांतर करण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६९/३ :**

श्री. अब्दुल हसन, कनिष्ठ लिपीक यांनी दाखल केलेल्या अपिलावर चर्चा करणे.

**अपील**

**विषय :-** जेष्ठ लिपीक या पदावरुन कनिष्ठ लिपीक या पदावर पदावन्वीत केल्याबद्दल मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये अपिल.

अपील ---------------------------------------

महोदय,

वरील विषयी विनंती की, कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/४७६८/९१ दि. ६-११-९१ अन्वये मला महानगरपालिकेच्या फंडाचा अपहर केल्याचे आरोपावरुन जेष्ठ लिपीक या पदावरुन कनिष्ठ लिपीक या पदावर पदान्वित करण्यात आले आहे. सदरील आदेशाविरुध्द मी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये विहित मुदतीच्या आत स्थायी समितीपुढे ही अपिला सादर करीत आहे. (सोबत आदेशाची प्रत जोडली आहे.)

१) या प्रकरणी प्रथम मला कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/३४६७/९१ दि. १६.८.९१ अन्वये लेखा परिक्षणाने दिलेल्या अहवालावरुन रु. १७७३८/- एवढया रकमेचा अपहार केल्याचे कामावरुन निलबीत करण्यात आले होते. (सोबत आदेशाची प्रत जोडली आहे).

या प्रकरणी मी सर्व प्रथम नमुद करु इच्छितो की, सदरील आदेशामध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, "लेखा परिक्षणाने दिलेल्या अहवालावरुन" परंतु हा अहवाल लेखा परिक्षणाने दिला नसुन हा खोटा अहवाल श्री. एन. एफ. पगारे उपलेखापाल व श्री. भास्करराव देशमुख, लेखाधिकारी यांनी दिला आहे व मला हेतु परस्कर बदनाम करण्यासाठी व त्रास देण्यासाठी या दोघांनी कट रचला आहे. ज्यामुळे मला निलंबीत करण्यात आले. मुंबई प्रांतिक

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (एफ) अन्वये कार्यवाही करुन निलंबीत करण्याचे अधिकाराचा गैरवापर करण्यात आला आहे.

२) आश्चर्याची गोष्ट आहे की, ज्या बिलाबाबत हा अहवाल देण्यात आला आहे. ती बिले वरील दोन्ही अधिकाऱ्यांनीच पारित केलेली आहेत व ही बिले पारित करतेवेळी त्यांनी या बिलात काहीही चुका न काढता पारीत केलेली आहेत. म्हणजे ती बिले बरोबर होती हे सिध्द होते. त्यांनी पारित केलेल्या बिलाप्रमाणें कर्मचाऱ्यांना त्याप्रमाणे पगाराचे वाटप करण्यात आलेले आहे. पारित केलेल्या बिलांच्या रक्कमेत काही खाडाखोड नाही. यात रक्कमेचा अपहार झालेला नाही. फक्त अनावधाने गणित पध्दतीत काही चुका झाल्यामुळे कर्मचाऱ्यांना पगारात जास्त रक्कम वाटप करण्यात आली आहे. जे की पगार वाटप पत्रकावरुन दिसुन येईल.

३) परंतु माझ्यावर अफरातफरचे खोटे आरोप लावुन मला निलंबीत करण्यात आले व वरील दोन्ही अधिकाऱ्यांना ज्यांनी ही बिले पारित केलेली आहेत त्यांचेविरुध्द काहीच कार्यवाही करण्यात आली नाही. मला निलंबीत करण्यात आल्यामुळे माझ्या मनावर फार वाईट परिणाम झाला कारण माझ्या २८ वर्षाच्या सेवेत माझ्या हातुन कोणत्याही प्रकारच्या चुका झालेल्या नाहीत. अचानकपणे मला निलंबीत करण्यात आल्यामुळे माझा मानसिक दबाव वाढला. मानसिक दबाव आणि घाबरलेल्या परिस्थितीत मी दि. २७-८-९१ रोजी अर्ज सादर केला की, नजरचुकीने जी काही रक्कम कर्मचाऱ्यांना जास्त वाटप करण्यात आली आहे ती रक्कम मी सशर्थ (Under Protest) भरीत आहे. तरी रक्कम भरण्याची परवानगी द्यावी. त्यानुसार मा. आयुक्त साहेब यांनी रक्कम भरण्याची परवानगी दिल्यानंतर लेखाधिकारी व लेखापाल यांनी काढलेली एकुण रक्कम रु. ४५,४७०/- (ही रक्कमही बरोबर काढली नाही मी बिले तपासली तेव्हा अशी रक्कम रु. ४१,४७०/- इतकी आहे. परंतु वरील अधिकाऱ्यांनी रु. ४०००/- हेतुपरस्कर जास्त रक्कम दाखविली यावरुन सिध्द होते की वरील अधिकाऱ्यांनीच मला हेतु पुरस्कर त्रास देण्यासाठी हा कट रचलेला आहे. जेंव्हा त्यांना एकुण रक्कम ही काढता येत नाही अशा अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालावरुन मला निलंबीत करण्यात आले. व मला मानसिक त्रास झाला) ही रक्कम सशर्थ (Under Protes) कार्यालयात जमा केली. सदरील रकमेचा भरणा मी आपले घर विकुन या आपेक्षाने केला की, माझ्या सेवेवर काही काही परिणाम होऊ नये व मला पुर्ववत कामावर घेतले जाईल. रक्कमेचा भरणा केवळ मानसिक दबाव आणि घाबरलेल्या परिस्थितीमुळे करण्यात आला. गुन्हा कबुल करुन नाही.

४) परंतु सदरील रक्कम भरल्यानंतरही व मी रकमेचा अपहार केल्याचे कबुल केले नसतांनाही कार्यालयातर्फे मला कारणे दाखवा नोटीस क्र. मनपा/अस्था-१/४३१०/९१ दि. ३-१०-९१ अन्वये विचारण्यात आले की आपण पगार देयकात खाडाखोड करुन रकमेचा अपहार केला असे आपण दि. २७-८-९१ रोजी दिलेल्या अर्जाद्वारे कबुल केले आहे. तरी आपणास सेवेतुन बडतर्फ का करण्यात येऊ नये. (सोबत कारणे दाखवा नोटीसची प्रत जोडली आहे.)

५) ही कारणे दाखवा नोटीस मिळालयानंतर मला आश्चर्य वाटले की, मी तर २७-८-९१ रोजी सादर केलेल्या अर्जात कुठेही रकमेचा अपहार केल्याचे कबुल केलेले नाही. अफरातफर केल्याची सिध्दही झाले नाही व जेव्हां मी रक्कम ही

सशर्थ (Under Protes) जमा केली. की चौकशीअंती ही रक्कम मला परत मिळेल. रक्कम भरण्याचा उद्देश फक्त एवढाच होता की, मला पुर्ववत कामावर घेतले जाईल. सदरील अर्जात मी स्पष्टपणे नमुद केलेले आहे की, मी रकमेचा अपहार केला नाही. (कृपया माझा अर्ज दि. २७-८-९१ चे अवलोकन करावे.)

६) परंतु या अर्जावरुन माझ्याकडुन पैसे भरुन घेतले व अर्जातील बाकीच्या मजकुराबाबत काहीच दखल घेण्यात आली नाही. व मा. आयुक्त यांचेकडे खोटे रिपोर्ट सादर करण्यात आले की, मी पैसे भरुन गुन्हा कबुल केला आहे. व आता खाते चौकशी गरज नाही. शिक्षेसाठी प्रकरण मा. आयुक्त साहेब यांचेकडे सादर करण्यात आले. मा. आयुक्त यांना वरील प्रमाणे चुकीचा रिर्पोट देण्यात आला. त्या मुळे त्यांनी मला कामावरुन बडतर्फ करण्यासाठी परिच्छेद ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस दिली.

७) दि. १-११-९१ रोजी मा. आयुक्त यांना पुन्हा अर्जाद्वारे मी विनंती केली की, मी रकमेचा अपहार केलेला नाही. फक्त नजर चुकीने काही कर्मचाऱ्यांना पगारात जास्त रक्कम वाटप करण्यात आली आहे. ही चुकही तेव्हां माझी मानसिक स्थिती (काही लोकांनी माझ्या विरुध्द खोटी तक्रार केली होती म्हणुन) बरोबर नव्हती म्हणुन चुका झाल्या आहेत. चुकांमुळे जी काही रक्कम जास्त वाटप करण्यात आली आहे. ती रक्कम मी दि. २-९-९१ रोजी कार्यालयात जमा केली आहे. तरी मला क्षमा करुन मला पुर्ववत कामावर रुजु करुन घ्यावे (सोबत माझी मन:स्थिती बरोबर नव्हती याबाबत डॉक्टरांचे प्रमाणपत्र ही सादर केले.)

८) हा अर्ज दिल्यानंतर मला अपेक्षा होती की, मा. आयुक्त साहेब वरील परिस्थितीचा सहानुभूतपुर्वक विचार करुन मला काही Minor Punishment, म्हणजे माझी एक किंवा दोन वार्षिक वेतनवाढ रोखुन मला पुर्ववत जेष्ठ लिपीक या पदावर रुजु करुन घेईल. परंतु कार्यालयातर्फे मा. आयुक्त यांना जो चुकीचा रिर्पोट देण्यात आला होता की, मी पैसे भरले आहे आणि गुन्हा कबुल केला आहे. त्यामुळे मा. आयुक्त यांची दिशाभुल झाली व त्यांनी मला फार मोठी शिक्षा Major Punishment म्हणजे मला जेष्ठ लिपीक या पदावरुन कनिष्ठ लिपीक या पदावर पदावन्वित केले आहे. त्यामुळे माझ्यावर फार मोठा अन्याय झालेला आहे.

९) जेंव्हा अधिकारी/कर्मचाऱ्यांकडुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते तेंव्हा त्याची भरपाई संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेकडुन करुन घेणे किंवा त्यांचे पगारातुन रक्कम वसूल करुन भरपाई करणे ही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ई) अन्वये ही एक शिक्षा आहे. तेंव्हा महानगरपालिकेचे जे नुकसान झाले होते. त्याची भरपाई मी आपले घर विकुन दिली असतांना मला पदान्वित करुन दुसरी मोठी शिक्षा देण्यात आली आहे. म्हणजे लहान चुकाबद्दल दोन शिक्षा देण्यात आली. त्यामुळे माझ्या २८ वर्षाच्या सेवेवर फार मोठा परिणाम होणार आहे व दरमहा आर्थिक नुकसान ही भोगावे लागणार आहे.

१०) गेल्या २८ वर्षाच्या सेवा काळात मी प्रत्येक शाखेमध्ये प्रामाणिकपणे काम केलेले आहे. त्याची खात्री आपण माझे दरवर्षीचे गोपनीय अहवाल पाहिल्यास पटेल. चांगले काम केल्याबद्दल मला वेळोवेळी प्रशस्ती पत्रे मिळालेली आहेत. तत्कालीन प्रशासक मा. सतीश त्रिपाठी साहेब, मा. शंकर मेमन साहेब, तसेच माजी उपआयुक्त श्री. रावळे साहेब यांनी मला प्रशस्ती पत्रे दिलेली आहेत.

११) मी कधीही महानगरपालिकेचे नुकसान होऊ दिले नाही. त्या बद्दल काही उदाहरण मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

अ) मी नोव्हेंबर ९० ते मे ९१ या कालावधीत अंतर्गत लेखा परिक्षक काम करत असतांना शहर अभियंता/उपअभियंता (बांधकाम) यांचेकडुन एम.बी. नंबर ३३० मध्ये श्री डी. अजितसिंग यांचे बळवंत वाचनालय ते हायकोर्ट या रस्त्याचे बांधकामाचे बिलात रुपये ६५,०००/-जास्त रकमेचे बिल तयार करुन पाठविण्यात आले होते. मी या बिलाची तपासणी करुन रु. ६५०००/- बिलामधुन कमी करुन बिल पास केले व महानगरपालिकेचे नुकसान होऊ दिले नाही.

ब) तसेच वरील अधिकाऱ्यांकडुन एम. बी. नंबर २१२ मध्ये श्री एस. पी. सरोदे गुत्तेदार याचे रु. २०००/- जास्त रकमेचे बिल तयार करुन पाठविले होते. या बिलाची तपासणी करुन मी बिलामधुन रु. २०००/- कमी करुन बिल पास केले.

क) उपअभियंता (विद्युत) यांचे कडुन चिंतामणी ट्रेडिंग कंपनी यांचे खालील दर्शविलेल्या एकुण तीन बिलात रु. २२५००/- जास्त रकमेचे देयक तयार करुन पाठविण्यात आले होते.

| | |
|---|---|
| १) एम. बी. नंबर - १२ | रु. ७५००/- |
| २) एम. बी. नंबर - १२ | रु. ७५००/- |
| ३) एम. बी. नंबर - १४५ | रु. ७५००/- |
| | --------------------- |
| | रु. २२५००/- |

वरील बिलांची तपासणी करुन मी सदरील बिलामधुन रु. २२५००/- कमी करुन बिले पास केली.

ड) आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडुन मेसर्स केनकरे ब्रदर्स मुंबई बिलात रु. ४०००/- जास्त रकमेचे देयक तयार करुन पाठविण्यात आले होते मी या बिलाची तपासणी करुन बिलामधुन रु. ४०००/- कमी करुन बिल पास केले.

वरील दर्शविल्याप्रमाणे मी एकुण ९३,०००/- हजाराचे महानगरपालिकेचे नुकसान होऊ दिले नाही. या व्यतिरिक्त या सहा महिन्याच्या कालावधीत जेंव्हा मी अंतर्गत लेखा परिक्षक या पदाच्या कार्यभार स्विकारला होता त्यावेळेस अधिकारी वर्ग/कर्मचारी वर्ग यांचेकडुन बरेच वर्षापासुन एकुण १६ लाख रु. ॲडव्हान्स रुपये रकमेचे हिशोब येणे बाकी होते. मी या ६ महिन्यापासुन अल्पावधित अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना नोटीसा देवुन एकुण १६ लाख पैकी (४) चार लाख रुपयांचे हिशोब मागवुन घेतले. अजुनही कित्येक वर्षापासुन अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी घेतलेले ॲडव्हान्स रकमेचे हिशोब दाखल केलेले नाहीत व त्यांना याबाबत कोणीही विचारत नाही. ही रकमेची अफरातफर नाही का?

तरी आपणास विनंती की, वरील बाबींचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन रकमेचा अपहार केल्याचे आरोप खोटे व निराधार असल्यामुळे तसेच अक्षेपित रक्कम जमा करण्यात आली असल्यामुळे महानगरपालिकेचे काहीही नुकसान झाले नाही. तेंव्हा मला संदर्भीय कार्यालयीन आदेशान्वये पदान्वित केल्याचे आदेश त्वरीत रद्द करण्यात यावे. व मला पुर्ववत जेष्ठ लिपीक या पदावर पदस्थापीत करण्याचे आदेश व्हावे ही विनंती.

आपला विश्वासु

(अब्दुल हसन)
लिपीक झोन नं. ६,
महानगरपालिका, औंरगाबाद.

**संवाद :**

**मा. उपआयुक्त :** सदर प्रकरणी प्रशासनातर्फे लेखी खुलासा (से) खालील प्रमाणे.

१) मुद्या क्र. १ वर प्रशासनातर्फे खुलासा करण्यात येतो की, श्री. अब्दुल हसन यांना लेखा परिक्षणाच्या अहवालावरुन निलंबीत केले आहे. हे बरोबर आहे. कारण श्री पगारे उप लेखापाल व श्री भास्करराव देशमुख, लेखाधिकारी यांना मा. आयुक्त यांनी लेखा परिक्षण करण्याचे आदेशीत केले होते. त्यामुळे त्यांनी लेखापरिक्षण करुन अहवाल सादर केला होता. व तो लेखा परिक्षण अहवाल बरोबर आहे.

२) मुद्या क्र. २ वरील अब्दुल हसन यांचे स्पष्टीकरण चुक आहे. कारण पगाराचे बिले तपासता खाडाखोड केलेली नव्हती. बिले पास झाल्यानंतर देयकात खाडाखोड करण्यात आली आहे. अनावधानाने बेरीज चुक होते. हे एक किंवा दोन बिलात ठिक आहे. परंतु बऱ्याच बिलात खाडाखोड करण्यात येऊन पैसे जास्त दर्शवुन अपहार केलेला आहे.

३) मुद्या क्र. ३ वरील खुलासा असा की, पगाराचे देयक तपासणी करीता वेळेवर सादर करण्यात येत होते. पगाराच्या दिवशी पगार देय दिल्यानंतर तपासणी करण्यात येत असे. श्री. अब्दुल हसन यांनी जर अफरातफर केली नसती तर सदरील रक्कम रु. ४५४७०/- ही त्यांनी कार्यालयात जमा केली नसती. ज्या अर्थी त्यांनी रक्कम जमा करुन घेण्याची विनंती केली आहे. त्यावरुन त्यांनी अफरातफर केली हे सिध्द होते. त्यांनी सदरील देयकाची पडताळणी करुन जी ४०००/- रुपये कमी दाखविली आहे ते चुक आहे. लेखापरिक्षण फेरपडताळणी अंती त्यांन रक्कम रु. ४५७००/- रुपयाची अफरातफर केली होती. हे सिध्द झाले आहे. त्यांना जाणुन बुजून कोणत्याच अधिकाऱ्याने त्रास दिला नाही. सदरील लेखा परिक्षण कार्यालयाच्या नियमाप्रमाणे करण्यात आले आहे.

४) असे की, त्यांना अफरातफरीची रक्कम कार्यालयात जमा केल्यानंतर त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती की, त्यांना सेवेतुन बडतर्फ का करण्यात येऊ नये. ही कार्यालयीन कार्यवाही बरोबर आहे. कारण अफरातफरीच्या आरोपात बडतर्फीची शिक्षेस कर्मचारी पात्र असतात.

५) असे की, एखादी मोठी रक्कम म्हणजे ४५४७०/- रुपये कार्यालयात जमा करण्याची परवानगी घेणे व नंतर मी अफरातफर केली नाही हे म्हणणे बरोबर नाही.

६) असे की, श्री. अब्दुल हसन यांचे प्रकरण अफरातफरीचे होते. अंतिम लेखा परिक्षण अहवाल मुख्य लेखा परिक्षकाकडुन आला होता. व त्यांना अफरातफर केली होती. म्हणुन निलंबीत केले होते. मुळ आरोप लेखा परिक्षणामुळे सिध्द झाल्यामुळे खाते चौकशी करण्याची आवश्यकता भासली नाही व अफरातफरीच्या आरोपात जी शिक्षा नियमाप्रमाणे द्यायची असते ती शिक्षा म्हणजे जेष्ठ लिपीक पदावरुन लिपीक पदावर पदावन्नत केलेले.

७) मुद्या क्र. ७ बाबत काही म्हणायचे नाही.

८) असे की, मुद्या क्र. ८ मध्ये अर्जदारचे म्हणणे खोटे असुन अर्जदार यांनी गुन्हा कबुल केला आहे. त्यामुळे मा. आयुक्तांची कार्यालयीन दिशाभुल केली यामध्ये तथ्य नाही. मा. आयुक्तांनी गुन्ह्याचे स्वरुप पाहता संबधीताना पदावन्नत करण्याचा योग्य निर्णय घेतला आहे. त्यामुळे अर्जदारावर अन्याय झाला हे म्हणणे बरोबर नाही.

९) परिच्छेत क्र. ९ मध्ये जेव्हढया रकमेचा अपहार केला तेवढी रक्कम भरणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. पगाराच्या देयकात खाडाखोड करुन अपहार केला आहे. त्यामुळे ते शिक्षेस पात्र आहत. म्हणुन अर्जदारास लहान चुकाबाबत दोन शिक्षा देण्यात आली हे म्हणणे खोटे आहे.

१०) काहीही म्हणणे नाही.

११) मूद्या क्र.११ मध्ये अर्जदाराने उदाहरणे दाखविली आहे ते त्यांच्या कामाचे स्वरुप असल्यामुळे प्रशासनास काहीही म्हणावयाचे नाही.

म्हणुन मा. सभापती स्थायी समिती यांना विनंती की, संबंधीतास महानगरपालिका रक्केचा अफरातफर केली आहे. त्यामुळे मा. आयुक्तांनी घेतलेला निर्णय योग्य आहे.

**ठराव :**

महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस (शिस्त आणि अपिल) नियम १९७९ चे कलम -५ मध्ये ज्या शास्ती दर्शविलेल्या आहेत त्या शास्ती विरुध्द सदरील नियमाचे नियम क्र. १७ अन्वये वरिष्ठ प्राधिकरणाकडे अपिल करता येते. श्री अब्दुल हसन यांना कारणे दाखवा नोटीस न देता संबंधितावर कार्यवाही करण्यात आली हे नियमाप्रमाणे योग्य नाही. पे बील तपासणीच्या कामात वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण नव्हते म्हणुन हे प्रकरण घडले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पे बिल तपासणीच्या कामात काटेकोर तपासणी केली नाही. म्हणुन एकाच कर्मचाऱ्यास जबाबदार धरणे योग्य होणार नाही संबंधीत कर्मचारी श्री. अब्दुल हसन यांनी रक्कम रुपये जका केली आहे. म्हणुन श्री. अब्दुल हसन यांना त्यांचे वरिष्ठ लिपीक या पदावर ठेवुन संबंधीताच्या दोन वेतनवाढी कायमस्वरुपी बंद ठेवण्यात याव्यात असे सर्वानूमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७०/४ :**

श्री. महमंद उमरदराज खान, कनिष्ठ लिपीक झोन क्र. ६ यांनी दाखल केलेल्या अपिलावर चर्चा करणे.

**अपील :**

विषय :- जेष्ठ लिपीक या पदावरुन कनिष्ठ लिपीक या पदावर पदान्वित केल्याबद्दल मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये अपिल.

संदर्भ :- कार्यालयीन आदेश क्र. मनपा/१/१३४/४१९ दिनांक २३-९-१९८७.

१) मे. सभापती यांना दिलेला अर्ज दिनांक १०-१-९०.

२) मे. सभापती यांना दिलेला अर्ज दिनांक २६-६-९१.

महोदय,

वरील विषयी विनंती की, संदर्भीय कार्यालयीन आदेशान्वये मला रुपये ८२५०/- एवढ्या रक्कमेचे अफरातफर केल्याचे आरोपावरुन जेष्ठ लिपीक या पदावरुन कनिष्ठ लिपीक या पदावर पदान्वित करण्यात आले आहे. या आदेशविरुध्द मी स्थायी समितीपुढे

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये अपिल दाखल करीत आहे. यापुर्वी मी सदरील अधिनियमाच्या कलमान्वये मुदतीच्या आत म्हणजे दि. २९-२-१९८७ रोजी मा. प्रशासक यांचेकडे या प्रकरणी फेरविचार करण्यासाठी अर्ज सादर केले होते. तसेच सन १९८८ बरेच अर्ज सादर केले परंतु त्यावर काहीही कार्यवाही करण्यात आली नाही. म्हणुन आता आपल्या समिती पुढे ही अपिल सादर करीत आहे.

१) कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/५९१८/८६ दि. १४-८-८६ अन्वये दि. १७-७-८४ रोजी रु. ८२५०/- शालेय वहया खरेदीसाठी अग्रीम म्हणुन कार्यालयातुन घेतले परंतु वह्या खरेदी केल्या नाहीत किंवा पैसे परत केले नाहीत व पैशाची अफरातफर केली. या आरोपावरुन मला निलंबीत करण्यात आले होते व माझ्‍ याविरुध्द खाते चौकशी सुरु करण्यात आली होती. श्री. व्ही. डी. अनगळ कार्यकारी अभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आली होती.
२) या प्रकरणी हकीकत अशी आहे की, सदरील ॲडहान्स माझ्या नांवावर नसुन शिक्षणाधिकारी यांचे नावावर आहे. त्यांनी मला वह्या खरेदीसाठी ती रक्कम दिली होती मी रजेवर असतांना रु. ८२५०/- श्री. डोगंरगांवकर शिक्षणाधिकारी यांनी माझ्याकडुन रुपये ३०००/- परत घेतले. बाकीची रक्कम मी माझ्या कपाटात ठेवली होती. मी रजेवर असल्यामुळे शिक्षणाधिकारी यांनी मला घरी पत्र पाठवुन कपाटाची किल्ली मागवुन घेतली व मला त्याच दिवशी म्हणजे दि. ११-६-८५ रोजी कार्यमुक्त केले. व कार्यमुक्त आदेश क्र. ५३४ दि. ११-६-८५ बंद पाकीटात माझ्या घरी पाठविला.
३) अग्रीम रक्कमेचा हिशोब दाखल केल्यास कार्यालयातर्फे मला काहीही सुचना देण्यात आली नव्हती. तसे मला हिशोब दाखल करण्यास सुचविण्यात आले असते तर मी त्याबाबत खुलासा केला असता अग्रीम रक्कम रुपये घेणे ही रक्केची अफरातफर नव्हे कारण अजुनही कित्येक वर्षापासुन अधिकारी/कर्मचाऱ्यांवर लाखो रुपये अग्रीम बाकी आहे. व त्यांनी हिशोब सादर केला नाही. ही पण अफरातफर समजण्यात यावे.
४) श्री. डोगंरगांवकर शिक्षणाधिकारी यांनी एकतर माझ्याकडुन सदरील रक्कम घेतली व कार्यालयात खोटा रिर्पोट दिला. सदरील रक्कम रु. ८२५०/- म्हणजे ८२५०/- ऐवजी ८५०० जास्त रक्कम कार्यालयात जमा करण्यासाठी मला फोनवर झोन क्र. ३ येथे धमकी देत होते. नाईलाजाने मी दि. १९-८-८६ रोजी रु. ८२५०/- पावती क्र. १९९६५ द्वारे भरणा केली. रक्कम भरण्याचे कारण असे की, त्यांनी व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पैसे न भरल्यास पोलीसांच्या स्वाधीन करु अशी सतत धमक्या देत होते. शिक्षणाधिकारी यांनी खोटा रिर्पोट दिला की, मी अग्रीम रक्कम घेऊनही वह्या खरेदी केल्या नाहीत किंवा रक्कमही भरली नाही. त्यांनी मला अंधारात ठेवुन हा रिर्पोट दिला. त्यांनी मला विचारले असता तर मी त्याबाबत खुलासा केला असता. पैसे भरल्यानंतर मला निलंबीत आदेश स्वाधीन करण्यात आले. निलंबन आदेश दि. १४-८-८६ रोजी टाईप करुन ठेवावे. होतेच जेव्हा मी भरले (म्हणजे दि. १९-८-८६ रोजी पैसे भरले) तेव्हां दि. २१-८-८६ ला निलंबीत आदेश दिले.
५) मला निलंबीत करण्यात आल्यामुळे माझ्या मनावर परिणाम झाला.माझ्या २४ वर्षाच्या सेवेवर काही परिणाम होऊ नये म्हणुन या अपेक्षेने मी सदरील रक्कमेचा भरणा केला होता. परंतु रक्कम जमा केल्यानंतर मला निलंबीत करण्यात आले व माझ्याविरुध्द खाते चौकशी सुरु करण्यात आली. खाते चौकशी मध्ये माझ्यातर्फे केलेल्या खुलासा विचारात घेण्यात आला नाही व मला जेष्ठ लिपीक या पदावरुन

कनिष्ठ लिपीक या पदावर ७ वर्षासाठी पदान्वित करण्यात आले त्याचे काहीच कारण नाही. कारण की, महानगरपालिकेच्या अधिकारी वर्ग हे जेंव्हा कोणत्याही प्रकारचे अग्रिम उचलतात तेंव्हा त्यांचे हाताखाली काम करणारे कर्मचारी रक्कम घेतात असे लाखो रुपयाचे अग्रीम धनाचे हिशोंब अजुन येणे बाकी आहे. याची चौकशी व्हावी.

६) मला पदान्वित केल्याचे आदेश दि. २३.१.८७ चे आहे. आदेशात असे म्हटले होते की, आपण त्वरीत कामावर रुजु व्हावे. परंतु दि. २९-१-८७ रोजी मला आदेशक क्र. ८१६/८७ दि. १९-१-८७ म्हणजे ६ दिवसानंतर मला कामावर रुजु करुन घेण्यात आले. यावरुन स्पष्ट होते की, माझ्याबरोबर कसे सुडबुध्दीने वागण्यात आले व मला आर्थिक व मानसिक त्रास देण्यात आला.
७) माझ्याकडुन रक्कम जमा केल्यानंतर जे की, एक शिक्षा आहे. मला पदान्वित करुन दुसरी मोठी शिक्षा देण्यात आली.

तरी आपणांस विनंती की, वरील सादर केलेला खुलासा लक्षात घेता सहानुभूतीपुर्वक विचार करुन पदावन्नतीचे आदेश रद्द करण्यात यावे. व मला पुर्ववत जेष्ठ लिपीक या पदावर दि. २९-१-८७ पासुन पदास्थापीत करण्याचे आदेश देण्यात यावे. ही विनंती.

आपला विश्वासु

स्वाक्षरीत
महंमद उभरदराज खान
लिपीक झोन क्र. ६,
मनपा, औरंगाबाद.

सोबत :- संदर्भीय पत्रक सोबत जोडले आहेत.

**संवाद :**

**मा. उपआयुक्त :** सदर प्रकरणी प्रशासनातर्फे लेखी खुलासा (से) खालील प्रमाणे.

टिप्पणी :-

श्री उमरदराजखान, लिपीक हे शिक्षण विभागात कार्यरत असतांना त्यांची बदली झोन नं. ३ येथे करण्यात आली होती. तथापी त्यांनी शिक्षण विभागाच्या कार्यभार हस्तांतरित केला नाही. तसेच त्यांनी वह्या, पाठयपुस्तक मंडळाकडुन खरेदी करण्याकरीता कार्यालयाकडुन रक्कम रु. ८२५०/- अग्रिम म्हणुन उचलल्यावही वह्या खरेदी केलया नाहीत किंवा सदरील रक्कम कार्यालयात जमा केली नाही म्हणुन त्यांना कार्यालर्यात आदेश क्र. ५९१८/८६ दि. १४-८-८६ अन्वये निलंबीत करण्यात आले व त्यांच्या विरुध्द खाते चौकशी प्रस्तापित करण्यात आली. श्री. व्ही. डी. अनगळ माजी कार्यकारी अभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी चौकशी करुन त्यांच्यावर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द झाल्यामुळे त्यांना कार्यालयीन पत्र क्र. मनपा/अस्था-१/९१९० दि. १८-१२-८६ अन्वये सेवेतुन कमी का करण्यात येऊ नये, म्हणुन अंतीम कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्यांनी त्यांचे स्पष्टीकरण दि.

३१-१२-८६ रोजी सादर केले की, त्यांना देण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात यावी व त्यांना सेवेतुन कमी करु नये.

मा. प्रशासक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी चौकशी अहवाल व श्री उमरदराज खान यांचा विनंती अर्जावर विचार करुन त्यांना कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/७३८/८७ दि. २३-१-८७ अन्वये जेष्ठ लिपीक पदावरुन लिपीक पदावर ७ वर्षाकरीता पदावन्नत करण्यात आले.

तथापी श्री. उमरदराजखान यांना जी शिक्षा करण्यात आली आहे तो निर्णय मा. प्रशासक यांच्या आहे व तो निर्णय सर्वसाधारण सभेचा आहे. असे गृहीत धरुन सदरील प्रकरणात समिती पुढे चर्चा करण्यात येऊ नये असे वाटते.

**ठराव :**

कनिष्ट लिपीक, श्री उमरदराज खान यांचे प्रकरण प्रशासकीय काळातील आहे. प्रशासकीय निर्णय म्हणजे सर्वसाधारण सभेचा निर्णय झालेला आहे. तेव्हां या प्रकरणात श्री. उमरदराज यांना स्थायी समितीसमोर अपिल करता येत नाही. या प्रकरणात त्यांनी न्यायालयात जाणे आवश्यक आहे. असे सर्वानुमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७१/५ :**

श्री. विश्वनाथ मनोहरराव कुलकर्णी निरिक्षक यांनी दाखल केलेल्या अपिलावर चर्चा करणे.

अपिल :

भारतीय संविधानाचे कलम १४ व १६ अतंर्गत आणि

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलमाच्या नियमाअंतर्गत आणि

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे पत्रक क्र. मनपा/आ. न. १/१५४९/९१ दि. १९-४-९१ द्वारे वादीस ३ वर्षाची वेतनवाढ रोखणे बाबत व त्याचा परिणाम सेवा निवृत्त वेतनावर होईल. अशा प्रकारे राखणे बाबत.

मी विश्वनाथ मनोहरराव कुलकर्णी नोकरी जकात निरिक्षक विभाग महानगरपालिका, औरंगाबाद रा. "शिवकृपा" रॉक्सी टॉकीज समोर (सन्मीत्र कॉलनी रोड) औरंगाबाद.

विरुध्द

आयुक्त महानगरपालिका, औंरगाबाद

असे की, मी २९ वर्षापासुन (१-२-१९६३) नगरपालिकेत नोकरीत आहे. सदर कालावधीत मला कार्यालयाकडुन कसल्याही प्रकारचे मेमो किंवा कारणे दाखवा नोटीस अथवा कोणत्याही प्रकारची शिक्षा दिलेली नाही. म्हणजेच मी गेल्या २९ वर्षापासुन महानगरपालिकेत प्रामाणीकपणे सेवा करीत आहे.

सदर प्रकरणात सध्या माझी चुक आहे असे मला वाटत नाही कारण मी श्री. किशन अप्पा यांना सविस्तर कच्ची चिठ्ठी दिली होती. सदर प्रकरणात मला जी शिक्षा देण्यात आली आहे ती नियमबाह्य आहे. त्याचे कारण असे की,

१) श्री. किशन अप्पा राजु अप्पा घ. नं. ४-९-१९, रणमस्तपुरा यांनी कार्यालयात किंवा झोनमध्ये रक्कमेबाबत माझे विरुध्द तक्रार केलेली नाही.

२) मला मुख्य कार्यालयाकडुन मे. आयुक्त साहेब किंवा म. उपआयुक्त साहेब यांचेकडुन सदर प्रकरणाबाबत एकही पत्रक मिळाले नाही. अथवा विचारणाही करण्यात आलेली नाही.
३) मला सदर प्रकरणात आरोप पत्र पण देण्यात आलेले नाही.
४) मला कारणे दाखवा नोटीसपण देण्यात आली नाही.
५) माझे प्रकरणात चौकशी अधिकारी नेमुन चौकी पुर्ण करण्यात आली नाही.
६) वरील सर्व बाबींचा अवलंब न होता एक तर्फी निर्णय देऊन माझे ३ वार्षिक वेतन वाढ सेवा निवृत्ती वेतनावर परिणाम होईल यादृष्टीने कार्यालयीन पत्रक क्र. आ.न. १/१५४९/९१ दि. ८-४-९१ अन्वये रोखली आहे. दिनांक १-५-९१ रोजी माझी वार्षिक वेतनवाढ मला देण्यात आली नाही. त्यामुळे माझे आर्थिक नुकसान झाले व होणार आहे.

तसेच मला फक्त विभागीय अधिकारी झोन नं. ३ यांचे पत्रक क्र. मनपा:वि. क्र. ३/२४३/९१ दि. १५-३-९१ मिळाले व त्याप्रमाणे मी माझा खुलासा दिनांक १९-३-९१ रोजी दिला असुन त्याची एक प्रत मे. आयुक्त साहेब यांचेकडे त्यांचे या प्रकरणात मला एक पत्रक नसतांनासुध्दा दिली असुन त्याची पोहच पावती क्र. ०३८४३२ दि. १९-३-९१ माझे कडे आहे.

तसेच श्री. किसन अप्पा रजु अप्पा यांनी पण मा. आयुक्त मनपा औरंगाबाद यांचेकडे अर्ज दिला आहे की, मला माझे पैसे दि. ९-२-८८ रोजीच परत मिळाले आहे. त्याबाबत माझी काहीच तक्रार नाही.

तरी सुध्दा माझी काहीच चौकशी न करता एकतर्फी हा कठोर निर्णय देऊन माझे आर्थिक नुकसान केलेले आहे.

मी दि. १९-३-९१ रोजी या प्रकरणात जो लेखी खुलासा कार्यालयात दिला आहे. हयामध्ये या प्रकरणाची संपुर्ण माहिती दिलेली आहे.

तरी स्थायी समितीस नम्र विनंती की, कृपया माझे अपील दाखल करुन घेऊन व मी सोबत दिलेल्या खुलासेवर योग्य निर्णय घेऊन मा. आयुक्त यांनी दि. १८-५-९१ रोजी आदेश क्र. आ. न. -१/१५४९ मला दिला आहे. तो रद्य करण्यात यावा ही नम्र विनंती व माझे होणारे आर्थिक नुकसानीतुन माझे कुटूंबियाना साहय कराल अशी अशा आहे.

आपला विश्वासु

स्वाक्षरीत/-
विश्वनाथ मनोहरराव कुलकर्णी
जकात निरिक्षक
महानगरपालिका, औरंगाबाद.

सोबत :-

१) मे. आयुक्त साहेब यांचा आदेश क्र. आ.न-१/१५४९/९१ दि. १८-४-९१ ची प्रत.
२) मी दि. १९-३-९१ रोजी दिलेला खुलाशाची प्रत.
३) श्री किशन अप्पा राजु अप्पा यांनी दिलेल्या अर्जाची सत्यप्रत.
४) मी कच्ची चिठ्ठी दिली त्याची सत्यप्रत.
५) मे. विभागीय अधिकारी यांचे पत्र क्र. वि. क्र. ३/२४३/९१ दि. १५-३-९१ ची प्रत.
६) मी परत विनंती अर्ज दि. २६-५-९१ रोजी दिला त्याची प्रत.

**संवाद :**

**मा. उपआयुक्त :** सदर प्रकरणी प्रशासनातर्फे लेखी खुलासा (से) खालील प्रमाणे.

टिप्पणी :

श्री विश्वनाथराव कुलकर्णी हे झोन क्र. ३ येथे जेष्ठ लिपीक पदावर असतांना दि. ९-२-८८ रोजी मालमत्ता कराच्या रक्कमेपोटी श्री. किशन आप्पा रामुआप्पा रा. रणमस्तपुरा घ. नं. ४-९-१९ यांचेकडुन रक्कम रु. २०००/- वसुल करुन कच्ची पावती दिली. पैसे घेऊन कच्ची पावती देणे हे नियमबाह्य आहे. यावरुन त्यांनी संबंधीत नागरीकास फसविले हे सिध्द झाले. म्हणुन श्री विश्वनाथ कुलकर्णी यांची वार्षिक वेतनवाढ तीन वर्षासाठी पुढील वेतनवाढीवर व पेन्शनवर परिणाम होईल अशा बेताने रोखण्यात आली. तथापी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये मा. आयुक्तांनी जर एखाद्या कर्मचाऱ्यास पदावन्नत केले. नोकरतुन काढुन टाकले किंवा बडतर्फ केले. तर मा. आयुक्तांच्या आदेशाविरुध्द स्थायी समिती समोर अपिल केले जाते. परंतु श्री. विश्वनाथ कुलकर्णी यांना वरील पैकी कोणतीही शिक्षा झालेली नाही. फक्त त्यांना मा. आयुक्त यांच्या अधिकारी कक्षेतील असलेली शिक्षा करण्यात आली आहे.

**ठराव :**

महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस (शिस्त आणि अपील) नियम १९७९ चे कलम ५ मध्ये ज्या किरकोळ शास्ती दर्शविल्या आहेत त्या शास्तीविरुध्द सदरील नियमाचे नियम क्र. १७ अन्वये वरिष्ठ प्राधिकरणाकडे अपिल करता येतो. वरिष्ठ लिपीक श्री कुलकर्णी यांचेकडुन कच्ची पावती देण्याबाबतचे प्रकरण दि. ९-२-८८ रोजी घडले आहे. या नंतर संबंधीत नागरिकांने ३ वर्षाच्या काळात कोणतीही तक्रार केलेली नाही. तेव्हां या आधारे संबंधिताची रोखण्यात आलेली वेतनवाढ योग्य वाटत नाही. म्हणुन वरिष्ठ लिपीक श्री. विश्वनाथ कुलकर्णी यांच्या रोखण्यात आलेल्या वेतन वाढीस सुरळीत करण्यात येऊन संबंधितास निर्दोष ठरविण्यात येते. असे सर्वानुमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७२/६ :**

श्री. रमेश पिता शंकरराव बनकर शाखा अभियंता (विद्युत) यांनी दाखल केलेल्या अपिलावर चर्चा करणे.

**<u>अपील</u> :-**

भारतीय संविधनाचे कलम १४ व १६ अंतर्गत

आणि

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलमाच्या नियमाअंतर्गत

आणि

मा. आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांचे दि. १८-४-१९९१ चे वाढीस एक वर्षीची वेतनवाढ रोखणे बाबत

आणि

रमेश पिता शंकरराव बनकर वय ३४ व्यवसाय नोकरी शाखा अभियंता (विद्युत) विद्युत विभाग महानगरपालिका, औरंगाबाद.

अर्जदार /वादी

रा. विद्यापीठ गेट, म्युनिसिपल क्वॉर्टर्स, औरंगाबाद.

विरुध्द

आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद

१) असे की, मी २३ ऑगस्ट १९८२ पासुन कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदावर औरंगाबाद नगरपालिकेमध्ये रुजु झालो असुन त्यानंतर मला ५ वर्षानी शाखा अभियंता (विद्युत) (वेतन श्रेणी ६००-३०-७५०-४०-९५०) या वेतनश्रेणीसह वरील पदनाम दिल्यावर आजपावेतो विद्युत विभागात समाधानकारक काम करीत आहे.

२) पण दिनांक १८-४-९१ रोजी मा. आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी आदेश क्र./मनपा/अस्था-१/१५४०/९१ अन्वये एक वेतनवाढ एक वर्षाकरीता पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशा बेताने रोखण्यात येते. असा आदेश काढला असुन जो आदेश मला दि. १९-४-९१ रोजी मिळाला आहे.

३) असे की, प्रस्ताव क्रमांक ६६१/४१ व ६६२/४२ नुसार मा. नगरसेवक निधीतुन ज्या ज्या वार्डात २५० वॅट सोडीयम व्हेपर बजाज मेक फिटींग लावण्यासाठी मे. चिंतामणी ट्रेडिंग कंपनी यांना वरील सोडीयम व्हेपर फिटींग पुरविण्यासाठी आदेश देण्यात आले होते.

४) असे की, नगरसेवक निधीतुन लावण्यात आलेल्या २५० वॅट बजाज मेक फिटींगमध्ये "टेस्लो" कंपनीचे बल्ब लावण्यात आले आहेत. असा आरोप करुन साईट वर न जाता एम. बी. रेकॉर्ड केली व कार्यालयाची दिशाभुल करुन मनपाचे आर्थिक नुकसान केले आहे.

५) तसेच वरील कारणांमुळे महानगरपालिकेची बदनामी झाली असुन त्यास आपणास जबाबदार धरण्यात येऊन का निलंबीत करु नये अशी विचारणा करण्यात आली आहे.

६) असे की, वरील आरोप हे निराधार आहेत. असे दाखवुन देतांना वरील २५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग विद्युत भांडारात आल्यानंतर स्टॉक लेजरमध्ये खतावणी केल्यानंतरच लाईनमनला वरील साहित्य विद्युत भांडारातुन दिल्यानंतर बिले तयार करण्यात आले. त्यामुळे "टेस्लो" कंपनीचे बल्ब मी लावुन घेतले हा आरोप निराधार आहे कारण वरील २५० वॅट फिटींग भांडारात आल्यानंतर विद्युत भांडारात व्यवस्थापन पाहणारे श्री पी. आर. बनसोडे यांनी पाहणी केली होती. ही बाब श्री बनसोडे यांनी तेंव्हाच निदर्शनास आणुन द्यावयास पाहिजे होती. म्हणुन साईटवर टेस्ला बल्ब आढळण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

७) असे की, वरील प्रकरणामुळे महानगरपालिकेची बदनामी झाली आहे अशा आरोपाचे खंडन करतांना मी असा खुलासा करु इच्छितो की, मी सदर टेस्ला बल्ब हे एम. आय. डी. सी. भागात माजी महापौर श्री. प्रदीप जैस्वाल यांनी शहर अभियंता श्री बी. अमरनाथ व निवासी अभियंता श्री सिकंदर अली यांच्या सोबत पाहणी केली असता MIDC भागात टेस्ला बल्ब लावल्याचे आढळुन आले आहे. तसेच मा. महापौर यांनी टेस्टला बल्ब जप्त करुन संबंधीत कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन पत्रकार परिषदेत जाहीर केल्यानंतर वर्तमानपत्रातुन बातमी झळकल्यावर वरील प्रकरणाला प्रसिध्दी मिळाली. वरील पेपरबाजी प्रकरणाला मी जबाबदार नाही. कारण वरील एम.आय. डी. सी. भागात मी काम कोठे नसुन वरील एम. आय. डी. सी. भागात मे. लुना इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद या ठेकेदाराने श्री पी. आर. बनसोडे शाखा अभियंता (सध्या उपअभियंता) यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे.

८) असे की, वरील खुलासा दिल्यानंतर सुध्दा माझे स्पष्टीकरण समाधानकारक नाही म्हणुन एक वर्षाची वेतनवाढ रोखण्यात आली.

परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, माझ्या साईटवर टेस्ला बल्ब लावलेले नसतांना सुध्दा माझे विरुध्द कुटील कारस्थान करुन मला पुढील पदोन्नतीची संधी न मिळण्यासाठी केलेला डाव आहे. तसेच मला कोणत्या ना कोणत्या प्रकरणात गुंतवून गोत्यात आणण्याचा प्रयत्न गेल्या दोन/तीन वर्षापासुन चालु आहे.

९) दुसरे असे की, माजी महापौर श्री. जैस्वाल ह्यांनी एम. आय. डी. सी. भागात प्रत्यक्ष टेस्ला कंपनीचे बल्ब जप्त करुन सुध्दा संबंधीत शाखा अभियंता व उपअभियंता यांच्यावर कसलीही कार्यवाही न करता एम.आय.डी.सी. चे प्रकरण दडवुन टाकण्यात आले आहे. ज्यामुळे महानगरपालिकेची बदनामी झाली आहे. तर माझ्यावर बोगस कारवाई का करण्यात आली. याचा विचार व्हावा.

१०) असे की, मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मधील कलम (अ) प्रमाणे ज्या कलमाने ज्या कर्मचाऱ्याचा मुळ पगारात २०० पेक्षा जास्त असल्याने त्या कर्मचाऱ्याच्या विरुध्द शिक्षा करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना नसुन कार्यवाही करण्यापुर्वी सन्माननीय स्थायी समितीची मंजुरी घेणे जरुरी आहे. परंतु विना चौकशी मला नैसर्गिक न्याय पध्दतीपासुन वंचित ठेवले आहे. सदर जे नियमबाह्य व अन्यायकारक आहे.

११) नगरसेवक निधीतुन २५० सोडीयम व्हेपर फिटींग लावण्याच्या प्रकरणावरुन एक वेतनवाढ एक वर्षाकरीता रोखण्याचा मा. आयुक्तांचा आदेश रद्य करावा. हि विनंती.

तरी स्थायी समितीस विनंती की,

अ) कृपया माझे अपील दाखल करुन घेणे व मा. आयुक्तांनी दि. १८-४-९१ काढलेला आदेश क्र. /मनपा/अस्था/१५४०/९१ रद्य करण्यात यावा.

किंवा

ब) हे अपील प्रलंबित असे पर्यंत दि. १८-४-९१ च्या आदेशास स्थगिती देण्यात यावी.

क) न्यायाच्या दृष्टीने जे की, यथोचित आदेश योग्य असेल आणि अर्जदार ज्यास पात्र असेल ते आदेश देण्यात यावेत.

दिनांक :- २-९-१९९१

स्वाक्षरीत/-
रमेश पिता शंकरराव बनकर
शाखा अभियंता (विद्युत)
विद्युत विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद.

**संवाद :**

**श्री. गजानन बारवाल :** एम.आय.डी.सी. भागाचे कामासाठी श्री. बनकर यांची नेमणुक करण्यात आलेली नव्हती या भागत जे कर्मचारी काम करीत होते. त्यांच्या वर कार्यवाही न करता वृत्तपत्रातील बातमीनुसार श्री. बनकर यांच्यावर कार्यवाही करण्यात आली आहे.

**मा. सभापती :** वृत्तपत्रातील बातमीनुसार मा. उप आयुक्त यांनी संबंधीस असलेल्या तिनही कर्मचाऱ्यांना प्रथम नोटीस दिल्या आहेत व नंतर फक्त दोन कर्मचाऱ्यांना नोटीस दिली गेली आहे.

**सहा. आयुक्त-१** : मा. आयुक्त यांच्या आदेशाप्रमाणे फक्त दोन कर्मचाऱ्यांना नोटीस दिल्या आहेत.

**मा. उपआयुक्त :** सदर प्रकरणी प्रशासनातर्फे लेखी खुलासा (से) खालील प्रमाणे.

**टिप्पणी :**

श्री. आर बनकर, शाखा अभियंता विद्युत विभाग यांच्या अधिपत्याखाली विद्युतीकरणाचा जो प्रभाग होता. त्या प्रभागात पथ दिवे बसविण्याकरीता चिंतामणी ट्रेडिंग कंपनी व मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांना काम देण्यात आले होते. व ते दिवे बजाज कंपनीचेच सोडीयम व्हेपर बल्ब बसविण्याचे आदेशीत होते. तथापी प्रत्यक्षात बजाज कंपनीचे सोडीयम व्हेपर न बसवता कमी दर्जाचे सोडीयम व्हेपर बल्ब बसविल्याचे निर्दर्शनास आले होते. ज्या अर्थी त्यांची जबाबदारी होती की, निविदेत नमुद केलयाप्रमाणे गुत्तेदार बल्ब बसवित आहे किंवा नाही याची खात्री करावयास पाहिजे होती परंतु त्यांनी जाणुन बुजून हेतुपुरस्पर कमी दर्जाचे बल्ब खांबावर लावुन घेतले. व एम. बी. मध्ये तशी नोंद करुन बिल प्रमाणीत केले. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले असुन बदनाम झालेली आहे. करीता त्यांची एक वेतन वाढ एक वर्षाकरीता पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशा बेताने रोखण्यात आले.

तथापी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये मा. आयुक्तांनी जर एखाद्या कर्मचाऱ्यास पदावन्नत केले, नोकरीतुन काढुन टाकले, बडतर्फ केले तर मा. आयुक्तांच्या आदेशाविरुध्द स्थायी समितीसमोर अपिल केले जाते. परंतु श्री. आर. एस. बनकर यांना वरील पैकी कोणतीही शिक्षा झालेली नाही. फक्त त्यांना मा. आयुक्त यांच्या अधिकार कक्षेतील असलेली शिक्षा करण्यात आली आहे.

**ठराव :**

महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस (शिस्त आणि अपिल) नियम १९७९ चे कलम ५ मध्ये ज्या किरकोळ शास्ती दर्शविल्या आहेत. त्या शास्ती विरुध्द सदरील नियमाचे नियम क्र. १७ अन्वये वरिष्ठ प्राधिकरणाकडे अपिल करता येते. २५० वॅट सोडीयम व्हेपर बल्बचे प्रकरण माजी महापौर यांचेकडुन उचलण्यात आले आहे. मेसर्स लुना इलेक्ट्रीकल्स आणि चिंतामणी यांनी हे काम केले आह. या दोन्ही फर्मनी केलेल्या कामाची पाहणी करण्यात आली. त्यावेळी तिनही कनिष्ठ अभियंता मा. महापौर यांचे वृत्तानुसार कसुरवार असल्याचे दिसतात. तरी पण एम.आय.डी.सी. विभागाचे कनिष्ठ अभियंता यांच्यावर कार्यवाही केली नाही. सदर काम हे नगरसेवक निधीतुन करण्यात येत होते. या कामासाठी मेसर्स चिंतामणी ट्रेडर्स यांचा माल विद्युत भांडारात जमा केला होता. त्यावेळेस याबाबत कोणीही विचारपुस केली नाही. श्री. बनकर व शाकेर यांनी विद्युत भांडारातुन माल घेऊन लाईनमनजवळ दिला.भांडारात जमा झालेल्या मालाबाबत भांडार अधिक्षक विद्युत यांना विचारणा केली गेली नाही. लाईनमन यांनी भांडारातील माल साईटवर लावला तेव्हा भांडारातुन माल खराब मिळाला किंवा लाईनमनने माल बदलला किंवा कनिष्ठ अभियंता यांनी माल बदलला हे कळु शकत नाही. म्हणुन या प्रकरणात तीनही कर्मचारी दोषी आहेत. असे दिसते. या वरुन सगळया कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावयास पाहिजे. होती. एकाच कर्मचाऱ्यास दोषी ठरविणे योग्य नाही. तरी पण साईटवर आलेल्या मालाची तपासाणी केली नाही याबाबत बनकर यांची गैर जुम्मेदारी दिसते. तरीपण या प्रकरणात संपुर्ण जिम्मेदारी बनकर यांचीच आहे. असे म्हणता

येणार नाही. म्हणुन श्री. बनकर यांची एक वेतनवाढ कायम स्वरुपी रोखण्यात येऊन त्यांना कामात सतर्क राहणे बाबत ताकीद देण्यात येते. असे सर्वानुमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७३/७ :**

श्री. सुरेश बाबुराव संगेवार, इमारत निरिक्षक यांनी दाखल केलेल्या अपिलावर चर्चा करणे.

**अपिल :**

विषय :- दंड माफ करणेबाबत.

संदर्भ :- आपले आदेश क्र. मनपा/अस्था-१/६२१८/९१/ दि. ६-१२-९१.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन मी खालील प्रमाणे अर्ज सादर करतो की, सदरील अर्ज पुनर्विलोकन अर्ज म्हणुन संबोधण्यात यावा.

वरील आदेशानुसार मला शिक्षा म्हणुन रु. २५/- दंड आकारण्यात आला आहे. वास्तविक पाहता दंडाची शिक्षा करणे आगोदर मला समक्ष बोलावुन तोंडी खुलासा करणेस्तव संधी दिली जाणे हे नैसर्गिक न्यायास धरुन आवश्यक बाब होती. परंतु तशी मला संधी न दिल्याने माझेवर अन्याय झालेला आहे. तशातच दंडाची शिक्षा करणेस्तव माझे विरुध्द खाते निहाय कार्यवाहीचा देखील अवलंब करण्यात आलेला नाही.

मला जी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्याचे सविस्तर असे खुलासेवार उत्तर मी दिलेले नाही. याही उपर जर मला तोंडी बाजु मांडण्याची संधी दिली असती तर काही माझ्या बाबींचा समर्थक खुलासा करु शकले असतो. परंतु तशा संधीपासुन मला वंचित केल्याने माझेवर अपार अन्याय झालेला आहे.

दंड करणे ही एक शिक्षा असुन अशी शिक्षा करणेचे आगोदर मा. आयुक्त ज्यांना कर्मचाऱ्याना नेमणुकीचे अधिकार आहेत त्यांचे आदेश घेणे आवश्यक बाब आहे. जेव्हा माझ्या विरुध्द कसल्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी आदेशित झाली नव्हती तेव्हा दंडाची शिक्षा मा. आयुक्तांनी दिलेली नसावी असा माझा समज आहे. वास्तविक पाहता मी माझ्या कामात कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा केलेला नाही. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे पालन करत असतो. जर एखादी चुक झाली असेल तर निव्वळ मानवी चुक अनावधानाने झाली असवी. हेतुपरस्पर व वरिष्ठांना माझा त्रास होणेचे हेतुने केव्हांही वागतो नाही.

तरी विनंती की, मला आकारण्यात आलेला दंडाची शिक्षा रद्य करुन दंड माफ करणेत यावा ही विनंती.

आपला विश्वासु

स्वाक्षरित
एस. बी. संगेवार
इमारत निरिक्षक, विभाग क्र. २,
मनपा औरंगाबाद.

सोबत :- आकारण्यात आलेल्या दंडाची प्रत माहितीस्तव रवाना.

१) मा. आयुक्त साहेब, म.न.पा. औरंगाबाद.
२) मा. उपआयुक्त साहेब, म.न.पा. औरंगाबाद.
३) मा. सहाय्यक आयुक्त साहेब, म.न.पा. औरंगाबाद.
४) मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग, स्थायी समिती म.न.पा. औरंगाबाद.

५) मा. श्री. विजय गोविंद पालीवाल स्थायी समिती म.न.पा. औरंगाबाद.
६) मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर स्थायी समिती म.न.पा. औरंगाबाद.
७) मा. श्री. गजानन बारवाल स्थायी समिती म.न.पा. औरंगाबाद
८) मा. श्री. प्रभाकर सिताराम विधाते स्थायी समिती म.न.पा. औरंगाबाद
९) मा. श्री. केशव काशिनाथ सोनवणे स्थायी समिती म.न.पा. औरंगाबाद
१०) मा. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर स्थायी समिती म.न.पा. औरंगाबाद
११) मा. श्री. फैय्यजखान अहमदखान स्थायी समिती म.न.पा. औरंगाबाद
१२) मा. श्री.जावेद हसनखान कसीम हसन खान स्थायी समिती म.न.पा. औरंगाबाद
१३) मा. श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग स्थायी समिती म.न.पा. औरंगाबाद
१४) मा. श्री. तुळशीराम छगन भगुरे स्थायी समिती म.न.पा. औरंगाबाद
१५) सचिव, स्थायी समिती मनपा औरंगाबाद.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** श्री संगेवार यांना विना परवानगी बांधकाम बाबत जी शिक्षा झाली त्याच प्रमाणे तुळशी बिल्डींग ही विना परवानगी दोन मजली इमारत पाडण्यात आली त्याबाबत संबंधीत इमारत निरीक्षक यांना कोणती शिक्षा झाली.

**श्री. प्रभाकर विधाते :** विना परवानगी बांधकामाबाबत नगरसेवकांकडुन लेखी पत्र दिले जाते. तेव्हां अशा विनापरवानगी बांधकामाबाबत सर्व संबंधीत इमारत निरिक्षक यांना शिक्षा करावी.

**मा. उपआयुक्त :** सदर प्रकरणी प्रशासनातर्फे लेखी खुलासा (से) खालील प्रमाणे.

१) श्री एस. बी. संगेवार इमारत निरिक्षक हे मालमत्ता विभागात कार्यरत असतांना अनाधिकृत बांधकामावर न ठेवल्यामुळे कार्यालयीन पत्रक क्र. मनपा/मामअ/४२३६/९१ दि. २६-९-९१ अन्वये मेमो देण्यात आला होता. त्यांनी मेमोच्या संदर्भात सादर केलेले स्पष्टीकरण समाधानकारक नसल्यामुळे कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/६२१८/९१ दिनांक ६-१२-९१ अन्वये त्यांना रु. २५/- दंड आकरण्यात आला.

२) नारळीबाग येथील सिटीएस नं. २६६२ येथे विना परवानगी बांधकाम होत असतांना त्यांनी निष्काळजीपणा दाखवुन सदरील अनाधिकृत बांधकाम पुर्ण झाल्यावर पंचनामे केले परंतु नोटीसेस तामील केल्या नाहीत तसेच मा. न्यायालयाचे जैसे थे परिस्थिती असतांना त्यांनी त्यावर लक्ष दिले नाही. करीता त्यांच्या दोन वार्षिक वेतन वाढी कायमस्वरुपाच्या बंद करण्यात आल्या.

तथापी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये मा. आयुक्तांनी जर एखाद्या कर्मचाऱ्यास पदावन्नत केले, नोकरीतुन काढुन टाकले किंवा बडतर्फ केले तर मा. आयुक्तांच्या आदेशाविरुध्द स्थायी समितीसमोर अपील केले जाते. परंतु श्री. एस. बी. संगेवार यांना वरीलपैकी कोणतीही शिक्षा झालेली नाही. फक्त त्यांना मा. आयुक्त यांच्या अधिकार कक्षेतील असलेली शिक्षा करण्यात आली आहे.

**ठराव :**

महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस (शिस्त आणि अपिल) नियम १९७९ चे कलम ५ मध्ये ज्या किरकोळ शास्ती दर्शविलेल्या आहेत त्या शास्ती विरुध्द नियमाचे नियम क्र. १७ अन्वये

वरिष्ठ प्राधिकरणाकडे अपिल करता येते. सदर प्रकरणी अभ्यास केल्यानंतर या प्रकरणात पहिली चुक सहाय्यक संचालक नगररचना यांची आहे. संबंधीतांनी साईटची पाहणी न करता चुकीच्या जागेवर परवानगी दिली. ही बाब लक्षात आल्यानंतर देण्यात आलेली परवानगी दि. २१-८-९१ रोजी रिव्होक केली यावरुन संबंधीतास बांधकाम करण्यासाठी साडेचार महिन्याच्या कालावधी मिळाला या साडेचार महिन्याच्या कालावधीत जास्तीत जास्त बांधकाम होऊ शकते. बांधकाम परवानगी रद्य झाल्यानंतर श्री. संगेवार यांनी २६-८-९१ व १८-९-९१ ला असे दोन पंचानामे करुन कार्यालयात दाखल केले. यावर नगररचना विभागाकडुन काहीच कार्यवाही करण्यात आली नाही. यानंतर न्यायालयाचे निर्णयानुसार पंचानामा केला आहे. इमारत निरिक्षकांनी पंचनामा करुन दाखल केल्यावरही मालमत्ता अधिकारी यांनी कार्यवाही केली नाही.

या प्रकरणात सहाय्यक संचालक नगररचना, मालमत्ता अधिकारी, जेष्ठ इमारत निरिक्षक यांचेवर काहीच कार्यवाही केली नाही. यावरुन इमारत निरिक्षक श्री. संगेवार यांनी दाखल केलेल्या पंचनाम्यावरुन सादर करण्यात ते गाफिल होते. असे दिसत नाही. तसेच या प्रकरणात विभागीय अधिकारी यांनीही काहीच कार्यवाही केली नाही ही बाब योग्य नाही. म्हणुन इमारत निरिक्षक श्री. संगेवार यांचे दोन वेतनवाढ रोखण्याबाबतचा आदेश रद्य करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७४/८ :**

श्री. मोहंमद युसूफ अहेमद शेख शाखा अभियंता यांनी दाखल केलेल्या अपिलावर चर्चा करणे.

**<u>अपिल</u>**

भारतीय संविधानाचे कलम ३०९, ३११, २२६ चे अंतर्गत

आणि

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे उपकलम (४) (ब) (क) व उपकलम (२) (ब) (क) चे अंतर्गत.

आणि

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे उपकलम ४ चे परंतु क अंतर्गत अपील मो. युसूफ अहेमद पिता शेख अहेमद.

वादी /अर्जदार

मो. युसूफ अहेमद पिता शेख अहेमद
वय वर्ष ३६, धंदा - शाखा अभियंता
महानगरपालिका औरंगाबाद.
पत्ता :- टाकळकर सोसायटी
बायजीपुरा, औरंगाबाद.

**विरुध्द**

मे. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रतिवादी / गैरअर्जदार

१) मी खालील सही करणार अर्जदार श्री मोहमंद युसूफ अहेमद शेख माननीय स्थायी समितीपुढे प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोटकलम ४ अन्वये खालील मुद्यावर अपिल विचारार्थ सादर करीत आहे.

२) असे की, सन १९८३ पासुन महानगरपालिकेमध्ये माझी नेमणूक कनिष्ठ अभियंता म्हणुन करण्यात आली होती. व त्या आधारे मी नगर रचना विभाग, जलनिःसारण विभाग बांधकाम विभाग व कर निर्धारण विभागात समाधानकारक काम केले आहे. सध्या मी कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण विभागात शाखा अभियंता म्हणुन करीत आहे. सध्या माझी बदली बांधकाम-२ या विभागात झालेली आहे.

३) असे की, १३-९-१९८९ रोजी मे. आयुक्त महानगरपालिका यांनी आदेश क्रमांक अेएमसी/एसटी-१/८९/५००८ दि. १३/९/८९ अन्वये अचानकपणे मला कोणत्याही प्रकारची नोटीस न देता निलंबनाचा आदेश काढले व तो आदेश मला दि. १३-९-८९ रोजी मिळाला. सदर आदेशाचा उल्लेख वादग्रस्त (Impugned Order) असा केला आहे. व सदरील आदेशाची प्रत एक्झीबीट "ए" वर जोडली आहे.

४) असे की, दि. १३-९-८९ रोजी काढलेला निलंबनाचा आदेशात कोणत्या नियमाप्रमाणे निलंबीत केलेले आहे. याचा उल्लेख आदेशात नमुद केलेला नाही. तसेच दिनांक ५-७-९० रोजी दिलेल्या आरोप पत्रात कोणत्या आरोपपत्र दिलेले आहे. याचा पण उल्लेख केलेला नाही. तसेच खाते चौकशी पुर्ण करुन दि. २६-६-९१ रोजी माझेवर पाच वार्षिक वेतनवाढी स्थगित ठेवण्याचे व निलंबनाचा काळ रजेत रुपांतर करण्याचे आदेश दिलेले आहे. त्यामध्ये पण कोणत्या नियमाअंतर्गत मला ही शिक्षा देण्यात आलेली आहे. त्याचा पण उल्लेख केलेला नाही.

५) असे की, माझी बदली कर आकारणी विभागात दि. ३१-८-८९ रोजी फेर आकरणीचे कामासाठी करण्यात आली होती.

६) दि. १-९-८९ ते १२-९-८९ म्हणजेच १२ दिवसात कर आकारणी विभागाचे वार्ड क्र. ५ चे ब्लॉक क्र. २-११-१२-१४-१५-१६ मोहल्ला भावसिंगपुरा, आशा नगर, अमित नगर, इ. असे एकुण आठ बंचेस मिळकतीचे रिव्हिजनचे Calculation & Correction etc. केलेले आहे व वेळोवेळी करमुल्य निर्धारण अधिकारी यांना दाखविण्यात आलेले आहे. सदरील सर्व बंचेस माझ्या सहीने आजही कर आकारणी विभागात उपलब्ध आहेत. मी माझ्या सहकार्यापेक्षा अधिकच काम केलेले आहे. असे आपल्याला स्पष्ट दिसुन येईल व मी केलेले काम समाधानकारक नाही असा आरोप निराधार व खोटा असुन दिशाभूल करणारी आहे. सदरील आरोपाची प्रत एक्झीटीक "बी" वर जोडली आहे.

७) असे की, मी मा. स्थायी समितीपुढे मा.आयुक्तांनी फक्त आरोप पत्रात एकच आरोप दिला होता व त्यानंतर अतिरिक्त -३ आरोप लावुन मला दुसरा व्यतिरिक्त आरोप पत्र देण्यात आला होता. परंतु माझ्या निलंबनामाच्या आदेशात प्रथम एकच आरोप होता. व नंतर अतिरिक्त आरोप माझ्यावर विनाकारण व हेतुपरस्पर लावण्यात आले आहे. जे नियमबाह्य आहे.

८) असे की, १-९-८९-१०-९-८९ पर्यंत इतके कामाचे दिवस होतात व त्या आधारे मी सरासरी वरील प्रमाणे आठ बंचेसचे मिळकतीचे कॅलक्युलेशन केलेले आहे जे जस्टिफिकेशन प्रमाणे बरोबर आहे.

९) असे की, दि. १२-९-८९ रोजी मा. आयुक्त यांनी अचानकपणे कर आकारणी विभागात भेट दिली व त्यावेळेस मी गैरहजर होतो. त्याबाबत मी असा स्पष्टपणे खुलासा करीत आहे की दि. ११-९-८९ रोजी किरकोळ रजा दिली होती. व रजेचा हक्क असतांना माझी किरकोळ रजा नामंजुर करण्यात आली होती. परंतु रजा नामंजुर करण्यात आलेल्या बद्दल मला कोणत्याही प्रकारची सुचना आजपर्यंत देण्यात आलेली नाही. तरी माझे मते मी रजेवर होतो व रजेचा हक्क असतांना नियमाप्रमाणे रजा नामंजुर करता येत नाही.

१०) असे की, सदरील फेर आकारणीचे काम अत्यंत महत्त्वपुर्ण होते. त्याची मला जाणीव होती. म्हणुन मी आजारी असतांना सुध्दा दि. १२-९-८९ रोजी दुपारी दोन वाजेपर्यंत काम केले. दुपारच्या जेवणासाठी गेलो असता माझी प्रकृती अचानक कामाच्या जास्त तणावामुळे पुन्हा बिघडली म्हणुन कार्यालयास मी हजर राहु शकलो नाही. तरीपण एव्हढे लहानसे कारणावरुन मला मा. आयुक्तांनी निलंबीत केले. जे नियमबाह्य आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१) (बी) अन्वये अधिकार नसतांना स्थायी समितीची मंजुरी न घेता निलंबनाचे आदेश काढले आहे. ते नियम बाह्य आहे.

११) असे की, मुंबई करमुल्य निर्धारण अधिकारी यांनी आपले पत्रक क्रमांक २५५/९० दि. २२-६-९० रोजी मी दि. १-९-८९ व २-९-८९ रोजी कार्यालयात उपस्थित नव्हतो असा रिर्पोट मा. आयुक्तांना दिला जो निराधार व खोटा असून मी दि. १-९-८९ व २-९-८९ रोजी कार्यालयात उपस्थित होतो व व्यवस्थितरित्या काम केले आहे. व त्या आधारे मला त्या दिवसाचे पगार देण्यात आलेले आहे. तसेच १-९-८९ प २-९-८९ मी गैरहजर होतो. याबाबत करमुल्य निर्धारण अधिकारी किंवा आयुक्त महानगरपालिका यांनी कधीच कळविलेले नाही. तसेच दि. २-९-८९ रोजी काढलेले पत्रकानुसार प्रत्येक गट प्रमुखांनी आपआपल्या कामाचे अहवाल कर मुल्य निर्धारण अधिकारी यांना द्यावा. असे कळविले होते. असे करमुल्य निर्धारण अधिकारी यांनी २२-६-९० च्या पत्रात उल्लेख केलेले आहे. परंतु वास्तविक पाहता हे पत्र मला मिळालेले नाही. व करमुल्य निर्धारण याचे दि. २२-६-९० रोजीचे पत्रक दिशाभुल करणारे आहे. पत्राची पत्र एक्झीबीट "बी" वर जोडण्यात येत आहे.

१२) असे की, पुर्वी मा. आयुक्तांनी मला एकच आरोपावर निलंबीत केले होते. त्या नंतर माझ्यावर अतिरिक्त -३ आरोप लावण्यात आले आहे. विनाकारण हेतुपूरस्कर मला त्रास देण्याचे बिनबुडाचे आरोप लावले आहे. हे नियमबाह्य आहे. व माननीय आयुक्तांनी वरील कृत्य सुडबुध्दीने मला जास्तीत जास्त शिक्षा व्हावी. म्हणुन आरोप लावले आहे जे निराधार आहे. व मी त्याचे सविस्तर उत्तर ही दिलेले असतांना माझ्या अर्जावर काहीच विचार करण्यात आलेला नाही. वरील आरोप पत्र "एक्झीबीट" "बी" वर जोडण्यात येत आहे. दि. १९-१०-८९ ची कारणे दाखवा नोटीस एक्झी "इ" वर माझे उत्तर एक्झी "एफ" वर जोडले आहेत.

१३) असे की, आरोप क्रमांक तिनमध्ये असे नमुद केले आहे की, मी बांधकाम विभागात काम करीत असतांना सात दिवस गैरहजर होतो व कोणत्याही प्रकारची माझ्या हाताखाली कामाची देखरेख केली नाही. हा आरोप खोटा व निराधार आहे. याबाबत उपअभियंता श्री. गायकवाड यांनी असे सांगितले आहे की, मी सदरील कामाची देखरेख करीत होतो. परंतु तसे ऑफिसला कळविलेले नाही. याबाबत मी असे कळवु इच्छितो की, मी सात दिवस गैरहजर नव्हतो नियमीतपणे काम केलेले आहे. साईटवर देखरेख केली व मधुन ऑफिसमध्ये येऊन याच्या सुचनेवरुन अंदाजपत्रके

इत्यादी तयार केलेले आहे व दिनांक ५-३-८९ रोजी टाऊन हॉल येथील रोडचे अंदाजपत्रक तयार केले. चौकशी अधिकारी यांनी दि. ५-७-८९ ऐवजी दि. ५-३-९१ असे लिहीले आहे. ते चुकीचे आहे. तसेच ७ दिवसाचा गैरहजेरी बद्दलचा आरोप तो निराधार व खोटा आहे. व माझ्यावर हेतु परस्पर लावण्यात आला आहे. तसेच याबद्दल मी दिनांक ८-८-९० रोजी सादर केलेले स्पष्टीकरणामध्ये कोणकोणते काम केले याचा स्पष्ट उल्लेख केला आहे. सदर दाखल केलेल्या अर्जाची प्रत "एक्झीट" जी वर जोडण्यात येत आहे. चौकशी अहवाल "एक्झीटबीट एच" वर जोडण्यात येत आहे.

१४) असे की, दि. १-८-८९ते २०-८-८९ पर्यंत माझी गैरहजेरी लावण्यात आली आहे. त्याबद्दल मी असे स्पष्टीकरण देतो की, प्रथम मी दि. १-८-८९ ते ६-८-८९ पर्यंत मी किरकोळ रजा घेतली होती. परंतु माझी प्रकृती बरोबर नसल्यामुळे मी लगेच ७-८-८९ रोजी वैद्यकीय प्रमाणपत्रासह दि. २०-८-८९ पर्यंत खास रजा मंजुर करावी. याबद्दल विनंती केली होती व दि. ११-८-८९ रोजी प्रमाणपत्रही देण्यात आलेले आहे. सदरील दोन्ही अर्जासह उपअभियंता श्री. गायकवाड यांनी पत्र क्र. ६१३/८९ दि. २८-८-८९ रोजी म्हणजे रजेचा उपभोग केल्याच्या आठ दिवसानंतर शहर अभियंता यांचेकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे. जे वास्तविक पाहता चुकीचा आहे व नियमबाह्य आहे तसेच माझे अर्ज शहर अभियंता यांच्याकडे न पाठविले उपआयुक्त मनपा किंवा अस्थापना विभागात पाठविले असते तर माझी रजा मंजुर झाली असती परंतु उपअभियंता यांनी तसे न करता माझी रजा मंजुर करण्यास विनाकारण विलंब केला व वरिष्ठांना माझ्याबाबत दिशाभुल केली तसेच दुपारी ३ ते ५.३० पर्यंत हजर राहावे असे २९-७-८९ रोजी पत्रान्वये उपअभियंता यांनी कळविले होते. या बद्दल मी असे स्पष्टीकरण करतो की, मी वरील आदेशाचे पालन केले व वेळोवेळी कार्यालयात हजर राहात कार्यालयीन काम करीत होतो. कदाचीत हजेरी पटावर सही करण्याचे विसरलो असुन परंतु याबद्दल संबंधीत उपअभियंता श्री. गायकवाड यांनी कधीही सुचीत केले नाही. आरोपपत्र क्र. ३ मध्ये दि. २७-७-८९ चे मला मिळालेले नाही म्हणुन माझेवर लावलेला आरोप धांदात खोटा, निराधार, बिनबुडाचा आहे.

१५) असे की, आरोप क्र. ४ मध्ये मी वरिष्ठांचे आदेशाचे पालन करीत नाही हा आरोप खोटा आहे असे चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवालामध्ये नमुद केले आहे.

१६) असे की, आरोप क्र. ४ चे दुसरा भाग म्हणजे सीटी.एस/नं. १२४८३/९ व १० जालना रोडची बांधकाम परवानगी बद्यल सदरील बांधकाम परवानगी क्र. २७४/८६ संचिका क्र. ४४४/१७/८५ दि. २५-४-८६ प्लॉटधारक सुखबीरसिंग तारासिंग छतवाल यांचे मालकीची असुन बांधकामाची परवानगी सन १९८६ मध्ये देण्यात आली होती. याबद्दल माझ्यावर असा आरोप लावण्यात आला की, याचे उत्तर असे की, सदरील जागेचे ले-आऊट सन १९८२ मध्ये मंजुर झालेले असुन सदरील ले-आऊट मंजुर करतांना त्यावर कोणत्याही प्रकारचे मंजुर आराखडयाचे किंवा नियोजीत रस्ते १३२ फुट पैकी किती बाधीत भाग आहे. दाखविण्यात आलेला नाही. याचा अर्थ असा की, संबंधीत मालकांना १३२ फुट रोड सोडुन ले-आऊट मंजुर करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे मी मनपाचे विकास नियंत्रण नियमावली नुसारच चाचणी करुन माझी सहीने मी रचनाकार यांना सादर केली व नगररचनाकार श्री. चौथाई यांनी सदरील बांधकाम परवानगीची फाईल स्वत: तपासुन व मंजुर रेखांकन बघुन तसेच डी. डी. पी. शिट पाहुन त्यानंतर सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडे फाईल पुढील

मंजुरीसाठी पाठविली होती. याबाबत श्री. चौथाई यांचे कोणत्याही प्रकारचे जबाब देण्यात आलेले नाही किंवा ऑफिसतर्फे त्याचा खुलासा मागविण्यात आला नाही. व त्यानंतर सदरील संचिका श्री. चौथाई यांनी सहाय्यक संचालक नगर रचना श्री. फडतरे साहेब यांच्याकडे पाठविली व त्यांनी सुध्दा ती संचिका तपासुन ले-आऊट इत्यादी बघुन आपली पुर्ण खात्री करुनच सदरील संचिका प्रशासक साहेबाकडे पाठविण्यात आली. माझ्यापेक्षा दोन तांत्रिक वरिष्ठ अधिकारी यांनी सुध्दा कोणतीही बाब माझ्यावर निर्दशनास आणुन दिलेली नाही. तसेच मी याबाबत असाही खुलासा करतो की, जेंव्हा १३२ फुट रोड सोडुन रेखांकन मंजुर करुन रितसर परवानगी दिल्यानंतर कदाचित संबंधीत घर मालकांना बांधकाम पुढे सरकवुन घेवुन केला असेल कारण सदरील घर मालकांनी परवानगी व्यतिरिक्त इतरही काम केले आहे. तर याबाबत माझी काहीही चुक नाही. तसेच वास्तविक पाहता शिवशक्ती कॉलनी सदरील बांधकाम सध्या संपुर्ण इमारती ज्यांना पुर्वी परवानगी देण्यात आलेली आहे. एकाच बिल्डींग लाईनमये बांधलेले आहे. तरी मी छाननी केलेले बांधकाम परवानगी बरोबर असु शकते.

१७) असे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१) (ब) प्रमाणे निलंबनाचा अधिकार फक्त स्थायी समितीला आहे.तरी मा. आयुक्त यांनी मला दि. १३-९-८९ अन्वये केलेली निलंबनाची कार्यवाही नियमबाह्य आहे.

१८) असे की, मला आदेश क्र. Ame/Est-१/८९/५००८ दि. १३/९/८९ आधारे प्रथम निलंबीत करण्यात आलेले आहे व त्यानंतर मला कार्यालयानी पत्र क्रमांक ५५९८ दि. १९-१०-८९ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्यामध्ये फक्त कर निर्धारण विभाग मध्ये दि. १२-९-८९ रोजी गैरहजर होतो व नियमीतपणे कार्यालयात काम केले नाही. याबाबत विचारणा करण्यात आलेली होती. त्या कारणे दाखवा नोटीसमध्ये माझे दोन वार्षीक वेतन वाढी का स्थगित करु नये असा उल्लेख केला होता.

१९) असे की, सदरील कारणे दाखवा नोटीसचे सविस्तर उत्तर मी दि. २६-१०-८९ रोजी दिलेले होते व त्यानंतर कोणत्याही प्रकारचे कारणे दाखवा नोटीस न देता माझ्यावर अजुन दोन आरोप करण्यात आले. जे नियमबाह्य व हेतु पुरस्सर आहे. मला त्रास देण्याच्या हेतुने लावण्यात आलेले आहे. बीएमसी. एस. आर. १९८१ नुसार नियमाविरुध्द केलेली कार्यवाही आहे.

२०) असे की, मी दि. १२-९-८९ रोजी फक्त अर्धा दिवस गैरहजर होतो व कर आकारणी विभागात मी फक्त १२ दिवस काम केलेले आहे. (सुट्या धरुन) या १२ दिवसात मी जे काम केलेले आहे. त्याचा खुलासा वरीलप्रमाणे दिलेला आहे व कोणत्याही कर्मचाऱ्याचा काम बरे आहे किंवा वाईट आहे या १२ दिवसामध्ये कळु शकत नाही. तसेच या बाबत मला कोणत्याही प्रकारची लेखी वा तोंडी सुचना दिलेली नाही व अचानकपणे मला निलंबीत केले व मानसिक त्रास दिला.

२१) तरी मे. अध्यक्ष, स्थायी समिती महानगरपालिका, यांना नम्र विनंती की, (अ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये मी सदरील अपिल मुदतीच्या आत दाखल करीत आहे. व मा. आयुक्तांनी (श्री. मुन्सीलाल गौतम) जाता जाता दिलेला आदेश क्र. मनपा/अस्था-१ २६३२/९१ दि. २७-६-९१ रद्य करण्यात यावा.

२२) चौकशी अधिकारी यांनी माझी बाजु ऐकून न घेता पुर्णपणे एकतर्फी कार्यवाही करुन कारणे दाखवा नोटीस मध्ये दोन वार्षिक वेतनवाढ स्थगित का करु नये असा

उल्लेख केलेला असतांनासुध्दा माझे ५ वार्षिक वेतनवाढीवर स्थगित करण्यात आलेले आहे. जे त्यांच्या अधिकारकक्षेत नसुन तसेच नियमाप्रमाणे करता येत नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये शिक्षा देण्याचा अधिकार स्थायी समितीचा आहे.

क) वरील अपिल दि. २७-६-९१ रोजी दिलेले पाच वार्षिक वेतनवाढ स्थगित करुन व माझा निलंबनाचा काळ रजेमध्ये रुपांतरीत करण्यात यावा. या आदेशास माझी अपिल प्रलंबीत असे पर्यंत स्थगिती देण्यात यावी व तसेच नियमाप्रमाणे सहा महिन्याच्या आत चौकशी पुर्ण झाली पाहिजे किंवा सुरु करण्यात आली पाहिजे असा नियम असतांना माझ्याबाबत साडेसात महिन्याचा कालावधीत कोणत्याही प्रकारची चौकशी न करता मला परत कामावर घेण्यात आलेले होते. तेव्हां साडेसात महिन्याचा कालावधी रजेमध्ये रुपांतरीत करता येत नाही कारण की, सदरील चुक माझी नसुन प्रशासनाची आहे. तरी मे. साहेबास विनंती की माझा निलंबनाचा काळ रजेमध्ये रुपांतर न करता पुर्ण पगार देण्यात यावा ही विनंती.

ड) दि. २७-६-९१ रोजी दिलेल्या आदेशापुर्वी त्या अनुषंगाने मला कोणत्याही प्रकारची कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली नाही व वरील शिक्षा मला देण्यात येत आहे. याबाबत सुध्दा सुचित करण्यात आलेले नाही.

**संवाद :**

**विधी सल्लागार :** शाखा अभियंता श्री. शेख युसूफ यांच्यावर खालील प्रमाणे तीन आरोप आहेत- १) श्री. शेख युसूफ हे आठ ते बारा सप्टेंबर ८९ या काळात गैरहजर असतांनाही त्यांनी गैरहजेरीच्या काळात सहया केल्या आहेत. २) श्री. शेख शाखा अभियंता हे त्यांच्या कामात निष्काळजी असुन त्यांना दिलेल्या कामात रस घेत नाहीत. ३) शाखा अभियंता श्री. शेख युसूफ यांना गैरहजर राहण्याची सवय असुन मा. आयुक्त यांचे पाहणीचे वेळी गैरहजर आढळुन आले आहेत.

**मा. सभापती :** चौकशी अहवाल पाहिला असता पहिला आरोप सिध्द झाला, दुसरा आरोप अंशत: सिध्द झाला आणि तिसरा आरोप सिध्द झाला नाही असे दिसुन आले आहे.

**मा. उपआयुक्त :** सदर प्रकरणी प्रशासनातर्फे लेखी खुलासा (से) खालील प्रमाणे .

**<u>टिप्पणी :</u>**

श्री. एम. वाय. शेख शाखा अभियंता यांना कर आकारणीच्या कामात निष्काळजीपणा व अनियमित काम केल्यामुळे कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/५००८/८९ दिनांक १३-९-८९ अन्वये निलंबीत करण्यात आले होते व त्यांच्या विरुध्द खाते चौकशी प्रमाणीत करण्यात आली. श्री. जी. टी. खाडीलकर माजी मुख्य लेखापरिक्षक यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती. परंतु चौकशी मुदतीत पुर्ण न झाल्यामुळे कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/१८३४/ ९०/ दि. २१/४/९० अन्वये खाते चौकशी प्रलंबीत ठेवुन त्यांना कामावर रुजु करुन घेण्यात आले नंतर चौकशी अधिकारी यांनी खाते चौकशी पुर्ण करुन सिध्द केले की, त्यांनी कार्यालयीन कामात निष्काळजीपणा दाखविला व कार्यालयीन कामा करीता नियमीत हजर राहत नाही. तसेच ते कार्यालयीन काम करण्यास पात्र नाहीत. चौकशी अहवाल वर मा. आयुक्त यांनी निर्णय दिला की, त्यांचे

वार्षिक वेतन वाढ पुढील वेतन वाढीवर व सेवा निवृत्तीवर परिणाम होईल अशारितीने ५ वर्षाकरीता रोखण्यात आले तसेच त्यांचा निलंबन काळ देय असलेल्या रजेत रुपांतरीत करण्यात आला. तथापी मुंबई प्रांतिक महानगपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये मा. आयुक्तांनी जर एखाद्या कर्मचाऱ्यास पदावन्नत केले, नोकरीतुन काढुन टाकले किंवा बडतर्फ केले तर मा. आयुक्तांच्या आदेशाविरुध्द स्थायी समिती समोर अपिल केले जाते. परंतु श्री. एम. वाय. शेख यांना वरीलपैकी कोणतीही शिक्षा झालेली नाही. फक्त त्यांना मा. आयुक्त यांच्या अधिकार कक्षेतील असलेली शिक्षा करण्यात आली आहे.

**ठराव :**

महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस (शिस्त आणि अपिल) नियम १९७९ चे कलम ५ मध्ये ज्या किरकोळ शास्ती दाखविल्या आहेत. त्या शास्ती विरुध्द सदरील नियमाचे नियम क्र. १७ अन्वये वरिष्ठ प्राधिकरणाकडे अपिल करता येते. मा. आयुक्त यांनी कर आकारणी विभागास भेट दिली त्यावेळी शाखा अभियंता श्री शेख हे हजर नव्हते. शाखा अभियंता श्री. शेख याचे बाबतीत वरिष्ठांनी अहवाल दिला तरी पण श्री शेख यांना जे काम देण्यात आले होते ते त्यांनी पुर्ण केले आहे. असे वरिष्ठांनी चौकशीच्या वेळी सांगितले आहे. याच प्रकरणाला धरुन त्यांच्यावर दुसरे प्रकरणदाखल करणे योग्य नाही. श्री. शेख यांना यापुर्वी चांगले काम केले म्हणुन अगाऊ वेतन वाढ मिळाली आहे. यावरुन ते दोषी आहेत असे दिसत नाही. बांधकाम परवानगीच्या एका प्रकरणात त्यांना दोषी धरण्यात आले आहे. परंतु ते आऊट प्रकरणाची परवानगी कनिष्ठ अभियंता देत नाहीत. मंजुर झालेल्या ले-आऊट प्रमाणे श्री. शेख यांनी बांधकाम परवानगी दिली आहे. त्यास सहाय्यक संचालक, नगररचना यांनी मान्यता व परवानगी दिली यावरुन परवानगी चुकीची असेल तर सहाय्यक संचालक नगर रचना हेही दोषी ठरु शकतात. तरी पण सहाय्यक संचालक नगर रचना यांनी मंजुरी दिली आहे. यावरुन त्यांची चुक नसुन सन १९८२ मध्ये या भागाचा जो ले-आऊट मंजुर झाला तो चुक असल्याने ही चुक झाली आहे. म्हणुन शाखा अभियंता श्री. शेख युसूफ यांचे रोखण्यात आलेले पाच वेतनवाढ शिथिल करण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.